१

# प्रागैतिहासिक भारत

**ले : आचार्य नी. र. वऱ्हाडपांडे**

३८, हिंदुस्थान कॉलनी, अमरावती मार्ग, दूरभाष- ०७१२- २५२२८०८

## कलियुगाची ऐतिहासिकता

आज इतिहासकारात मान्य असलेल्या मताप्रमाणे प्रागैतिहासिक भारत म्हणजे बुद्धपूर्व भारत या भारताला प्रागैतिहासिक म्हणण्याचे कारण बुद्धापूर्वी घडलेल्या घटनांचे काल माहीत नाहीत असे सांगण्यात येते.

बुद्धाच्या पूर्वी घडलेल्या घटनांचा काल मुळीच माहीत नाही हे मत मान्य करता येत नाही. बुद्धाच्या पूर्वी घडलेल्या भारतीय युद्धाचे वर्ष महाभारतात स्पष्टपणे सांगितलेले आहे. भारतीय युद्ध कलि-द्वापाराच्या सन्धीत झाले असा महाभारतात स्पष्ट उल्लेख आहे. हा सन्धि २०० वर्षांचा होता. म्हणजे भारतीय युद्धाच्या वर्षांबद्दल दोनशे वर्षांपेक्षा जास्त वाद वस्तुतः सम्भवू नये. लक्षश्लोकात्मक महाभारत ख्रिस्तोत्तर ५० मध्ये उपलब्ध होते हे त्या काळात भारतात आलेल्या क्रायसोस्टोम या ग्रीक प्रवाशाच्या साक्षीवरून सिद्ध होते. तेव्हा हे वचन महाभारतात ख्रिस्तोत्तर काळी घालण्यात आलेल्या तुरळक श्लोकापैकी आहे असे म्हणता येत नाही. तसे असले तरी ते खोटे आहे असे त्यावरून सिद्ध होत नाही. हे वचन युधिष्ठिराच्या राज्यारोहणाच्या काळचे नाही असे मानण्यास काहीच प्रमाण नाही. कारण कलि म्हणजे युद्ध व कलियुग हे युद्धापासून गणना करते.या युगाला युधिष्ठिराने युधिष्ठिर युग म्हटले नाही कारण तो शालीनतेबद्दल प्रसिद्ध होता.

कलियुगाचा दुसरा उल्लेख भागवतात आहे. (अध्याय २ स्कन्ध १२) कृष्णाच्या निर्याणापासून लोकात कलि शिरला असे भागवताचे वचन आहे.याचा अर्थ भारतीय युद्ध ख्रि.पू. ३१०१ च्या ३६ वर्षे आधी झाले असा होऊ शकतो. भागवताचा उल्लेख जैमिनीय अश्वमेध पर्वात आहे. हे पर्व ख्रि. पू. १०० च्या सुमाराचे आहे.यावरून कलियुगाचा हा उल्लेख ख्रिस्तपूर्व म्हणविला जाऊ शकतो.

श्रीहरिस्वामी याने लिहिलेल्या शतपथ ब्राह्मणावरील भाष्यात खालील श्लोक आहे.

यदाशब्दानां कलेर्जग्मुः सप्त, त्रिंशच्छतानि च।
चत्वारिशत्समाश्चान्यास्तदा भाष्यमिदं कृतम्।।

जेव्हा कलीची ७+ ३०००+ ४० = ३०४७ वर्षे गेली तेव्हा हे भाष्य लिहिले. म्हणजे हे भाष्य ख्रि.पू. ३१०१ हा कलियुगाचा प्रारंभ मानला तर ख्रि.पू. ५४ मध्ये

लिहिले. हा काळ विक्रमाच्या काळाशी जुळतो. श्रीकृष्ण निधनापासून कलियुग मानले तर जुळत नाही.

पण भागवताचे म्हणणे श्रीकृष्ण निधनामुळे लोकात कलि म्हणजे अनिष्ट प्रवृत्ती शिरल्या असे आहे. त्या वर्षांपासून कलियुग सुरु झाले असा त्याचा अर्थ असेलचअसे नाही. शिवाय कृष्णाला देवत्व प्राप्त झाल्यावरच त्याच्यापासून कालगणना सुरु होण्याचा सम्भव आहे. तो जिवंत असताना त्याला देवत्व प्राप्त झाले असते तर खुद्द यादवातील एका मोठ्या गटासकट अकरा अक्षोहिणींचे सैन्य त्याच्याविरुद्ध लढण्यास तयार झाले नसते. तेव्हा कलियुग श्रीकृष्ण निर्वाणापासून सुरु झाले असे सांगण्याचा भागवतातील वाक्याचा उद्देश असू शकत नाही.

दुसरे पुराण ज्या विष्णूचा श्रीकृष्ण हा अवतार मानला गेला त्या विष्णूचा महिमा गाणारे विष्णुपुराण विचारात घेतले पाहिजे. कलियुग जर श्रीकृष्ण निधनापासून मोजण्यात आले असते तर या पुराणात त्याचा उल्लेख अपेक्षितआहे. पण तसा उल्लेख न करता परीक्षितापासून नन्दापर्यंत दोन्ही पाठ लक्ष्यात घेता १०१५ वा १११५ वर्षे झाली असे हे पुराण सांगते. परीक्षिताला श्रीकृष्णाने जिवंत केले त्या परीक्षिताचा हा उल्लेख असेल तर त्याच्यापासून कालगणना सांगणे फार विचित्र आहे. ज्यांच्यापासून कालगणना सांगावी असे युधिष्ठिर व श्रीकृष्ण जिवंत असता शककर्ता म्हणून जो मुळीच प्रसिद्ध नाही त्या परीक्षितापासून विष्णुपुराण कालगणाना कशी सांगेल? तेव्हा हा परीक्षित श्रीकृष्णाने जिवंत केलेला परीक्षित असू शकत नाही व हा उल्लेख कलियुगाच्या विरुद्ध पुरावा म्हणून वापरता येत नाही.

भारतीय युद्धाचा संदर्भ देऊन कलियुगाचा उल्लेख पाचव्या शतकात आर्यभट्टाने केला आहे. कलियुगारंभी सर्व ग्रह अश्विनीत एकत्र होते या चुकीच्या समजुतीच्या आधारे चुकीचे गणित करुन आर्यभट्टाने तो ठरविला असे काही लोकांचे म्हणणे आहे. पण आर्यभट्टाचा ग्रंथ उपलब्ध आहे व त्यात कोठेही असे गणित नाही व मी असे गणित केले असे आर्यभट्ट म्हणत नाही. आर्यभट्टाने स्वतःच्या काळी चालू असलेली परंपरा सांगितली आहे.

भारतीय ऐतिहासिक परंपरेत हे मत मान्य आहे. सर्व पंचाङ्गात कलियुग हे ऐतिहासिक युग म्हणून विक्रम व शालिवाहन शकाबरोबर दिलेले असते भारतीय युद्ध खि.पू. ३१०१ मध्ये झाले या महाभारतातील विधानाला शिलालेखांचा देखील भक्कम दुजोरा आहे. खिस्तोत्तर ६३४ चा ऐहोळे शिलालेख भारत आहव म्हणजे युद्ध होऊन ३७३५ वर्षे झाली असे सांगतो. मदुरेजवळील अनइमलइ येथील इसवी सन ७७० च्या शिलालेखात कलियुगाचा प्रारंभ होऊन ३८७१ वर्षे झाली असा उल्लेख आहे. वरंगळ येथील शिलालेखात कलियुगाच्या प्रारंभानंतर ४५६१ वर्षे झाल्याचा उल्लेख आहे. हा लेख तज्ज्ञमते इसवीसन १४६० आहे.

तेव्हा कलियुग गणना विक्रमसंवताच्या आधीपासून सुरु झाली आहे ती



आजही पंचाङ्गरुपाने उपलब्ध आहे. तेव्हा कलियुगाचे ऐतिहासिकत्व नाकारणाऱ्या संशोधकांच्या तर्कटापेक्षा कलियुगाची सत्यता पुष्कळच वादातीत आहे. कलियुग नाकारणे विक्रम व शालवाहन संवत् नाकारण्यासारखेच आहे.

कलियुगाचीच पुष्टि महाभारतातील वर्णनांचे पुरातत्वीय व खगोलीय आधार पाहिले असता होते. भारतीय युद्धाच्या ऐतिहासिकतेबद्दल शंका घेणे व कलियुगगणनेला इतिहासात स्थान न देणे हे कोणत्याही विज्ञानपूत संशोधनाला मान्य होण्यासारखे नाही.

**प्रागैतिहासिक इतिहासाची वाङ्मयीन साधने**

प्राचीन भारताबद्दल जे काही खरे/खोटे चित्र प्रचलित आहे ते रामायण, महाभारत, अठरा पुराणे व उपपुराणे आणि चार वेद व त्यांची ब्राह्मणे हे स्पष्टीकरणात्मक ग्रंथ यावर आधारलेले आहे. यापैकी रामायण,महाभारत व पुराणे अति प्राचीन कालाबद्दलच आहे. हे ग्रंथ कथासरित्सागर, पंचतंत्र वगैरे ग्रंथाप्रमाणे कथांचे ग्रंथ नाहीत. ते घडलेल्या प्राचीन घटनांचे वृत्तांत आहेत असे या ग्रंथाचे लेखक सांगतात. जयो नामेतिहासोऽयम् असे महाभारतात सांगितले आहे. रामाचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला हिवाळ्याच्या शेवटी झाला असे रामायणात सांगितले आहे. रामाचा ३१ वा वंशज बृहद्बल हा अभिमन्यूशी लढला म्हणून रामायणातील राम हा ऐतिहासिक पुरुष आहे अशी महाभारताने ग्वाही दिली आहे. हजारो वर्षांची परंपरा या ग्रंथांना इतिहासच मानत आली आहे.

पुराण या शब्दाचा अर्थ देखील प्राचीन कालची हकिकत असाच आहे. पण पुराणात सृष्टीची उत्पत्ति (सर्ग) व मन्वन्तर म्हणजे जुनी समाजव्यवस्था बदलून नवी सुरू होण्याची प्रक्रिया यांचेही वर्णन असावे अशी अपेक्षा असल्यामुळे पुराणे इतिहासापेक्षा प्राचीन घटनाबद्दल असावीत अशी अपेक्षा होते. त्याप्रमाणे उपलब्ध पुराणात विष्णु, शिव वैगेर देवांचे वृत्तान्त आहेत.पण ज्या राजांचे उल्लेख आहेत ते राम व युधिष्ठिर यांच्यापेक्षा बरेच अलीकडचे आहेत. हे राजे काल्पनिक नाहीत कारण त्यापैकी काहींची नाणी व शिलालेख हल्ली सापडलेले आहेत.

या ग्रंथात घडू शकणाऱ्या गोष्टींबरोबरच अनेक असम्भाव्य घटनांचे वर्णन आहे. शिवाय त्यात अंतर्गत सङ्गति फार थोडी आहे. घटनांचा काळ, तिथी व महिने यांनी सांगितला आहे. वर्षाचा उल्लेख नाही. याला फक्त महाभारताचा अपवाद आहे.

ऋग्वेद हा निरनिराळ्या ऋषीनी लिहिलेल्या सुक्तांचा म्हणजे देवतांना उद्देशून केलेल्या स्तुतींचा व मागण्यांचा संग्रह आहे. ऋग्वेदाची सुक्ते लिहिणारे ऋषि तीनशेंच्या वर आहेत. यात काही प्राचीन व काही अर्वाचीन आहेत असे स्पष्टच सांगितले आहे.

वेदातली सुक्ते स्वतंत्र आहेत व त्यात कोणताही सुसङ्गत वृत्तांत नाही. कुठे कुठे फक्त दाशराज्ञ युद्धासारख्या प्राचीन घटनांकडे अङ्गुलिनिर्देश केला आहे. या

घटना सुक्त ऐकणाऱ्यांना माहित आहे असे गृहीत धरून हा निर्देश केलेला आहे. दाशराज्ञ युद्धाचा सविस्तर वृत्तांत सांगितलेला नाही. ऐतिहासिक घटनांचे इतर निर्देश तर याहूनही तुटक आहेत. तरी ऋग्वेदावरुन ऋग्वेदकालीन समाजस्थितीबद्दल बरेच ज्ञान होऊ शकते. जनतेला कृष्टी म्हटले आहे. यावरून व सतत पावसासाठी प्रार्थना करीत असल्यामुळे हा शेतकऱ्यांचा समाज होता हे स्पष्ट होते. शेतीसाठी जलयोजना होत्या हे पाण्याचे प्रकार सांगितले आहेत, त्यावरुन म्हणता येते. हरियूपिया नावाच्या शहराचा उल्लेख आहे. पुर या शब्दाने तटबन्दीचा उल्लेख आहे. ही तटबन्दी उन्हात वाळवलेल्या विटांची वा विस्तवावर भाजलेल्या विटांची असे, कुठे कुठे तटबन्दीला आयसी म्हटले आहे. आयसी म्हणजे अयसासारखी म्हणजे तांब्यासारखी पक्की वा तांब्याच्या सळाकांनी पक्की केलेली असाही अर्थ असू शकेल. भिंतीच्या घराव्यतिरिक्त गर्त म्हणजे खड्डा खणून बनविलेल्या घरांचाही उल्लेख आहे.

अयस् म्हणजे ज्याला प्रयास पडत नाही अशी मऊ धातु म्हणजे तांबे. अयस नेहमी लाल म्हणून वर्णिलेले आहे. लोखंड व कासे यांचा उल्लेख नाही.

ऋग्वेदात वर्णिलेली संस्कृति ताम्रपाषाणयुगीन आहे याची पुष्टी प्रोष्ठपदात म्हणजे भ्राद्रपदात पावसाळा सुरु होत होता या उल्लेखवरून होते. याच्याही पूर्वीचा उल्लेख अश्विनी नक्षत्रात उत्तरायण सुरु होत होते ही ख्रि. पू. ७००० ची परिस्थिति सांगणारा आहे.

ऋग्वेदातील यमयमी सुक्तावरून त्याकाळी सख्ख्या बहिण भावाचे लग्न होत होते असे अनुमान निघते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ऋग्वेदात कोठेही आर्य व अनार्य असे दोन समाज व त्यांचा संघर्ष यांचा उल्लेख नाही. तसेच उल्लेखिलेला कोणताही समाज भारताच्या बाहेरून आलाहोता असे भासविणारे अवाक्षरही नाही.

ऋग्वेदातील यज्ञपर सुक्ते वेगळी काढून ती यजुर्वेदात, गेय सुक्ते सामवेदात व अभिचारपर सुक्ते अथर्ववेदात समाविष्ट करून व्यासाने चार वेद सम्पादित केले अशी परंपरा महाभारतात सांगितली आहे. सामवेद हा भारतीय सङ्गीतकलेचा आद्यग्रंथ आहे. सामगायन प्रचलित आहे. ते मूळ सामगायनासारखेच असेल तर सङ्गीताच्या इतिहासाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व असाधारण आहे.

कृष्णद्वैपायन व्यास हे वेदांचे संपादक होते या परंपरेत एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना सुचित होते. व्यासांनी वेदांचे पुस्तक रुपाने विभाग केले याचाच अर्थ पूर्वी केवळ मुखाने प्रसारित होणारी सुक्ते लिहून काढून विषयानुरूप त्याचे चार भाग केले. सिन्धुसंस्कृतीच्या अवशेषात लिपि सापडली आहे व त्या संस्कृतीचा काळ ख्रि.पू. २५०० ते ३००० सांगण्यात आला आहे. यावरुन व्यास या संस्कृतीच्या पूर्वी झाले असे अनुमान काढता येते.

सिन्धुसंस्कृतीत कासे सापडले आहे. उलट ऋग्वेदात कासे माहित असल्याचे काहीच प्रमाण नाही याने या विधानाची पुष्टी होते.

या चारही वेदांचा अर्थ कळण्यास मदत करणारे ब्राह्मण नावाचे ग्रंथ आहेत. हे



प्रायः गद्यात आहेत. गद्य ग्रंथ हा लिपीच्या अस्तित्वाचा पुरावा समजतात कारण गद्यग्रंथ पाठ करणे कठीण असल्यामुळे त्यांचा मुखाने प्रसार होणे दूरापास्त असते. ब्राह्मण ग्रंथांत वैदिक ऋचांचे संदर्भ सांगणाऱ्या गोष्टी आहेत.याच ग्रंथांच्या शेवटच्या भागाला वेदान्त वा उपनिषदे असे म्हणतात.या उपनिषदात तत्वज्ञानपर वचने आहेत.या वचनांच्या आधारावर पुढे भारतीय तत्वज्ञान म्हणून प्रसिद्ध असलेली दर्शने निर्माण झाली.

उपनिषदांचा उपयोग कोणताही प्राचीन राजकीय इतिहास समजून घेण्यासाठी होऊ शकत नाही. पण त्यावरुन प्राचीन चालीरीतींचा व समाजव्यवस्थेचा काही बोध होऊ शकतो. श्वेतकेतु व सत्यकाम जाबाली यांच्या गोष्टीवरुन विवाहसंस्था अस्तित्वात नसल्याचा काळ द्योतित होतो.

वेदांचा अर्थ कळण्यास मदत व्हावी म्हणून पुढे पाच वेदाङ्गे निर्माण झाली. वैदिक शब्दांचे उच्चार कसे करावे हे सांगणारी शिक्षा, धार्मिक विधींचे वर्णन करणारे कल्प, संस्कृत भाषेच्या स्वरुपाचे ज्ञान करून देणारे व्याकरण, शब्दांचे अर्थ व्युत्पत्तीच्या आधारे सांगणारे निरुक्त, काल कसा ओळखावा हे सांगणारे ज्योतिष म्हणजे खगोल व वैदिक ऋचात वापरलेल्या छन्दांची ओळख करून देणारी छन्दोविचिति ही सहा वेदाङ्गे आहेत. यापैकी वेंदाङ्गज्योतिषात श्रविष्ठेच्या प्रारंभी उत्तरायण होते असे स्पष्ट सांगितले आहे. यावरून हा ग्रंथ ख्रि. पू. १४०० च्या सुमारास झाला हे स्पष्ट होते.

हे सर्व वाङ्मय मूळ स्वरुपात बुद्धपूर्व होते.त्यामुळे भारताच्या बुद्धपूर्व इतिहासाचे हेच आधार आहेत. पण इतिहासलेखनासाठी त्याचा वापर जपूनच केला पाहिजे.त्यात असम्भाव्य घटना आहेत. मारुतीने शतयोजन समुद्रावर उड्डाण केले. रामाने शिळा होवून पडलेल्या अहल्येला जिवंत केले. अशा प्रकारची शेकडो विधाने रामायणात आहेत.

महाभारतात देखील श्रीकृष्णाने सुदर्शनचक्राने सूर्य झाकला. कृष्णार्जुन जयद्रथवधाच्या आदल्या रात्री स्वर्गात जाऊन आले वगैरे वर्णने आहेत.

असंभाव्य घटनाबरोबरच या दोन्ही ग्रंथात कोणत्याही इतिहासकथनात कधीही येऊ न शकणारा कालविपर्यास आहे. रामायणात बुद्धाचा उल्लेख आहे व विश्वामित्राशी लढायला शक/यवन आले होते असे वर्णन आहे.

भारतीय युद्धात यवनांचा म्हणजे ग्रीकांचा उल्लेख आहे व त्यांचे शौर्य आणि विज्ञानातील प्रगती यांची स्तुति केली आहे. तसेच बुद्धधर्माचा सर्वत्र प्रसार होत आहे व वैदिक देवतांना कुणी विचारीत नाही असे युधिष्ठिर म्हणतो. बरे भारतीय युद्धच या काळचे आहे असे म्हणावे तर हे युद्ध गदांनी लढलेले होते म्हणजे त्या काळी तरवार नव्हती असे दाखविणारी स्पष्ट वर्णने आहेत.

जयद्रथाच्या तरवारीचे शतशः तुकडे झाले म्हणजे ती तरवार काशाची होती असे ही वर्णन आहे. काशाच्या तरवारी उपलब्ध असताना गदा निरुपयोगी होते. मग

भारतीय युद्ध ताम्रपाषाणयुगात झाले की कांस्ययुगात की बुद्धधर्माचा जोरात प्रसार होऊ लागण्याच्या सुमारास?

हे दोन्ही ग्रंथ बुद्धोत्तर आहेत व त्यापेक्षा प्राचीन वाटणारी वर्णने काल्पनिक आहेत असा याचा अर्थ करायचा काय? असे अनुमान काढण्यात अनेक अडचणी आहेत. बुद्धधर्माचा झपाट्याने प्रसार होण्याच्या काळात हे दोन्ही ग्रंथ झाले व त्याच्या पूर्वीचा इतिहास सांगणारे भाग काल्पनिक आहेत असे म्हटले तर या ग्रंथातील काही खगोलीय उल्लेख व काही पुरातत्त्वीय उल्लेख यांची सङ्गति लागत नाही. रामाच्या काळी भाद्रपद महिन्यात पावसाळा, पौष महिन्यात, हेमन्त व चैत्रात हिवाळ्याचा अंत होत होता असे उल्लेख कसे येतील?

अंगदाने वज्रदंष्ट्राला मारले तेव्हा वज्रदंष्ट्र ओणवा बसला होता. अंगदाने आपले खड्ग खुपसून त्याच्या शिराचे दोन तुकडे केले असे वर्णन आहे.

या वर्णनावर सहजच पुढील प्रश्न उद्भवतात अङ्गदाजवळ तरवार असती तर त्याने पाठमोऱ्या वज्रदंष्ट्रावर कुठेही मारली असती तरी त्याच्या शरीराचे दोन तुकडे झाले असते. त्याच्याजवळ तांब्याचा खंजीर असता तरी त्याच्या पाठीत खुपसण्याने आरपार गेला असता व तो मेला असता. यावरून असे दिसते की अंगदाच्या हातात जे खड्ग होते ते कोशातील या शब्दाच्या अर्थाप्रमाणेच गेण्डयाचे शिंग होते. गेण्डयाचे शिंग पाठीवर मारल्याने आत घुसून मृत्यु होण्याचा संभव कमी. डोक्यावर मारले तरी आत घुसणे कठीणच कारण त्याचे टोक फारसे तीक्ष्ण नसते. नेमके मानेच्या नालीत मारले तर मात्र डोक्याची दोन शकले करु शकते. तेव्हा हे वर्णन तांब्याचा शोध लागण्यापूर्वीचे आहे. तांब्याच्या खंजीराने कुणाला ठार मारण्यास त्याच्या मानेतील नालीवर नेम धरण्याची जरुर नाही.

त्याचप्रमाणे महाभारतात ज्येष्ठामूलीय अमावास्येला राजसूय सुरु झाल्यानंतर १५ व्या वर्षी रोहिणी नक्षत्रात चंद्र असताना माघ शुक्ल अष्टमीला उत्तरायण सुरु झाले हा उल्लेख ख्रि.पू. ३००० या काळाशी जुळतो.त्याचप्रमाणे श्रावणात पावसाळा हा उल्लेख ख्रि.पू. २००० च्या आसपासचा संभवतो.

या खगोलीय उल्लेखाबरोबरच तांब्याच्या व दगडाच्या शस्त्रांनी युद्ध हा उल्लेख ख्रि.पू. ३००० च्या सुमाराचा व अभिमन्यूच्या तरवारीचे तुकडे पडले हे काशाच्या तरवारीचे वर्णन ख्रि.पू. २००० च्या आसपासचे आहे.

३००० वर्षेपर्यंत या ग्रंथात भर पडत होती तर त्यात एकाच तऱ्हेची भाषा कशी आहे? ३००० वर्षापर्यंत भाषा बदलल्याशिवाय राहू शकते काय? असा पाश्चात्य संशोधकांचा रास्त व त्यांच्या मते बिनतोड प्रश्न आहे. या प्रश्नात हे विसरले गेले आहे की वैशम्पायन व सौती हे महाभारताचे नकलाकार नव्हते, ते मूळ ग्रंथात भर घालून त्यांचे पुनर्लेखन करणारे संपादक होते. पुनर्लेखन करताना मूळ ग्रंथाची भाषादेखील बदलून समकालीनांना समजण्यासारखी करण्याची आवश्यकता असते. सौती हा व्यवसायाने सूतच होता. पुराणदिक ग्रंथ जनतेसमोर मौखिकरीत्या मनोरंजक होतील अशा रीतीने प्रस्तुत करणे हा त्याचा व्यवसाय होता. त्यावेळी लिपीचा शोध लागला असला तरी लिखित ग्रंथ अशा सूताजवळच असत व जनतेत त्यांचा प्रसार मौखिक रीत्याच होई. समग्र ग्रंथ हाताने ताडपत्रावर खरवडून लिहून काढणे फार कष्टाचे होते.



प्राचीन ग्रंथांच्या नकला करताना त्यांची भाषा समकालीन भाषेशी जुळविण्याचा प्रयत्न केला गेला या म्हणण्याला हस्तलिखितांचा पुरावा सापडू शकत नाही. महाभारताचे सर्वात प्राचीन हस्तलिखित फार तर हजार वर्षापूर्वीचे आहे.पण मराठी ग्रंथांच्या नकला करताना असे केले जात होते हे हस्तलिखितांच्या आधारे दाखविता येते. गोडबोल्यांनी प्रकाशित केलेल्या दमयन्ती स्वयंवराचे हस्तलिखित उपलब्ध आहे. गोडबोल्यांच्या प्रतीत मुळातील भाषा बदलून समकालीनांना समजण्यासारखी केली असल्याचे स्पष्ट आहे. तसेच एकनाथांनी ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली याचा अर्थ समकालीनांना समजण्यासारखी केली असाच करणे संयुक्तिक आहे. ज्या हस्तलिखिताच्या आधारे प्रत करायची ते हस्तलिखितच कोणी शुद्ध करीत नाही ते प्रमाण मानले जाते.

लेखकागणिक भाषेत फरक पडतो. विशेषतः अनुष्टुभ छन्दात लघु व गुरु अक्षरांचे वितरण निरनिराळ्या लेखकात निरनिराळे असते असे गृहीत धरून यार्दींनी हल्ली सांख्यिकीच्या आधारे लेखक एक की अनेक हे ठरविण्याची युक्ति काढली आहे. त्यांनी एकाच लेखकाच्या लेखनात लघु गुरुंचे वितरण एक सारखेच असते असे दाखवून दिलेले नाही. त्यामुळे त्यांच्या पतिपादनाचा पायाच डळमळीत आहे.पण महाभारताचे तीन लेखक आहेत असे इतर प्रमाणावरुन दिसते व यार्दींना देखील महाभारतात तीन प्रकारचे लघु गुरुंचे वितरण सापडले आहे हा योगायोग सूचक मानण्यासारखा नक्कीच आहे.

रामायण/महाभारतात ऐतिहासिक व पुरातत्त्वीयच नव्हे तर खगोलीय कालविपर्यास देखील आहेत. रामायणात पौष हा हेमन्ताचा पहिला महिना, चैत्र हा हिवाळ्याचा शेवटचा महिना, व भाद्रपद हा पावसाळ्याचा पहिला महिना. हा ख्रि.पू. ३७०० च्या सुमारास लागू होणारा व श्रावणात पावसाळा सुरु होण्याचा ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकात लागू होणारा उल्लेख आहे.

महाभारतात श्रावणात पावसाळा सुरु होण्याचा ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकाला लागू होणारा व श्रवण नक्षत्रात उत्तरायण होण्याचा ख्रि. पू. ४०० ला लागू होणारा उल्लेख आहे.

तात्पर्य हे दोन्ही ग्रंथ कोणत्याही एका काळचे नसून,ताम्रपूर्व युगापासून तो अशोक कालापर्यंत लिहिले जात होते असेच अनुमान काढावे लागते.

अशा अनुमानांना या ग्रंथातच आधार आहेत. रामायणात दोन अनुक्रमणिका आहेत. तिच्यातील एकीत बालकाण्ड व उत्तरकाण्ड यातील वृत्तांत नाही. दुसरीत उत्तरकाण्डाचा वृत्तांत आहे पण तो अनागताबद्दल म्हणजे काल्पनिक आहे असे

म्हटले आहे.

काव्यं रामायणं कृत्स्नं सीतायाश्चरितं महत्। पौलस्त्यवधमित्येव चकार चरितव्रतः। या वाक्यात रामायण शब्दाचा अर्थ रामायण हे काव्य असा केला तर पुढे सीतायाश्चरितं या शब्दांमुळे रामायण हे सीतेचे चरित्र आहे असा अर्थ होतो. पण रामायण हे सीतेचे चरित्र नसून रामाचे चरित्र आहे. तेव्हा रामायण या शब्दाचा अर्थ रामाचे अयन म्हणजे मार्ग वा आयुष्यक्रम असा करावा लागतो. व मग रामाचे व सीतेचे चरित्र ज्यात आहे असे पौलस्त्यवध हेच, (एव) एक काव्य रचले असा अर्थ होतो. अर्थात् रामायण हे नाव नंतरचे असून पौलस्त्यवध हेच मूळ काव्याचे नाव होते. व्यासांच्या जय या ग्रंथाप्रमाणेच या काव्याचा विषयही युद्ध हाच होता असे दिसते.

रामायण रचणारा वाल्मिकि हा वैदिक ऋषि प्रचेतस याचा दहावा पुत्र होता. तो वाल्याचा वाल्मीकि झाला. तत्पूर्वी तो रत्नाकर नावाचा वाटमाऱ्या होता अशी प्रसिद्ध आख्यायिका आहे ती उपलब्ध रामायणात नाही.

या व्यतिरिक्त रामायणरचनेत आणखी एक नाव येते ते म्हणजे रामायणात शम्भर उपाख्याने लिहिणाऱ्या भार्गवाचे.

तसेच व्यासाने ८८०० श्लोकांचा जय नावाचा ग्रंथ लिहिला त्यानंतर हजार वर्षांनी वैशम्पायनाने भारत या नावाने तो २४००० श्लोकात परिवर्धित केला. (एतद्वर्षसहस्राय राज्यं कलियुगे गतम्) व शेवटी सौतीने अशोककालात त्यात भर घालून हल्ली उपलब्ध असलेले एक लक्ष श्लोकाचे महाभारत रचले असे महाभारतातच उल्लेख आहेत.

महाभारतात समाविष्ट नसलेले आणखी एका महाभारतकाराचे नाव जैमिनी असे आहे.त्याने रचलले अश्वमेधपर्व उपलब्ध आहे.

ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात झालेल्या आश्वलायन गृह्यसूत्रात भारत व महाभारत नावाचे वेगळे ग्रंथ होते व त्यांचे वेगळे आचार्यही होते असे स्पष्ट म्हटले आहे. जय या ग्रंथाचा वेगळा उल्लेख नाही कारण जय ग्रंथ वाचल्याशिवाय भारत व महाभारत यापैकी कोणत्याही ग्रंथाचे पठन होऊ शकत नाही.

यातील प्रत्येक नंतरच्या आवृत्तीत पूर्वीच्या सर्व आवृत्या समाविष्ट आहेत पण त्यात फेरफारही केलेले आहेत. असे म्हणता येते की नंतरच्या संपादकांनी ग्रंथात फेरफार केले असले तरी पूर्वीचा कोणताही भाग गाळला नाही.पूर्वीचा भाग गाळायचा असता तर नवी अनुक्रमणिका रचताना जुनी अजिबातच गाळली असती. भर घालताना आपण घातलेला भागच मूळ आहे अशी वाचकाची दिशाभूल करण्याचा हेतु दिसत नाही. आपण ग्रंथाची सुधारून वाढविलेली आवृत्ती काढीत आहोत अशीच वृत्ती दिसते.

चैत्रात हिवाळा संपतो वगैरे स्वतःच्या काळी प्रत्यक्ष दिसणाऱ्या वस्तुस्थितीच्या अगदी विरुद्ध विधाने राहू दिली आहेत यावरून पूर्वीचे काही गाळायचे नाही असेच



या संपादकाचे धोरण होते हे वाजवी अनुमान आहे.

रामाचे खरे चरित्र पाहायचे असेल तर उपलब्ध रामायणातल्या प्राचीनतम भागाचे प्रामाण्य सर्वात जास्त, इतर भागांचे प्रामाण्य त्याच्या अर्वाचीनत्वाच्या प्रमाणात कमी मानले पाहिजे. तसेच भारतीय युद्धाबद्दल व्यासाच्या जय ग्रंथांचे म्हणजे युद्धकाण्डाचे प्रामाण्य सगळ्यात जास्त हे स्पष्टच आहे.

रामायण/महाभारत हे ग्रंथ इतिहासावर आधारलेले असले तरी तो इतिहास काव्यरुपाने सांगण्याचा त्यांचा उद्देश आहे व काव्यात अद्भूत रस आणण्यासाठी काल्पनिक गोष्टी लिहाव्या लागतात. म्हणून काल्पनिक व असंभाव्य गोष्टी त्यात आहेत म्हणून हे ग्रंथ सारेच्या सारेच काल्पनिक आहेत असे म्हणणे समर्थनीय नाही.

पुष्कळ वेळा असंभाव्य वर्णन हे एखाद्या सत्य घटनेचे अलंकारिक वर्णन असू शकते. उदाहरणार्थ भीष्म मरणापूर्वी ५८ रात्री शरपंजरी पडला होता हे वर्णन घ्या स्वतःच्या पक्षातल्या जखमी योद्ध्याला कोणीही शरपंजरी निजविणार नाही.पण सर्वाङ्गावर जखमा झाल्या असता अंथरुणावर निजणे देखील शरपंजरी निजण्यासारखेच वेदनादायक असते. भीष्म म्हातारा असला तरी तो चिवट होता. तेव्हा जखमांनी शरीर जर्जर झाले असताना देखील तो ५८ दिवस जिवंत होता हे खरे असू शकते. भीष्म शरपंजरी पडला हे वर्णन या खऱ्या घटनेचेच काव्यमय वर्णन आहे हे निःसंशय.

तसेच रावणाला दहा तोंडे व वीस हात होते हे वर्णन मोठा माणूस जे बोलेल ते दहा लोक बोलू लागतात व मोठा माणूस जे करू इच्छितो ते करायला दहा लोक सज्ज होतात या सत्य घटनेचे अलंकारिक वर्णन आहे याबद्दल शंका असू नये.

कधी कधी एकाच घटनेची दोन वर्णने आढळतात. त्यातले कमी अद्भुत वर्णन जास्त प्राचीन व ऐतिहासिक घटनेपेक्षा अधिक जवळचे मानावे लागते.

रामायण आणि महाभारत निदान दोन हजार वर्षांपासून वाचनात आहेत असे असता हेच रामायण व महाभारत वाचून तब्बल दोन हजार वर्षे हे ग्रंथ अनेक ग्रंथकारांनी हजारो वर्षांच्या अंतरांनी लिहिलेले आहेत असे कुणाच्या लक्षात कसे आले नाही? असा प्रश्न उद्भवतो. याचे उत्तर असेच की हजारो वर्षे हे ग्रंथ त्यातील कथेला धार्मिक महत्त्व देऊन वाचले गेले. तिची ऐतिहासिकता पारखण्याच्या दृष्टीने नाही.

रामसेतूबद्दल बरेच गैरसमज प्रचलित आहेत. रावणाने सीतेला खेचराच्या रथातून नेले असे स्पष्ट वर्णन आहे तेव्हा रामाने सेतु बांधला नसून असलेली वाट सैन्याची ये-जा होऊ शकेल एवढी मोठी व पक्की केली हे उघड आहे.

रामायण महाभारताप्रमाणेच पुराणेदेखील एकाच काळी एकाच कर्त्याने केलेले ग्रंथ नाहीत. साधारणपणे पुराणात गुप्तकालाच्या खुणा आढळतात. त्यामुळे पुराणे गुप्तकालात झाली असे साधारणपणे पाश्चात्त्य संशोधकांचे मत आहे. सगळ्यात प्रसिद्ध असलेल्या भागवत पुराणात तर यादव कालापर्यंत म्हणजे चौदाव्या

शतकापर्यंतच्या खुणा आढळतात असे कोलब्रुक इत्यादी संशोधकांचे मत आहे.

पण हे पण्डित सर्वात अर्वाचीन खुणा कोणत्या सापडतात याचाच विचार करतात. सर्वात प्राचीन खुणा सापडतात की नाही याचा विचारच करीत नाहीत. असा विचार केला तर भागवताचा काळ १४ व्या शतकापर्यंत नव्हे तरी नवव्या शतकापर्यंत सहज ओढता आला तरी त्यात ख्रिस्तपूर्व कालाच्याही खुणा आहेत हे दिसून आले असते. जैमिनीय अश्वमेधपर्वात भागवताचा उल्लेख आहे व हे पर्व ख्रि.पू. १०० च्या सुमारांचे आहे.

**प्रागैतिहासिक अवशेष**

अलीकडे बुद्धपूर्व इतिहासाबद्दल पुरातत्व हा एक महत्त्वाचा आधार निर्माण झाला आहे. पाकिस्तानी पंजाब, सिंधुनदीचे खोरे बलूचिस्तान, राजस्थान व गुजराथ येथे ४००० वर्षापूर्वीच्या संस्कृति सापडल्या आहेत. त्यांचा काळ ठरविण्यासाठी ज्यात कोळसा आहे अशा अवशेषांचे रासायनिक विश्लेषण करण्याची युक्ती निघाली आहे. या युक्तीला प्राङ्गारगणना म्हणतात. प्राङ्गारगणनेने ठरविलेल्या काळात दोन तीनशे वर्षापेक्षा जास्त फरक नसतो. या संस्कृती बुद्धपूर्व नाहीत असे कोणताच संशोधक म्हणत नाही.या अवशेषावरुन राजकीय इतिहास कळत नसला तरी त्यातून प्रतीत होणाऱ्या समाजाची व्यवस्था कशी होती हे कळू शकते.

या अवशेषांचा काळ खगोलीय प्रमाणावरुन ठरविलेल्या ऋग्वेदकालाच्या आसपास म्हणजे खि. पू. तिसऱ्या सहस्त्रकापासून तो खि.पू. सातव्या सहस्त्रकाइतका प्राचीन आहे. मेहेरगड येथे सापडलेले अवशेष पुरातत्वीय प्रमाणाप्रमाणे खि.पू. ७००० चे आहेत. मोहेजोंदरो हरप्पा व कालीबागन येथील अवशेष खि.पू. ३००० च्या सुमाराचे आहेत.

ऋग्वेदाचा काही भाग देखील पूर्वी दाखविल्याप्रमाणे खगोलीय प्रमाणावरुन याच काळचा ठरतो.

हे अवशेष वैदिक संस्कृतीचेच आहेत कारण त्यांच्यापैकी पुष्कळसे लुप्त सरस्वतीच्या खोऱ्यात सापडलेले आहेत. ऋग्वेदाप्रमाणेच तेथे कासे व लोखंड नाही. कापसाचे कापड सापडत नाही. मेहेरगड येथे कापसाचे बी सापडले आहे. ते रानकापसाचे नसून लागवडीच्या कापसाचे आहे असे काही पुराविद् म्हणतात. पण रानकापूस व लागवडीचा कापूस यांच्या ९००० वर्षापूर्वीच्या अवशेषात निश्चितपणे ओळखू येण्यासारखा फरक असतो असे मानणे सोपे नाही. तसे मानले तरी इतक्या प्राचीन काळी कापसाचे कापड प्रचारात असल्याचा पुरावा नाही. ऋग्वेदात लोकरीचे व अतसीचे बोचरे कापड आहे. कापसाच्या कापडाचा अजीबात उल्लेख नाही. कापसाचे कापड अतसींच्या कापडापेक्षा वा पशूच्या कातड्यापेक्षा जास्त सोईस्कर असल्यामुळे तेच प्रचारात राहण्याचा संभव आहे. तेव्हा ७००० ख्रि. पू. या काळी कापूस असेल तर तो नंतर दोन तीन हजार वर्षांनी सार्वत्रिक होईल अशी अपेक्षा आहे. मग ऋग्वेदात त्याचा मागमूसही नाही हे कसे?



परकीयांच्या आक्रमणाने नाश केल्याचा या अवशेषात काहीही पुरावा नाही. असे अमेरिकन विश्वकोश म्हणतात. पुष्कळ ठिकाणी मानवी सांगाडे सापडले आहेत. त्यात परकीय व एतद्देशीय असा भेद करता येत नाही ते एकाच तऱ्हेचे आहेत. भारतावर स्वारी करून येणारे आर्य व त्यांनी केलेल्या कत्तली या विकृत मनांच्या कल्पना आहेत हे ऋग्वेदाप्रमाणेच पुरातत्वीय अवशेष देखील घोषित करतात.

आर्य युरोपातून भारतात आले असे बव्हंश आर्याक्रमणवाद्याचे मत आहे. बहुवंश युरोपीय देशात पुरातत्वीय उत्खनने झाली आहेत. आर्यांचा प्रसार युरोपपासून भारत असा झाला असता तर पुरातत्वीय अवशेषात आर्यांच्या निरनिराळ्या वस्त्यांच्या कालानुक्रमात याचा पुरावा सापडू शकला असता पण असा पुरावा सापडत असल्याचे कोणीही पुराविद म्हणत नाही. मोहेंजोदरोमध्ये ऋग्वेदात वर्णन केल्याप्रमाणे कच्च्या व पक्क्या विटांच्या भिन्ती आढळतात. हरप्पा हेच ऋग्वेदातील हरियूपिया असावे हा तर्क वाजवी आहे. मोहंजोदरो ही प्रगत नागर संस्कृति आहे. तेथील शहरे स्वच्छन्दे वाढलेली नसून नियोजित आहेत. पाणीपुरवठ्यासाठी देखील प्रभावी तन्त्रे वापरलेली आहेत. या तन्त्रांची झलक ऋग्वेदात स्पष्टपणे आढळते.

मोहेजांदरोत लिपी सापडली आहे.ती वाचण्यात अजून सफलता मिळालेली नाही. जोपर्यंत पुराविद् आर्याक्रमणाचे भूत आपल्या डोक्यातून काढत नाहीत तोपर्यंत ही लिपी वाचण्यात सफलता मिळण्याचा संभव नाही. पाच सहा हजार वर्षापूर्वीचे हे अवशेष वैदिकांचे असले पाहिजेत. कारण वैदिक या प्रदेशात राहत होते हे ऋग्वेदावरून स्पष्ट आहे. हेच मुळात खोटे मानले तर या कुणाच्या वसत्या आहेत याबद्दल कोणताच सुबुद्ध तर्क करता येणार नाही. कारण वैदिकाखेरीज कोणते समाज तेथे राहत होते याचा तर्क करण्यास काडीचाही आधार नाही. तेव्हा मोहेजांदरी लिपीची भाषा संस्कृत नाही असे गृहीत धरल्यास इतक्या प्राचीन काळी या ठिकाणी दुसरी कोणती भाषा होती याचीकल्पना देखील करता येत नाही. तामीळ ख्रि.पू.३०० पेक्षा प्राचीन असल्याचे कोणताही संशोधक मानीत नाही. द्रविड नावाची कोणतीही भाषा अस्तित्वात नाही. तमिळ, तेलगू, कन्नड व मल्यालम या चार भाषा संस्कृतोद्भव नसून त्यांचा उगम एक आहे व या उगमाला द्रविड असे नाव, संस्कृत व तमिळ खेरीज इतर भारतीय भाषांचे विशेषतः उत्तर भारतीय भाषांचे ज्ञान नसणाऱ्या काल्डवेल सारख्या मिशनऱ्याने ठोकून दिलेले आहे. अस्तित्वात असलेली संस्कृत सोडून मोहंजोदरोमध्ये द्रविड वा इतर कोणती काल्पनिक भाषा बोलली जात होती अशी कल्पना करुन तेथील लिपी वाचण्याचा प्रयत्न करणे एका अंधाऱ्या खोलीत तिथे नसलेले काळे मांजर शोधण्यासारखे आहे.

मोहेंजोदरोत लिपी होती हे तथ्य व्यासाने खि.पू. ३००० च्या सुमारास

वेदांचे संकलन केले या घटनेवर प्रकाश टाकते. व्यासांच्या काळी ब्राह्मणे या गद्यग्रंथांची रचना सुरु झाली होती. गद्य ग्रंथांचे अस्तित्व हा लिपी वापरात असल्याचा पुरावा समजला जातो. लिपि असलव्याशिवाय कोणत्याही मौखिक ग्रंथाचे संकलन म्हणजे काय याची कल्पनाही करता येत नाही. भारतीय युद्धात ताम्रपाषाणयुगीन शस्त्रे वापरली गेली व ते युद्ध कलिद्वापराच्या सन्धीत म्हणजे खिपू ३१०१ यावर्षी झाले. या महाभारतातील विधानांची पुष्टिदेखील पुरातत्वाने होते. भारतीय युद्धातील योद्धयांची शिबिरे, पंजाब, रोहतक, कुरुक्षेत्र, इन्द्रप्रस्थ म्हणजे दिल्ली, राजस्थान व अहिच्छत्र म्हणजे रामपूर संस्थान या विस्तृत प्रदेशावर पसरली होती असे महाभारतात वर्णन आहे. या सर्व ठिकाणी ताम्रपषाणयुगीन शस्त्रे सापडलेली आहेत.

तेव्हा पुरातत्व महाभारताची समर्थपणे पुष्टि करते.

***

- धर्माच्या नावाखाली माणुस जेव्हा विधिनिषेध स्वीकारतो तेव्हा रक्षणाकरिता स्वतंत्र पोलिसाची गरज पडत नाही, त्याची विवेकबुद्धीच त्याची पोलीस असते.
- निष्ठा म्हणजे मत नव्हे. जीवनाच्या उन्नतीसाठी श्रद्धापूर्वक आग्रहाने स्वीकारलेले आचरणयुक्त तत्त्वज्ञान म्हणजे निष्ठा.
- अभय हा दैवी संपत्तीचा पहिला गुण. तरीही पातकाला भिणे, पापभीरू असणे हा सद्गुण आहे. मरणाला भिऊ नये पण दुष्कीर्तिला भिणे हे सज्जनपणाचे आहे.
- वेदान्त ज्ञानाचे खरे प्रयोजन दुःख दूर करणे हे नसून शोक दूर करणे हे आहे.
- निंदा मत्सराचेच अपत्य आहे.
- धर्माचरण वा सदाचरण हे नेहमीच निरपेक्ष असले पाहिजे.
- साधनात विषमता राहणारच कारण साधकात विषमता आहे. साध्यात समता असली म्हणजे झाले. साध्यात समता असली की वाद होत नाही.
- कोणाचेही खाजगी जीवन पाहू नये हे व्यवहारतः कितीही खरे असले तरी पाहण्यासारखे खाजगी जीवन नसणे हा जीवनाचा अधःपात आहे.
- मोक्षाचा विचार सुटला की धर्माचाही विचार दूर होतो. मग उरतात ते फक्त अर्थ व काम! परिणामी उपभोक्तावाद, चंगळवाद जन्म पावतो.
- ताणरहित आयुष्य जगावयाचे असेल, आळशी नसलेले अत्यंत कार्यक्षम जीवन जगावयाचे असेल तर फलाची आकांक्षा नसलेले कर्तव्य कर्मनिष्ठेने करित राहणे हाच एक मार्ग आहे.

*– प.पू. वरदानंद भारती यांचे ग्रंथातून*

2

# ऋग्वेदकालावर नवा प्रकाश

**नी. र. वऱ्हाडपांडे**

ऋग्वेदकालाबद्दल पूर्वी कधीही चर्चिल्या न गेलेल्या काही प्रमाणांचा विचार या लेखात करण्याचे योजले आहे. असा विचार करताना पूर्वी चर्चिल्या गेलेल्या मुद्द्यांचा विचार ते मुद्दे या नवीन प्रमाणांना बाध आणू शकणारे असतील तरच करण्यात येईल.

**रामाचा काल**

ऋग्वेदाच्या काळाचा रामाच्या काळाशी संबंध आहे. ऋग्वेदात पुढील ऋचेत रामाचा उल्लेख आहे–

प्र दुःशीमे पृथवाने येने प्र रामे वोचमसुरे मघवत्सु ।
ये युक्त्वाय पंचशतास्मयु पथा विश्राव्येषाम् ॥ १०/९३/१४

"जे आमचे हितैषी पाचशे घोडे जोडून आमच्या यज्ञास येतात त्या दुःशीम, पृथुवान, वेन व राम या जीवनशील व समृद्ध राजांना उद्देशून हे सुश्राव्य स्तोत्र मी म्हणत आहे."

यात उल्लेखिलेला राम हा दाशरथी रामच असला पाहिजे. कारण सायणाच्या मते या ऋचेतील सर्व नावे ही राजांची नावे आहेत. पृथु व वेन हे महान राजे म्हणून पुराणांना परिचित आहेत. पुराणांना माहीत असलेला परशुराम, बलराम वगैरे दुसरा कोणताही राम, राजा म्हणून प्रसिद्ध नाही. तेव्हा ऋग्वेदाची ही ऋचा रामाच्या नंतरची आहे असे सहजच अनुमान निघते व रामाच्या कालाची निश्चिती ऋग्वेदांचा काल ठरविण्यास उपयुक्त ठरते.

ऋग्वेदात परशुरामाचा पिता जमदग्नी भारद्वाज याने रचलेल्या ३/६२,८/१०१,९/६२, ९/८५,६७,१०/११०, १०/१३७, १०/१६७ या ऋचा आहेत. १०/११० ही ऋचा रामाचा प्रतिस्पर्धी जामदग्न्य राम म्हणजे परशुराम याने रचलेली ऋचा आहे. रामायणकार वाल्मिकीचा पिता प्रचेतस् याने ऋग्वेदाची १०/१६४ ही ऋचा रचली आहे. तेव्हा १०/९३/१४ या ऋचेतील राम हा रामायणाचाच राम आहे व ऋग्वेदाचा काही भाग राम, परशुराम व वाल्मिकी यांच्यानंतरचे आहेत असे मानण्यास हरकत नाही.

रामाचा काळ कळण्यास रामायणातील रामाची जन्मतिथी व अरण्यकांडातील दोन उल्लेख उपयोगी पडण्यासारखे आहेत. रामाच्या जन्मतिथीचा उल्लेख असा-

एवं यज्ञे समाप्ते तु ऋतूनां षट् समाययौ ।
ततस्तु द्वादशे मासे चैत्रे नावमिके तिथौ ॥
नक्षत्रेऽदितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पंचसु ।
ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पताविन्दुना स ह ।
प्रोद्यमाने.......

वसंतऋतूत दशरथाचा पुत्रकामेष्टी यज्ञ सुरू झाला. तो बाराव्या महिन्यात संपला. म्हणजे हा महिना शिशिराचा शेवटचा महिना होता.

अरण्यकांडातील उल्लेख असा-

निवृत्ताकाशशयनाः पुष्यनीता हिमारुणाः ।
दीर्घदीर्घतरायामास्त्रियामा यान्ति साम्प्रतम् ॥

लक्ष्मण रामाला म्हणतो, "पुष्यनक्षत्रावर चाललेल्या रात्री लांब होत चालल्या आहेत. आता बाहेर निजण्याची सोय नाही."

बाहेर निजणे असुखकर होऊ लागले होते, म्हणजे हा ऑक्टोबरातील हेमंताच्या सुरुवातीचा काळ आहे. रात्री पुष्यनक्षत्रावर चालतात म्हणजे सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत पुष्य नक्षत्र दिसत असते. अर्थात हा पौष महिना आहे. म्हणजे रामाच्या काळी चैत्र हा हिवाळ्याचा शेवटचा तर पौष हा हेमंताचा पहिला महिना होता.

हा हेमंताचा पहिला महिना नसून दुसरा महिना होता असे दप्तरी म्हणतात. (लेखसंग्रह) दप्तरी यांनी या मताच्या पुष्ट्यर्थ पुढील श्लोक उद्धृत केला आहे-

सेवमाने दृढ सूर्ये दिशमन्तकसेविताम् ।
विहीनतिलकेव स्त्री नोत्तरा दिक्प्रकाशते ॥ ३/१६/८

याचा अर्थ दप्तरींनी सूर्य दक्षिणेच्या टोकाला पोचला होता असा केला आहे. पण दृढ याचा अर्थ निश्चितपणे असा आहे, टोक असा नाही. सूर्य निश्चितपणे दक्षिण दिशेकडे जाऊ लागला होता, असे या श्लोकात सांगितले आहे. सेवमाने हे वर्तमानकालवाचक कृदन्त आहे, भूतकालवाचक नाही. तेव्हा ही हेमंताची सुरुवात आहे, अंत नाही.

दुसरे असे की, बाहेर निजणे असुखद वाटण्यास सुरुवात होणे हा काळ ऑक्टोबरच्या अंताचा आहे. डिसेंबरच्या अंताचा नाही. बाहेर निजणे बंद करावे, असे म्हणण्यास कुणीही डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत वाट पाहणार नाही.

तिसरा उल्लेख असा-



मासि प्रोष्ठपदे ब्रह्म ब्राह्मणानामधीयताम् ।
अयमध्यायसमयः सामगानामुपस्थितः ॥ ४/२८/५४

हा श्लोक पावसाळ्याच्या सुरुवातीचे वर्णन करताना आला आहे. "भाद्रपद महिन्यात मंत्रपठण करणाऱ्या सामगायकांचा अध्ययनाचा काळ सुरू झाला आहे." असे या श्लोकात सांगितले आहे. पावसाळ्याच्या प्रारंभी पाठशाळा सुरू होत असत, हा या श्लोकाचा संदर्भ आहे.

उपरिनिर्दिष्ट तीन श्लोकांत भाद्रपद हा पावसाळ्याचा व पौष हा हेमंताचा पहिला आणि चैत्र हा हिवाळ्याचा शेवटचा- म्हणजे फाल्गुन हा पहिला महिना असे तीन ऋतूंच्या महिन्यांचे स्पष्ट उल्लेख मिळतात. ऋग्वेदातदेखील भाद्रपद हा पावसाळ्याचा पहिला महिना सांगितला आहे व यावरून गणित करता ही परिस्थिती ख्रि.पू. ३७०० ची आहे असे ठरते, हे पुढे दाखविण्यात येईल..

रामाचा ३१ वा वंशज बृहद्बल हा अभिमन्यूकडून मारला गेला अशी भागवतात माहिती आहे. भारतीय युद्धाचा काल म्हणजेच कलियुग असे मानले तर प्रत्येक पिढीला २० वर्षे धरता पिढ्यांच्या हिशेबावरून देखील रामाचा हाच काळ ठरतो. ऋग्वेदात रामाचा समकालीन परशुराम याने रचलेले सूक्त असल्यामुळे ऋग्वेदाचा काही भाग ख्रि.पू. ३७०० च्या सुमाराचा आहे असे अनुमान निघते.

### ऋग्वेदातील राशी

वरील प्रमाणावर मुख्य आक्षेप असा आहे की, 'कर्कटे लग्ने' या शब्दप्रयोगात कर्क राशीचा उल्लेख आहे व भारतात राशींचे ज्ञान ग्रीकांकडून म्हणजे फार प्राचीन म्हटले तरी ख्रि.पू. ५०० च्या सुमारास आले. तेव्हा वरील उल्लेख यानंतर घुसडलेले आहेत.

पण हा आक्षेप टिकण्यासारखा नाही. कारण ख्रि.पू. ५०० च्या नंतर लिहिणारा कवी चैत्र हा हिवाळ्याचा दुसरा, भाद्रपद हा पावसाळ्याचा व पौष हा हेमंताचा पहिला महिना अशी विधाने करीलच कसा? त्याला हे ऋतू केव्हा सुरू होतात हे डोळ्याने दिसत नव्हते काय? हे दिसण्यास मोठे गणित करण्याची जरूर नाही. तेव्हा वरील उल्लेख हजारो वर्षे नंतरचे समजण्यापेक्षा भारतीयांना राशींचे ज्ञान ग्रीकांच्या परिचयानंतर झाले, या निराधार समजुतीचा त्याग करणेच अधिक संयुक्तिक आहे.

भारतीयांना ग्रीकांचा परिचय होण्याच्या हजारो वर्षे आधी राशींचे ज्ञान होते, हे खुद्द ऋग्वेदातील उल्लेखांवरून दाखवून देता येते-

सिंहं नसन्त मध्वो अयासं हरिमरुषं दिवो अस्य पतिम् ।
शूरो युत्सु प्रथमः पृच्छते गाः अस्य चक्षसा परिपात्युक्षाः ॥ (९/८९/३)

"सिंह, प्रेरक इंद्र, चंद्र व आकाशाचा तांबूस पती जो सूर्य त्यांना सोमधारा

व्याप्त करत्या झाल्या. तो युद्धातला प्रथम, शूर व वर्षक इंद्र उदकांचा शोध घेतो व स्वत:च्या दक्ष नजरेने रक्षण करतो."

येथे सिंह म्हणजे सिंहराशी. या सिंहराशीमध्ये चंद्र त्याचप्रमाणे यज्ञात वाहिलेला सोम, इंद्र व सूर्य हे प्रवेश करतात असे वर्णन आहे. अर्थात् सूर्य व चंद्र सिंहराशीत अमावस्येच्या दिवशी एकत्र होते. सिंह राशीत मघा, पूर्वा व उत्तरा फाल्गुनी ही नक्षत्रे आहेत. फल्गुन हे इंद्राचे नाव आहे. त्याचप्रमाणे इंद्र हा मघवान् देखील आहे. म्हणजे सिंहराशीत इंद्र आहेच, त्यामुळे त्याला आवाहन करून दिलेला सोम त्याच्याबरोबर सिंहराशीत आलाच. याप्रमाणे सोम, इंद्र, चंद्र व सूर्य यांची ही युती उदकांना प्रेरित करणारी आहे. म्हणजे पावसाळ्याचा प्रारंभ करणारी आहे.

सायणाच्या मते ही ऋचा सूर्यरूपी सोमाला उद्देशून आहे. सूर्यरूपी सोम म्हणजेच सूर्याने लोपलेला अमावस्येचा चंद्र.

सायण, सिंह हे आकाशाच्या पतीचे विशेषण समजतो. पण आकाशाचा पती जो सूर्य त्याला सिंह हे विशेषण देण्यात काहीच खास औचित्य दिसत नाही. या वाक्याचा कर्ता बहुवचनी सोम आहे हे सायणाला मान्य आहे. येथे हरि हे सिंहाचे विशेषण समजणे वाजवी आहे. कारण सिंहराशीतील सर्व नक्षत्रे इंद्राचे नाव धारण करतात.

सूर्याचे तांबूस या विशेषणाने वर्णन उदयकालच्या सूर्याचे आहे. अर्थात् पावसाळा सुरू झाला तेव्हा सूर्य सिंहराशीत होता.

ऋतु एका निश्चित दिवशीच सुरू होत नसले तरी ज्योतिषामध्ये ऋतूच्या प्रारंभाचे निश्चित दिवस मानलेले आहेत. २२ जून म्हणजे दक्षिणायनाचा प्रारंभ, हा पावसाळ्याचा, व २२ डिसेंबर म्हणजे उत्तरायणाचा प्रारंभ हा हिवाळ्याचा प्रारंभ मानलेला आहे. *१०/८५/१३ च्या अनुसार सोमसूर्याविवाह- म्हणजे याकोबीच्या मते पावसाळ्याचा प्रारंभ करणारी अमावास्या-* फल्गुनींच्या मध्ये म्हणजे पूर्वा फल्गुनीनंतर आली तेव्हा झाला. हल्लीचा २२ जूनचा सूर्याचा सायनभोग व ऋग्वेदकाळाच्या पावसाळ्याच्या प्रारंभीचा सायनभोग यातील फरकावरून गणित करता ९/८९/३ या ऋचेचा काल ख्रि.पू. ३७६८ हा ठरतो.

या ऋचेत "इंद्र पाण्याचा मागोवा" घेतो हा पावसाळ्याच्या प्रारंभाचा उल्लेख मानला आहे व याकोबीने सरळसरळच सोमसूर्याविवाहाचा केलेला रूपकात्मक अर्थ स्वीकारून हा प्रारम्भ पूर्वा फल्गुनीनंतरचा ठरविला आहे, असा आक्षेप येऊ शकतो. हा उल्लेख एकटादुकटा असता तर प्रस्तुत आक्षेप फार जाडा मानावा लागला असता. पण या उल्लेखाशी सुसंगत असे राशींचे व ऋतूंच्या प्रारम्भाचे उल्लेख अनेक सापडत असल्यामुळे वरील सिद्धान्ताबद्दल शंका उरत नाही. उदाहरणार्थ-

वयश्चित्ते पतत्रिणो द्विपच्चतुष्पदर्जुनि ।



उष: पारन्नृतैरनु दिवो अन्तेभ्यस्परि ॥ १/४९/३

"हे अर्जुनी, ऋतूंना अनुसरून तुझ्या उषांमध्ये द्विपाद, चतुष्पाद व पंखवाले पक्षी आकाशाच्या अंती प्रेरित होतात."

येथे 'आकाशाच्या अन्ती' हा शब्दप्रयोग महत्त्वाचा आहे. उत्तरायणाच्या व दक्षिणायनाच्या प्रारंभी सूर्य जेथे असतो तेथून पुढे न जाता तो परत फिरतो, म्हणून या दोन बिंदूंना आकाशाचे अंत म्हटलेले आहे. अर्जुनी ऋतूंचा प्रारंभ करते म्हणजे अर्जुनीत सूर्य असताना वर्षाऋतू सुरू होत असे, असे या ऋचेत स्पष्टपणे सांगितले आहे.

सायण 'अर्जुनी उषा' म्हणजे पांढरी उषा असा अर्थ करतो. पण उषेला पांढरी म्हणण्यात काही औचित्य दिसत नाही. तसेच 'तुझ्या उषांचे ऋतु' असाही सायण अर्थ करतो. 'उषांचे ऋतू' हा शब्दप्रयोग फारसा सार्थ नाही.

या सूक्ताची पहिली ऋचा अशी आहे-

उषो भद्रेभिरागहि दिवश्चिद्रोचनादधि ।
वहन्त्यरुणप्सव: उप त्वा सोमिनो गृहम् ॥ १/४९/१

"हे उषे, भास्वर आकाशावर अनेक मंगलासहित तू अवतीर्ण हो. अरुणवर्ण वासरे तुला सोमाच्या गृही वाहून नेवोत."

येथे 'सोमिनो गृहम्' याचा सोमयाग करणाऱ्यांच्या घरी असा सायणाने अर्थ केला आहे. पण अरुणवर्ण वासरे उषेला सोमयाग्यांच्या गृही कशा पाठविणार? उषा ही देवता आहे. यज्ञात गायिली गेलेली सूक्ते देवतांना यज्ञस्थानी घेऊन येतात अशी समजूत होती, किरणे नव्हेत.

'सोमिनो गृहम्' याचा अर्थ सोम म्हणजे चंद्र ज्या नक्षत्रात आहे ते नक्षत्र असा दिसतो. 'अरुण वासरे' या शब्दप्रयोगाने उष:कालची किरणे द्योतित होतात. कारण गौ या शब्दाचा अर्थ प्रकाश असा देखील होतो. म्हणजे हा अमावस्येच्या उष:कालाचा उल्लेख आहे. वासरे या शब्दाने पावसाळ्याच्या प्रारंभीच्या सरी विवक्षित असाव्यात. कारण गायी हा शब्द पाणी या अर्थीदेखील ऋग्वेदात अनेक ठिकाणी आला आहे.

वरील संदर्भदेखील अलंकारिकतेपासून मुक्त नाहीत. पण पुढील उल्लेखांसोबत वाचले असता ते निर्णायक वाटतात.

स्तोमासस्त्वा विचारिणि, प्रतिष्टोभन्त्यक्तुभि: ।
प्र या वाजं न हेषन्तं पेरुमस्यस्यर्जुनि ॥ ५/८४/२

"खिंकाळणाऱ्या घोड्यासारखे ढग फेकत येणाऱ्या हे विचरणाऱ्या अर्जुनी, ही स्तोत्रे तुला कांतीने गौरवितात."

पेरु या शब्दाचा अर्थ ढग असा आहे. पावसाळ्याचा प्रारंभ अर्जुनी नक्षत्रात होत

असे हे यावरून स्पष्ट आहे. 'कांतीने गौरवतात' या शब्दांनी अर्जुनीला उद्देशून प्रात:काली स्तोत्रे गायिली जात होती असे सूचित केले आहे.

सायण अर्जुनी म्हणजे पांढरी व विचरिणी म्हणजे फिरणारी असे अर्थ करून ही पृथ्वीची विशेषणे समजतो.

पृथ्वी फिरते हे वैदिकांना माहीत होते असे मानणे कठीण आहे. शिवाय अर्जुनी हे विशेषण पृथ्वीला ओढून ताणूनच लावता येईल.

यापुढील ऋचेत हाच विषय पुढे चालविला आहे-

दृढा चिद्या वनस्पतीन्क्ष्मया दर्धर्षि ओजसा ।
यत्ते अभ्रस्य विद्युतो दिवो वर्षन्ति वृष्टय: ॥ (५/८४/३)

"हे दृढ अर्जुनी, जेव्हा तुझ्या ढगांच्या विजा आकाशातून वर्षा करतात तेव्हा तू आपल्या ओजाने पृथ्वीद्वारा वनस्पतींचे धारण करतेस."

हा विषय या सूक्ताच्या पहिल्या ऋचेपासूनच सुरू झाला आहे.

बडित्था पर्वतानां खिदं बिभर्षि पृथिवि ।
प्र या भूमिं प्रयत्वति मह्ना जिनोषि महिनी ॥ ५/८४/१

"हे महान् व ओसंडणाऱ्या अर्जुनी, तू जेव्हा या भूमीला समृद्धीने भरतेस तेव्हा पर्वतांच्या दऱ्याही भरून जातात."

अर्जुनी नक्षत्रात सुरू होणाऱ्या भरघोस पावसाळ्याचे हे वर्णन आहे.

पहिल्या ओळीतील पृथ्वी या शब्दाचा अर्थ सायण धरणी असा करतो. पण दुसऱ्या ओळीत ही पृथ्वी भूमीला समृद्ध करते असे म्हटले आहे. तेव्हा सायणाच्या अर्थी पृथ्वीलाच पृथ्वी समृद्ध करते असे म्हटल्यासारखे होईल. तेव्हा पहिल्या पृथ्वी या शब्दाचा अर्थ मोठी असाच केला पाहिजे.

तात्पर्य ५/८४ हे सारेच सूक्त अर्जुनी नक्षत्रात सुरू होणाऱ्या पावसाळ्याचे वर्णन करणारे आहे.

### इतर राशींचे उल्लेख

ऋग्वेदात सिंह हा शब्द सिंहराशी या अर्थी इतरत्रही आला आहे-

रथीव कशयाश्वॉ अभिक्षिपन्नाविर्दूतान्कृणुते वर्ष्यॉं अह ।
दूरात्सिंहस्य स्तनथा उदीरते यत्पर्जन्य: कुरुते वर्ष्यं नभ: ॥ ५/८३/३

"चाबकाने घोड्यांना हाकलीत जाणाऱ्या सारथ्याप्रमाणे तो वर्षेचे दूत (म्हणजे ढग) प्रकट करतो. पर्जन्य जेव्हा आकाशाला वर्षाकुल करतो तेव्हा दुरूनच सिंहाच्या गर्जना ऐकू येतात."



येथे सायण सिंहाचा अर्थ ढग असा करतो. पण याला कोशाचा आधार नाही व असा शब्दप्रयोग फक्त अलंकारिक असू शकतो. सिंहराशी असा अर्थ घेणे अधिक सरळ आहे. तसेच पावसाचे दूत व आकाश वर्षणासाठी योग्य करण्याचे उल्लेख पावसाळ्याचा प्रारंभ द्योतित करतात. ऐन भर नव्हे. तेव्हा हा सिंहराशीत पावसाळा सुरू होण्याचाच उल्लेख आहे. ३/९/४ ने याचीच पुष्टी होते.

ईयिवांसबमति सिध: शश्वतीरति सश्चत: ।
अन्वीमविन्दन्निचिरासो अद्रुहो अप्सु सिंहमिव श्रितम् ॥ ३/९/४

"हिंसकांचे अतिक्रमण करणाऱ्या, शाश्वतांना पार करणाऱ्या व सिंहाप्रमाणे पाण्यात आश्रय घेणाऱ्या अग्नीला चिरंतन व अद्रोही विश्वेदेव प्राप्त करतात."

पाण्यात राहणारा अग्नी विद्युद्रुपाने प्रकट होतो, या घटनेला उद्देशून ही ऋचा आहे. विजेचा अग्नी पडला म्हणजे मोठमोठ्या हिंसकांपेक्षाही अधिक अनर्थ करतो. वीज क्षणार्धात नाहीशी होते असे वाटले तरी स्वत:चाच नाश करणाऱ्या पाण्यात ती राहते. म्हणजे शाश्वत वाटणाऱ्या तत्त्वापेक्षाही ती अधिक शाश्वत आहे.

सायण 'अप्सु श्रितं सिंहम्' याचा अर्थ 'गुहेत दडलेला सिंह' असा करतो. पण अप्सु याचा अर्थ गुहेत असा करण्यास कोशांचा आधार नाही. येथे 'अप्सु श्रितं सिंहम्' याचा अर्थ पावसाळ्याच्या आरंभी पाण्याने डबडबलेली सिंहराशी असा करणेच उचित आहे.

सिंहाप्रमाणेच ऋग्वेदात मिथुन या शब्दाचा उल्लेखदेखील मिथुन राशी या अर्थाने केला आहे-

यमा चिदत्र यमसूरसूत जिह्वाया अग्रं पतदाहि अस्थात् ।
वपूंषि जाता मिथुना सचेते तमोहना तपुषो बुध्न एता ॥ ३/३९/३

"जुळ्यांच्या आईने जुळ्यांना जन्म दिला. माझ्या जिभेचे टोक (त्यांच्या स्तुतीसाठी) हलत आहे. जन्मल्याबरोबर ते शरीराने निकट आहेत. ते तमोनाशक व तपाचे आधार आहेत."

सायण वपूंषि याचा अर्थ सकाळचे कर्मकांड असा करतो. पण ही ओढाताण आहे. जन्मल्याबरोबर आर्द्रा व पुनर्वसु हे मिथुन शरीराने एकत्र राहत, हाच स्पष्ट अभिप्राय आहे.

अश्विनीकुमार हे उषेचे जुळे पुत्र आहेत. म्हणून उषेला यमसू म्हटलेले आहे. या यमसूने मिथुन या दुसऱ्या जुळ्यांना जन्म दिला. आर्द्रा व पुनर्वसु या नक्षत्रांच्या जोडीला मिथुनराशी म्हणतात.

सायणाच्या मते येथे मिथुन शब्दाने अश्विनीकुमार विवक्षित आहेत व या अनुसार तो 'तपुषो बुध्न' याचा अर्थ दिवसाचे जनक असा करतो. पण अश्विनीकुमार हे

सकाळ व संध्याकाळ या दोन्ही वेळी दिसणाऱ्या संधिप्रकाशाचे प्रतीक मानले गेल्यामुळे त्यांना दिननिर्मिति हे वर्णन लागू होत नाही.

काहींच्या मते अश्विनीकुमार हे सूर्योदयी व सूर्यास्ती दिसणारे बुध व शुक्र आहेत. या अर्थीदेखील अश्विनीकुमार हे दिननिर्मिति नाहीत.

येथे अश्विनीकुमारांचा जन्म विवक्षित आहे, असे म्हटल्यास अत्र म्हणजे येथे हा शब्द व्यर्थ होतो. अश्विनीकुमार हे अत्र या शब्दाने उल्लेखिलेल्या उषःकाली जन्मले नव्हते.

शिवाय एखाद्या स्त्रीचे पहिलेच जुळे असेल तर जुळ्यांच्या आईने जुळ्यांना जन्म दिला हा शब्दप्रयोग निरर्थक ठरतो. कारण जुळ्यांना जन्म देण्याच्या आधी ती जुळ्यांची आई नव्हतीच.

राशिचक्राकडे दृष्टी टाकली असता असे दिसून येते की, सिंह राशीत पावसाळा सुरू होत असेल तर मिथुन राशीत उन्हाळा सुरू व्हायला पाहिजे. मिथुन राशीला 'तपुषो बुध्न' म्हणजे 'उकाड्याचे आधार' म्हणून हेच सूचित केले आहे.

मिथुन राशीत पावसाळा पडत असेल तर वृषभ राशीत वसंत असायला पाहिजे. ६/४७/५ मध्ये हेच सांगितले आहे-

> अयं विदच्चित्रदृशीकर्मणः शुक्रसद्मनामुषसामनीके ।
> अयं महान्महता स्कम्भनेनोद्यामस्तभ्नाद वृषभो मरुत्वान् ॥ ६/४७/५

"शुक्रातील (ज्येष्ठ महिन्यातील) उषांच्या समूहात या वृषभाने चित्रविचित्र प्रकाश प्राप्त केला आहे. या वायुमन्ताने मोठा टेकू देऊन आकाश वर पेलून धरले आहे."

ज्येष्ठ महिन्याला ऋग्वेदात शुक्र हे नाव आहे. जेव्हा सिंहराशीत पावसाळा सुरू होत होता तेव्हा भाद्रपद व अश्विन हे पावसाळ्याचे, आषाढ आणि श्रावण हे उन्हाळ्याचे व वैशाख आणि ज्येष्ठ हे वसंताचे महिने होते. म्हणजे ऋग्वेदकाली वसंतऋतूमध्ये ज्येष्ठ महिन्यात वृषभ राशी सूर्योदयी दिसत होती. पावसाळा भाद्रपदात सुरू होत असल्यामुळे ज्येष्ठ हा वसंताचा दुसरा महिना होता व वसंतसमाप्त ज्येष्ठात पडत होता. कृत्तिका, रोहिणी व मृग ही वृषभ राशीची नक्षत्रे आहेत. तेव्हा ऋग्वेदकाली वसंतसमाप्त मृगात होता, या टिळकांच्या मताची पुष्टी होते.

वृषभाला मरुत्वान् म्हणजे वायुमान म्हटले आहे. कारण वसन्त ऋतूतला दक्षिणानील प्रसिद्ध आहे.

८/९३/१ या ऋचेत देखील सूर्याचा वृषभ राशीत प्रवेश वर्णिला आहे.

> उद्धेदभि श्रुतामघं वृषभं नर्यापसम् अस्तारमेषि सूर्य (८/९३/१)

"हे सूर्या, तू समृद्धिख्यात, पौरुषयुक्त व दानशूर अशा वृषभाकडे जाण्यास येत आहेस."



वसंतऋतूत वनस्पती फुलतात म्हणून त्याला समृद्धिख्यात व दानशूर आणि तो कामोत्तेजक आहे म्हणून त्याला पौरुषयुक्त म्हटले आहे.

सायण वृषभ म्हणजे यज्ञ व सूर्य म्हणजे इंद्र असे अर्थ करतो. पण ते पटण्यासारखे नाहीत. उदेषी या क्रियापदाने स्पष्टपणे उगविण्याच्या क्रियेचा बोध होतो. इंद्र यज्ञासाठी वर येत नसून खाली येतो.

या ऋचेत सूर्य वृषभराशीकडे येत आहे असे वर्णन आहे. याचा अर्थ असा होतो की वृषभराशीचा कोणताही भाग सूर्योदयापूर्वी दिसल्याशिवाय राहत नव्हता. तेव्हा वृषभराशीचा शेवटचा तारा उगवण्याचा काळ घेतला तर त्याचा सायनभोग ८३° येतो व ही ऋचा रचण्याचा काळ ८३ × ७२ = ख्रि.पू. ३९८४ हा येतो.

ऋग्वेदात कन्याराशीचाही उल्लेख आहे–

> पावीरवी कन्या चित्रायुः सरस्वती वीरपत्नी धियं धात् ।
> ग्नाभिरच्छिद्रं शरणं सजोषा दुराधर्षं गृणते शर्म यंसत् ॥ (६/४९/७)

"शुद्धिकारक कन्याराशी, स्वतःचे जीवन जे चित्रा नक्षत्र त्याबरोबर वनस्पतींचे राखण करीत आम्हाला बुद्धी, छिद्ररहित व स्त्रियांनी भरलेले मजबूत घर देऊन स्तोत्यांचे कल्याण करो."

सायण येथे कन्या शब्दाचा अर्थ सरस्वती असा करतो. पण हा अर्थ सरळ नाही. कन्या म्हणजे कुमारिका व वीराची म्हणजे प्रजापतीची पत्नी ही वर्णने परस्परविरोधी आहेत. प्रजापतीने कुमारिका सरस्वतीचा अभिलाष धरला यावरून ती त्याची पत्नी ठरत नाही.

कन्याराशीला शुद्धिकारक म्हटले आहे, कारण ती शरदऋतूची राशी होती. शरदाच्या आगमनाने जलाशयातील पाण्यातील गाळ खाली बसून त्यांचे पाणी शुद्ध होते. कन्या राशी चित्रायु आहे. कारण चित्रा हे कन्याराशीचे मध्यवर्ती नक्षत्र आहे.

कन्याराशी सरस्वती आहे, कारण या राशीत शरदऋतुमुळे सरोवरे भरलेली असतात. ती वीरपत्नी आहे, कारण वीर म्हणजे तृणधान्यादिक शरदऋतूत फुललेले असते.

दुसऱ्या अर्थी ही ऋचा सरस्वती नदीला उद्देशून आहे असे म्हणता येते. ती शुद्धिकारक आहे. कारण तिच्या प्रवाहाने सर्व काही धुतले जाते. ती कन्या आहे, कारण ती समुद्राला मिळत नाही. ही परिस्थिती ख्रि.पू. ८००० नंतर निर्माण झाली असे Central Arid Zone Research Institute Jodhapur चे म्हणणे आहे. सरस्वती ही चित्रायु आहे. कारण अनेकविध उपनद्या व त्यांच्या काठची वने यांनी ती वैविध्यपूर्ण झाली आहे. ती वीरपत्नी म्हणजे वीरपुत्रांची रक्षक आहे. कारण तिच्या औदार्यामुळेच धनधान्यसमृद्धी होते.

दुसरी ओळ दोन्ही अर्थांना समान आहे. पहिली ओळ सरस्वती नदीलादेखील लागू आहे. यावरून या ऋचेत कन्याराशीचा उल्लेख आहे. या सिद्धान्ताला बाध

येत नाही, कारण ऋग्वेदाचे कवी श्लेषप्रिय होते हे अनेक सूक्तांवरून, विशेषत:
सोमविषयक सूक्तावरून स्पष्टपणे दिसून येते– 'भाद्रपद, वर्षारंभ व मित्रावरुण
चैत्र हा हिवाळ्याचा व ज्येष्ठ हा वसंताचा दुसरा महिना होता या परिस्थितीची
पुष्टी करणारा भाद्रपद हा पावसाळ्याचा पहिला महिना असल्याचा उल्लेख ५/६३/५
या ऋचेत आहे–

रथं युंजते मरुत: शुभे सुखं शूरो न मित्रावरुणा गविष्टिषु ।
रजांसि चित्रा वि चरन्ति तन्यवो दिव: सम्राजा पयसा न उक्षतम् ॥ ५/६३/५

हे मित्रावरुणांनो, गोधनार्थ युद्धास निघालेल्या शूरांप्रमाणे मरुत् आपले रथ शुभे (म्हणजे सायणाच्या मते पाण्यासाठी) सुखाने जुंपत आहेत. चित्रविचित्र धुळींचे लोट पसरीत ते विहरत आहेत. "हे आकाशाच्या सम्राटांनो आम्हाला पाण्याने न्हाऊन काढा."

मित्रावरुणा हे भाद्रपद महिन्याचे अधिष्ठाते देव आहेत. या ऋचेतील वर्णन
पावसाळ्याच्या सुरुवातीला लागू होते. ५/६३ मधील ऋचांमध्ये हाच विषय पुढे
चालू आहे-

ऋतस्य गोपावधितिष्ठथो रथं सत्यधर्माणा परमे व्योमनि ।
यमत्र मित्रावरुणावथो युवं तस्मै वृष्टिर्मधुमत्पिन्वते दिव: ॥ ५/६३/१

"हे विश्वव्यवस्थेच्या रक्षक सत्यधर्म मित्रावरुणांनो, तुम्ही परम आकाशात आपल्या रथावर आरूढ होता. तुम्ही येथे ज्याचे रक्षण करता त्यावर स्वर्गातून मधुमती वृष्टी होते."

सम्राजावस्य भुवनस्य राजथो, मित्रावरुणा विदथे स्वर्दुशा ।
वृष्टिं वां राधो अमृतत्वमीमहे द्यावापृथिवी विचरन्ति तन्यव: ॥ १५/६३/२

"हे मित्रावरुणांनो, तुम्ही ज्ञानामध्ये वा यज्ञामध्ये आपल्या स्वर्गदर्शी दृष्टीने भुवनाचे सम्राट शोभता. आम्ही तुमच्यापासून वृष्टी, धन व अमरत्व यांची इच्छा करतो. (या तिन्ही) आकाश आणि पृथ्वीत पसरून विहार करीत आहेत."

सम्राजा उग्रा वृषभा दिवस्पती, पृथिव्या मित्रावरुणा विचर्षणी ।
चित्रेभिरभ्रैरुपतिष्ठतो रवं द्यां वर्षयथो असुरस्य मायया ॥ ५/६३/३

"हे मित्रावरुणांनो, तुम्ही पृथ्वीचे उग्र व जाणते सम्राट व आकाशाचे पती आहात. चित्रविचित्र ढगांनों तुम्ही गर्जनात अधिष्ठान मांडता व जीवनोत्फुल्ल मायेने आकाशाला वर्षायला लावता."

माया वां मित्रावरुणा दिवि श्रिता सूर्यो ज्योतिश्चरति चित्रमायुधम् ।
तमभ्रेण वृष्ट्या गूहथो दिवि पर्जन्य द्रप्सा मधुमन्त ईरते ॥ ५/६३/४



"हे मित्रावरुणांनो, तुमची माया आकाशात आहे. (या मायेनेच) सूर्य आपले विविध आयुध जो प्रकाश त्याचा संचार करतो. तुम्ही त्याला ढगांनी व वृष्टीने लपविता. हे पर्जन्या, तुझे मधुर बिंदु खेळत आहेत."

वाचं सुमित्रावरुणाविरावतीं पर्जन्यश्चित्रां वदति त्विषीमतीम ।
अभ्रा वसंत मरुत: सुमायया द्यां वर्षयतमरुणामरेपसम् ॥ ५/६३/६

"हे मित्रावरुणांनो पर्जन्य, कांतिमान, विविध व इरेने म्हणजे पृथ्वीने (मृद्गंधाने) भरलेली वाणी बोलत आहे. मरुत् आपल्या मायेने ढगावर आरूढ झालेले आहेत. लाल व कोमल आकाशाला तुम्ही वर्षायला लावा." ३/६२/१६ मध्ये मित्रावरुणांचे पुढीलप्रमाणे वर्णन आहे-

आ नो मित्रावरुणा, घृतैर्गव्यूतिमुक्षतम्, मध्वा रजांसि सुक्रतू ॥ ३/६२/१६

"हे शोभनकर्म मित्रावरुणांनो, आमचे गोठे तुपाने व भूमी मधाने भरा."

वरील ऋचातील फक्त ५/६३/५ ही ऋचा पावसाळ्याच्या प्रारंभाचा उल्लेख करते
व म्हणून भाद्रपद हा पावसाळ्याचा पहिला महिना होता असे अनुमान तिच्यावरून
काढता येईल. पण इतर ऋचांत तसा उल्लेख नाही. तरी येथे हे लक्षात ठेवले पाहिजे
की, भारतात पावसाचे म्हणता येतील असे फक्त दोनच महिने असतात व या दोन
महिन्यांत साधारणपणे सारखाच पाऊस पडतो. त्यामुळे पावसाच्या प्रमाणावरून यांपैकी
एका महिन्याची अधिष्ठात्री देवता पावसाशी सम्बद्ध होती असे म्हणता येत नाही.
तेव्हा ज्या महिन्याची अधिष्ठात्री देवता पावसाशी संम्बद्ध होती तो महिना हा पावसाळ्याचा
पहिला महिना होता हे अनुमान वाजवी आहे.

भाद्रपद हा पावसाळ्याचा पहिला महिना होता व अर्जुनी नक्षत्रात पावसाळा सुरू होत होता, याची पुष्टी पुढील ऋचेने होते-

सहस्रशृङ्गो वृषभो य: समुद्रादुदाचरत् ।
तेना सहस्येना वयं नि जनान्स्वापयामसि ॥ १७/५५/७

"हा सहस्रशृंगाचा वृषभ समुद्रातून वर आला आहे. या सहस्याने आम्ही लोकांना निजायला लावतो."

सायण येथे वृषभ याचा अर्थ सूर्य असा करतो. पण "सूर्य उगवला की, आम्ही लोकांना निजायला लावतो." असे म्हणणे विचित्र आहे.

अ. ज. करंदीकर वृषभ म्हणजे वृषभराशी असा अर्थ करतात. (भारतीय आर्यांचे
ज्योतिर्विज्ञान) व ऋग्वेदकाळात वृषभ राशी शरत्सम्पातानंतर सूर्यास्ती उगवत असे
व या काळातच सुखाने झोप घेणे शक्य होते अशी त्यावर मल्लिनाथी करतात.

करंदीकरांची ही मल्लिनाथी त्यांच्या बाकीच्या लिखाणाप्रमाणेच स्वैरकल्पना व संशोधन
यांच्यातील फरक न ओळखणारी आहे. उन्हाळ्यात रात्री उघड्यावर निजणे भारताच्या

बहुतेक भागात तसेच उत्तर भारतात सुखकारक असते. पावसाळ्यातील निद्रादेखील निगळ घर असेल तर सुखदच असते. पावसाची झिमझिम ऐकत निगळ घरात निजणे ही एक आगळीच मजा आहे. तेव्हा झोपेसाठी शरद ऋतूचा खास उल्लेख करण्याचे काही कारण नाही.

करंदीकरांनी सहस्य या शब्दाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. सहस् म्हणजे हिवाळा व सहस्य म्हणजे हिवाळी. तेव्हा ही ऋचा स्पष्टपणेच हिवाळ्यात सूर्यास्ती उगवणाऱ्या ताऱ्याबद्दल आहे.

वृषभ हे एक इंद्राचे नाव आहे. तसेच फल्गुन हे देखील इंद्राचेच नाव आहे. तेव्हा हा फाल्गुनी नक्षत्राचा उल्लेख आहे.

ऋग्वेदकाळात प्रात:काली फाल्गुनी नक्षत्रात सूर्य असताना ग्रीष्मात होत असे, असे पूर्वी दाखविलेच आहे. तेव्हा सहा महिन्यांनंतर हीच फाल्गुनी हिवाळ्यात सूर्यास्ती उगवणार.

ऋग्वेदकाळात प्रकाशासाठी लाकडांनी पेटविलेल्या अग्नीचा वा खाद्य तेलाने पेटविलेल्या ज्योतीचा उपयोग होत असे. अग्नीचा प्रकाश उन्हाळ्यात तापदायक व ज्योतीचा अपुरा असल्यामुळे सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त उपयोग करून अंधाराचा सारा काळ झोपेत घालविणे सोयीचे होते.

याप्रकारे पावसाळ्याच्या प्रारंभी सूर्योदयी उगविणाऱ्या फाल्गुनींचा उदय पुढे सहा महिन्यांनी हिवाळ्यात सूर्यास्ती होण्याचा उल्लेख परस्परसंगत आहेत.

१/११/६ ही अश्विनींना उद्देशून आहे. हा अश्विनी नक्षत्राचा उल्लेख आहे-

प्र वां. शरद्वान्वृषभो न नि:षाट् पूर्वीरिषश्चरति मध्व इष्णन् ।
एवैरन्यस्य पीपयन्त वाजैर्वेपन्तीरुर्ध्वा नद्यो न आगुः ॥ १/१८१/६

"हे अश्विनींनो, तुमच्यापैकी एक शरद्वान सांडाप्रमाणे सर्वांना उधळीत पुरातन मधुर कामना वाढवीत विहरतो आहे. तुमच्यापैकी दुसऱ्याच्या गमनाने, सामर्थ्याने भरलेल्या नद्या ओसंडत आहेत."

अश्विनीकुमार म्हणजे सकाळचा व संध्याकाळचा संधिप्रकाश असे एक मत आहे. वरील ऋचेत उल्लेखिलेले दोन अश्विनीकुमार हेच आहेत. पहिल्यानंतर शरदऋतूची निरभ्र चांदण्याची रात्र येते व तीमुळे कामोत्तेजन होते. दुसरीने सूर्योदयी हिमालयातील बर्फ वितळून नद्यांना पूर येतात. ही बर्फ वितळण्याची क्रिया शरदऋतूत सुरू होते. कारण पावसाळ्यात ढगांमुळे सूर्याचा प्रभाव पूर्णपणे पडत नाही.

सायण शरद्वान् म्हणजे शरद ऋतूतला चंद्र असा अर्थ करतो. ख्रि.पू. ४००० च्या सुमारास अश्विनी सूर्यास्तानंतर उगवत. तेव्हा सामर्थ्याने भरणे व ओसंडणे हे श्लेषाने शरदाच्या भरघोस पिकाकडे संकेत करतात. या ऋतूत चंद्राला कापणीचा चंद्र harvest moon असे म्हणतात.



१/१८०/४ ने याची पुष्टी होते-

युवं ह धर्मं मधुमन्तमत्रये अपो न क्षोदो अवृणीतमेषे ।
तद्वां नरा अश्विना पश्व इष्टी रथ्येव चक्रा प्रतियन्ति मध्वः ॥ १/१८०/४

"हे अश्विनींनो, तुम्ही इच्छुक अत्रीसाठी पाण्याच्या तुषाराप्रमाणे मधुर उषेची निवड केली. हे मधु रथाच्या चक्राप्रमाणे आवृत्त होतात, ही तुमचीच पश्वैष्टी आहे."

चंद्र अत्रीच्या डोळ्यांतून निघाला अशी कथा आहे. शरद हा सस्यप्राप्तीचा ऋतू आहे म्हणून त्याला 'पश्वैष्टी' म्हणजे 'नियमाने इच्छातृप्ती करणारा' असे म्हणणे युक्त आहे. मधुर ऊब म्हणजे शरदाने मृदु केलेले ऊन. शरद सौम्य उष्णता व पिके यांसाठी प्रसिद्ध आहे.

वरील विधानांच्या आधारे आपण ऋग्वेदांचा काळ ख्रि.पू. ४००० पर्यंत मागे नेऊ शकतो. पण हल्ली प्रा. के. डी. अभ्यंकर (उस्मानिया युनिव्हर्सिटी, हैदराबाद १९९१ बंगलोर परिषदेत वाचलेला निबंध) यांनी खालील उल्लेखांच्या आधारे तो ख्रि.पू. ७००० पर्यंत मागे जाऊ शकतो, असा सिद्धान्त मांडला आहे.

स्वश्वा यशसा यातमर्वाक् दस्रा निधिं मधुमन्तं पिबाथः ।
वि वां रथो वध्वा यादमानो, अन्तान्दिवो बाधते वर्तनिभ्याम् ॥ ७/६९/३

हे अश्विनींनो, तुम्ही आपल्या उमद्या अश्वांनी यशोयुक्त होत्साते पश्चिमेचा मार्ग आक्रमित आहात. हे सुंदरांनो तुम्ही मधाचा निधी जो साम त्याचे पान करीत आहात. वधूला घेऊन जाणारा तुमचा रथ आपल्या मार्गाने आकाशाच्या अंताला जाऊन भिडतो."

वरील ऋचेत अश्विनी आकाशाच्या अंताला जाऊन भिडतात, याचा अर्थ त्या आकाशाच्या शक्य तितक्या दक्षिणेस उगवतात, याशिवाय दुसरा होऊ शकत नाही. म्हणजे हा उत्तरायणाचा प्रारंभ आहे. अश्विनी नक्षत्रात उत्तरायणाचा प्रारंभ होण्याचा काळ ख्रि.पू. ७००० हा आहे.

अभ्यंकरांच्या या शोधाला पुष्टी देणारा उल्लेख मला सापडला आहे. तो असा-

सुषुप्वांस ऋभवस्तदपृच्छता गोह्य क इदं नो अबूबुधत् ।
श्वानं बस्तो बोधयितारमब्रवीत् संवत्सर इदमद्या व्यख्यत ॥ १/१६१/१३

"निजणाऱ्या ऋभूंनी विचारले, 'हे लपविण्यास अशक्य असलेल्या तू आम्हाला सांग की, आम्हाला कुणी उठविले?' बस्त म्हणजे बकरा म्हणाला, 'वाढणारा हा उठविणारा आहे' संवत्सरामध्ये तुम्ही या जगाला प्रकाशित करता."

ऋभु म्हणजे हिवाळ्याचा दुसरा महिना संपल्यानंतर जे कोणत्याच ऋतूत मोडत नाहीत असे बारा अधिक दिवस, असे मॅक्डोनेल म्हणतो. कोणत्याच ऋतूत मोडत नसल्यामुळे हे झोपी गेलेले ऋतू म्हणविले गेले. पुन्हा ऋतूंची सुरुवात झाल्यावर म्हणजे सूर्य उत्तरायणबिंदूवर आल्यावर हे झोपेतून उठले, असे म्हणता येते. ही ऋतूंची

सुरुवात करणारी बस्त म्हणजे मेष राशी होती. कारण या राशीत सूर्याने प्रवेश केल्यावरच दिवस श्वान म्हणजे वाढणारा झाला.

अश्विनी हे मेषराशीतले नक्षत्र असल्यामुळे अश्विनीत उत्तरायणाचा प्रारंभ होत असे, या अभ्यंकरांच्या विधानाची पुष्टी होते.

### पुरातत्त्वीय पुरावा

आतापर्यंत ज्योतिषीय पुराव्याची चर्चा केली. पण ऋग्वेद खिस्तपूर्व ३००० च्या पूर्वीचा म्हणजे ताम्रपाषाणयुगातला ग्रंथ आहे याबद्दल पुरातत्त्वीय पुरावादेखील सापडतो. पुढील ऋचा पहा-

आ तू षिंच हरिमीं द्रोरुपस्थे वाशीभिस्तक्षताश्मन्मयीभिः ।
परिष्वजध्वं दश कक्ष्याभिरुभे धुरौ प्रति वह्निं युनक्त ॥ १०/१०१/१०

"हे अध्वर्यूंनो लाकडाच्या कलशात सोम ओता. लाकडाच्या वास्त्याने सोला. दहा दोरांनी दोन्ही धुरा बांधा व त्यांना बैल जोडा."

यात दगडाच्या वास्त्याचा उल्लेख आहे. तो पाषाणयुगाकडे अंगुलिनिर्देश करणारा आहे. कक्ष्या म्हणजे गवताचा दोर. अशा दोराने धुरा बांधीत असत हाही लाकडाला भोक पाडून लोखंडाच्या दांड्याने धुरा जोडण्यास आवश्यक असलेल्या लोखंडाच्या वा काशाच्या तंत्रज्ञानाचा अभाव दर्शवितो.

खालील ऋचेतील उल्लेख वरील विधानाची पुष्टी करतो.

इमे मा पीता यशस उरुष्यवो रथं न गावः समनाह पर्वसु ।
ते मा रक्षन्तु विस्रसश्चरित्रादुत मा स्रा.माद्यवयन्त्विन्दवः ॥ ८/४८/५

"मी प्यालेले हे यशस्कर व रक्षणकर्ते सोम, रथाला जशा वाद्या जखडून ठेवतात तसे माझ्या सांध्यांना जखडून ठेवीत आहेत. चळलेल्या चरित्रक्रमापासून व व्याधींपासून ते माझे रक्षण करोत."

रथाची चौकट एका बल्लीतील भोकात दुसऱ्या बल्लीचा दंड घुसवून न करता त्या बल्ल्या एकमेकांना चामड्याच्या वाद्यांनी बांधून करीत हे यावरून स्पष्ट आहे.

जू व चौकट तयार करण्यासाठी याप्रमाणे लाकडाला भोक पाडणे टाळता आले तरी रथाच्या चाकाला भोक पाडल्याशिवाय रथ तयार होणार नाही. हे भोक दगडाची गिरमिटे वापरून पाडीत. एक भोक पाडताना डझनावारी दगडी गिरमिटे निकामी होत असली पाहिजेत. पण त्याशिवाय गत्यंतर नव्हते. दगडाची गिरमिटे उत्खननात सापडलेली आहेत व त्यामुळे हा केवळ तर्काचा प्रांत उरलेला नाही.

ऋग्वेदातील उल्लेख काळजीपूर्वक तपासले असता ऋग्वेदाच्या सूक्तकर्त्यांना कासे व लोखंड या धातूंची माहिती नव्हती हे स्पष्ट होते. सोन्याव्यतिरिक्त ऋग्वेदात उल्लेखिलेला धातु अयस् हा आहे. अयस् या शब्दात यस् म्हणजे जोर लावणे हा धातू आहे.



अर्थात् अयस् म्हणजे जिला जोर लागत नाही म्हणजे जो मऊ आहे असा धातू.

अयसचा हा अर्थ ते नेहमी लाल म्हणून त्यांचे वर्णन केले जाते यावरूनही निश्चित होतो.

हिरण्यरूपमुषसो व्युष्टावयःस्थूणमुदिता सूर्यस्य ।
आरोहथो वरुण मित्र गर्तमतश्चक्षाथे अदितिं तितिं च । ५/६/८

"हे मित्रावरुणांनो, उषःकाली सोन्यासारख्या व सूर्योदयी अयस्च्या स्तम्भासारख्या दिसणाऱ्या आपल्या रथावर तुम्ही आरूढ होता म्हणूनच तुम्ही दिती म्हणजे मर्त्य व अदिती म्हणजे अखंड व अमर्त्य पृथ्वी यांना पाहू शकता."

शस्त्र बनविण्याचा धातू म्हणून तांब्याचा सगळ्यात मोठा दोष हा आहे की, ते सहज वाकते व त्याचे शस्त्र निकामी होते. याचेही उल्लेख ऋग्वेदात आहेत-

एवा ते इन्द्रोचथमहेम श्रवस्या न त्मना वाजयन्तः ।
अश्याम तत्साप्तमाशुषाणा ननमो वधरदेवस्य पीयोः ॥ २/१९/७

"हे इंद्रा, बल व यश यांच्या कामनेने आम्ही तुझी स्तोत्रे गातो. तुझी प्राप्ती झाली की आम्हाला मित्र मिळतात. देव न मानणाऱ्या हिंसकाचे शस्त्र तू वाकविलेस."

सना ता त इंद्र नव्या आगुः सहो नभोऽविरणाय पूर्वीः ।
भिनत्पुरो न भिदो अदेवीर्ननमो वधरदेवस्य पीयोः ॥ १/१७४/८

"हे इंद्रा, तुझे नवे व जुने पराक्रम (स्तोत्रामध्ये) प्रकटतात. तू नित्य संग्रामांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी पूर्वी बहुत हिंसा साहिल्यास. तू देवांना न मानणाऱ्यांची पुरे फोडलीस व हिंसक अदेवाचे शस्त्र वाकविलेस."

य ऋक्षादंहसो मुचद्यो वार्यात्सप्तसिन्धुषु ।
वधर्दासस्य तुविनृम्ण नीनमः ॥ ८/२४/२७

"सप्तसिंधूंमध्ये राक्षस असोत वा आर्य असोत, त्यांच्या पापापासून जो मुक्त करतो त्या (इंद्राने) शत्रूचे शस्त्र वाकविले."

'ननमः' याचा अर्थ सायण कधी कधी 'खाली केलेस' असा करतो. नम् धातूचे खालील अर्थ आपट्यांच्या कोशात दिलेले आहेत.

1-bow 2-bend 3-sink

यातील bow व sink हे अर्थ येथे लागू होत नाहीत. इंद्राने शत्रूला नमविले असे न म्हणता शत्रूच्या शस्त्राला नमविले असे म्हणण्यात काहीच औचित्य नाही. तरवारीचा शोध लागल्यानंतरच्या काळातील वर्णनात एखाद्या कवीने शत्रूला नमविले असे न म्हणता शत्रूच्या शस्त्राला नमविले असा शब्दप्रयोग सापडणार नाही. 'नमयामास नृपाननुद्धरम्' 'अजाने राजांना नमविले' असेच कालिदास म्हणतो. त्यांची शस्त्रे नमविली असे म्हणत नाही.

ऋग्वेदीय धातू तांबे हा होता याबद्दल धर्मशास्त्रकारांना शंका नाही. आश्वलायनगुह्यसूत्रात यासंबंधी पुढील उल्लेख आहे-

"... क्षुरस्ताम्रमयो भवेत्...." १७ भट्टकुमारिलस्वामिप्रणीता आश्वलायनगृह्यकारिका ।
आश्वलायनगृह्यसूत्रं नारायणकृतवृत्तिसमेतम् । अध्याय १, खं. १७ सूत्र ९
स्वधिते मैवं हिंसीरिति निष्पीडय... अत्र लोहशब्दस्ताम्रे वर्तते (नारायणीयवृत्ती)

वरील उद्धरणाचा भावार्थ असा की, वैदिक विधीत तांब्याच्या वस्तऱ्याने क्षौर करावे. तो इजा करीत असला तरी, "याप्रमाणे छळू नकोस" अशी प्रार्थना करावी. कारण तांबे हाच वैदिक धातू आहे. विजेचे दिवे आले तरी देवापुढे समईच लावतात कारण प्राचीन परंपरेत जे पावित्र्य भासते ते नवीन उपकरणे कितीही कार्यक्षम असली तरी त्यांच्यात भासत नाही.

ऋग्वेदाचा काही भाग ख्रि.पू. ७००० च्या सुमारास आहे, या मताची पुष्टी करणारा पुरावा भूगर्भशास्त्रात सापडला आहे. खालील ऋचा पाहा-

एका चेतत्सरस्वती नदीनां शुचिर्यती गिरिभ्य आ समुद्रात ।
रायश्चेतन्ती भुवनस्य भूरेर्घृतं पयो दुदुहे नाहुषाय ॥ ७/९५/२

"नद्यांमधली ही एक चेतनाशील व पवित्र सरस्वती पर्वतातून निघून समुद्राला मिळते. भुवनाचे वैभव वाढवीत ती मानवासाठी पाण्याचे दोहन करते."

सरस्वती हीच फक्त समुद्राला मिळते व बाकीच्या (पंजाबातील) नद्या सरस्वतीला मिळतात, असा या ऋचेचा अर्थ आहे.

सरस्वती हल्ली लुप्त झालेली आहे. पण ऋग्वेदकाळी तीच प्रमुख नदी मानली जात होती. तिला उद्देशून ऋग्वेदात स्वतंत्र सूक्ते आहेत. ती इतकी खोल होती की, मधे-मधे तिच्यात सरोवरासारखे मोठे डोह झाले होते. म्हणून तिला सरस्वती असे नाव पडले.

ही वर्णने काल्पनिक नाहीत, असे हल्ली सरस्वतीचे भूमिगत प्रवाह सापडल्यामुळे सिद्ध झाले आहे.

सरस्वती समुद्राला मिळत होती व हा काळ ख्रि.पू. ७००० चा होता असे Central Arid Zone Research Institute Jodhapur ने सरस्वतीच्या भूमिगत प्रवाहांचा अभ्यास करून सिद्ध केले आहे.

सारांश ज्योतिषीय व पुरातत्त्वीय अशा दोन्ही प्रकारच्या पुराव्यांचा विचार करता ऋग्वेदाचा अति प्राचीन भाग ख्रि.पू. ७०००, त्यानंतरचा ख्रि.पू. ४००० व शेवटचा व्यासकालीन म्हणजे ख्रि.पू. ३००० चा आहे.

(सारे संदर्भ निबंधातच दिले आहेत.)

●



3

# ऋग्वेदातील सोम

नी. र. वऱ्हाडपांडे

या निबंधात सोमाबद्दल खालील सिद्धान्त मांडले आहेत.

(१) सोम म्हणजे भांग. भांगेचे रोप असते. या रोपाची पाने कुटून त्याचा रस काढतात व त्याचे पान करतात: या रसालाच उद्देशून भांग हा शब्द वापरतात. पण याच रोपाची फुले वाळवून त्याची भुकटी धूम्रपानासाठी वापरली की तिला गांजा म्हणतात व पानावर साचणारी राळ खरवडून काढून धूम्रपानासाठी वापरली की तिला चरस म्हणतात. हे तिन्ही प्रकार ऋग्वेदात सोमाचे म्हणून वर्णिलेले आहेत.

(२) सोमविषयक साऱ्या ऋचा सोम वनस्पती व चंद्र या दोहोंनाही लागू होतात.

## सोमाबद्दल इतर कल्पना

सोमाबद्दल इतरांनी जे तर्क केलेले आहेत त्यांचे खंडण करणे आवश्यक वाटत नाही. कारण ऋग्वेदातील सारी वर्णने आपल्याला सोम म्हणून अभिप्रेत असलेल्या वनस्पतीला लागू आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न देखील न करता या कल्पना केल्या आहेत. ही सारी वर्णने लागू होतील असे भांगेचे रोप हीच एकमात्र वनस्पती आहे. 'सोमाला पाने व फांद्या नव्हत्या त्या अर्थी ते एक ओळंबे होते', असे ठोकून देण्यात आले आहे. पण सोमाला फांद्या, पाने व फुलेदेखील असल्याची वर्णने ऋग्वेदात आहेत.

## सोमाच्या फांद्या, पाने व फुले

*फांद्या*

वनस्पतिं पवमान मध्वा समंग्धि धारया
सहस्रवल्शं हरितं भ्राजमानं हिरण्ययम् ॥९/५/१०

"हे सोमाधिष्ठित देवते, हजार फांद्यांच्या हिरव्या व सोन्याप्रमाणे दीप्तिमान अशा या वनस्पतीला मधाच्या धारांनी युक्त कर."

*पाने*

दिव्यः सुपर्णोऽवचक्षि सोम पिन्वन्धाराः कर्मणा देववीतौ।

ऐन्दो विश कलशं सोमधानं, क्रन्दन्निहि सूर्यस्योपरश्मिम्॥१/१७/३३

"हे उत्कृष्ट पर्णवान सोमा यज्ञादि कर्मात देवांचे प्रिय करण्यासाठी धारा वाहवीत तू दैवी भासतोस. हे बिन्दुरूपा, तू सोम साठविणाऱ्या कलशात प्रवेश कर. खळखळ करीत तू सूर्याच्या उपकिरणांमध्ये म्हणजे ज्योत्स्नेमध्ये ये" (तिच्यातील अमृत आपल्यात भिनविण्यासाठी) (चन्द्राचा प्रकाश सूर्यकिरणांमुळे आहे याचे ज्ञान होते.)

*चन्द्राला उद्देशून*

"हे दिव्य पक्षाप्रमाणे उडणाऱ्या सोमा, यज्ञादि कर्मात देवांच्या प्रीतीसाठी किरणांच्या धारा वर्षत तू खाली म्हणजे भूलोकांकडे पहा. हे इन्दो सोमाचे स्थान जे विश्वाचे कळसरूप आकाश त्यात प्रवेश कर. आमंत्रण करीत सूर्याच्या किरणात प्रवेश कर."

एक: सुपर्ण: स समुद्रमाविवेश स इदं विश्वं भुवनं विचष्टे।
तं पाकेन मनसापश्यमन्तितस्ते माता रेळिह स उ रेळिह मातरम्॥ १०/११४/४

"हा चांगला पर्ण एक जरी समुद्रात म्हणजे कुढ्या माणसात शिरला तरी तो जणू सारे भुवन पाहतो. म्हणजे त्या माणसाला साऱ्या जगाचे ज्ञान झाल्यासारखे वाटते. याला मी आज परिणत झालेल्या मनाने जवळून जाणतो आहे. याला त्याची माता चाटते व हा आपल्या मातेला चाटतो. (सोम कुटण्याचा बत्ता त्याला चाटतो व तो त्या बत्त्याला चाटतो, दोघेही एकमेकाला चिकटतात.)

*चंद्राला उद्देशून*

"हा पक्षासारखा चंद्र समुद्रात म्हणजे आकाशात शिरला. तो साऱ्या भुवनाला पाहतो. मी त्याला परिणत झालेल्या मनाने पाहत आहे. (म्हातारा होईपर्यंत पाहत आलो आहे.) त्याला त्याची माता जे आकाश ते चाटते व तो आकाशाला चाटतो."

*फुले*

स वह्नि सोम जागृविः पवस्व देववीरति। अभि कोशं मधुश्च्युतम्॥९/३६/२

"हे देवप्रिय वह्निरूप जागृत सोमा, मधुस्रावी अशा उत्कृष्ट कोशाला तू प्रवाहित कर."

येथे कोश म्हणजे अर्धोन्मिलित फूल. पूर्ण न उमललेल्या फुलापासून गांजा केला की तो अधिक रुचकर होणार. याबाबतीत वनस्पतिशास्त्रज्ञांशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की भांगेच्या फुलाची कळी विशिष्ट प्रमाणात वाढली असता तिच्यापासून उत्कृष्ट गांजा तयार होतो, त्यापेक्षा कमी वाढली असल्यास तो अपरिपक्व असतो व जास्त वाढली असता तो रोपाच्या मुळासारख्या अवयवात उतरतो व कळीतील त्याची शक्ती क्षीण होते.



वह्निरूप सोम म्हणजेच धूम्रपानासाठी वापरण्यात येणारा सोम.

*चंद्राला उद्देशून*

"हे उत्कृष्ट मधुस्रावी खजिना धारण करणाऱ्या जागृत देवप्रिय सोमा, प्रवाहित हो." (वह्नि म्हणजे वहन करणारा)

वृषेव यूथा परि कोशमर्षस्यपामुपस्थे वृषभः कनिक्रदत्।
स इंद्राय पवसे मत्सरिन्तमो यथा जेषाम् समिथे त्वोतयः॥

"हे सोमा गार्यीच्या कळपात डरकाळ्या फोडणाऱ्या वृषभाप्रमाणे पाण्याच्या अंतरंगातून तू कळीच्या भोवती घोंगावतोस. हे मदकारका, तुझ्या रक्षणाखाली असलेले आम्ही युद्धात जिंकावे म्हणून तू इन्द्रासाठी वाहतोस."

गुडगुडीमध्ये पेय धूम्र पाण्यातून गाळला जातो व गुडगुड आवाज करतो याचे हे वर्णन आहे. कोशाच्या भोवती सोम घोंगावतो म्हणजे कळीचे चूर्ण करून केलेल्या गांजाभोवती घोंगवतो.

*चंद्राला उद्देशून*

"गार्यीच्या कळपात डरकाळ्या फोडणाऱ्या सांडाप्रमाणे जलस्रावी अशा आकाशाच्या गोलात परिभ्रमण करणाऱ्या हे सोमा, मदकारक असा तू इन्द्रासाठी वाहतोस, जेणेकरून तुझ्या संरक्षणाखाली आम्ही युद्धात जिंकावे."

अत्यो न हियानो अभि वाजमर्ष स्वर्वित्कोशं दिवो अद्रिमातरम्।
वृषा पवित्रे अधि सानो अव्यये सोमः पुनानः इन्द्रियाय ध्यायसे। ९/८६/३

"हे सोमा, प्रेरित केलेल्या अश्वाप्रमाणे स्वर्गाची रहस्ये जाणणारा तू दगडाने निर्मिलेला ज्योतीचा कोश यज्ञात आण. जेथून वारा फुंकता येतो अशा गाळण्याच्या टोकात वर्षक असा तू इन्द्रियांनी धारण करण्यासारखा आहेस."

अवि म्हणजे वारा (आपटे) + अय् म्हणजे जाणे, म्हणजे जेथून वारा जातो ते म्हणजे चिलीम.

"ज्योतीचा कोश" या शब्दप्रयोगाने धूम्रपानासाठी पेटविलेली पूड सूचित होते. ही पूड कोशाची म्हणजे कळीची केलेली असते. कळी वाळवून तिला दगडाने कुटतात म्हणून तिला अद्रिमातर म्हटलेले आहे.

*चंद्राला उद्देशून*

"हे चंद्रा, युद्धाला प्रेरित अश्वाप्रमाणे तू ढगाचे जन्मस्थान असलेल्या या आकाशाच्या कोशात विहार कर. अनंत व पावन करणाऱ्या या आकाशरूपी खजिन्यात ये. या अनंताच्या शिखरावर वर्षक असा तू धारक इंद्रासाठी आरूढ हो."

यज्ञस्यकेतु: पवते स्वध्वर: सोमो देवानामुपयाति निष्कृतम्।
सहस्रधार: परि कोशमर्षति वृषा पवित्रंमत्येति रोरुवत्॥९/८६/७

"हा उपासनेचा ध्वज यज्ञाला पवित्र करीत आहे. तो ब्राह्मणांच्या निष्कृतास म्हणजे कृतकृत्यतेसाठी येत आहे. सहस्रधारांचा तो कळीच्या भोवती परिक्रमा करीत आहे. हा वर्षक गुडगुड करीत शोधकाला पार करीत आहे."

कळीच्या भोवती म्हणजे वाळल्या कळीच्या चूर्णाभोवती सहस्रधार गुडगुड करीत येतो, हे वर्णन सोमाच्या पानांच्या रसाला मुळीच लागू होत नाही व ते वारंवार येते हे लक्षात ठेवले पाहिजे. उलट धूम्रपानातील वायुरूप सोमाला ते चांगले लागू होते.

*चन्द्राला उद्देशून*

"हा उपासनेचा केतु व यज्ञाला शुभ बनविणारा वाहत आहे तो ज्योतींचे स्थान जे आकाश तेथे प्रकट होत आहे. सहस्रधारांचा तो पृथ्वीचे आवरण जे आकाश त्यात परिभ्रमण करीत आहे. साऱ्या शोधकावर मात करीत व आपल्या ज्योत्स्नेचे सूर पसरीत हा वर्षक येत आहे."

प्र तु द्रव परि कोशं निषीद नृभि: पुनानो अभि वाजमर्ष।
अश्वं न वा वाजिनं मर्जयन्तोऽच्छा बर्ही रशनाभिर्नयन्ति॥९/८७/१

"हे सोमा वाहा व कळीच्या भोवती वास कर. नरांनी शुद्ध केलेला तू बलप्रदान कर. अश्वाप्रमाणे तुला धूत अंगुलींच्या साहाय्याने शुद्ध केलेल्या तुला मानव अग्नीप्रत नेतात."

दहा अंगुलीत धरून सोमाचे धूम्रपान करणे म्हणजे त्याला अग्नीप्रत नेणे. सोमाला अंगुलींनी शुद्ध करणे हे वर्णन फक्त गुडगुडीतल्या सोमाला लागू होते. रसरूप सोम अंगुलींनी शुद्ध केला जात नाही.

*चंद्राला उद्देशून*

"हे चंद्रा, वाहा व आकाशरूपी आवरणात निवास कर. मानवांनी स्तुतीने पुनीत केलेला तू बलप्रदान कर. किरणांनी तुला घोड्याप्रमाणे धूत दीप्तीप्रत नेतात." (चंद्राची दीप्ती सूर्याच्या व इतर स्वयंप्रकाशी ताऱ्यांच्या किरणांनी सिद्ध होते).

परि कोशं मधुश्च्युतमव्यये वारे अर्षति। अभि वाणीर्ऋषीणां सप्त नूषत॥९/१०३/३

"हा सोम ज्यात वारा फुंकला जातो त्या आवरणात म्हणजे गुडगुडीत मधुस्रावी कळीभोवती पिंगा घालतो. ऋषींच्या सात प्रकारच्या छंदातली वाणी त्याची स्तुती करते.



*चंद्राला उद्देशून*

"अनन्त आवरणातील (आकाशातील) मधुस्रावी खजिन्यात; (आकाशस्थ ज्योतींच्या किरणात) हा सोम विहार करतो. त्याला ऋषींची सात छन्दातली वाणी स्तविते."

प्र सोम देववीतये सिन्धुर्न पिप्ये अर्णसा।
अंशो: पयसा मदिरो न जागृवि:रच्छा कोशं मधुश्च्युतम्। ९/१०७/१२

"हे सोमा, पाण्याने पूर्ण केल्या जाणाऱ्या समुद्राप्रमाणे देवांच्या प्रीतीसाठी पाण्याने तुझे सामर्थ्य वाढविले जाते. ज्योतिर्मय पाण्याने तू मधुस्रावी कळीप्रत मदकारकतेने जागृत होतोस."

ज्योतिर्मय पाणी हा गुडगुडीचा उल्लेख आहे.

*चंद्राला उद्देशून*

"हे सोमा, आटलेली नदी जशी पाण्याने पुन: भरते तसा देवांच्या प्रीतीसाठी तू पुन: पुन: पूर्ण होतोस. आकाशाच्या मधुस्रावी खजिन्यात तू आपल्या दुधाळ कांतीने मदकारक व जागृत आहेस."

सोम हे रोप आहे, ते ओळम्बे वा लतादेखील नाही, हे साऱ्या वर्णनावरून स्पष्ट असता सोमवल्ली असा शब्द कधीकधी वापरतात. हा शब्द ऋग्वेदात कुठेही नाही.

सोम ही ऋग्वेदातील एक महत्त्वाची देवता आहे. ऋग्वेदाचे नववे मंडल सोमविषयक सूक्तांनी भरलेले आहे व सोमाला वाहिलेली निदान अर्धा डझन सूक्ते इतर मंडलांतूनही विखुरलेली आढळतात. सोमाचा रस विधिपूर्वक प्राशन केला जात असे. इतर देवतांप्रमाणेच सोमावरही व्यक्तित्वारोप केलेला आहे. सोम हजार अग्रांचा दंड व धनुष्य ही शस्त्रे धारण करतो. तो इन्द्राबरोबर रथात बसतो. या रथाचे घोडे वायुरूप असतात. सोमाचे दिवसातून तीन वेळा सेवन म्हणजे दोहन होत असे. सकाळी व दुपारी इंद्रासाठी व संध्याकाळी ऋभूसाठी.

सोम हा शब्द सू धातूपासून निघालेला आहे. सू म्हणजे पिळणे वा शिंपणे. सोम वनस्पतीचा रस काढण्याच्या क्रियेला पिळणे हा अर्थ लागू होतो व सोमाच्या म्हणजे चंद्राच्या प्रकाश वितरणाला शिंपणे हा अर्थ लागू होतो. ("चांदणे शिंपीत जाशी, चालता तू मंजुळे")

सोम म्हणजे काय हे उत्तरकालीन आयुर्वेद ग्रंथांना माहीत नसल्यामुळे त्यांनी सोम ही चन्द्राच्या कलांबरोबर फुलणारी व क्षीण होणारी एक वनस्पती आहे, अशी जगात कुठेच अस्तित्वात नसलेल्या वनस्पतीची कल्पना केली. सोम ही भारतात मिळणारी वनस्पती नाही, असे म्हणण्यास यामुळे अवकाश सापडला. त्यातून ऋग्वेदातील पुढील ऋचा, ऋग्वेदात नेहमी अभारतीय गोष्टी शोधण्याची प्रतिज्ञा करून बसलेल्या

आर्याक्रमणवाद्यांच्या मदतीस धावली :–

सोमं मन्यते पपिवान्यत्संपिंशन्त्योषधिम्।
सोमं यं ब्रह्माणो विदुर्न तस्याश्नाति कश्चन॥१०/८५/३

"एखादी औषधी कुटणाऱ्यांना (व तिचा रस पिणाऱ्यांना) आपण सोम पितो आहोत असे वाटते. पण जो सोम ऋत्विज पितात त्याचा (अंशही) कुणाला प्यायला मिळत नाही."

येथे 'विदुः' याचा अर्थ 'जाणत होते' असा भूतकालवाचक करून आजकाल सोमाचे कुणाला ज्ञान नाही असा अर्थ क़रण्यात आला आहे. पण विदुः हा "लटो विदो वा" या सूत्राप्रमाणे वर्तमानकाळ आहे, भूतकाळ नाही. तेव्हा ही ऋचा लिहिणाऱ्याच्या काळीदेखील ऋत्विज खरा सोम पीत होते. सोम लुप्त झालेला नव्हता.

या ऋचेचा रोख असा आहे :–

ज्याप्रमाणे समाजमान्य रीतीने विवाहात स्त्रीसमागम करणे हा धर्म आहे, त्या बाहेर करणे हे पाप आहे, त्याचप्रमाणे सोम हा धार्मिक विधीतच प्यायला तर ती सोमोपासना होते नाहीतर ती नशा ठरते.

या ऋचेवर भाष्य करताना चंद्राच्या कला पिणारे देवच फक्त खरा सोम पितात (म्हणजें सोमयाग करणारे ऋत्विज सोम पिण्याचे नुसते नाटक करतात) असा सायण अर्थ करतो. पण 'ब्रह्माण:' म्हणजे देव हा अर्थ सरळ नाही.

'सोम मिळाला नाही तर पूतिक वापरावे' असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. पूतिक म्हणजे रानशेर. यात सोमाच्या वर्णनात सांगितलेले कोणतेच गुणधर्म नाहीत. ते बेचव असते, त्यात कोणतीही मादकता नसते. तेव्हा 'सोमाच्या ऐवजी पूतिक वापरा' हे पूतिकात सोमाचे गुण आहेत म्हणून सांगितलेले नसून 'बायको नसेल तर धार्मिक विधीत सुपारी ठेवावी' याप्रमाणे आपद्धर्म म्हणून सांगितलेले आहे.

"सोम मिळाला नाही तर" याचा अर्थ सोम लुप्त झाला होता असा होत नाही. सोमाला फार मागणी असल्यामुळे व तो मुंजावत् पर्वतासारख्या दूरच्या ठिकाणाहून आणावा लागत असल्यामुळे कधीकधी तो मिळणे दुष्कर असे. तसे यज्ञमंडपात सोमाचे भारे ठेवलेले असत. त्यांची कधकधी चोरी होत असे व ऐन यज्ञाचे वेळी सोम उपलब्ध नसे. पण मुहूर्त टळू नये म्हणून ठरल्या वेळेस पूतिकाच्या साहाय्याने यज्ञ सुरू करीत.

दुसऱ्या महायुद्धात साखर दुर्मिळ झाली होती व त्यामुळे काही लोक साखरेऐवजी गूळ वापरीत. यावरून "दुसऱ्या महायुद्धाच्या काळी भारतीयांनी जेथे साखर उपलब्ध नव्हती अशा ठिकाणी स्थलांतर केले होते' असे अनुमान निघत नाही.

"सोम म्हणजे काय याची आठवण लुप्त होण्याचे कारण काय ?" असा प्रश्न कधी कधी विचारण्यात येतो. याचे उत्तर फारसे अवघड नाही. सोमच नव्हे तर वैदिक



ऋचांचा काय अर्थ होतो याचे ज्ञानदेखील यास्काच्या काळीं लुप्त झाले होते व वेदांचे अर्थ करणारे ऐतिहासिक, याज्ञिक, नैदान व नैरुक्तिक असे चार पंथ निर्माण झाले होते. कौत्सासारखे काही विद्वान तर वेदांच्या ऋचांना काही अर्थच नाही असे म्हणत असत. वेदांबद्दल जर एवढे अज्ञान उत्तरकाली होते तर त्यातील सोम ही काय चीज आहे याचे ज्ञान लुप्त झाले होते, यात आश्चर्य करण्यासारखे काय आहे ?

**सोमाच्या धूम्रपानाचे आणखी उल्लेख**

तमीं हिन्वन्ति अग्रुवो धमन्ति बाकुरं दृतिम्, त्रिधातु वारणं मधु॥ ९/१/८

*वनस्पतीला उद्देशून*

"या सोमाला बोटांनी प्रेरित करतात. (चिलीम ओढताना दहाही बोटांची फुंकणी करतात.) त्याची कांतीमान त्वचा (बाकुर दृती ती हीच) फुंकतात. (धमन्ती) असा हा तीन प्रकारचे धातु (म्हणजे ज्या द्रव्यापासून पेय सोम तयार करतात त्या भांग, गांजा व चरस या तीन रूपातला (ग्लानी) निवारण करणारा वा संरक्षक कवचासारखा मधु म्हणजे गोड पदार्थ आहे."

सायण बाकुर हे भासुरचे रूप मानतो. ग्रिसवल्ड[२] म्हणतो की, बाकुर या शब्दाला भासुराचे रूप मानणे भाषाशास्त्राला धरून नाही व म्हणून तो बाकुरची व्युत्पत्ती वच् पासून लावतो व त्याचा अर्थ "आवाज करणारा" असा देतो. हे एक ठोकून दिलेले विधान आहे. ब चा भ व भ चा ब तसेच क चा स व स चा क होणे ही शब्दव्युत्पत्तीत नेहमीच सापडणारी गोष्ट आहे. उलट बाकुरची व्युत्पत्ती वचूपासून सांगणे हा द्राविडीप्राणायाम आहे.

सेंटर आणि केंद्र व सीझर आणि कैसर यात स व क ची अदलाबदल झाली आहे. भ-स-ब-ची अदलाबदल संस्कृत भंग म्हणजे भांग व आवेस्त्यातील बंह म्हणजे भांग तसे संस्कृत भरणी व मराठी बरणी यात झाली आहे.

यावरून सेंटर हे केन्द्राच्या व बंह हे भांगेच्या आधीचे आहे, असे अनुमान काढता येणार नाही. कारण समिती व कमिटी, बाहेर व भाइर. ही उलट उदाहरणे उपलब्ध आहेत. शब्दातील बदल एकाच दिशेने होत नसून चक्राकार असतात. कोट लांब लांब होता होता पुनः आखूड होत जातात. आधी जोडाक्षरांच्या जागी शुद्ध अक्षरे वापरण्याची प्रवृत्ती असते. पण नंतर साध्या अक्षराच्या जागी जोडाक्षरे वापरण्याची प्रवृत्ती होते. जसे संस्कृत व्रणचे मराठी वण व क्षीणचे शीण होते. याच्या उलट शापचे श्राप व विमुखचे विन्मुख होते.

*चंद्राला उद्देशून*

"किरणे या जणू चंद्राच्या अंगुली आहेत. (अग् हा धातु गतिवाचक आहे.

त्यामुळे ही किरणे सर्वत्र संचार करतात हे द्योतित होते.) ही किरणे, अंगुली चिलमेला वेष्टितात त्याप्रमाणे चंद्राला वेष्टितात व फुंकर घालून घालून ते जणू चंद्राची बाकुर दृती म्हणते ज्योत्स्नेचा संचार, कांतिमान् करतात. असे हे त्रिधातू म्हणजे तीन स्थानी राहणारे (सायण) संरक्षक मधु आहे. ''

चंद्राची तीन स्थाने म्हणजे पूर्व क्षितिज, खमध्य व पश्चिम क्षितिज. अर्थात् हे पौर्णिमेच्या चंद्राचे वर्णन आहे.

हाच अर्थ पुढील ऋचेत व्यक्त झाला आहे :–

एतमु त्यं दश क्षिपो मृजन्ति सप्त धीतय:। स्वायुधं मदिन्तमम्॥ ९/१५/८

*वनस्पतीला उद्देशून*

''या मादक व आयुधांनी म्हणजे साधनांनी सज्ज सोमाला सात ऋत्विज दहा अंगुलींनी (बंदिस्त करून) तीक्ष्ण करतात.'' (मृज् म्हणजे तीक्ष्ण करणे : आपटे). दहा अंगुलीत चिलमीतील सोमाला बंद करून फुंकर मारल्यानेच त्याची परिणामकारकता वाढते.)

*चंद्राला उद्देशून*

क्षिप् म्हणजे फेकणे वा शिंपणे. ''किरणरूप दहा अंगुली चंद्राला (प्रकाशाने) धुवून काढतात. सात ऋत्विज मंत्रांनी त्याला तेजस्वी बनवितात.'' म्हणजे एका अर्थी धुवून काढतात. (मृज् म्हणजे धुणे)

*याच कल्पनेचा विस्तार*

यमत्यमिव वाजिनं मृजन्ति योषणो दश। वने क्रीडन्तमत्यविम्॥९/६/५

*वनस्पतीला उद्देशून*

''पाण्यात खेळणाऱ्या व श्रेष्ठ वायुरूप असलेल्या; (अवि म्हणजे पाणी : आपटे) वा मेंढीच्या लोकरीचे कापड जिच्या तोंडावर गुंडाळलेले आहे अशा चिलमेतून गाळून निघालेल्या या सोमाला दहा अंगुली अतिगामी घोड्याप्रमाणे तीव्र करतात.''

''अवेवरिषु'' म्हणजे ''मेंढीच्या लोकरीने केलेल्या कापडात'' असे उल्लेख ऋग्वेदात ठिकठिकाणी आहेत.

धूम्रपानाचा धूर पाण्यातून काढण्याची गुडगुडीची प्रक्रिया येथे विवक्षित दिसते. घोड्याची उपमा वेगासाठी नसून त्याच्या सामर्थ्यासाठी आहे.

*चंद्राला उद्देशून*

''वनात म्हणजे (आकाशस्थ ज्योतींच्या समूहात) अतिगामी घोड्याप्रमाणे



वातावरणाच्या वर क्रीडा करणाऱ्या या चंद्राला त्याच्या दहा (दिशारूपी) योषिता न्हाऊ घालीत आहेत.''

चंद्र वातावरणाच्या वर आहे कारण द्यौ ही अन्तरीक्षाच्या वर आहे ही कल्पना ऋग्वेदात अनेक ठिकाणी आली आहे.

समिद्धो विश्वतस्पति: पवमानो विराजति प्रीणन् वृषा कनिक्रदत्॥९/५/१

पेटणारा, वाहणारा, वर्षणारा हा सर्वांचा पती गुडगुड करीत व सुखवीत विराजमान होत आहे.

समिद्ध म्हणजे पेटलेला, कनिक्रदत् म्हणजे गुडगुडणारा व पवमान म्हणजे वायूसारखा वाहणारा, ही विशेषणे धूम्रपानातील सोमालाच लागू होऊ शकतात. रसरूप सोम गुडगुड आवाज कसा करील?

*चंद्राला उद्देशून*

''हा प्रकाशणारा, आमंत्रिणारा, (क्रन्द आह्वाने) (प्रकाश) वर्षिणारा वाहणारा (आकाशात संथपणे मार्गक्रमण करणारा) विश्वाचा पती विराजत आहे.''

असर्जि स्कम्भो दिव उद्यतो मद: परि त्रिधातुर्भुवनान्यर्षति।
अंशु रिहन्ति मतय: पनिप्नतं गिरा यदि निर्णिजं ऋग्मिणो ययु:॥ ९/८६/४६.

जर ऋचापाठकांना पठण करता करता राळ सापडली तर हा (आमचा) आधार निर्माण झाला. ज्योतीचा मद उसळला, हा तीन द्रव्यांचा सोम साऱ्या भुवनामध्ये संचार करू लागला व मने गुडगुडणाऱ्या ज्योतीचा स्वाद घेऊ लागली.

या ऋचेतील 'निर्णिजम्' हा शब्द महत्त्वाचा आहे. निर्णेजन म्हणजे खरवडणे. अर्थात् निर्णिक् म्हणजे खरवड. सोमाची योग्य ती पाने खरवडल्याने त्या पानावर राळेसारखा जमलेला चरस मिळतो. हा फक्त काही पानावर व अत्यंत थोडा असतो त्यामुळे ऋचांचा पाठ करीत तासन् तास खरवडल्याने थोडा फार मिळतो.

*चंद्राला उद्देशून*

(सोमविषयक ऋचांच्या) ''पठणाने जर या रूपाची प्रतीती आली तर हा ज्योतीचा आधार निर्माण झाला (चंद्र हा रात्री चमकणाऱ्या ज्योतीत सगळ्यात मोठा दिसत असल्यामुळे तो त्यांचा पती वा आधार समजला जातो.) मद उसळू लागला. हा (पूर्वपश्चिम क्षितिजे व खमध्य या तीन स्थानीं राहणारा (म्हणजे पौर्णिमेचा) चंद्र संचार करतो आहे. मने याच्या आवाहन करणाऱ्या ज्योत्स्नेचा आस्वाद घेतात.''

निर्णिज या शब्दाचा रूप व धातू या शब्दाचा स्थान व ''पनिप्नतम्'' चा बोलावणाऱ्या असे अर्थ सायणाने दिले आहेत.

पवमान धिया हितो, अभि योनिं कनक्रिदत्, धर्मणा वायुमाविश (९/२५/२)

"हे वायुरूप सोमा, अंगुलींमध्ये धारण केलेला व गुडगुड करीत आपल्या स्थानाकडे (म्हणजे नळीकडे) जाणारा तू आपल्या गुणांनी श्वासात प्रवेश कर."

*चंद्राला उद्देशून*

"हे तरंगणाऱ्या व आमच्या ध्यानाचा विषय असलेल्या व स्वत:चे उत्पत्तिस्थान जे आकाश त्यात आवाहन करीत हिंडणाऱ्या सोमा, वायुमंडलाला आपल्या गुणांनी भरून टाक."

खालील ऋचेत सोमाच्या पानातून चरसाची राळ काढण्याच्या क्रियेचे वर्णन आहे.

अभि क्षिप: समग्मत मर्जयन्तीरिषस्पतिम्। पृष्ठा गृभ्णत वाजिन:।

"इच्छानाथ व बलदायक अशा सोमाचा पृष्ठभाग धरीत तो पुसण्यासाठी अंगुली जुळल्या आहेत."

*चंद्राला उद्देशून*

(सूर्याच्या किरणरूपी) "अंगुली इच्छानाथ व बलदायी चंद्राला धुण्यासाठी त्यांचे पृष्ठ धरून जुळल्या आहेत."

**सोमाचे परिणाम**

गांजारूपातील भांग कामोत्तेजक असते.' हेच पुढील ऋचेत सोमाबद्दल म्हटले आहे:–

एष शृंगाणि दोधुवच्छिशीते यूथ्यो वृषा, नृम्णा दधान ओजसा॥९/१५/४

"हरिणींच्या कळपातील काळवीटाप्रमाणे हा सोम आपल्या ओजस्वी पौरुषाने परजलेली शिंगे धारण करीत शिवशिवला आहे"

"भांगेच्या सेवनाने संगीत अधिक भरघोस वाटते."[१] याचे वर्णन असे केले आहे.

उत्ते शुष्मास ईरते सिन्धोरुर्मेरिव स्वन: वाणस्य चोदया पविम्॥ ९/५०/१

"हे सोमा, तुझ्या शक्ती समुद्राच्या लाटांप्रमाणे स्वरित होतात. तू वेताच्या पाव्याला स्फुरित कर."

चंद्राला उद्देशून काही श्लेष न करता हेच वर्णन सरळ लागू पडते. समुद्राच्या घोषाप्रमाणे चंद्राचा प्रकाश वातावरणात घुमतो व ज्योत्स्नेने नहात असताना बासरीचे स्वर अधिक मधुर लागतात, हे रसक्रीडेच्या वर्णनावरून प्रसिद्ध आहे.

स नो अद्य वसुत्तये क्रतुविद्गातुवित्तम:॥ वाजं जेषि श्रवो बृहत्॥ ९/४४/६

"कर्मज्ञात्या व गानकुशल सोमा" तू आम्हाला धनलाभ व्हावा म्हणून महान् कीर्ती व बल यांच्यावर जय मिळव."



सायण गातु याचा अर्थ मार्ग असा करतो. पण 'गा' या धातूचा अर्थ गाणे, असा देखील मैक्डोनलने दिला आहे. त्यामुळे व्याकरणदृष्ट्या 'गायन' हा अर्थ 'मार्ग' या अर्थाइतकाच समर्थनीय आहे. सोमऋचातील श्लेषप्रियता लक्षात घेता गाणे व मार्ग हे दोन्ही अर्थ विवक्षित दिसतात. गानकुशल सोम कर्माचा योग्य मार्ग जाणतो असा अर्थ निष्पन्न होतो.

अपाम सोमममृता अभूम अगन्म ज्योतिरविदाम देवान्। ८/४८/३

"आम्ही सोम प्यालो. आता आम्ही अमर झालो. आम्हाला प्रकाश दिसला. आम्ही देवांना जाणले."

कोलमनने[१] भांगेचा परिणाम पुढीलप्रमाणे वर्णिला आहे:–

"उंचावल्याची, उत्साह व सर्व कुशल असल्याची, ज्ञानेन्द्रियांची कार्यक्षमता वाढल्याची, सुखद स्वस्थतेची व कधी कधी तरंगण्याची व आपल्याला सृष्टीचे गूढ उकलले असल्याची भावना पिणाऱ्याला अनुभवास येते."

*चंद्राला उद्देशून*

चंद्र ही देवता मानल्यावर त्याला यासारख्या प्रार्थना करणे युक्तच आहे.

तनूनपात्पवमान: शृङ्गे शिशानो अर्षति। अन्तरिक्षेण रारजत्॥९/५/२

"हा अग्निरूप, वाहणारा व अन्तश्चक्षूंनी विराजणारा सोम शिंगे तीक्ष्ण करीत येत आहे."

सोमपान केल्यावर शिंगांची खाज शमविण्यासाठी खडकावर धडका मारणाऱ्या सांडाप्रमाणे अंगात उत्साह संचारतो, असे सूचित केले आहे. ही शिंगे सोमरसाची शिंगे नसून सोम पिऊन सांडाप्रमाणे माजलेल्या पुरुषाची शिंगे आहेत.

*चंद्राला उद्देशून*

"धावणारी अग्निरूप व शिंगे म्हणजे कोरीला तीक्ष्ण टोके असलेली चंद्रकला अंतरिक्षात विराजते आहे."

भांगेच्या सेवनाने रंग अधिक कांतिमान दिसतात, असे कोलमन[१] सांगतो. सोमपानानेही तसेच होते असे खालील ऋचेत सांगितले आहे :-

पवमान: असिष्यदद्रक्षांस्यपजंघनत्, प्रत्नवद्रोचयन्रुच:। ९/४९/५

"नेहमीप्रमाणेच कांतींना अधिक कांतिमान करीत व राक्षसांना मारीत सोम ओसंडला आहे."

भांगेचा परिणाम हळूहळू वाढतो व पिणारा वाचाल होतो[३], असे वैद्यकीय वर्णन आहे. हेच वर्णन खालील ऋचेत आहे :-

हिन्वानो वाचमिष्यसि, पवमान विधर्मणि, अक्रान्देवो न सूर्य:॥ (९/६४/९)

"हे सोमा गाळण्यातून गाळला जाणारा तू सूर्याप्रमाणे आमच्या वाणीला उत्तेजित करतोस." (सूर्याची उपासना केल्याने वाणी प्रगल्भ होते.)

*चंद्राला उद्देशून*

"हे तरंगणाऱ्या चंद्रा, सूर्य तुझ्या विरुद्ध म्हणजे पश्चिम क्षितिजावर असताना (म्हणजे पौर्णिमेला) तू संवर्धित केला जाऊन त्या सूर्याप्रमाणेच आमच्या वाणीला उत्तेजन देतोस" (चांदण्यात जमलेल्या लोकांच्या भाषणांना बहर येतो.)

भांग शंकराला अत्यंत प्रिय आहे या चालू समजुतीचे मूळ खुद्द ऋग्वेदात आहे :-

अयं सोम: कपर्दिने, घृतं न पवते मधु, आभक्षत्कन्यासु न:॥ ९/६७/११

"आहुतीत दिलेल्या घृताप्रमाणे हा सोम शिवाला मधुर (पेय) पुरवितो तो आम्हास कन्यामध्ये प्राप्तव्य बनवो."

*चंद्राला उद्देशून*

आकाश हे शिवाचे केस आहेत व त्याच्या कपाळावर चंद्र आहे या कल्पनेला अनुसरून ही ऋचा म्हणते :-

"हा चंद्र (व्योमकेशरूपी) शिवासाठी पाण्याप्रमाणे म्हणजे वैपुल्याने किंवा तुपाप्रमाणे शुभ्र ज्योत्स्नारूपी मधूचा वर्षाव करीत आहे. तो आम्हाला कन्यामध्ये प्राप्तव्य बनवो." (चांदण्या रात्री कामोत्तेजन होत असल्यामुळे अशी प्रार्थना)

खालील ऋचेत 'भंग' हा भांग या अर्थाचाच शब्द वापरून सोम म्हणजे भांग याबद्दल काही शंकाच ठेवलेली नाही.

उपो षु जातमप्तुरं, भंगं गोभि: परिष्कृतं, इन्दुं देवा अयासिषु:॥ ९/६१/१३

"अप्ने म्हणजे पाण्याने जो वाहतो व गवाने म्हणजे दुधाने परिष्कृत केला जातो त्या भंग नामक सुजात सोमाला देव म्हणजे यज्ञकर्ते प्राप्त करते झाले."

*चंद्राला उद्देशून*

"अप्तुला म्हणजे कर्माला प्रवृत्त करणाऱ्या व गवांनी म्हणजे किरणांनी परिष्कृत केलेल्या भंग म्हणजे अपूर्ण इन्दूला म्हणजे चंद्राला (सूक्तांचा विषय असलेले आकाशातील) देव प्राप्त करते झाले."

सोमाला शिंगे नसतात. सोम प्यालेल्या पुरुषाला आपण हरिणींच्या कळपातील काळवीट आहोत अशासारखा जो अनुभव येतो त्याचे 'शिंगे शिवशिवणे' या शब्दप्रयोगाने वर्णन केले आहे.

*चंद्राला उद्देशून*

"हा तारकांच्या कळपातील चंद्र तेजस्वी पौरुषाने धारण केलेली किरणरूपी शिंगे



मिरवीत शिवशिवला आहे."

अव्ये वधूयु: पवते परि त्वचि श्रथ्नीते नप्तीरदितेर्ऋतं यते।
हरिरक्रान्यजत: संयतो मदो नृम्णा शिशानो महिषो न शोभते॥ ९/६९/३

"हा स्त्रीलिप्सु म्हणजे कामोत्तेजक, बकऱ्याच्या चामड्यात वाहतो आहे. तो यज्ञात येणाऱ्यासाठी अदितीच्या नातींना मृदु करतो. यज्ञकर्त्यांचा हा हरित व संयत मद पौरुषाने तीक्ष्ण झालेल्या महिषाप्रमाणे शोभतो."

स्रक्वे द्रप्सस्य धमत: समस्वरन्नृतस्य योना समरन्त नाभय:।
त्रीन्स मूर्ध्नो असुरश्चक्र आरंभे, सत्यस्य नाव: सुकृतमपीपरन्॥ ९/७३/१

"सोम फुंकणाऱ्याच्या ओठ व हनवटीच्या मधल्या भागात स्वररूप होऊन सारी सारभूत तत्त्वे विश्वात विहार करीत आहेत. हा जीवनोत्फुल्ल आपल्या तिन्ही शिरांना संचरणासाठी तयार करतो आहे. आता सत्याच्या नावा सत्कृत्ये पार करत्या झाल्या."

यात सोम फुंकला जात असे म्हणजे त्याचे धूम्रपान होत असे. याचा स्पष्ट उल्लेख आहे. भांगेच्या सेवनाने येणाऱ्या आध्यात्मिक अनुभूतीचे हे वर्णन आहे. फुंकल्या गेलेल्या सोमाचा धूम हे जणू संगीताचे बासरीतून निघालेले स्वर आहेत व त्याने विश्वाच्या नियमबद्धतेची नाभी म्हणजे गूढ उकलल्याचा अनुभव येतो. सोमाची तीन शिरे म्हणजे भांग, गांजा व चरस सोमाच्या सेवनाने नैतिक अनुभवदेखील येतो. सत्याची कास न सोडता सत्कर्मे करीत राहणे फार कठीण आहे. पण हे कठीण काम साधल्याचाही सोमपानाने अनुभव येतो.

*चंद्राला उद्देशून*

"ओसंडणाऱ्या या सोमाच्या सूत्रामध्ये (स्रग्वन् म्हणजे सूत्र. न् ने अन्त होणाऱ्या शब्दांच्या 'न्' चा लोप होण्याची प्रवृत्ती आहे, जसे धर्मन् चे धर्म) म्हणजे किरणजालामध्ये स्वररूप धारण करणारी विश्वाच्या नियमबद्धतेची गूढे संचार करीत आहेत. हा जीवनोत्फुल्ल तीन शिरांना म्हणजे खमध्य, पूर्व क्षितिज व पश्चिम क्षितिज यांना चक्राकार करतो म्हणजे या तीन स्थानी पुन:पुन: येतो. सत्याच्या नावा सुकृते पार करत्या झाल्या."

एष स्य सोम: पवते सहस्रजिद्धिन्वानो वाचमिषिरामुषर्बुधम्।
इन्दु: समुद्रमुदियर्ति वायुभिरेन्द्रस्य हार्दि कलशेषु सीदति॥ ९/८४/४

"हा सहस्रजित् सोम उषा ज्याप्रमाणे विश्वाला जाग आणते त्याप्रमाणे बुद्धीला जागविणाऱ्या अशा वाणीचे प्रबोधन करीत वाहतो आहे. हा समुद्रांना म्हणजे मुद्रित मनस्कांना वायूने उत्साहित करतो. हे इन्द्राचे हृदयच जणू कलशात विराजत आहे."

कलशात विराजणे हे फक्त द्रवरूप सोमालाच लागू आहे असे नाही. गांजाचे

वा चरसाचे चूर्ण देखील कलशात ठेवता येते. वायूचा उल्लेख मात्र धूम्रपानास उपयोगी पडणाऱ्या सोमालाच लागू होतो.

*चंद्राला उद्देशून*

"हा सहस्रजित् चन्द्र प्रात:कालीन कमनीय स्तोत्रांना प्रेरित करीत विहार करतो आहे. हा इन्दु वायूच्या साहाय्याने समुद्राला उचंबळायला लावतो. हे इंद्राचे हृदयच जणू (पृथ्वीच्या) कळसावर चढविले आहे."

स सूर्यस्य रश्मिभि: परिव्यत, तन्तुं तन्वानस्त्रिवृतं यथा विदे।
नयन्नृतस्य प्रशिषो नवीयसी:, पतिर्जनीनामुपयाति निष्कृतम्॥ ९/८६/३२

"सूर्यकिरणांनी न्हालेला हा सोम, जाणण्यासाठीच जणू, तीन प्रकारचे तंतू पसरतो. या व्यवस्थेतल्या नवनवीन टोचण्या (शिष् म्हणजे hurt : आपटे). दूर करीत निर्मितीचा हा पती (शरीरात) योग्य ठिकाणी भिनतो."

सोमपानाने नवनवीन कल्पना सुचतात म्हणून त्याला 'प्रकृतिर्जनीनाम्' म्हटले आहे. तीन प्रकारचे तंतू म्हणजे भांग, गांजा व चरस. किडे ज्याप्रमाणे चाचपडण्यासाठी स्वत:च्या मिशीसदृश केसांचा उपयोग करतात त्याप्रमाणे सोम आपल्या तीन तंतूंचा उपयोग करून सृष्टीचे नवीन प्रकारे दर्शन घडवितो.

*चंद्राला उद्देशून*

"हा सूर्याच्या किरणांनी वेष्टिलेला आहे. तो सृष्टीचे ज्ञान करून घेण्यासाठी आपले त्रिपरिमाणात्मक किरणजाल पसरतो. (चंद्राच्या चारही बाजूंनी किरण निघताना दिसले की ते सपाट पृष्ठभागावरील सारखे दिसत नसून तीन परिमाणे असल्यासारखे दिसतात.) "सृष्टीच्या उरलेल्या म्हणजे न पाहिलेल्या भागाचा वेध घेत हा जीवसृष्टीचा पती (चंद्रामुळे वनस्पती फुलतात व वनस्पतीमुळे बाकी सारे जीव जगतात.) आपल्या निवासाप्रत चालला आहे."

साकमुक्षो मर्जयन्त स्वसारो दश धीरस्य धीतयो धनुत्री:।
हरि: पर्यद्रवज्जा: सूर्यस्य द्रोणं ननक्षे अत्यो न वाजी॥ (९/९३/१)

"दहा अंगुलीरूपी प्रेरक बहिणी एकमेकासह वर्षाव करायला लावून या सोमाला कुरवाळतात. त्यामुळे या पिवळ्या सोमाने सूर्याच्या साऱ्या निर्मितीला वेढेत घेत अतिगामी घोड्याप्रमाणे सारे गतिमान जग व्यापून टाकले आहे." (सोमाला धूर जणू साऱ्या जगालाच वेष्टीत आहे.)

दहा अंगुलीत धरून चिलिम पिण्याच्या क्रियेचे हे वर्णन आहे. गतिमान जग व्यापले आहे म्हणून गतिशील पदार्थही सोमाला मागे टाकू शकले नाहीत, असे सुचविले



आहे. सोमाच्या प्रभावाने सारे जग सोममय दिसते.

*चंद्राला उद्देशून*

"दिशारूपी दहा प्रेरक बहिणी एकमेकासह वर्षाव करीत या चंद्राला कुरवाळतात. याने सूर्याच्या कन्या जे किरण त्यांच्यात स्नान केले आहे. वाहणाऱ्या पदार्थाला धारण करणाऱ्या द्रोणाप्रमाणे ज्योतींना धारण करणाऱ्या आकाशाला अतिगामी घोड्याप्रमाणे त्याने व्यापले आहे."

अदितीच्या नाती- अदिती म्हणजे पृथ्वी. तिचा पुत्र म्हणजे वनस्पती, प्राणी इत्यादी जीव त्यांच्यापासून होणारे मध, दूध वगैरे पदार्थ या पृथ्वीच्या नाती. दुधात वा मधात सोम मिसळला की यांची उग्रता, उष्णता वगैरे नाहीशी होते. (भांगेला थंडाई म्हणतात.) दूध व मध हे पदार्थ उष्ण आहेत अशी समजूत आहे. त्यांना म्हणजे अदितीच्या नातींना सोम सौम्य करतो याचा हा अर्थ आहे.

*चंद्राला उद्देशून*

"अवीला म्हणजे सूर्याला पांघरणारी त्वचा जी आकाश तिच्यात हा स्त्रीलिप्सु म्हणजे कामोत्तेजक चंद्र परिभ्रमण करीत आहे. अदितीचा पुत्र जो आदित्य त्यांच्या कन्या म्हणजे अदितीच्या नाती जे किरण त्यांना या नियमबद्ध सृष्टीत येणाऱ्यासाठी सौम्य बनवीत आहे. म्हणजे सूर्यकिरणांची प्रखरता नाहीशी करीत आहे. यज्ञ करणाऱ्यांचा हा संयत मद पौरुषाने शिवशिवणाऱ्या महिषाप्रमाणे शोभतो आहे."

भांगेने समुद्राच्या लाटांवर झोके घेत असल्यासारखे वाटते. याचे वर्णन पुढील ऋचेत आहे :-

परि प्रासिष्यदत्कवि: सिन्धोरूर्मावधिश्रित: कारं बिभ्रत्पुरुस्पृहम्॥ ९/१४/१

"स्पृहणीय अशी कर्मे धारण करणारा व कवित्व स्फुरविणारा हा सोम समुद्राच्या लाटांवर विराजमान झाल्यासारखा वाहतो आहे."

*चंद्राला उद्देशून*

"हिमाचे कमनीय पुंज धारण केल्यासारखा व समुद्राच्या लाटांवर प्रतिबिंबिलेला हा चंद्र आसमंतात ओसंडतो आहे."

सोमाने वाणी स्फुरते व कामोत्तेजन होते हे पुढील ऋचेत सांगितले आहे.

अयं मे पीत: उदियर्ति वाचमयं मनीषामुशतीमजीग:।
अयं षडुर्वीरमिमीत धीरो न याभ्यो भुवनं कच्चनारे॥ ६/४७/३

"प्याल्याने हा माझ्या वाणीला स्फुरण चढवितो व कामुक इच्छांना जागृत करतो. याने ज्याच्या प्रभावातून या जगात कोणीच सुटले नाही त्या काम, क्रोध, लोभ,

मोह, मद, मत्सर या सहा महान् शक्तींना जन्म दिला आहे."

सायण "षड्उर्वी": याचा अर्थ "षण्मोर्वीरंहसस्पान्तु" या वचनाच्या आधारे द्यौ, पृथ्वी, अह्न, रात्रि व औषधि असा करतो, पण यापैकी काहीही सोमवनस्पतीने वा चंद्राने निर्माण केलेल्या नाहीत. उलट चंद्र व सोम ही दोन्हीही षड्रिपु मानल्या गेलेल्या भावना निर्माण करण्यास समर्थ आहेत.

*चंद्राला उद्देशून*

चंद्रप्रकाशात ठेवलेल्या दुधात चंद्राचे अमृत उतरते, अशी आजही समजूत आहे. तिच्याच आधारे कवी म्हणतो :-

"या चंद्राचे पान केल्याने माझी वाणी स्फुरते व कामुक इच्छा जागृत होतात. यानेच ज्यांच्या प्रभावातून या भुवनात कोणीही मुक्त नाही, अशा सहा भावना निर्माण केल्या आहेत."

अयं स वो वरिमाणं पृथिव्या वर्ष्माणं दिवो अकृणोदयं सः।
अयं पीयूषं तिसृषु प्रवत्सु, सोमो दाधारोर्वन्तरिक्षम्।। ६/४७/४

*चंद्राला उद्देशून*

"या सोमाने पृथ्वीचा विस्तार वाढविला व आकाशाला दृढ केले. तीन प्रवाही तत्त्वात याने अमृत ओतले. सोमाने अंतरिक्ष धारण केले."

रात्रीच्या अंधारात फक्त जवळचे दिसते व त्यामुळे पृथ्वीचा विस्तार आपल्या लेखी संकुचित होतो. चंद्राचा प्रकाश पसरला की तिचा विस्तार झाल्यासारखे वाटते. चंद्र हा तंबूचा कळस व त्याच्यापासून निघणारे किरण हे जणू दोर, यांनीच ज्योतिर्मय आकाश जणू धरून ठेवले आहे. म्हणून चंद्राने द्यौला दृढ केले असे म्हटले आहे. तीन वाहती तत्त्वे म्हणजे पाणी, प्रकाश व वायू. यात चंद्राने अमृत ओतले. चंद्रामुळे ही तिन्ही अत्यंत सुखद होतात. अंतरिक्ष म्हणजे वायुमंडळ. त्याला सूर्य हलवितो, कारण त्याच्या उष्णतेमुळेच वारे सुटतात. उलट चंद्राच्या शीतलतेमुळे ते स्थिर होतात.

सोमपानामुळे पृथ्वीचे श्रेष्ठत्व वाढते म्हणजे मन उत्साहित झाल्यामुळे सर्वच उत्साहप्रद दिसू लागते. द्यौला म्हणजे दीप्तीला याने सुंदर रूप: दिले; (वर्ष्म म्हणजे सुंदर रूप: आपटे) धूम्रपानासाठी पेटविलेले चूर्ण त्यातील सोमामुळेच सुखकारक होते. तीन वाहणाऱ्या तत्त्वात याने अमृत ओतले. ही तीन वाहणारी तत्त्वे म्हणजे भांग, गांजा व चरस. सोमानेच विशाल अशा अंतरिक्षाचे म्हणजे अन्तश्चक्षूचे धारण केले म्हणजे सोमपानांमुळेच अंतरंगाच्या विशालतेचा अनुभव येतो.

सोमपानाचे वाईट परिणाम

मा नः सोम संवीविजो मा वि बिभीषथा राजन्।
मा नो हार्दि त्विषा वधीः।। ८/७९/८




"सोमा तू आम्हास थरथरायला लावू नकोस; अशा रीतीने आम्हाला भिववू नकोस. तुझ्या दीप्तीने आमची हृदये आहत करू नकोस."

गांजाच्या अति सेवनाने शरीराला कंप देणारा व्याधी होतो.[३] एक प्रकारचा अपस्मार होऊन बेशुद्धी व हृदय बंद पडून मृत्यू देखील होण्याचा संभव असतो. याच परिणामांचे हे वर्णन असल्यामुळे गांजा हा सोमाचाच प्रकार आहे याबद्दल शंका उरू नये.


*चंद्राला उद्देशून*

निष्फल प्रेमात फसलेला पुरुष चंद्राला पाहून अधिकच व्याकुळ होतो व चंद्राला विनवितो,

"हे चंद्रा, तू माझ्या (विरहाग्नीवर) भाता चालवू नकोस. मला चिंतामग्न करू नकोस. माझे हृदय आपल्या दीप्तीने आहत करू नकोस."



भांगेच्या रोपाचे चित्र



ऋग्वेदातील वर्णनानुसार रॅग्युझेनने काढलेले चित्र

## आवेस्त्यातील सोम

पारशी लोकांचा आवेस्ता हा ग्रंथं मॅक्डोनेलच्या मते ऋग्वेदाच्या ५०० वर्षे नंतर झालेला आहे. केवळ उच्चाराचे नियम लावून आवेस्त्याच्या व ऋग्वेदाच्या भाषेत अदलाबदल करता येऊ शकते. एवढे दोहोंत साम्य आहे. म्हणजे संस्कृत/प्राकृतासारखे हे साम्य निकटचे आहे. आवेस्त्याची उपासनापद्धतीदेखील यज्ञप्रधान आहे. यामुळे आवेस्त्यात सोमाचा उल्लेख व त्याची वर्णने असल्यास त्यांचा ऋग्वेदातील सोमाचे स्वरूप समजण्यास उपयोग होऊ शकेल.

हौम शब्दाने आवेस्त्यात सोमाचा उल्लेख आहे. दोनदा हा शब्द वंहुश या शब्दाबरोबर वापरलेला आहे.

वंहुश सोमो मज्धातो। यस्न १०/१७
नमो हौम वंहुश हौमो। यस्न ९/१६

सेक्रेड बुकस्‌मध्ये वंहुशचे भाषांतर good असे दिलेले आहे. पण वेन्दिदाद १५/१४



१९/४१ तील वंह व वंहुश हे सम्बद्ध शब्द आहेत. वंह ही गर्भपातासाठी वापरण्यात येणारी एक वनस्पती होती, असे तेथील वर्णनावरून दिसते. भांगेच्या बिया गर्भपातासाठी वापरतात, असे खेडोपाडी केलेल्या चौकशीवरून कळते.

शेवटी सोम म्हणजे भांगच याविषयी काहीच शंका राहू नये अशा एका निर्णायक पुराव्याचा उल्लेख केला पाहिजे. रॅग्युझेन[४] याने सोमाच्या ऋग्वेदातील वर्णनानुसार एक चित्र काढले. ते चित्र व भांगेच्या रोपाचे चित्र ही सोबत दिली आहेत. ही दोन चित्रे पाहून ती एकाच वनस्पतीची आहेत याबद्दल कोणाला शंका उरेल असे वाटत नाही.

### संदर्भ

1. Abnormal Psychology and Modern Life : James C. Coleman & William E. Boen,
2. Soma Hymns of the Regveda : S. S. Bhave
3. Materia Medical & Therapeutics : Rakaldas Gosh & B.H. Deare
4. Vedic India : Ranguzen

४

# रामायणाची ऐतिहासिकता

नी. र. वऱ्हाडपांडे

'राम/कृष्ण हे ऐतिहासिक पुरुष नव्हते' असे विधान पाठ्यपुस्तकात घातल्याबद्दल टीका होत आहे. यापूर्वी शाळेत ब्रिटिश काळातदेखील जे इतिहास शिकविले जात त्यात असे विधान कोठेही नव्हते व इतिहासाची काही पाठ्यपुस्तके वेदापासून सुरू न होता रामापासून सुरू होत असत. इतिहासज्ञात सर्वमान्य नसलेले कोणतेही मत पाठ्यपुस्तकात घालणे उचित नाही या एका कारणास्तवच हा उल्लेख काढून टाकणे आवश्यक आहे. राम/कृष्णांचा उल्लेख रामायण/महाभारतात आहे व हिंदू या ग्रंथांना ऐतिहासिक मानतात असा उल्लेख केल्याने ऐतिहासिक प्रामाणिकपणाचे पुरेपूर पालन होते.

तथापि, पुष्कळशा वाचकांना याबाबतीतली सत्य परिस्थिती समजून घेण्याची इच्छा असणार म्हणून खालील विवेचन करीत आहे.

अमुक व्यक्ती ऐतिहासिक आहे की नाही हे कशाच्या आधारावर ठरते ? साधारणपणे इतिहासात जिचे नाव आहे ती व्यक्ति ऐतिहासिक असे समजले जाते. पण यावर 'अमुक ग्रंथ ऐतिहासिक आहे की नाही हे कसे ठरवावे ?' हा प्रश्न उपस्थित होतो. इतिहासकार म्हणून मान्य झालेल्या विद्वानांनी जे ग्रंथ लिहिलेले असतात त्यांचे इतिहास म्हणून मूल्यमापन करताना ज्या घटनांबद्दल त्यांनी लिहिले आहे त्या घटनांशी संबंधित असलेली समकालीन कागदपत्रे त्यांनी आधारास घेतली आहेत की नाहीत हे विचारात घेतले जाते. समकालीन कागदपत्रात जेव्हा विरोध असेल तेव्हा न्यायाधीश कुणाची साक्ष बरोबर हे ठरविताना ज्या पद्धतीचा उपयोग करतात त्या पद्धतीचा उपयोग केला गेला की नाही हे पाहावे लागते.

हा पहिला मानदंड लावला तर रामाला अनैतिहासिक ठरविण्यास आधार नाही. रामाचे चरित्र सांगणारा रामायण हा ग्रंथ उपलब्ध आहे व तो भारतात इतिहास या नावाने प्रसिद्ध आहे.

यावर नेहमी असा आक्षेप येतो की, ''रामायण अद्‌भुत व काल्पनिक गोष्टींनी भरलेले आहे. त्याला इतिहास कसे म्हणता येईल ? मारुतीने उड्डाण करून शतयोजन समुद्र पार केला, एकट्या रामाने खर दूषणांच्या १४ हजार सैन्यांचा पराभव केला, कुंभकर्ण सहा महिने झोपला होता, अशा गोष्टी लिहिणाऱ्या ग्रंथाला ऐतिहासिक कसे म्हणावे ?''

हा आक्षेप मानला तर ख्रिस्ताचा वृत्तान्त सांगणारा एकमात्र ग्रंथ जो न्यू टेस्टामेण्ट त्याची काय गती होईल ? ख्रिस्त मेल्यावर जिवंत झाला, तो मेलेल्या लोकांना जिवंत करीत असे, तो समुद्रावरून चालत गेला, अशी विधाने या ग्रंथात आहेत. मग एवढ्या एका कारणास्तव ख्रिस्त झालाच नाही, असे म्हणता येईल काय ?

अद्भुत गोष्टी आहेत म्हणून रामायण इतिहास या दृष्टीने निकालात काढता येणार नाही. कारण या गोष्टी कशा शिरल्या याचे स्पष्टीकरण देता येते. रामायण हा ग्रंथ रामाच्या काळीच लिहून पूर्ण झाला नव्हता. प्राचेतस या रामाच्या समकालीन ऋषीने जेवढा भाग लिहिला त्यात अद्भुत व अशक्य घटना होत्या असे दिसत नाही. सुमारे चार हजार वर्षांपर्यंत रामायणात नवीन भर पडत होती. आजचे रामायण मूळ ग्रंथाच्या पंचवीस पट तरी मोठे आहे. तेव्हा आजच्या रामायणात अद्भुत गोष्टी आहेत म्हणून मूळ रामायणाचे ऐतिहासिकत्व नाकारता येत नाही. उपलब्ध रामायणातील रामकालीन भाग कोणता हे शोधून काढले तर त्या भागाला अनैतिहासिक म्हणण्यासारखे त्यात काही नाही हे कळून येईल.

रामाचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला हिवाळा संपत आला असताना झाला यावरून राम सुमारे ३७०० वर्षापूर्वी झाला असे गणित करता येते. (New Light on the date of the Rgveda by N. R. Waradpande) रामायणाच्या सर्वांत प्राचीन भागाला 'पौलस्त्यवध' म्हणत होते. अर्थात त्यात फक्त आजच्या युद्धकांडातील भाग होता. हा भाग रामाच्या जीवनकालातच वा त्याची आठवण ताजी असतानाच लिहिला गेला असला पाहिजे.

**सेतुबंधाचे ऐतिहासिक महत्त्व**

रामायणातील सेतुबंधाच्या घटनेवरून त्याच्या ऐतिहासिकतेला पुष्टी मिळते. रामाने समुद्रावर सेतू बांधला असे वर्णन आहे. असे वर्णन रामाच्या शेकडो वर्षांनंतर झालेला कवी करणार नाही. कारण रामेश्वर ते लंका हा समुद्र अवघ्या २२ मैलांचा आहे. वेदकालीदेखील शंभर वल्ह्यांच्या व शिडांच्या नावा वापरात होत्या. (ऋ. १/११६/५, ६/६२/६) व त्या सुमेरपर्यंत फेरफटका करीत होत्या. तेव्हा अशा नावा वापरून रामाला आपले सैन्य लंकेवर उतरविता आले असते. रामाने तसे का केले नाही हा उत्तरकालीन कवींना प्रश्न पडला होता, हे महाभारतातील रामोपाख्यानात हा प्रश्न विचारला आहे यावरून स्पष्ट आहे. त्याचे उत्तर 'एवढ्या मोठ्या प्रमाणावर नावा मिळत नव्हत्या' असे दिले आहे हे उत्तर पूर्णपणे असमाधानकारक आहे.

खरे कारण असे आहे : रामाच्या काली म्हणजे ख्रि. पू. ३७०० च्या सुमारास समुद्राची पातळी बरीच खाली होती. पण युरोपातील हिमयुग जसजसे ओसरत चालले तसतसे तेथील बर्फ वितळून समुद्राची पातळी उंचावत गेली. यामुळेच पुढे द्वारका समुद्रात बुडाली. रामाच्या काळी जी पातळी होती तीमुळे समुद्रातील खडक स्पष्ट दिसत होते व



अशा खडकांची रांगच रांग रामेश्वरापासून लंकेपर्यंत होती. ही रांग इसवीसन १४०० पर्यंत सलग होती. त्या साली भूकंप झाल्यावर तिच्यात खिंडारे पडली. (Encyclopaedia Britanica) त्यावर सेतु बांधणे सोपे होते कारण सेतूला लागणारे स्तंभ आयतेच तयार होते.

समुद्राची पातळी वाढल्यामुळे हे खडक बरेच खोल गेले व काठावरून तर दिसेनासेच झाले. त्यामुळे समुद्राकडे पाहून त्यावर सेतू बांधता येईल अशी कल्पनादेखील उत्तरकालीन कवींना होणे शक्य नव्हते. अर्थात सेतुबंधाची कल्पना रामकालीन आहे. सध्याच्या रामायणात सेतुबंधाचे वर्णन आहे त्यात अद्भुत व काल्पनिक भाग आहे. कारण 'समुद्रावर सेतू' ही कल्पनाच रामानंतर चारपाचशे वर्षांनी वास्तव कोटीतली वाटण्यासारखी नव्हती.

रामायणाचे सर्वच संपादक आपण इतिहास लिहीत आहोत असे मानतात. पण उत्तरकालीन संपादकांनी मूळ इतिहासात अद्भुत वर्णने घातल्याने सत्याचा अपलाप होतो असे वाटत नव्हते. 'हे फार प्राचीन काळी अवतारकृत्य केलेल्या देवकोटीतल्या पुरुषाचे चरित्र आहे' असे त्यांना वाटत होते..

आपण इतिहास लिहीत नसून कादंबरी लिहीत आहोत, अशी त्यांची कल्पना असती तर त्यांनी निरनिराळ्या घटनांच्या तिथ्यांचा उल्लेख केला नसता. कादंबरी लिहिताना कोणी तारखा सांगत नाही. दुसरे असे की रामायण व महाभारत या दोन्ही ग्रंथांत हजारो वर्षांत हजारो श्लोकांची भर पडली तरी राम कृष्णापेक्षा व रामायण महाभारतापेक्षा प्राचीन आहे ही जाणीव एवढी जागृत होती की महाभारतातल्या एकाही पात्राचा वा घटनेचा रामायणात उल्लेख नाही. उलट महाभारतात रामोपाख्यानच दिले आहे व परशुराम हनुमान वगैरे रामकालीन पात्रांचा उल्लेख आहे. रामायणातील एक श्लोकदेखील महाभारतात उद्धृत केला आहे. (अपि चायं पुरा गीत:श्लोको वाल्मीकिना भुवि... द्रोणपर्व १४६, ६७, ६८) हे ग्रंथ कादंबरीरूप आहेत असे जर या उत्तरकालीन लेखकांना वाटत असते तर आधी काय व मागून काय याचा त्यांनी एवढा काटेकोर विचार केला नसता.

वेदामधील देवता सोडल्या तर इतर व्यक्ती काल्पनिक नाहीत हे सर्वमान्य आहे. त्यामुळे रामायणातील प्रमुख व्यक्तींचा ऋग्वेदात उल्लेख सापडतो, यावरून या व्यक्ती ऐतिहासिक आहेत असे म्हणणे वाजवी दिसते. खुद्द रामाचा उल्लेख एक आदर्श राजा म्हणून आहे. (१०/९३/१४) आदर्श राजा म्हणून प्रसिद्ध असलेला रामायणातील रामाखेरीज दुसरा कोणी राम प्राचीन वाङ्मयात नाही. तेव्हा हा उल्लेख रामायणाच्या रामाचा नाही असे म्हणण्यास दुराग्रहाखेरीज दुसरा काही आधार असू शकत नाही. प्रचेतस व जमदग्नी हे ऋग्वेदाच्या सूक्तकर्त्यांपैकी आहेत. ते अनुक्रमे 'पौलस्त्यवध'कर्ता प्राचेतस व रामाने ज्याचा पराभव केला तो जामदग्न्य परशुराम यांचे जनक मानण्यास काही हरकत नाही.

एखाद्या सर्वगुणसंपन्न पुरुषाचे काल्पनिक चित्र रंगवायचे असा रामायण रचण्यातला हेतू दिसत नाही. याचे प्रमाण म्हणजे वालिवधाचा प्रसंग. राम आडून बाण मारतो व या

कृत्याचे 'सारी पृथ्वीच इक्ष्वाकूंची आहे म्हणून मला तुला शासन करण्याचा अधिकार आहे' असे वालीला सांगून त्याचे समर्थन करतो. रामाचे वर्तन रावणाशी युद्ध करायला निघालेल्या एखाद्या राजाचे रावणाच्या मित्रराज्याशी होणारे वर्तन म्हणून समर्थनीयच नव्हे, तर अपेक्षितदेखील आहे; पण सगळ्या सद्गुणांचा पुतळा म्हणून एखादा पुरुष कल्पायचा असेल तर अशा प्रसंगांची कोणी कल्पना करणार नाही. रामाच्या चरित्रात केवळ आदर्श राजाच नव्हे, तर आदर्श व्यक्ती म्हणूनदेखील अनेक गुण आहेत. त्याचे चरित्र गाणाऱ्यांना याच गुणांची मोहिनी आहे. म्हणून रामायणाचा पुष्कळसा भाग आदर्श जपण्यात खर्च झाला आहे. रामायण केवळ काल्पनिक असते, तर वालिवधासारखा प्रसंग कोणी घातला नसता.

ही गोष्ट रामाच्या हातून खरोखरच घडली म्हणून सर्वश्रुत असल्याशिवाय रामाच्या चरित्रात असा प्रसंग कोणी घालणार नाही. रामायणाचा कोणताही लेखक आपली कथा वास्तव वाटावी म्हणून प्रयत्न करताना दिसत नाही. तसे असते तर रामायणात अद्भुत प्रसंग आलेच नसते. तेव्हा रामकथेला वास्तवतेचा मुलामा चढविण्यासाठी वालिवधाचा काल्पनिक प्रसंग घातला असे म्हणता येत नाही.

रामायण/महाभारत व पुराणे ही पूर्णपणे काल्पनिक मानणे अशक्यच आहे. असे जे मानत असतील त्यांनी ज्यात सर्वच काल्पनिक आहे व त्याचा अनुभव ज्यात कोठेच प्रतिबिंबित झाला नाही अशी केवळ ५० पृष्ठे लिहून दाखवावी. असे करणे केवळ अशक्य आहे हे त्यांना दिसून येईल. ना. सी. फडके यांचा हेतू केवळ कादंबऱ्या लिहिण्याचाच होता, तरी त्यांच्या कादंबऱ्यांत त्यांच्या काळच्या खऱ्या व्यक्ती डोकावताना आढळून येतात. खांडेकरांच्या कादंबऱ्या वाचल्या की हा लेखक ध्येयवादामुळे हायस्कूलनंतर खेड्यात जाऊन शाळामास्तरकी करू लागला हे कुणालाही ओळखू येण्यासारखे आहे. बर्नार्ड शॉला एकदा एका चाहत्याने आत्मचरित्र लिहिण्याची सूचना केली तेव्हा तो म्हणाला, 'मी जे आजपर्यंत लिहिले ते आत्मचरित्रच आहे.'

### दक्षिण भारतात तेव्हा काय होते ?

दशरथाचे चाळीस घोडे हजार सैनिकांच्या तुकडीचे नेतृत्व करीत होते असे ऋ १/१२६/४ मध्ये वर्णन आहे.

पंचवीस सैनिकांचा मुख्य एक घोडेस्वार व घोड्यांचा उपयोग फक्त रथाला जोडण्यासाठीच होत नसून, त्यावर बसून युद्ध करण्याची पद्धतदेखील होती असे यावरून दिसते. या सेनेचा नेता दशरथ हा राजा होता व तोच रामाचा पिता असे मानण्यास काही प्रत्यवाय नाही.

५/३०/१४ म्हणते 'जी रात्र रुशमाच्या ऋणंचयनामक राजाबरोबर हसत खेळत घालविली वा घालवावी ती संपली. वेगवान घोड्याच्या वेगाने आलेल्या बदामी वर्णाच्या



रघूने चार हजार (नाणी) मिळविली.'

हा रघु पारसीकावर स्वारी करणारा काळ्या रामाचा बदामी वर्णी आजा असावा. रुशम हा शब्द मराठीत इराण या अर्थी वापरल्या जाणाऱ्या रुमशाम या शब्दाचे प्राचीन रूप असावे. होळकरांच्या कैफियतीत 'भाऊसाहेब, आता परता, पुढच्या वर्षी रुमशामची खबर घेऊ' असे भाऊसाहेबांना पानिपत संग्रामाच्या शेवटच्या प्रसंगी मल्हारराव होळकर म्हणतो.

बभ्रू नावाच्या पुरोहिताला चार हजार दक्षिणा मिळाली असा सायण अर्थ करतो. पण हा पुरोहित त्याच्याकडे घोड्याच्या वेगाने गेला या वाक्याची या अर्थात नीट संगती लागत नाही.

ऋग्वेदसंस्कृतीच्या दक्षिण भारताशी मुळीच संबंध नव्हता व त्यामुळे ऋग्वेदातील राम हाच रामायणाचा राम मानला तर तो केवळ एक आदर्श राजा होता एवढेच ठरते. त्याला दक्षिण भारतात वनवासाला जावे लागले व त्याने रावणाचा पराभव केला या घटना काल्पनिक मानाव्या लागतात.

पण या घटना काल्पनिक मानल्या तर ऋग्वेदकालीन प्राचेतसाने सेतुबंधाचा वृत्तांत असलेले 'पौलस्त्यवध' लिहिले व ज्याची ऋग्वेदात डझनवारी सूक्ते आहेत त्या अगस्त्याने दक्षिणेत प्रयाण करून तेथे तो आश्रमवासी झाला या परंपरांची उपपत्ती लागत नाही.

या गोष्टी ऋग्वेदात नाहीत याचे स्पष्ट कारण ऋग्वेदाचा बव्हंश भाग यापूर्वीचा आहे. अभ्यंकरांनी अश्विनीत उत्तरायण सुरू होत होते या ऋचेरून ख्रि. पू. ७००० हा त्या ऋचेचा काळ ठरविला आहे. ऋग्वेदात दक्षिण भारतातील एकाही पर्वताचा वा नदीचा उल्लेख नाही. अर्थात ऋग्वेदात रामानंतर रचलेला भाग जवळजवळ नाहीच व त्यामुळे त्यांत दक्षिण भारताचा उल्लेख नाही. दक्षिणेचे मार्ग राम व अगस्त्य यांनी खुले केले.

यावर आक्षेप असा येतो की यावेळी दक्षिणेत किष्किंधा व लंका यांसारखी वैभवशाली नगरे असल्याचा पुरावा नाही. काही पुरातत्त्वज्ञांच्या मते पशुपालन व शिकार यावर जगणाऱ्या वन्य जमाती फक्त दक्षिणेत राहत होत्या. कुठे कुठे शेती होती असेही अनुमान काढता येईल. पण रामायणात वर्णिलेले रावणाचे साम्राज्य व त्याच्याशी सामर्थ्याने तुल्य असलेले किष्किंधेचे राज्य ही कल्पनेचीच अपत्ये ठरतील.

ही कल्पनेची अपत्ये मानण्याचे कारण नाही. वानर हे वानर नसून, त्यांच्या जातीचे नाव होते. हल्लीचे नागा हे नाग व सर्प नसून मानवच आहेत यावरून हे स्पष्ट व्हावे. राक्षस शब्दाच्या मूळ अर्थाप्रमाणे ते रक्षक म्हणजे सैनिक होते. पण मूळचे सैनिक पेंढारी हे जसे उपजीविकेचे साधन नाहीसे झाल्यामुळे लूटमार करू लागले तसेच राक्षसही विध्वंसक कृत्ये करू लागले.

दक्षिणेत उत्तरेप्रमाणे नागर संस्कृती वा कृषिसंस्कृती नसली तरी पशुपालन व शिकार यावर जगणाऱ्या समाजातदेखील काही समाज अत्यंत बलाढ्य असू शकतात. या

समाजाजवळची शस्त्रास्त्रे उत्तरेतील समाजाजवळ असलेल्या शस्त्रास्त्रांपेक्षा कमी सामर्थ्यशील होती असे म्हणण्यास आधार नाही. धनुष्यबाण हेच राक्षसांचेही मुख्य शस्त्र होते व याबाबतीत ते नागरी समाजापेक्षा कमी सामर्थ्यवान होते असे म्हणण्यास जागा नाही. रामाने एका वन्य जमातीच्या राजाला जिंकले हा त्याचा मुख्य पराक्रम नसून, प्रवासाची साधने नसलेल्या काळात एका अयोध्येच्या राजपुत्राने अयोध्येचे सैन्य न घेता लंकेवर स्वारी केली हा पराक्रम अद्भुत आहे.

रामाने सुग्रीवाशी सख्य करून त्याच्या सैन्याच्या साहाय्याने रावणाला जिंकले ही घटनाही पुष्कळांना संशयास्पद वाटते. रामाजवळ मुळी सैन्यच नव्हते. सुग्रीवाला वालीचा पराभव करण्यात त्याचे किती साहाय्य होणार ? दुरून बाण मारूनच वालीला मारायचे तर त्यासाठी रामच कशाला पाहिजे होता ? अचूक शरसंधान करणारा कोणी एकलव्य त्याला मिळू शकला नसता काय ?

**राक्षस आणि वानर**

याची उत्तरे दोन प्रकारची आहेत. एकतर रामाजवळ सैन्य नसले तरी अयोध्येची राजसत्ता त्याच्या पाठीशी होती व सुग्रीवाच्या सत्तेला रामाची मान्यता म्हणजे एका बलाढ्य राजाची मान्यता होती. रामाच्या राज्यपदावरचा अधिकार अमान्य झाला होता पण अयोध्येचा राजपुत्र हे त्याचे स्थान अबाधित होते. याचे रक्षण करणे हे अयोध्येच्या सिंहासनाचे कर्तव्यच होते. 'मी इक्ष्वाकुकुलाचा प्रतिनिधी या नात्याने तुला दंड देत आहे, असे स्वत: राम वालीला सांगतो. (भरतस्तु महिपालो वयं त्वादेशवर्तिन:)

दुसरे असे की वानरांचे दूरप्रहारी शस्त्र धनुष्यबाण नसून गोफण हे होते. (शैलतालशिलायुधा:) सैन्यांच्या संघर्षात गोफण धनुष्यापेक्षा कमी प्रभावी नसली तरी एकाच व्यक्तीचा अचूक वेध घेणे गोफणीपेक्षा धनुष्याला अधिक सुकर आहे.

एकूण रामाच्या पराक्रमातील मुख्य कथासूत्रात मला अविश्वसनीय असे काही दिसत नाही. रामाला ऐतिहासिक मानण्याच्या बाबतीत रामाचा उल्लेख इतिहास सांगण्याचा दावा मांडणाऱ्या ग्रंथात आहे हे प्रमाण मुख्य आहे. याबद्दल काही लोक म्हणतात की हे प्रमाण अमान्य न केले तरी त्याकाळचे इतर लेख, रामाची नाणी, शिलालेख, तत्कालीन नगरे व प्रासाद यांचा पुरातत्वीय पुरावा यापैकी काही नाही हे विसरून कसे चालेल ?

हा मुद्दा खरा मानला तर बुद्धाला ऐतिहासिक मानता येणार नाही. बुद्धाच्या बाबतीतही समकालीन मानता येईल असा लेख उपलब्ध नाही. तिपिटके अशोकाच्या कारकीर्दीत संपादित करण्यात आली. त्यातले अमुक वचन हे साक्षात बुद्धाचेच असे म्हणण्यास दोन शतकांची केवळ मौखिक परंपरा याशिवाय काही आधार नाही. बरे या मौखिक परंपरेच्या मागे एकाही मात्रेचा फरक न करता बुद्धाच्या वचनांचे पठन करायचे असा काही दंडक नव्हता. स्वत: बुद्धाने आपली वचने लोकांनी प्रमाण मानावी या प्रवृत्तीला विरोध केला



होता. (परीक्ष्य मद्वचो ग्राह्यं भिक्षवो न तु गौरवात्) बुद्धाच्या समकालीनाने लिहिलेला त्याचा एखादा चरित्रग्रंथ उपलब्ध नाही. बुद्ध राजा नसल्यामुळे त्याची नाणी सापडण्याचा प्रयत्न उद्भवत नाही. त्याच्या वचनांचे शिलालेख अशोककालीन आहेत. बुद्धाचा राजवाडा म्हणून एखाद्या वास्तूला पुराविदांनी मान्यता दिल्याचे ऐकिवात नाही. तेव्हा रामाच्या ऐतिहासिकतेबद्दल जी प्रमाणे देण्यात येतात त्यापेक्षा जास्त बुद्धाबद्दल देता येतील असे वाटत नाही.

ख्रिस्ताबद्दल ही हीच स्थिती आहे. ख्रिस्ताच्या ऐतिहासिकतेबद्दल एकही समकालीन लेख उपलब्ध नाही. त्याचे समकालीन जे हिब्रू व रोमन लोक त्यांच्या वाङ्मयात कुठेही ख्रिस्ताचा उल्लेख नाही. नाणी, शिलालेख, वास्तू वगैरे सापडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

संबंधित समाजांच्या वाङ्मयात उल्लेख असला पाहिजे असा कोणाचीही ऐतिहासिकता ठरविण्याचा आग्रह धरला तर अलेक्झांडरने भारतावर स्वारी केली ही गोष्ट अनैतिहासिक मानता येईल. ज्या भारतात त्याने युद्धे करून मोठमोठ्या राजांना पराभूत केले असे आपण प्रत्यही वाचतो त्या अलेक्झांडरचे नावदेखील भारतीय वाङ्मयात नाही. ही गोष्ट संशयोत्पादक नाही काय ? अयोध्येवर मीनांडरने स्वारी केली असा स्पष्ट उल्लेख करणाऱ्या लेखकांना अलेक्झांडरने भारतावर स्वारी केली असे लिहिता आले नसते काय ?

तेव्हा ज्यांना रामाला अनैतिहासिक मानायचे असेल त्यांना बुद्ध, ख्रिस्त व अलेक्झांडरची भारतावरील स्वारीदेखील अनैतिहासिक मानावी लागेल. एकाला एक न्याय व दुसऱ्याला दुसरा हे ऐतिहासिक प्रामाणिकपणाचे लक्षण नाही.

९

# रामायणाच्या चार आवृत्त्या

नी. र. वऱ्हाडपाण्डे

महाभारताच्या तीन आवृत्त्या प्रसिद्ध आहेत. पण रामायण हा एकटाकी व एकाच लेखकाचा ग्रंथ आहे, अशी समजूत आहे. तथापि, हल्ली उपलब्ध असलेला वाल्मीकी रामायण नावाचा ग्रंथ काळजीपूर्वक वाचला तर दिसून येईल की या ग्रंथाच्याही एकाहून अधिक आवृत्त्या झाल्या हे त्यातच नमूद केले आहे. रामायणाला दोन अनुक्रमणिका आहेत. पहिली पहिल्या व दुसरी, तिसऱ्या आणि चौथ्या सर्गात दिलेली आहे. पहिल्या अनुक्रमणिकेतील विषय नारदाने प्रेरित केलेल्या व दुसऱ्या अनुक्रमणिकेतील ब्रह्मदेवाने प्रेरित केलेल्या काव्यातील आहेत. नारदापेक्षा ब्रह्मदेव श्रेष्ठ म्हणून त्याच्या प्रेरणेने झालेले काम अधिक परिपूर्ण असे सुचविण्याचा उद्देश दिसतो.

पहिल्या अनुक्रमणिकेत बालकाण्ड व उत्तर काण्ड ही नाहीत. दुसऱ्या अनुक्रमणिकेत ही दोन्ही काण्डे निर्देशिली आहेत. पण उत्तर काण्ड हे वाल्मीकीने युद्धकाण्डानंतर ग्रंथसमाप्ती झाल्याचे स्पष्टपणे लिहिले असूनदेखील नवे रचले व यात 'अनागत' घटना सांगितलेल्या आहेत असे म्हटले आहे. अनागत म्हणजे न घडलेल्या. अर्थात यात वर्णिलेल्या घटना काल्पनिक आहेत हे स्पष्टच सांगितले आहे. हे मूळ ग्रंथकारानेच रचले असते तर त्याने युद्धकाण्डाच्या शेवटी लिहिलेली ग्रंथसमाप्ती काढून टाकली असती. पण ग्रंथाच्या नवीन आवृत्त्या काढणारे मूळ ग्रंथातील एक अक्षरही काढून टाकीत नाहीत. केवळ नवीन रचना त्यात टाकीत असतात व ती योग्य वाटावी म्हणून मूळ रचनेला नवीन अनुक्रमदेखील असतात.

उत्तरकाण्डात कवि 'मी प्रचेतसाचा मुलगा' असे म्हणतो (९६/१९-२१) पण आपले नाव वाल्मीकी आहे असे म्हणत नाही. चौथ्या वर्गात 'पौलस्त्यवध' नावाच्या रामायणाच्या आवृत्तीचा उल्लेख आहे. ही रामायणाची सर्वांत प्राचीन आवृत्ती असली पाहिजे कारण त्याच्या नावावरून तिच्यात फक्त रावणवधाचा म्हणजे युद्धकाण्डाचा विषय होता असे दिसते. ही रचणारा प्राचेतस असावा कारण तो ऋग्वेदीय ऋषी प्रचेतस् याचा दहावा पुत्र होता. तो सर्वांत प्राचीन आहे. सर्वांत प्राचीन कवीने सर्वांत लहान अशी रामायणाची आवृत्ती रचली असे म्हणणे वाजवी आहे. कारण नवीन आवृत्ती मोठी असते असे महाभारताच्या उदाहरणावरून दिसते.

प्राचेतस हा वाल्मीकी नव्हे. वाल्मीकी हा मूळचा वाटमाऱ्या, नारदाच्या उपदेशामुळे व 'आम्ही तुझ्या लुटीचे भागीदार आहोत, पापाचे नाही' असे आप्तेष्टांनी उत्तर दिल्यामुळे

उपरति होऊन सज्जन झाला. जातीने तो कोळी होता अशी परंपरा आहे. त्याच्या पित्याचे नाव वल्मीक पडण्याचे कारण तो काळा होता वा ठेंगणा होता हे समजू शकेल. तपश्चर्येत बुडाल्यामुळे त्याच्याभोवती वारूळ जमले म्हणून त्याला वाल्मीकी म्हणू लागले हे विश्वासार्ह नाही. शिवाय असे मानल्यास त्याचे मूळ नाव वाल्मीकी नव्हते असे ठरते. व मूळ नाव काय हा नवीनच प्रश्न उपस्थित होतो. उपलब्ध रामायणात वाल्मीकी वाटमाऱ्या असल्याचा उल्लेख नाही. पण नारदाच्या उपदेशावरूनच तो रामकथा गाऊ लागला व त्याच्या रामकथेत बाल व उत्तर ही काण्डे नव्हती असे स्पष्ट सांगितले आहे.

याच काण्डात भार्गव हे तिसरे नाव आहे व त्याने रामायणाची शंभर उपाख्याने रचली असे म्हटले आहे (९४/२६) तेव्हा रामायणाच्या तीन आवृत्त्यांचे कर्ते प्राचेतस, वाल्मीकी व भार्गव हे आहेत. प्राचेतसाने फक्त 'पौलस्त्यवध' रचले (पौलस्त्यवधमित्येव चकार चरितव्रत:) (१/४/७) व वाल्मीकीने सीतेचे चरित्र असलेले रामायण लवकुशांना शिकविले (१/४/६-७) म्हणजे लवकुशांना शिकवलेला भाग नंतर रचलेला आहे असा याचा अर्थ होतो. प्राचेतसाच्या मूळ ग्रंथात फक्त राम-रावण युद्धाचे वर्णन होते. पण एवढा पराक्रम करणाऱ्या रामाचे चरित्र त्यात नव्हते. व्यासानेदेखील जय म्हणजे फक्त पांडवांच्या जयाचे वर्णन करणारा ग्रंथ लिहिला असे महाभारतात वचन आहे. रामाचे चरित्र सांगणारी अयोध्या, अरण्य व सुंदर ही तीन काण्डे वाल्मीकीने रचली. भार्गवाने उपाख्याने रचली; पण उत्तर व बाल ही काण्डे कोणी रचली याचे उत्तर कोठेही सापडत नाही. कारण ही काण्डे मूळ रामायणातच होती असेही रचणाऱ्याला दाखवायचे आहे.

प्राचेतसाचा काळ खगोलीय प्रमाणावरून व प्रचेतस् हा ऋग्वेदाचा ऋषी आहे. यावरून ख्रिस्तपूर्व ३७०० हा ठरतो. (New Light on the Date of the Rgveda, N. R. Waradpande) या काळी लेखन कला असल्याचा पुरावा नाही. तेव्हा 'पौलस्त्यवधात' हजार श्लोकांपेक्षा जास्त श्लोक नसावे. ते एका बैठकीत गाऊन होतील एवढाच त्यांचा विस्तार असावा.

प्राचेसानंतर वाल्मीकीने अयोध्या, अरण्य व सुंदर ही काण्डे दोन एक शतकांच्या आतच रचली असावी. कारण ३७०० ख्रि. पू. या काळाकडे निर्देश करणारे हिवाळा व पावसाळा यांचे उल्लेख (किष्किन्धा २८/५४ अरण्य १६/१२) ख्रि. पू. ३७०० या काळचे आहेत. 'पौलस्त्यवधात' फक्त युद्धाचे वर्णन होते. किष्किन्धेकडून लंकेकडे हेमन्तामध्ये सेना निघाल्या. त्या लंकेला पोहचून तेथील युद्ध सुरू होईपर्यंत ग्रीष्म लागला असला पाहिजे. त्यात हेमन्त व पावसाळा यांचे वर्तमानकालीन उल्लेख असण्याचा संभव नाही.

### राम-रावण युद्धातील शस्त्रे

शिवाय या ग्रंथात बालकाण्ड नसले तरी चैत्र हा हिवाळ्याचा शेवटचा महिना व चैत्र शुद्ध नवमीला रामजन्म हा उल्लेख (बालकाण्ड१८/८,९) अयोध्या काण्डाच्या सुरुवातीला



असला पाहिजे. बालकाण्डाची रचना झाल्यावर तो तेथे जास्त योग्य असल्यामुळे अयोध्याकाण्डातून काढून बालकाण्डात घालण्यात आला.

अशा आवृत्त्यांना प्रक्षेप हा शब्द लावण्यात येतो तो बरोबर नाही. प्रक्षेप आठ दहा श्लोकांपुरते मर्यादित असतात. या आवृत्त्या मूळ ग्रंथाच्या कित्येक पट मोठ्या आहेत. त्या अक्षरश: वाढविलेल्या पुन:सम्पादित आवृत्त्या आहेत.

येणेप्रमाणे रामायणाच्या (१) पौलस्त्यवध, (२) ४ काण्डांचे रामायण(३) सहा काण्डांचे रामायण व (४) शंभर उपाख्यानासहित रामायण अशा चार आवृत्त्या मानल्या पाहिजेत.

अर्थात युद्धकाण्ड ही सर्वात प्राचीन रचना आहे; पण रामायणातील काण्डांची प्राचीनता ठरविण्यास त्यातील उल्लेख प्राचीन की अर्वाचीन एवढे पाहू गेल्यास काहीच हाती लागणार नाही. कारण बहुतेक काण्डात अत्यन्त प्राचीन उल्लेखाप्रमाणेच बुद्धोत्तर कालाच्या खुणादेखील सापडू शकतात. पण युद्धकाण्डाचा मुख्य विषय जे युद्ध त्यातील शस्त्रकारितेचा कालखण्ड ३७०० ख्रिस्तपूर्व या कालात बसणारा असेल, तर हे युद्ध त्याकालचे आहे, असे मानता येते. युद्धकाण्डात यानंतरचा काल निश्चितपणे द्योतित करणारे एक वाक्यही नाही ही गोष्ट महत्त्वाची आहे.

या युद्धातली सर्व शस्त्रे ताम्रपाषाणयुगातील आहेत. ढाली बैलाच्या चामड्याच्या आहेत(५४/३१) बैलाच्या चामड्याच्या ढाली लोखंडाच्या वा काशाच्या तरवारीचे वार सोसण्यास मुळीच समर्थ असू शकत नाहीत. या ढालींनी झेललेल्या तरवारी शिंगांच्या व तांब्याच्या होत्या. वानर शिळा (४३/४०, ४२) व तालवृक्षांच्या मुद्गलांनी व मुसळांनी लढत होते. (५८/४९) बाणांचे फाळ सत्सदन्त म्हणजे तरुण प्राण्यांच्या दातांचे व सिंहद्रंष्ट्र म्हणजे सिंहाच्या दातांचे असत. (४६/२४) 'तैलधौत' म्हणजे तेलाने ज्याच्या दाण्डयाची निगा राखण्यात आली आहे व 'शैलसारमय' म्हणजे ज्याचे पाते दगडाचे आहे अशा परशूचा ९९/१८ मध्ये उल्लेख आहे. शैलसारमय म्हणजे शिळेने मजबूत झालेला. अर्थात या परशूचा फाळ दगडाचा होता.

अंगदाने वज्रदंष्ट्राला मारले. ही घटना युद्धकाण्डातल्या शस्त्रकारितेवर प्रकाश टाकते. अंगद व वज्रदंष्ट्र लढता लढता थकले असता गुडघ्याच्या आधारावर विश्रांती घेऊ लागले. गुडघ्याच्या आधारावर विश्रांती घेताना हात समोर टेकलेले असले पाहिजेत. ही विश्रांती घेतल्यावर अंगदाचा दम आधी परत आला व त्याने आपल्या 'खड्गाने' वज्रदंष्ट्राच्या शिरावर प्रहार केला. या प्रहाराने वज्रदंष्ट्राच्या शिराचे दोन तुकडे झाले व ते धरणीवर पडले. (५४/३१-३५)

येथे या खड्गाच्या घडणीचा विचार केला तर हे खड्ग म्हणजे या शब्दाच्या मूळ अर्थाप्रमाणे गेण्ड्याचे शिंग होते ते नि:संशय. ती पूर्ण लांबीची तरवार असती तर गुडघ्यावर विश्रांती घेण्याच्या अवस्थेत शिराचा व मानेचा मागचा भाग आणि पाठ यावर तिचा वार बसला असता. अशा वाराने शरीराच्या या सर्व भागाची दोन शकले झाली असती. तरी

त्यामुळे फक्त शिराचेच तुकडे जमिनीवर पडले नसते. फक्त शिराचेच तुकडे पडले त्याअर्थी अंगदाने गेंड्याचे शिंग खंजीरासारखे शिराच्या मागच्या बाजूस खुपसले. त्याचा जाड भाग शिराच्या भेगेत शिरल्यामुळे ते शिर दुभंगले व जमिनीवर पडले असे दिसते. म्हणजे लोखंडाच्याच काय काशाच्या देखील पूर्ण लांबीच्या तरवारीचा शोध लागला नव्हता हे स्पष्ट आहे. हा काळ ३००० ख्रि. पू.च्या पूर्वीचा आहे कारण ३००० च्या सुमारास मोहंजोदारोमध्ये काशाची मूर्ती सापडली आहे. अर्थात युद्धकाण्ड हा उपलब्ध रामायणाचा सगळ्यात प्राचीन भाग आहे.

## उत्तरकाण्डरचनेतील उद्देश

ताम्रपाषाणयुगातील शस्त्रे वापरणारे युद्ध ताम्रपाषाणयुगात झाले असे म्हणता येते तसे इतर काण्डातील घटनांबद्दल कालनिर्णयाचे काही गमक उपलब्ध नाही. त्यातील कोणतीही मुख्य घटना विशिष्ट कालातच झाली असे म्हणता येऊ शकत नाही.

युद्धकाण्डात कालनिर्णयाला उपयोगी पडणारे खगोलीय उल्लेख नाहीत. पण रामाचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला झाला व चैत्र हा हिवाळ्याचा शेवटचा महिना होता या उल्लेखावरून रामाचा जन्म ख्रि.पू. ३७०० मध्ये झाला असे गणित करता येते. राम, दशरथ, इक्ष्वाकु वंश, रामायणप्रणेत्या प्राचेतसाचा पिता प्रचेतस् व जमदग्नि म्हणजे परशुरामाचा पिता यांचे उल्लेख ऋग्वेदात आहेत. प्राचेतस हा रामाचा समकालीन होता यावरून पौलस्त्यवधाची रचना ख्रि. पू. ३७०० च्या सुमाराची आहे असे अनुमान होते.

महाभारतातील रामोपाख्यान हे उत्तरकाण्डाच्या पूर्वीचे आहे व त्यात 'रामावर तुझ्यापेक्षाही जास्त आपत्ती आल्या' असे धौम्य ऋषी युधिष्ठिराचे सांत्वन करण्यासाठी सांगत आहेत. सीतात्याग ही रामाच्या जीवनातील सर्वात मोठी आपत्ती होती. त्यावेळी उत्तरकाण्ड प्रचलित असते, तर या आपत्तीचा उल्लेख झाल्यावाचून राहिला नसता. तेव्हा रामाचे चरित्र सांगणारा उत्तरकाण्डविरहित एखादा ग्रंथ त्यावेळी उपलब्ध असला पाहिजे व तो प्राचेतसाच्या पौलस्त्यवधानंतर एखाद दोन शतकातच झाला असला पाहिजे. पौलस्त्यवध व रामायण यात हजारो वर्षांचे अंतर मानले तर रामचरित्र हजारो वर्षे केवळ तोंडी व गद्य कथातच राहिले, फक्त रावणवधच केवळ काव्यबद्ध झाला होता अशी असंभाव्य कल्पना करावी लागते.

महाभारतातील रामोपाख्यान ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकातले असले तरी याच सहस्रकात जय ग्रंथात वैशम्पायनाने जी भर घातली त्यातले आहे व त्यावेळी उत्तरकाण्ड रचले गेले नव्हते हे स्पष्ट आहे; पण रामाचे चरित्र सांगणारी वाल्मीकीची तीन काण्डे मात्र उपलब्ध होती.

वैशाम्पायनाचे भारत ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकातले आहे असे महाभारतात जनमेजयाला त्याचे मंत्री 'कलियुगाची हजार वर्षे लोटून गेली आहेत. (आदिपर्व दक्षिण प्रत) असे सांगतात त्यावरून स्पष्ट आहे. महाभारतात कार्तिक हा शरदऋतुचा दुसरा महिना (उद्यो



अ. ८३) व कार्तिक अमावस्येनंतर ६८ दिवसांनी उत्तरायण (अनुशासन १६७) अशी वचने आहेत. ती ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकाच्या दुसऱ्या अर्धाला लागू होतात. ख्रि. पू. दुसऱ्या सहस्रकाच्या दुसऱ्या अर्धात वैशम्पायनाचे भारत झाले असे या दोन प्रमाणांवरून म्हणता येते. त्याच सुमारास उत्तर काण्ड व बालकाण्ड यांची रचना झाली असली पाहिजे. कारण रामायणातदेखील श्रावणात पावसाळा सुरू झाल्याचा उल्लेख आहे. (सुंदर २६/१४) त्याप्रमाणे या पाचशे वर्षांत केव्हा तरी महाभारत व रामायण या दोहोंचीही नवीन आवृत्ती तयार होत होती; पण उत्तरकाण्डाची रचना रामोपाख्यानाच्या नंतर झाली.

त्यापैकी उत्तरकाण्ड रचनेचा हेतू परक्याच्या घरी राहिलेल्या स्त्रीचा त्याग करावा अशी स्त्रियांच्या लैंगिक पावित्र्याबद्दलची नवीन अपेक्षा प्रसारित करण्याचा आहे. यापूर्वीच्या रामायणातील राम ही कल्पना मानणारा नाही. तो सीतेचा नि:शंकपणे स्वीकार करतो व अहल्येचा उद्धार करतो. जनतेसमोर हे उदाहरण चांगले नाही असे ज्यांना वाटत होते त्यांनीच सीतेचे अग्निदिव्य व नंतर उत्तरकाण्डातील तिचा त्याग याची कल्पना केली. बालकाण्डाची रचना या काळचीच असली तरी त्यातील अहल्योद्धार हे उपाख्यान भार्गवाने बुद्धोत्तर कालात टाकले असे म्हणता येते. बालकाण्डातील ११९ सर्गापैकी ७४ सर्ग उपाख्याने सांगणारे आहेत.

पौलस्त्यवधाचा निर्माता प्राचेतस अयोध्या, अरण्य व सुंदर या तीन काण्डांचा निर्माता वाल्मीकी व बुद्धोत्तर कालात उपाख्याने टाकणारा भार्गव असे रामायणातील वचनावरूनच ठरते. उत्तरकाण्ड व बालकाण्ड लिहिणारा कोण हे आज सांगता येत नाही कारण ही काण्डे मूळ रामायणातीलच आहेत असे या लेखकाला भासवायचे असल्यामुळे त्याने आपले नाव सांगितले नाही.

## महाभारतात उत्तरकाण्डाचे प्रतिध्वनि

रामायणात ज्याप्रमाणे स्त्रीच्या पावित्र्याबद्दलच्या अनुदार कल्पना या काळात शिरल्या त्याचप्रमाणे त्या महाभारतातदेखील शिरल्या. महाभारताच्या मूळ कथेत स्त्रीच्या पावित्र्याबद्दलच्या या नवीन कल्पनेला काहीच स्थान नव्हते. त्याची नायिका एकाच वेळी पाच नवरे करते. दमयन्ती पती जिवंत असताना स्वयंवर घोषित करते, अम्बालिका, अम्बिका आणि कुन्ती नियोग करतात. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात या घटना दु:सह वाटू लागल्या. जनतेत पसरलेल्या ग्रंथातून त्या काढून टाकणे शक्य नव्हते. नवीन वृत्तान्त त्यात घालून त्या ग्रंथाचे संपादन करणे मात्र शक्य होते. महाभारतातदेखील असे संपादन झाले. अम्बा आपल्या प्रियकराकडे परत जाते तेव्हा तो 'भीष्माने तुला नेले आता मी तुझा स्वीकार करणार नाही' असे म्हणतो तेव्हा अम्बा भीष्माकडे परत जाते व 'तू माझे जीवन उद्ध्वस्त केले आहेस, आता तू माझ्याशी लग्न कर' अशी गळ घालते. भीष्म नकार देतो तेव्हा अम्बा परशुरामाला म्हणजे एका रामकालीन वीराला शरण जाते. परशुराम तिचा पक्ष घेतो व भीष्माला समज देतो. भीष्म ऐकत नाही म्हणून त्याच्याशी युद्धदेखील

करतो. परशुराम भीष्माचा पराभव करू शकला नाही असे सांगून त्या जुन्या मताचा आता पराभव झाला असे ही कथा सुचविते.

कुन्ती नियोग करते पण माद्री मात्र सती जाते अशी कथा याच काळात जोडण्यात आली. वस्तुतः एकाच कुटुंबात एकाचवेळी अशा विरुद्ध प्रथा असण्याचा संभव नाही.

डॉ. लाल, ख्रिस्तपूर्व ७००च्या पूर्वीचे अयोध्येचे अवशेष सापडत नाहीत म्हणून रामाचा जन्मच ख्रि. पू. ७०० च्या नंतरचा मानतात. पुरातत्त्वीय स्तर फक्त भूमीतच असतात या समजुतीवर हे अनुमान काढण्यात आले आहे. पण अयोध्येच्या भूमीप्रमाणेच रामायणातही स्तर आहेत व त्याचा सगळ्यात अर्वाचीन स्तर ख्रि. पू. ७०० च्या नंतरचा आहे. या स्तरातच अयोध्येचे वर्णन आहे असे मानल्याने डॉ. लाल यांच्या शोधाची पुरेशी उपपत्ती लाभते. या शेवटच्या स्तरातच बुद्धाचा व शकयवनांचादेखील उल्लेख आहे. डॉ. लाल अयोध्येच्या कालावरून रामाचा काल ठरवितात तर त्यांनी बुद्धाच्या कालावरून रामाचा काल का ठरवू नये?

रामायणाची पहिली आवृत्ती ख्रि. पू. ३७०० व शेवटची ख्रि. पू. ५०० च्यानंतरची म्हणजे दोन आवृत्त्यांत निदान ३२०० वर्षांचे अंतर! मग या बत्तीसशे वर्षांत सर्वत्र एकरूपच भाषा आहे हे कसे? या पाश्चात्त्यांच्या आक्षेपालाही उत्तर हेच की या आवृत्त्या आहेत, पुनर्मुद्रण नव्हे. नवीन आवृत्त्यांचे संपादक जुने श्लोक गाळत नसले तरी त्याचीं भाषा नवीन काळानुरूप बदलत असत. ही प्रथा मराठी वाङ्मयातदेखील दिसून येते. एकनाथांनी ज्ञानेश्वरी शुद्ध केली म्हणजे समकालीन भाषेत लिहून काढली. ज्ञानेश्वरांच्या भाषेत ती समजत नव्हती. आजच्या ज्ञानेश्वरीतले मराठी ज्ञानेश्वरकालीन नाही.

रामायण व महाभारत पुनः पुनः सम्पादित करून व वाढवून त्याच्या आवृत्त्या काढल्या गेल्या कारण हे ग्रंथ कोणा एका व्यक्तीचे समजले न जाता राष्ट्रीय ग्रंथ समजले गेले. त्यामुळे राष्ट्राच्या गरजेप्रमाणे त्यांच्या आवृत्त्या काढण्यात आल्या. यात आपण काही खोटेपणा करीत आहोत, असे कुणाला वाटले नाही. तसे वाटले असते तर आवृत्ती काढणाऱ्यांची नावे उघडपणे सांगण्यात आली नसती व रामाच्या व कृष्णाच्या चरित्रात बुद्ध, यवन वगैरे घुसडण्यात आले नसते. या घटना राम व कृष्ण यांच्या कालच्या नाहीत पण राम व कृष्ण आज असते तर कसे वागले असते हे दाखविण्यासाठी आम्ही त्या वापरल्या आहेत असेच याचे समर्थन या सम्पादकांनी केले असते.

रामायण/महाभारताप्रमाणेच पुराणे हीदेखील राष्ट्रीय संपदा मानण्यात आली व त्यांच्याही अशाच आवृत्त्या झाल्या हे भागवताचे जे विवेचन ग. वि. चिपळूणकर यांनी श्रीमद्‌भागवतादर्श या ग्रंथात केले आहे त्यावरून दिसून येते. भागवतात आठव्या शतकापर्यंतचे संदर्भ येतात म्हणून सारे भागवतच आठव्या शतकात झाले हे अनुमान चूक आहे. कारण त्यात बुद्धपूर्व उल्लेख देखील येतात. रामायण, महाभारत व पुराणे यांच्याबद्दल त्यांच्या राष्ट्रीयतेचा पैलू लक्षात घेऊन त्यांच्या कालावर संशोधन व्हायला पाहिजे. या ग्रंथाचा एक काल नसून तो हजारो वर्षांवर पसरलेला आहे.

*



९

# भारतीय युद्धातील शस्त्रास्त्रे

**नी. र. वऱ्हाडपांडे**
३८ हिंदुस्तान कॉलनी, अमरावती रोड,
नागपुर १०

एखाद्या सभ्यतेचा काळ ठरविण्यासाठी त्या सभ्यतेने वापरलेल्या शस्त्रास्त्रांचा विचार फार निर्णायक ठरत असतो. युद्धात जय मिळविण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान वापरणे फार आवश्यक असते. म्हणूनं जगातील अग्रगण्य शक्ती जर धनुष्यबाणांचा वापर करीत असेल तर त्याकाळी बंदुकांचा शोध लागला नव्हता असे अनुमान काढणे वाजवी ठरते. या दृष्टीने भारतीय युद्धात कोणती शस्त्रे वापरली गेली याचा विचार केल्यास ते युद्ध कोणत्या काली लढले गेले याचा निर्णय करणे सोपे जाईल.

भारतीय युद्धाचा कालनिर्णय करण्याच्या दृष्टीनेच केवळ नव्हे तर भारतीय युद्ध कसे लढले गेले हे समजण्याच्या दृष्टीने देखील भारतीय युद्धात कोणती शस्त्रास्त्रे वापरली गेली याचा आढावा घेणे उपयुक्त होईल.

असा आढावा घेताना एक महत्त्वाची गोष्ट ही लक्षात ठेवली पाहिजे की महाभारत हा एकहाती ग्रंथ नाही, त्याचा मूळ भाग व्यासांनी रचला असला तरी त्यानंतर त्यात दोन वेळा मोठी भर घालण्यात आली. या भरीला प्रक्षेप हा शब्द लागू होत नाही. ग्रंथात प्रकरणेच्या प्रकरणे नवीन घालणे व त्याचा विस्तार पूर्वीच्या दुप्पट/तिप्पट करणे हा प्रक्षेप नसून त्या ग्रन्थाचे परिवर्धन करणारे पुनर्लेखन आहे. महाभारताचे असे पुनर्लेखन दोन वेळा झाले आहे असे प्रत्यन्तर त्यातील कालदर्शी उल्लेखावरून सहज होते. व्यासाचा काल परंपरेप्रमाणे ख्रि.पू. ३१०१ हा मानला (रोहिणी नक्षत्रात चंद्र असताना शुक्ल अष्टमीला उत्तरायण) तर मूळ ''जय'' या ग्रंथाची रचना ख्रि.पू. चौथ्या सहस्रकाच्या पहिल्या शतकात झाली असे ठरते. यानंतर महाभारतात मोठी भर ख्रि.पू. २५०० ते १५०० (काशाच्या तरवारींचा उपयोग) या कालखंडात व तिसरी ख्रि.पू. पहिल्या सहस्रकात पडली असे सहज दिसून येते. (श्रवणनक्षत्रात उत्तरायण) यापैकी चौथ्या सहस्रकाचे पहिले शतक ताम्र/पाषाणयुगातले, ख्रि.पू. २५०० ते १५०० हा काल कास्ययुगाचा व ख्रि.पू. पहिले सहस्रक हे लोहयुगाचे आहे.

**ताम्रपाषाणयुगातील शस्त्रे :**

महाभारत वाचताना कोणाच्याही लक्षात येण्यासारखी गोष्ट ही की त्यात निकट-युद्धासाठी गदा वापरण्यात येत होती, तरवार नव्हे. गदा हे शस्त्र अत्यंत अवजड असते. त्याने परिणामकारक असा वरून खाली हा एकच वार करता येतो. खालून वर वार केला तर गदेच्या वजनामुळे त्यात वेग आणणे कठिण जाते. हीच गोष्ट आडव्या वारांनाही लागू आहे. शिवाय हे वार करण्यास बराच वेळ लागतो. त्यामुळे तरवारीने लढणाऱ्या योद्ध्याविरुद्ध गदा कुचकामाची ठरते. तरवारीने वरून खाली, खालून वर, आडवेतिडवे कोणतेही वार व भोसकण्याची क्रिया द्रुत गतीने करता येते. खुद्द महाभारतात खालील वाक्य आहे.

.... गदाशक्तिधरांस्तदा।

एकः खड्गधरो धीरः समर्थः प्रतियोधितुम्॥ शान्तिपर्व १४५/४

"अनेक गदाधरांचा समाचार घेण्यास एकटा खड्गधर पुरा आहे". हे वाक्य, उघडपणेच, तरवारींचा शोध लागल्यावर महाभारताचा जो भाग रचला गेला त्या भागातले आहे. भारतीय युद्धात गदा वापरल्या जात होत्या त्या अर्थी भारतीय युद्ध तरवारींचा शोध लागण्याच्या आधी लढले गेले असे सरळ अनुमान निघते. खि.पू. १२०० मध्ये लढल्या गेलेल्या ट्रोजनयुद्धात गदा वापरल्या गेल्याचे वर्णन नाही.

ताम्रपाषाणयुगात कासे व लोखंड या धातू माहीत नव्हत्या. त्यामुळे तरवार करता येत नव्हती. तांब्याच्या तरवारी केल्या तर त्या लढता लढता वाकून जाऊन योद्धा निःशस्त्र होण्याचा धोका असतो. "हे इन्द्रा, तू शत्रूचे शस्त्र वाकविलेस" असे ऋग्वेदात उल्लेख आहेत. (वधर्दासस्य नीनमः ८/२४/२७) शस्त्र वाकणे म्हणजे पराभव असे समीकरण होते. हे वाकणारे शस्त्र म्हणजे १०/१५ इंचाचे खंजीर होते, पूर्ण लांबीच्या तांब्याच्या तरवारी करीतच नव्हते.

महाभारतातील वर्णनावरून हे स्पष्ट आहे. भूरिश्रवा सात्यकीला ठार करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचे केस धरून त्याच्या मानेवर आपली 'तरवार' चालवू पाहतो. धृष्टद्युम्न द्रोणाचार्यांचा शिरच्छेद करतो तो त्याचे केस धरून त्याच्या मानेवर तरवार चालवूनच (अथ कोशाद्विनिष्कृष्य खड्गं भूरिश्रवाः शितम्। मूर्धजेषु च जग्राह पदा चोरस्यताडयत्॥ जयद्रथवधपर्व १२१/१४४) विकृष्य पार्श्वतः खड्गं क्रोधामर्षवशं गतः। दृश्यमानः सर्वभूतैः केशपक्षे परामृशत्॥ (द्रोणवधपर्व १६०/१३९)



या वर्णनावरून हे स्पष्ट आहे की या योद्ध्याजवळची 'तरवार' हा एक खंजीर होता. पूर्ण लांबीच्या तरवारीने शत्रूचे केस वगैरे न धरता एका घावानेच त्याचे शिर उडविता येते.

मौसलपर्वात सात्यकी कृतवर्म्याचे शिर आपल्या तरवारीने उडवितो तो त्याचे केस वगैरे न धरता सरळ वार करून असे वर्णन आहे. (अभिसृत्य शिरस्तस्य चिच्छेद कृतवर्मणः मौसलपर्व ३/२९). हे वर्णन अर्थात् तरवारीचा शोध लागल्यानंतरचे म्हणजे निदान खि.पू. २५०० च्या नंतरचे आहे.

निकटयुद्धाचे शस्त्र गदा हे होते तसेच दूरयुद्धाचे मुख्यतः धनुष्यबाण हे होते. काही बाण 'शिलाशित' होते. (शिलाशितेन... क्षुरप्रेण महारथः (शन्यवधपर्व २४/३९). 'शिलाशित' याचा अर्थ शिळेसारखे म्हणजे दगडासारखे तीक्ष्ण असा करता येत नाही. कारण दगडाची धार फार तीक्ष्ण करू गेले तर तो तुटतो व धार तीक्ष्ण होण्याऐवजी खडबडीत होते. यापेक्षा तांब्याचीच धार अधिक तीक्ष्ण करता येऊ शकते. तेव्हा तांब्याच्या शस्त्राला 'दगडासारखे तीक्ष्ण' म्हणणे हे घोड्याला गौरविण्यासाठी 'गाढवाएवढा मोठा' असे म्हणण्यासारखे आहे. 'शिलाशित' चा अर्थ दगडावर धार लावलेला असाही होऊ शकत नाही. कारण धार नेहमी दगडावरच लावली जात असे. तेव्हा या शस्त्राची धार दगडावर लावली आहे असे म्हणणे म्हणजे हे वासरू गायीच्या पोटी आले आहे असे म्हणणे होय.

'शिलाशित' या शब्दातील शिला या शब्दाचा अर्थ सोमल म्हणजे आर्सेनिक असा आहे. सोमल व तांबे यांची मिश्रधातु केली म्हणजे ती तांब्यापेक्षा अधिक कठिण व तीक्ष्ण होऊ शकते. अशी सोमलमिश्रित तांब्याची शस्त्रे सापडली आहेत असे प्रसिद्ध पुरावेत्ते अग्रवाल यांनी दाखवून दिले आहे.[२]

शिलाशित या शब्दातील शिला शब्दाचा अर्थ आर्सेनिक असा आहे या कल्पनेला शिलाधौत (शल्यवधपर्व २५/५) या शब्दाने पुष्टी मिळते. शिलाधौत या शब्दात शिला या शब्दाचा सोमलाशिवाय दुसरा अर्थ होऊच शकत नाही. 'शिलाधौत' बाण हा सोमलविषाने लिप्त असा बाण असे. बाण एकदा शरीरात घुसला की योद्धा मरावाच या हेतूने तो विषारी केलेला असे.

बाणांचे फाळ कधी कधी तरुण प्राण्यांच्या दाताचे केलेले असत. हे 'वत्सदन्त' (भीष्मपर्व ५७/४१) या बाणाच्या नावावरून स्पष्ट आहे. तरुण प्राण्याचा दात वयस्क प्राण्याच्या दातापेक्षा जास्त मजबूत असतो.

बस्त (द्रोण १५७/११) म्हणून उल्लेखिलेले बाण बकऱ्यांच्या शिंगांचे असावे. ते वर्ज्य मानलेले आहेत. याचे कारण मात्र कळत नाही.

काही बाणांना 'कूर्मनख' असेही म्हटले आहे. (द्रोणपर्व १००/८१) यावरून कासवाच्या नखाचेही बाणाचे फाळ असत असे दिसते. नखाचा ओरखडा लोखंडावरही पडतो असे रासायनिकांनी मला सांगितले आहे. तात्पर्य, नख लोखंडा-पेक्षा जास्त कठिण असते.

बाण या शब्दावरून बाणाचा दाण्डा वेताचा असे हे स्पष्ट आहे. काही बाणांना विपाट म्हटलेले आहे. कारण हे बाण शत्रूच्या शस्त्राचे तुकडे करीत (भी.व.प. ५५/२७) भल्ल बाण हे भाल्यासारखे फाळ असणारे असणार. क्षुरप्र हे केशवपन करू शकतील इतक्या तीक्ष्ण धारेचे असत. (शल्य १२/१९) विकर्ण म्हणजे बिनकानाचे बाण (कर्ण. ८४/८) म्हणजे फाळाच्या खाली कानासारख्या बाजू नसणारे बाण. या कानांना मागच्या बाजूला तीक्ष्ण टोके असत व त्यामुळे अंगात घुसलेला बाण बाहेर काढला तर तो शरीराला फाडूनच निघत असे. धर्मयुद्धात असा बाण वर्ज्य मानला आहे. कर्णिक बाणाप्रमाणेच लिप्त म्हणजे विषलिप्त बाण अधर्म्य मानला आहे. (द्रोण १५७/११)

अर्जुनाच्या धनुष्याला गांडीव म्हटलेले आहे. गंड म्हणजे गाठ. यावरून असे दिसते की गांडीव धनुष्य दोन वा तीन वेत दोरीने बांधून केलेले होते. भारसाधन धनुष्य (भीष्मपर्व ७४/५३) व भारसाधन नसलेले म्हणजे हलके धनुष्य अशी दोन प्रकारची धनुष्ये सांगितलेली आहेत. त्यातले गांडीव धनुष्य हे भारसाधन धनुष्य होते. अशी धनुष्ये 'द्वादशारत्नि' म्हणजे बारा हात लांबीची असत. (द्रो. १४४/२१) व ती न उचलता खाली ठेवूनच त्याने शरसंधान करीत असे अलेक्झांडर व पोरस यांच्या युद्धाच्या वर्णनावरून दिसते.

भारसाधन धनुष्याच्या उलट एक लहान व हलके धनुष्य असे. लहान असल्यामुळे हे फार लांबवर ओढावे लागत नसे व त्यातून सुटणारे बाण 'वैतस्तिक' म्हणजे वीतभर लांब असत. (द्रोणपर्व १०७/५५) शत्रू जवळ येऊ लागला म्हणजे अशा धनुष्याचा प्रयोग करीत कारण अशा प्रसंगी एकेक बाण सोडायला बराच वेळ खर्चणे परवडणारे नसते. क्षुद्रक हा अशाच तऱ्हेचा लहान बाण असावा. (ज.व.प. ९६/४)

शार्ङ्ग धनुष्य शिंगाचे असे. शिंग वाकविण्यास कठिण पण वाकविले की अतिवेगाने आपल्या पूर्वआकारावर येते व शिंगाच्या धनुष्यातून सुटलेला बाण प्रचंड शक्तीचा असतो.



नाराच बाण (भीष्मपर्व ४७/२३) हा 'सर्वलोहमय' असे. नार म्हणजे नाल वा नळी. नाराच बाणाला नालीक असेही म्हटले आहे. (भीष्मपर्व ९०/३२) या नावावरून तो पोकळ असल्याची पुष्टी होते. नाराच बाणाला क्ष्वेडन म्हणजे आवाज करणारा असेही म्हटले आहे. (अमरकोश). सगळेच बाण सू सू आवाज करतात. त्यात धातूचा पोकळ बाण जास्तच आवाज करणार हे स्पष्ट आहे. आवाज वाढविण्या-साठी त्याला भोकेही पाडत असतील.

तांबे किंवा लोखंड यापेक्षा काशाचे रणन जास्त होते. म्हणूनच काशाला 'बेलमेटल' वा घंटाधातू असे म्हणतात. तेव्हा काशाचे नाराच बाण जास्त आवाज करणार. त्यामुळे काशाचा शोध लागल्यावर नाराच बाण काशाचेच करीत असतील.

आवाज करणारा बाण हा हल्लीच्या 'शीकिंग बॉंब' सारखा असावा. हा किंचाळणारा बॉंब न किंचाळणाऱ्या बॉंबपेक्षा जास्त विध्वंसक नसतो. पण अनेक बॉंबांचे कर्णकटू किंचाळणे शत्रूला गलितधैर्य करण्यासाठी उपयोगी पडू शकते.

दगडाची शस्त्रे म्हणजे गदा व गोफणी. गदांचे डोके दगडाचे असे (अद्रिसारमयी शल्यपर्व ५१/७५) व दाण्डा लाकडाचा. उत्खननात गदांची दगडी डोकी सापडलेली आहेत. गोफणीला 'भिन्दिपाल' म्हटलेले आहे.(भीष्मपर्व ४३/१४) गोफणींचा नेम बाणासारखा अचूक असू शकत नाही. पण संकुलयुद्धामध्ये इतक्या अचूक नेमाची आवश्यकता नसते.

'आर्षभं चर्म' या शब्दांनी बैलाच्या कातडीच्या ढालींचा उल्लेख करण्यात आला आहे. (भीष्मपर्व ६६/३१) बैलाच्या कातडीची ढाल, लोखंडाच्या तर सोडाच, काशाच्या पूर्ण लांबीच्या तरवारीविरुद्ध देखील निरुपयोगी ठरेल. अशा तरवारींच्या एका वाराने देखील ते कापले जाईल व ते धरणाऱ्या हातालाही कापल्याशिवाय राहणार नाही.

अशा बैलाच्या चामड्याच्या ढालींचा उपयोग तांब्याच्या खंजीराविरुद्ध होऊ शकेल. कारण अशा ढालींच्या आत नारळाच्या काथ्याचे भरण असते व त्यांची जाडी निदान ६ इंचांची तरी असते. या सहा इंचांना भेदून हाताला इजा करण्यासाठी त्या तांब्याच्या खंजीराचा वार अगदी काटकोनात पडायला पाहिजे. तसातो क्वचित्‌च पडतो. शिवाय वार पडल्याबरोबर ढालवाल्याने आपली ढाल आडवी सरकविली तर तो तांब्याचा खंजीर वाकू देखील शकतो.

काही तरवारी गेंड्याच्या शिंगाच्या असत. हे 'खड्ग' म्हणजे गेंड्याचे शिंग या शब्दावरून सिद्ध आहे. अशा शिंगांच्या तरवारीविरुद्ध बैलाच्या कातड्याची ढाल हे चांगले संरक्षण ठरू शकते.

आजकाल ज्याप्रमाणे शत्रूच्या फौजेची हालचाल रोखण्यासाठी जमिनीत सुरुंग पेरतात त्याप्रमाणे भारतीय युद्धात शत्रूच्या मार्गावर जमिनीत 'हुल' पेरून ठेवीत. (द्रोणपर्व १६६/२०) हे 'हुल' जमिनीच्या एकदोन इंच आत असत व शत्रु त्या जमिनीवरून जाऊ लागला की त्याला भयंकर इजा करून त्याचे लढण्याचे सामर्थ्य काही काळ तरी नष्ट करीत.

'शैक्यायसी गदा' नावाची एक गदा वर्णिलेली आहे. (भीष्मपर्व ४९/२२) शिक्य म्हणजे शिंके म्हणजे एक प्रकारची गोफण. धातूची गदा दोरीने गरगर फिरवून फेकीत. त्याने ती फार दूर जात असे. अलीकडे ऑलिंपिक वगैरे खेळात 'हॅमर थ्रो' नावाचा एक खेळ असतो. त्यात साखळीला बांधलेला एक हातोडा दूर फेकण्याची शर्यत असते. त्यातलाच हा प्रकार आहे.

'दगडाऐवजी लोखंडाची गदा करण्यात फायदा काय ?' असा प्रश्न येथे उद्भवतो. त्याचे उत्तर असे दिसते की हत्तींच्या गंडःस्थळावर, योद्धांच्या छातीवर व रथांच्या वरुथ नावाच्या कठड्यावर असणाऱ्या धातूच्या चिलखतावर आदळलेली दगडी गदा, दगड ठिसूळ असल्यामुळे, फुटण्याचा संभव असे. धातूची गदा न फुटता घातक ठरू शकते.

'अवस्कन्दा' चा उपयोग शत्रूला ओढून खाली पाडण्यासाठी होत असे. (भीष्मपर्व ९१/५५) हे दोराला बांधलेले एखादे चक्र असावे. ते शत्रूच्या मानेत फेकले जात असावे. शत्रू जर विरुद्ध दिशेने जात असेल तर या चक्रात मान अटकल्याबरोबर खाली आदळेल.

पाश म्हणजे फास हा गळफास असे. (भीष्मपर्व ९१/५६) गळफासाचा उपयोग कुस्तीसारख्या अंगघर्षणाच्या द्वंद्वातच होऊ शकतो. शत्रू चार/पाच फूट दूर असला तर त्याच्या गळ्यात फास अटकविण्यापेक्षा त्यावर गदेने प्रहार करणे जास्त सोपे जाते. तोमर (भीष्म ५२/२२) हा एक खिळ्याने भेदक केलेला सोटा असे. कर्पण (भीष्म ५२/२२) हे मुख्यत: कापण्यासाठी वापरण्यात येत असे. हे कृप् म्हणजे कापणे या धातूवरून स्पष्ट आहे. शक्ती या फेकून मारीत असत. कर्णाजवळ अशी एक अमोघ वासवी शक्ती होती व तिच्या साहाय्यानेच कर्णाने घटोत्कचाचा वध केला. ही शक्ती



म्हणजे एक प्रकारचा भाला असावा असे सर्वमान्य मत आहे. परश्वध वा परशु ही एक कुऱ्हाड असे. अशा तऱ्हेच्या शस्त्राने युद्ध करण्यात परशुरामाचा हातखंडा होता.

**कांस्ययुगीन शस्त्र**

पुष्कळ ठिकाणी शत्रूने फेकलेल्या शस्त्रांचे तुकडे पडल्याचे वर्णन आहे. शत्रूच्या शस्त्राचे तुकडे पाडणाऱ्या विपाट नावाच्या बाणांचा उल्लेख अनेक ठिकाणी आहे. (भीष्म ५५/२७) विपाट या शब्दाचा अर्थच मुळी 'फोडणारा' असा आहे. अशी फुटणारी शस्त्रे काशाचीच असू शकतात.

यातील एक महत्त्वाचे वर्णन अभिमन्युवधपर्वात आहे. जयद्रथाने अभिमन्यूला मारण्यासाठी तरवारीने वार केला. तो अभिमन्यूने चुकविला. तेव्हा जयद्रथाची तरवार अभिमन्यूच्या चामडी भात्यात अटकली. ती बाहेर काढण्यासाठी त्याने जोरात ओढली. तेव्हा तिचे तुकडे पडले. जयद्रथाची तरवार ही 'महानसि' म्हणजे पूर्ण लांबीची तरवार होती. (ततो विक्षिपत: खड्गं सौभद्रस्य यशस्विन:। शरावरणपक्षान्ते प्रजहार जयद्रथ: ॥ रुक्मपक्षान्तरे सक्तस्तस्मिंश्चर्मणि भास्वरे । सिन्धुराजकरोद्धूत: सोभज्यत महानसि: ॥ (द्रोणपर्व १३/७४/७५) तिचे तुकडे पडले त्याअर्थी ती काशाची असली पाहिजे. लोखंडाच्या तरवारीचे असे तुकडे पडू शकत नाहीत व तांब्याची तरवार एवढी लांब असूच शकत नाही.

**लोहयुगीन शस्त्रे**

महाभारतात पट्ट्याचा 'पट्टिश' म्हणून उल्लेख आहे. (भीष्मपर्व १९/५६) पट्ट्याचे पाते अत्यंत पातळ व लवचिक असते. असे पाते फक्त लोखंडाचेच बनू शकते. तेव्हा हा उल्लेख लोहयुगातला आहे.

''कार्ष्णायस वर्म'' म्हणून लोखंडाच्या चिलखताचा उल्लेख सापडतो. (द्रो.प. ११०/६८)

शतघ्नी नावाचे शस्त्र एका फैरीत शंभर बळी घेऊ शकत असे. (भीष्मपर्व ९१/६१) हे शंभर शिपायांना मारू शकेल एवढा मोठा दगड फेकणारे यंत्र असावे. अशी 'कॅटापुल्ट' नावाची यंत्रे आर्किमिडीजने तयार केली होती. आर्किमिडीजचा काळ खि.पू. २८७-२१२ आहे.

भुशुण्डी (द्रोण १४७/३७) नावाच्या शस्त्राचा अनेक ठिकाणी उल्लेख आहे. नवसहसांकचरितातही भुशुण्डींचा उल्लेख आहे. जितेन्द्रचन्द्रभारतींनी त्याचा अर्थ बंदूक असा केला आहे. पण नवसाहसांकाच्या रचनाकाली म्हणजे अकराव्या शतकात बंदुकांचा शोध लागला नव्हता. तेव्हा या बंदुका नसाव्यात.

**भाषाशास्त्रीय पुरावा**

शंतनुचा भाऊ देवापि याने ऋग्वेदातील पर्जन्यसूक्त रचले असे महाभारतात व बृहद्देवता या ग्रंथात सांगितले आहे. तसेच शंतनूची पत्नी जी सत्यवती तिचा व्यास हा मुलगा होता व त्याने वेदांचे संपादन केले असेही महाभारतात सांगितले आहे. व्यास हा भारतीय युद्धाच्या समकालीन होता. अर्थात भारतीय युद्धाचा काल हा ऋग्वेदाच्या अंतिम टप्प्याचा काल आहे. याच काळात संस्कृत ही बोलभाषा होती. पुरातत्त्वाच्या दृष्टीने ख्रि.पू. ३००० चा हा काळ ताम्रपाषाणयुगाचा आहे. म्हणजे संस्कृतभाषा ही ताम्रपाषाणयुगात विकसित झाली असे अनुमान होते. या दृष्टीने संस्कृत शब्दांचे विश्लेषण केले तर ताम्रपाषाणयुगाच्या खुणा स्पष्टपणे दिसतात.

'शिलीमुख' हा शब्द घ्या. बाणाला शिलीमुख म्हणतात. कारण शिला म्हणजे दगड. शिला शब्दाला अल्पार्थे ई हा स्त्रीलिंगी प्रत्यय लावला की शिली हे रूप होते. अर्थात शिली म्हणजे लहान दगड. ज्याचे मुख - म्हणजे फाळ - लहान दगडाचे आहे तो शिलीमुख. अर्थात शिलीमुख म्हणजे दगडाचा फाळ असलेला बाण.

बाणाला विशिख असा देखील शब्द आहे. ज्याला शिखा नाही तो विशिख. (शल्य १५/७२) बाणाच्या मागच्या टोकाला त्याची गती सरळ राहावी म्हणून पिसे खोवीत असत. अशी पिसे ज्याला बांधली आहेत तो सशिख बाण. ज्याला अशी पिसे नाहीत तो विशिख बाण. म्हणजे हा बाण धातूचा असला पाहिजे व त्याच्या मागच्या टोकावर गती सरळ राहावी म्हणून पिसांच्याऐवजी धातूचे पुच्छपक्ष म्हणजे फिन्स लावीत असतील.

संस्कृतभाषेतले तरवारवाचक शब्द तपासले तर ते सर्व मुळात सुरीचे वाचक होते असे दिसून येते. अमरकोशात खालील तरवारवाचक शब्द दिलेले आहेत :-

(१) खड्ग (२)नि:स्त्रिंश (३) चंद्रहास (४) असि (५) रिष्टि (६) कोक्षेयक (७) मण्डलाग्र (८) करवाल (९) कृपाण

खड्ग या शब्दाचा मूळ अर्थ गेंड्याचे शिंग असा आहे. सुरुवातीला गेंड्याच्या शिंगांचा तरवार म्हणून वापर करीत. हे गेंड्याचे शिंग ४० सेंमी लांबीचे म्हणजे सुरीइतकेच असते. नि:स्त्रिंश म्हणजे तीस अंगुलांपेक्षा लांब. अंगुल म्हणजे यवाचे आठ दाणे. त्यांची उदरे एकमेकांना टेकतील अशा रीतीने ठेवली तर जेवढी लांबी होईल तेवढी लांबी. मी अशी ठेवून पाहिली तेव्हा ही लांबी अर्धा इंच भरली. साधारण पुरुषाच्या बोटाची जाडीदेखील अर्धा इंचच असते. तेव्हा तीस अंगुले म्हणजे १५ इंच होतात. १५ इंचापेक्षा मोठी लांबी म्हणजे फार झाली असे वाटण्याचा काळ हा पूर्ण



लांबीच्या तरवारी जेव्हा करता येत नव्हत्या तेव्हाचा म्हणजे ताम्रपाषाणयुगाचा काळ आहे. हे नि:स्त्रिंश खंजीरासारखे फेकून मारीत असत असे वर्णन आहे. (भीष्म ८२/३०, ३१, ६७) तेव्हा नि:स्त्रिंश या शब्दाचा तरवार हा अर्थ होण्याच्या आधीचे हे वर्णन आहे. कारण पूर्ण लांबीची तरवार फेकून मारली जात नाही.

चंद्रहास रावणाच्या तरवारीचे विशेषनाम आहे. विशेषनामावरून नामित वस्तूच्या गुणांचा बोध होत नसतो. असि या शब्दास 'अस्' म्हणजे फेकणे हा धातू आहे. तेव्हा ही असि सुरुवातीला फेकून मारायची सुरीच होती.

रिष्टी म्हणजे लाकूड सोलण्याची पटासी असे सायण म्हणतो. तेव्हा हीही एक सुरीच होती. कोक्षेयक हे पोटावरील दुपट्ट्यात लपविण्याचे एक शस्त्र होते. त्याअर्थी ते सुरीसारखेच लहान असले पाहिजे. मण्डलाग्र म्हणजे ज्याचे अग्र वा टोक गोल आहे असे शस्त्र. हे वर्णन विळीला लागू होते. मानेत हे शस्त्र अडकवून मान कापली जात असेल. करवाल म्हणजे हातातले बाल म्हणजे लहान शस्त्र. कृपाण हा शब्द कृपाणी म्हणजे कात्री या शब्दात आला आहे. जिच्यात कृपाण म्हणजे पाती आहेत ती कृपाणी. अर्थात मूळ शब्द कृपाणिन् व त्याचे प्रथमा एकवचन कृपाणी. पुढे हा शब्द ईकारान्त स्त्रीलिंग झाला. तेव्हा कृपाण म्हणजे कात्रीचे पाते, पूर्ण लांबीची तरवार नव्हे.

वरील तरवारवाचक शब्दांपैकी आपट्यांच्या कोशात असि, रिष्टि व कृपाण यांचे अर्थ पाणिनीय संस्कृतात देखील सुरी असे होऊ शकतात असे सांगितले आहे. करवाल याचा एक अर्थ बोटाचे नख असा दिलेला आहे. म्हणजे सिंहाची जशी नखें तसा योद्ध्याच्या हातातला करवाल. यात देखील करवाल हा नखासारखा आखूड असतो असे सूचित असते. कोक्षेयक व मण्डलाग्र यांचा अर्थ 'सिमिटर' म्हणजे आखूड व वाकदार तरवार असा दिलेला आहे. म्हणजे कौक्षेयक व मण्डलाग्र हेही सुरीचेच प्रकार होते.

**पुरातत्त्वीय पुरावा**

वरील वाङ्मयीन व भाषाशास्त्रीय विवेचनाची पुरेपूर पुष्टी पुरातत्त्वीय उत्खननांनी झालेली आहे. मोहेंजोदरोमध्ये ४० सें.मी. लांबीची तांब्याची तरवार सापडली आहे. मोहेंजोदरोचा काल ख्रि.पू. ३००० च्या सुमाराचा आहे.

राजस्थानातील गणेश्वरपरिसर व हरयाणा येथे तांब्याच्या शस्त्रांचे साठेच्या साठे सापडलेले आहेत.[३] ही शस्त्रे मुख्यत: तीन प्रकारची आहेत. (१) मिशीची तरवार. या तरवारीला मध्यभागी एक तांब्याचा दंड आहे व मुठीच्या जागी मिशासारख्या दोन शाखा आहेत. या शाखा एका लाकडाच्या ठोकळ्यात फसवून ती तरवार एका

खड्ड्यात उभी ठेवीत व खड्डा बुजवीत. वरून जाणारे सैनिक व युद्धपशु या खड्ड्यात फसून जाया होऊ शकतात. महाभारतात उल्लेखिलेले 'हुल' (द्रोण १६६/२०) हेच असावे. २) मानवाकृतिः -वर गोल डोके व खाली दोन पाय व साऱ्या कडेला धार असे हे शस्त्र आहे. हे चक्रासारखे फेकता येते. श्रीकृष्णाचे सुदर्शन असेच असावे. (३) भाल्याचा वा बाणाचा फाळ. याला मध्ये एक भोक आहे व बाजूला कानासारखी प्रसरणे आहेत. या प्रसरणातून दोऱ्या घालून हे फाळ बांबूला बांधून त्यांचा भाला वा वेताला बांधून त्यांचे बाण करीत असतील. भोक खिळा ठोकण्यासाठी असेल. महाभारतात 'नतपर्व' नावाचे बाण वर्णिलेले आहेत. पर्व म्हणजे गाठ. वाकड्या गाठीचे बाण कसे असतील हा माझ्यापुढे प्रश्न होता. पण या फाळांच्या कर्णाकृती प्रसरणांनी तो सुटला. कारण जिथे गाठी बांधलेल्या आहेत ते या फाळांचे कान, नत म्हणजे खाली वाकलेले आहेत.

ही शस्त्रे खास कुरुक्षेत्रात सापडलेली नाहीत व म्हणून त्यांच्यावरून भारतीय युद्धाच्या कालाचे व ऐतिहासिकतेचे अनुमान होत नाही असे डॉ. लाल म्हणतात. भारतीय युद्ध हे सध्याच्या कुरुक्षेत्राच्या नगरपालिकाहद्दीत लढले गेले ही समजूत या आक्षेपाच्या मुळाशी आहे. वस्तुतः भारतीय युद्धाची रणभूमी फार विस्तृत होती. जेथे द्रोण व युधिष्ठिर लढत होते त्या स्थळापासून जेथे अर्जुन संसप्तकांशी लढत होता ते तीन योजने म्हणजे २४ किंवा २७ मैल होते असे सात्यकीच्या वचनावरून दिसते. ही सैन्याच्या तोंडाची कमीत कमी लांबी झाली.

सर्व सैन्य एकाच वेळी आघाडीवर नसते. तेव्हा साधारणपणे ३० मैलांच्या या आघाडीच्या मागे सैन्याचा तळ कित्येक मैल पसरलेला असला पाहिजे. उद्योगपर्वात तर भारतीय युद्धातील सैन्ये पंजाब, हरयाणा - समस्त रोहितारण्य - राजस्थान व अहिच्छत्र म्हणजे रामपुर येथपर्यंत पसरलेल्या होत्या असे लिहिले आहे. तेव्हा भारतीय युद्धातील सैन्याच्या छावण्या २०० मैल लांब व २०० मैल रुंद एवढ्या प्रदेशात पसरलेल्या होत्या असे दिसते. या प्रदेशात हरयाणा व राजस्थान यांचा समावेश होतो व येथेच मोठ्या प्रमाणावर तांब्याची शस्त्रे सापडलेली आहेत. त्याचा काल पुरावेत्त्यांनी खि.पू. २८०० म्हणजे कलियुगारंभाच्या जवळचाच ठरविलेला आहे. तेव्हा ही शस्त्रे भारतीय युद्धातली आहेत व भारतीय युद्धाचा पारंपरिक काल समर्थनीय आहे असे अनुमान काढायला हरकत नाही.



## संदर्भ

(महाभारतातील उद्धरणे दक्षिणी आवृत्तीतील आहेत)

१. भारतीययुद्धाची दैनंदिनी व वर्ष, प्र.व्यं. होले
२. The Indian Bronze - Age Cultures and Their Metal - Technology by D - P - Agaraval.
३. The Copper and Bronze Age of india by D. P. Agarval.

७

# महाभारताच्या तीन आवृत्त्या (१)

नी. रं. वऱ्हाडपाण्डे,
नागपूर

रामायण, महाभारत व पुराणे यांच्या कालनिर्णयात हजारो वर्षांचा फरक पडतो कारण या ग्रंथात खि. पू. हजारो वर्षापासून तो खिस्तारम्भापर्यंतचे उल्लेख सापडतात. याचे स्पष्ट कारण हे ग्रंथ कोणा एका ग्रंथकाराचे न समजता साऱ्या राष्ट्राचे समजले गेले व त्यात केवळ प्रक्षेपच नव्हेत तर मूळ ग्रंथापेक्षाही मोठे भाग घालून व अनुक्रम बदलून त्यांचे पुन: सम्पादन करण्यात आले आहे. महाभारतातबद्दल ही गोष्ट सर्वमान्य आहे. सौती शोनकाला ''मला वैशंपायनाने काय सांगितले'' हे सांगतो व वैशंपायन जनमेजयाला मला व्यासाने काय सांगितले हे सांगतो अशी महाभारताची कथनशैली आहे. वैशंपायन व्यासनंतर १००० वर्षांनी झाला असे जनमेजयाला त्याचे मंत्री ''इदं वर्षसहस्राय राज्यं कलियुगे गतम् (पृ.२५१) ''हे राज्य स्थापन झाल्यापासून कलियुगाची हजार वर्षे लोटून गेलेली आहेत.'' असे सांगतात या वरून स्पष्ट आहे. कलि म्हणजे युद्ध व कलियुग हे युद्धाचे स्मारक म्हणून सुरू केले गेले. युद्धसमाप्तीबरोबर युधिष्ठिराचा राज्याभिषेक झाला व त्याच्या वंशाचे राज्य सुरू झाले. ते हजार वर्षांनी संपले असले पाहिजे. वनपर्वात देखी 'सहस्रमेकं वर्षाणां तथा कलियुगं स्मृतम'' (वनपर्व १८८८, २१-२८ ) म्हणजे कलियुग हजार वर्षांचे असे सांगितले आहे. ज्या वंशाने कलियुग सुरू केले त्याचे राज्यच राहिले नाही या अर्थी कलियुग संपले. पण तेव्हा दुसऱ्या सत्ताधाऱ्यांनी आपली नवीन गणना सुरू केली असेल तरी ती आज उपलब्ध नाही. याकाळी राजवंशच बदलला नसून जुन्या वाङ्मयाचा फेरविचार सुरू झाला होता असे दिसते. नाही तर महाभारतासारख्या ग्रंथांची फेरफार करून वाढविलेली आवृत्ती काढण्याची जरूर नव्हती. रामायणाची देखील याच काळात बालकाण्ड व उत्तरकाण्ड यांची भर घालून दुसरी आवृत्ती निघाली व वेदावर टीका करणाऱ्या उपनिषदांची रचना झाली याला पुरावा आहे. (रामायणातील श्रावणी पावसाळा, मैत्र्युपनिषदातील मधार्धापासून धनिष्ठार्धापर्यंत दक्षिणायन व आश्लेषापासून धनिष्ठार्धापर्यंत उलट क्रमाने उत्तरायण, छान्दोग्योपनिषदातील लोखंडाचा उल्लेख).

पुढे सौती ''मी आमच्या कुलात वंशपरंपरेने आलेली भारतकथा पित्याकडून ऐकली असे सांगतो, आपण भारतीय युद्धकालीन आहोत असा आव आणीत नाही.(वैशंपायन विप्राद्यै स्तेश्चापि कथितं पुरा । यदधीत च पित्रा मे सम्यक्चैव ततो मया । आदिपर्व पृ.१०२)

बुद्धधर्माच्या अनावर प्रसाराच्या उल्लेखावरून सौती अशोकोत्तर असावा असे अनुमान होते.

तीन कर्त्याप्रमाणेच या ग्रंथाची जय, भारत व महाभारत अशी तीन नावे देखील सांगितलेली आहेत. व्यासांच्या ग्रंथाचे नाव जय (ततो जयमुदीरयेत् । आदिम श्लोक आदिपर्व ६२/२०). अर्थात् यात फक्त पाण्डवांचा युद्धात जय कसा झाला हे सांगितले आहे. म्हणजे त्यात फक्त युद्धपर्व होते. वैशम्पायनाच्या ग्रंथाला भारत म्हणतात. कारण त्यात फक्त युद्धाची कथा नसून त्या युद्धाची पूर्वपीठिका व कौरवपाण्डवांच्या भरत वंशाचा वृत्तात सांगण्यात आला होता. (उपाख्यानैर्विना तावद्भारतं प्रोच्यतै बुधै: (आदिपर्व पृष्ठ १४) सौतीच्या ग्रंथाचे नाव महाभारत कारण त्याने उपाख्याने व उपप्रकरणे जोडून ग्रंथ वाढविला. (पृष्ठ १४) आश्वलायन गृह्यसूत्रात भारत/महाभारतधर्माचार्या: या उल्लेखाने दोन वेगळ्या ग्रंथांचा व त्याचे अध्ययन करणाऱ्या दोन प्रकारच्या उल्लेख आहे. आश्वलायनाचा काळ ख्रिपू. तिसरे शतक म्हणजे अशोकाच्या आसपासच आहे.

तीन नावाप्रमाणेच ८८००, २४००० व १००००० अशा या तीन ग्रंथांच्या अनुक्रमे तीन श्लोकसंख्याही सांगण्यात आल्या आहे. (आदिपर्व पृ. ५, १३, १४) व्यासांच्या जयात फक्त ८८०० श्लोक होते व त्यांनी फक्त युद्धातील पाण्डवांच्या जयाचा भाग लिहिला. या दृष्टीने सध्याच्या युद्धपर्वातील उपाख्याने व अद्भुत भाग गाळला तर मुख्य कथाभाग ८००० श्लोकात आणणे कठिण नाही. हे ८००० मिळून वैशंपायनाने नवीन घातलेले २२००० कोणते हे सांगतांना उपाख्याने वगळण्याचे तत्त्व लागू पडले तरी अद्भुत व असम्भव भाग वगळण्याचे तत्त्व लागू पडेल असे नाही. कारण वैशंपायनाचे भारत जयाच्या १००० वर्षे नंतरचे आहे व या हजार वर्षात मूळ इतिहासात पुष्कळ आख्यायिकांची भर पडली असली पाहिजे. वैशंपायनाची २४००० श्लोकांची आवृत्ती वगळता उरलेले ७६००० श्लोक अर्थात



सौतीकालातले., या कालात महाभारताला सर्वसंङ्ग्राहक स्वरूप देण्याचे उद्दिष्ट असल्यामुळे त्यात अमुक घालू नये असा निर्बंधच उरला नाही.

महाभारताचे तीन प्रारंभ देखील सांगितले आहेत. पहिला मनु म्हणजे वैवस्वत या शब्दापासून, दुसरा आस्तीक आख्यानापासून तिसरा उपपरिचर आख्यानापासून. वैवस्वतापासूनचा आरंभ वर्तमान महाभारताच्या सुरुवातीलाच असल्यामुळे तो सौतीच्या महाभारताचा समजण्यास हरकत नाही. आस्तीकाख्यानाचा जनमेजयाच्या सर्पसत्राशी संबंध आहे व सर्पसत्राच्या वेळीच वैशंपायनाचा ग्रंथ सांगितला गेला त्यामुळे हा वैशंपायनाच्या ग्रंथाचा प्रारंभ मानला गेला पण उपरिचर आख्यान हा व्यासांच्या ग्रंथांचा प्रारंभ मानणे शक्य नाही. कारण व्यासांच्या जय या ग्रंथात फक्त भारतीय युद्धाचे वर्णन होते. त्याची सुरुवात व्यास आपल्या आईच्या कुळकथेपासून करतील असा सम्भव नाही. हा विषय भरतवंशाचा इतिहास सांगणाऱ्या भारताशी अधिक संबंध आहे.

सध्या तरी व्यासाच्या ग्रंथांचा प्रारंभ कुठून झाला हे सांगता येत नाही. सर्व महाभारत एकट्या व्यासाचे व उघडपणे नंतरच्या कालाचे उल्लेख असणारे श्लोक हेच फक्त प्रक्षेप मानावे असे महाभारताचा कोणताही महत्त्वाचा संशोधक मानत नाही. पण संशोधकाच्या बाहेर या मताचे आकर्षण असणारे पुष्कळ लोक आहेत. त्यांच्यासाठी हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की चारदोन श्लोकच फक्त प्रक्षिप्त मानून भागण्यासारखे नाही. व्यासांचा काल खि. पू. ३००० च्या सुमाराचा मानला तर त्याकाळी एका मतानुसार लिपीचाच शोध लागला नव्हता. त्याकाळी ग्रंथ लिहिणे म्हणजे तो स्वत: रचून पाठ करणे व त्याचा प्रचार करणे म्हणजे शिष्य जमवून तो त्यांना पाठ करायला लावणे. अशा परिस्थितीत एक लक्ष श्लोकांचा ग्रंथ रचण्याचा कोणी विचार देखील करील हे शक्य नाही.

तेव्हा लिपि होती असे मानले तरी कागदाचा शोध लागला नव्हता हे निश्चित. भूर्जपत्रावर कोरून लिहीत. याला बराच वेळ व श्रम लागत असे. शिवाय भूर्जपत्र बरेच जाड असते. एक लाख श्लोक लिहायला हजारो भूर्जपत्रे लागतील. एवढ्या मोठ्या ग्रंथाच्या प्रति काढून त्याचा प्रसार कसा होणार ? ग्रंथांचा प्रसार देशभर होण्यास तो पाठ करणारे शेकडो सूत देशभर असले पाहिजेत व इतक्यांच्या जवळ

तरी ग्रंथांच्या लिखित प्रति असणे आवश्यक आहे. नाहीतर ते ग्रंथ पाठ कसा करणार ? कागद माहीत झाल्यावरच ग्रंथांच्या इतक्या प्रति काढणे शक्य झाले. कागदाला भूर्जपत्रापेक्षा जागा थोडी लागते व कोरून लिहिण्यापेक्षा शाईने लिहिणे बरे सोपे जाते. कागदाचा वापर भारतात ख्रि. पू. ३०० च्या पूर्वी होत असल्याचा पुरावा नाही. महाभारत लक्ष श्लोकांचे झाले तो कागदाचा शोध लागल्यावरच. यावरून सौतीच्या अशोकोत्तरकालीनत्वाचे जे अनुमान इतरत्र दिले आहे त्याची पुष्टि होते.

३००० ख्रिस्तपूर्व हा ज्यांचा काल सांगता येईल असा कोणताही एक ग्रंथ तर सोडाच ऋग्वेदासारखा संङग्रहही महाभारताएवढा मोठा नाही.

शिवाय महाभारतात टाकलेली भर काही तुटक श्लोकांसारखी नाही. उदाहरणार्थ सारस्वतपर्वात गर्गतीर्थाचा उल्लेख आहे. गर्गाचा काळ कोणत्याही अन्दाजानुसार ख्रि. पू. ४०० च्या पूर्वीचा नाही. फक्त हाच उल्लेख प्रक्षिप्त आहे, बाकीचे पर्व व्यासकालीन आहे असे म्हणण्याची सोय नाही. हे पर्व सरस्वतीचा लोप होण्याच्या पूर्वीचे असूच शकत नाही. बलरामाला कुठेही वेदात वर्णिलेली जिवन्त सरस्वती सापडली नाही. त्याने सरस्वती जिथे लुप्त झाली ते विनशन तीर्थ देखील पाहिले. .. हे पर्व १८ त्यावर छापलेल्या दक्षिणी प्रतीची १४० पृष्ठे व्यापते. तेव्हा महाभारतात शेदोनशे

"बुक्स" चे व न्यू टेस्टामेण्ट हे २७ बुक्सचे बनलेले आहे. ही सर्व पुस्तके रचण्यात व मान्य होण्यास निदान ७०० वर्षे लोटली म्हणजे बायबल हा एका कर्त्याचा एकाच वेळी लिहिलेला ग्रंथ नाही.

महाभारतात ३००० ख्रिस्तपूर्वापासून तो बुद्धोत्तर कालापर्यंतच्या रचना आहेत या मतावर पाश्चात्य पण्डितांचा असा आक्षेप आहे की असे असते तर या ग्रंथात तीन हजार वर्षात बदललेल्या भाषेची अनेक रूपे दिसली असती. पण सर्व एक लक्ष श्लोकांत. एकसारखीच भाषा आहे. त्या अर्थी सर्वच महाभारत बुद्धोत्तर मानले पाहिजे. जुन्या काळचे उल्लेख नव्या काळात देखील होऊ शकतात.

या आक्षेपाला उत्तरे असे की प्राचीन काळच्या खगोलीय स्थितीचे उल्लेख अर्वाचीन कालीन करायला ज्योतिर्गणित यायला पाहिजे व असे गणित करून हा ग्रंथ प्राचीन आहे असे वाचकाला वाटायला लावून त्याची फसवणूक करण्याचा उद्देश पाहिजे. असे गणित ख्रिस्तपूर्व कालात प्रचलित होते व असले तरी वैशंपायन व सौती या कवींना ते येत होते व त्यांची हा ग्रंथ प्राचीन आहे असे दाखविण्यासठी लबाड्या करायची तयारी होती असे मानण्यास आधार नाही. दुसरे असे की एवढे सूक्ष्म गणित ज्या लोकांना माहित आहे व ते वाचकांची फसवणूक करण्यासाठी

आवृत्तीने हे स्पष्ट केले आहे. तुकारामाची गाथा रामेश्वर शास्त्र्यांनी शुद्ध केली व ज्ञानेश्वरी एकनाथांनी शुद्ध केली याचा अर्थही ती वाचकाला समजण्यासारखी केली. तुकारामाचे अभंग त्यांच्या बोलीत होते. अखिल महाराष्ट्रात समजल्या जाणाऱ्या मराठीत नव्हते. ज्ञानेश्वरीची भाषा एकनाथकाली दुर्बोध झाली होती. जुन्या काळी ग्रंथांची नक्कल करणे म्हणजे त्याची शक्य तितकी भाचित्र काढल्यासारखी हुबेहूबप्रत प्रत काढणे हा उद्देश नसे. शिवाय वैशंपायन व सौती हे संपादक होते जुळारी नव्हते. त्यांनी मूळ ग्रंथांची नुसती नक्कलच केली नाही त्यावर संपादकीय संस्कार देखील केले.

भांडारकर इन्स्टिट्यूटच्या संपादकांनी देखील संस्कारित भाषेत लिहिलेला श्लोक नवा व त्यामानाने असंस्कारित असलेला जुना हे तत्त्व मानले आहे.

आता वर उल्लेखिलेल्या तीन आवृत्यांचे तीन काळ दाखविणारे उल्लेख कोणते हे पाहू:–

बुद्धोत्तर कालाचे उल्लेख

(१) शकुंतला म्हणते

अतिनक्षत्रवंशानि क्रुद्धो नक्षत्रसम्पदा

''प्रतिश्रवणपूर्वाणि नक्षत्राणि ससर्ज यः ।।

विश्वमित्र – म्हणजे माझा पिता– नक्षत्रसंपदेमुळे (वर्तमान सृष्टीवर) क्रुद्ध झाला व त्याने साऱ्या नक्षत्राहून वरचढ अशी प्रतिश्रवणपूर्व नक्षत्रे निर्माण केली.

येथे प्रति शब्द महत्त्वाचा आहे. विश्वामित्राने प्रतिसृष्टि निर्माण केली या संदर्भात हा शब्द वापरलेला आहे. प्रति कालिदास याचा अर्थ कालिदासानंतर लगेच ज्याचे नाव घ्यावे असा आपट्यांच्या कोशात immediately following असा याचा अर्थ दिलेला आहे, या अनुसार श्रवणपूर्वाच्या म्हणजे श्रवणाच्या सुरुवातीच्या भागाच्या लगेच नंतर नक्षत्रे येतात असा अर्थ निष्पन्न होतो. असा अर्थ केला नाही तर प्रति हा शब्द निरर्थक ठरतो. दुसरे असे की उत्तरायणाचा आरंभ सांगताना नक्षत्राच्या सुरुवातीला, मध्ये, की शेवटच्या भागात तो आरंभ होतो हे सांगण्याची पद्धती आहे, जसे श्रविष्ठादौ (वेदाङ्गज्योतिष) श्रविष्ठार्धम मघार्धम (मैत्रायणी) इत्यादि, विशेषतः हा नवीन शोध आहे असे सांगताना नक्षत्राच्या कोणत्या भागात उत्तरायण होते हे



सांगणे जास्तच आवश्यक आहे.

वरील विचारानुसार लो. टिळक (गीतारहस्य) व शं.बा. दीक्षित (भा. ज्यौ. इ.) यांनी या वाक्याचा अर्थ श्रवणारंभी उदगयन असा धरून खिपू ४५० हा याचा काळ मानला आहे. बुद्धाचे निर्याण खि. पू. ४८६ चे समजतात. त्यामुळे महाभारतातील बुद्धोत्तर उल्लेखातला हा सर्वात प्राचीन कालाचा उल्लेख आहे.

(२) बुद्ध व बौद्ध याचे स्पष्ट उल्लेख महाभारतात आहेत. ''एडूचिह्ना पृथिवि न देवगृहभूषिता ।'' (वन १०९/६८) या वाक्यात सगळीकडे बुद्धाची देवळे होतील व वैदिक देवतांना कोणी विचारणार नाही असे स्पष्ट म्हटले आहे. एडूक म्हणजे जेथे बुद्धाच्या काळ अशोकोत्तर म्हणजे खि. पू. तिसऱ्या शतकाचा उत्तरार्ध हा होय.

(३) याही पेक्षा नंतरचा काळ म्हणजे केवळ बुद्धाचा उपदेश न सांगता त्याच्या आधारे स्वतंत्र दर्शने रचण्याचा काळ. हा काळ ख्रिस्तोत्तर काळातही पसरलेला आहे. ब्रह्मसूत्रांमध्ये बोद्धदर्शनांचे खण्ड न केलेले आहे. या ब्रह्मसुत्रांचा उल्लेख गीतेत ''ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमदभिर्विनिश्चितैः'' म्हणजे ''मी सांगतो ते ब्रह्मसूत्रामध्ये साधार निश्चित केलेले आहे' या शब्दात केलेला आहे. गीतेत ब्रह्मसूत्रांचा उल्लेख आहे. तसेच ब्रह्मसूत्रात गीतेचे संदर्भ आहेत कर्त्याची असे लो. टिळकांनी दाखवून दिलेले आहे. (गीतारहस्य) गीता व ब्रह्मसूत्रे ही दोन्ही एकाच कर्त्यांची आहेत असे लो. टिळकांनी जे अनुमान काढले आहे, त्याची जरूर नाही. दोन्ही ग्रंथांत प्रक्षेप होत होते एवढाच त्याचा अर्थ आहे. त्यामुळे गीतेत ब्रह्मसूत्रानंतरचा भाग आहे असे समजण्यास हरकत नाही.

बौद्ध दर्शनातील शून्यवादाचा उल्लेख खालील श्लोकांत आहे'–

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् । अपरस्परसम्भूतं किमन्यत्कामहैतुकाम ।।

हे लोक जग असत्य, निराधार, निरीश्वर व परस्पराशी संबंध नसलेल्या घटनांनी भरलेले व कामहैतुक म्हणजे स्वच्छन्दी वा नियमशून्य आहे असे मानतात.

रामानुजांच्या मते हे अद्वैतवेदातांचे वर्णन आहे. पण अद्वैतवेदान्त जगाला निराधार मानीत नसून ब्रह्म हा त्याचा आधार मानतो. तसेच जगाच्या राहटीला निश्चित नियम नाहीत वा ते स्वच्छन्दी आहे असे दाखविणारे उद्गार निदान शंकराचार्यांच्या लिखाणात आढळत नाहीत. चिं. वि. वैद्य चार्वाकवादाशी या श्लोकाचा

संबंध जोडतात पण चार्वाक जगाला असत्य अप्रतिष्ठ वगैरे मानत नाहीत. हे शब्द वैद्यांनी चार्वाकवादाला ओढाताण करून लावलेले आहेत.

उपाख्याने व उपप्रकरणे जोडूनच भारताचे महाभारत झाले हे उपाख्यानासहित भारतात महाभारत म्हणतात (खण्ड १ आदिपर्व पृष्ठ १४) या वचनावरून स्पष्ट आहे. अर्थात् उपप्रकरणे सौतीने घातलेली आहेत. यापैकी सारस्वतपर्वाचा उल्लेख वर केलाच आहे.

(४) डॉ. लाल यांनी हस्तिनापुराच्या परिसरात उत्खनन करून तेथे खि. पू. ९०० च्या पूर्वीचे अवशेष सापडत नाहीत यावरून त्यापूर्वी हस्तिनापूर नव्हते व भारतीय युद्ध खि. पू. ९०० च्या पूर्वी झाले असण्याचा संभव नाही असे अनुमान काढले आहे. (Mahabharata the End of an Era. Indian Institute of Advanced studies Simla April 2000) ज्या ग्रंथांत उल्लेखिलेल्या घटनांचा काल ठरवायचा तो ग्रंथ न वाचता केवळ उत्खनन करून अनुमाने काढल्याने कशी हास्यास्पदता निर्माण होते याचे हे उदाहरण आहे. भूमीच्या उद्रात जसे स्तर असतात व काल ठरविताना या स्तरांचा विचार करावा लागतो तसेच स्तर महाभारतातही आहेत हे विसरून व सर्व महाभारत एकाच काळी लिहिले गेले असे गृहीत धरून हे अनुमान काढलेले आहे. डॉ. लाल यांचे उत्खनन पुरातत्वाया दृष्टीने निर्दोष आहे असे मानले तरी त्यावरून हस्तिनापूराचा उल्लेख सौतीच्या काळातला आहे. एवढेच सिद्ध होते. भारतीय युद्धाबद्दल त्यांच्या आधारे काही अनुमान करता येत नाही. अशा तऱ्हेने अनुमाने काढायची तर भारतीय युद्ध हस्तिनापुरनिर्माणाच्याच काय अलेक्झाण्डरच्या नंतर झाले असे का म्हणू नये ? महाभारताचा काही भाग अलेक्झाण्डरच्या स्वारीनंतरचा आहे असे खालील आधारे म्हणता येईल.

(५) यवन सर्वज्ञ व शूर आहेत (खण्ड ११ कर्णपर्व पृ.२३२) हा उल्लेख अलेक्झाण्डरच्या सैन्याच्या शौर्याचा व त्यानिमित्ताने झालेल्या ग्रीकांच्या वैज्ञानिक प्रगतीचा अनुभव आल्यानंतरचाच असू शकतो.

विदुर युधिष्ठिराशी यवनभाषेत बोलतो व भुयार या अर्थाचा ग्रीक शब्द सुरङ्गा हा महाभारतात वापरलेला आहे. (आदि १४८/१२) त्यावरून ग्रीकांचा परिचय बराच दृढ झाल्यानंतर महाभारताचा काही भाग लिहिला गेला हे स्पष्ट आहे. शंकांचे



स्पष्ट उल्लेख महाभारतात आहेत (खण्ड ९ द्रोणपर्व पृष्ठ ११२) हूणांचे मात्र उल्लेख सापडत नाहीत कारण हूण चौथ्या शतकापर्यंत भारतात आले नव्हते. रोमन नाणे दीनार यांचा उल्लेख खि. पू. १०० च्या सुमाराचा आहे.

ग्रीक प्रवासी क्रायसोस्टोम ख्रिस्तोत्तर ५०मध्ये मलबार किनाऱ्यावर आला होता. तो एक लक्ष श्लोकांच्या भारतीय ''ईलियडचा'' उल्लेख करतो. (चिं. वि. वैद्य महाभारताचा उपसंहार) तेव्हा ख्रिस्तोत्तर ५० च्या नंतर महाभारतात प्रकरणेच्या प्रकरणे जोडण्यात आली नाहीत असे समजण्यास हरकत नाही. तुरळक श्लोकांचे प्रक्षेप हर्षकाळापर्यंत देखील होत होते असे भाण्डारकर आवृत्तीशी संबंधित असलेले विद्वान मेहेंदळे म्हणतात...

***

# महाभारताच्या तीन आवृत्त्या (२)

नी. र. वऱ्हाडपाण्डे,
नागपूर

## खि. पू. दुसऱ्या सहस्रकामधील उल्लेख

जनमेजयाला त्याचे मन्त्री हे राज्य कलियुगात एक हजार वर्षे टिकले आहे असे सांगतात (खण्ड १आदिपर्व पृष्ठ २५१) कलियुगाची सन्ध्या व सन्ध्यांश यात जोडले की खि.पू.दुसऱ्या सहस्रकात प्रवेश होतो. याची पृष्टि पुढील प्रमाणांनी होते.

(१) श्रीकृष्ण आपल्या शिष्टाईसाठी ''कोमुदे मासि रेवत्यां शरदन्ते हिमागमे'' कार्तिक महिन्यात रेवती नक्षत्रावर शरदृतूच्या अन्ती व थण्डी सुरु झाली असताना निघाला (उद्योग ८३/१६/१३)

(२) धृतराष्ट्र कार्तिक पुर्णिमेला शरत्सम्पातानन्तर वानप्रस्थाला निघाला (आश्रमवासी पर्व अध्याय १५) व

(३) कार्तिक अमावास्येनन्तर ६८ दिवसांनी माघ शुक्ल अष्टमीला उत्तरायण असताना भीष्माचे निर्याण झाले (अनुशासनपर्व ३ पृष्ठ १३७०)

कार्तिक हा शरदृतूचा शेवटचा महिना असल्याचे उल्लेख स्पष्टपणेच ख्रि.पू.दुसऱ्या सहस्रकातले आहेत. उत्तरायणाचा उल्लेख अभ्यंकरांच्या मते ख्रि.पू. १५००+३०० चा आहे.

(४) ''मासानां मार्गशीर्षोऽहम'' असे श्रीकृष्ण गीतेत म्हणतो. महिन्यामध्ये मार्गशीर्ष कोणत्या दृष्टीने एवढा श्रेष्ठ आहे की श्रीकृष्ण स्वतःला मार्गशीर्ष म्हणवून घेतो ?

अमरकोशात मार्गशीर्षाला आग्रहायणिक म्हणजे हायनाच्या अथवा वर्षाच्या अग्रभागी असलेला असे म्हटले आहे. याच बरोबर २५० व्या श्लोकात हेमन्तापासून सुरवात करुन २५३ व्या श्लोकात शरदाने शेवट केला आहे व २५४ मध्ये हे सहा ऋतु होत असे सांगितले आहे. म्हणजे ऋतुंची अर्थात् वर्षाची सुरवात हेमन्तापासून केली आहे. पावसाळा निश्चितपणे सम्पल्यावर योद्धयांचा व व्यापाऱ्यांचा संचार मुक्तपणे सुरु होण्याच्या महिन्यात वर्षारम्भ मानीत. यावरुन श्रीकृष्ण ''मासांनां मार्गशीर्षोऽहम्'', का म्हणतो हे स्पष्ट आहे. कार्तिकात जेव्हा शरदृतू सम्पत असे तेव्हा अर्थात्च मार्गशीर्षात हेमन्त ऋतु सुरु होत असे तेव्हा हा कालही ख्रि.पू. दुसऱ्या सहस्रकाचाच आहे.

मार्गशीर्ष हा वर्षाचा पहिला महिना असल्यामुळे श्रीकृष्णाने स्वतःला मार्गशीर्ष म्हणवून घेतले आहे हे '' ऋतूनां कुसमाकर'' म्हणजे ''ऋतूमध्ये वसन्त श्रेष्ठ आहे. या

विधानावरुन स्पष्ट होते. हेमन्तापासून वर्ष सुरु होत असले व मार्गशीर्ष हेमन्ताचा पहिला महिना असला तरी उत्तर भारतात हेमन्तात देखील उकाडा त्रास देत असतोच व हिवाळ्यात उकाडा नाहीसा झाला तरी यापेक्षा उकाडाच बरा असे वाटायला लावणारी थण्डी सुरु होते. तेव्हा सर्व दृष्टीने आनदायक असा फळाफुलांनी बहरलेला व सुखद हवामानाचा वसन्त हाच या भागात ऋतुराज म्हणविला जाऊ शकतो.

भीष्मनिर्याण वसन्त ऋतूच्या प्रारम्भी माघ शुक्ल अष्टमीला झाले असे पुढे दाखविले आहे. अर्थात् भारतीय युद्धकाली मार्गशीर्ष शुक्ल अष्टमीला हिवाळा सुरु झाला. म्हणजे पूर्णिमान्त मार्गशीर्षचे फक्त सात दिवस हिवाळ्यात येतात. त्यामुळे तो हिवाळ्याचाही पहिला महिना म्हणता येत नाही व कोणत्याच दृष्टीने वर्षाचा पहिला महिना ठरत नाही. वर निर्दिष्ट केलेल्या कोमुदे मासि रेवत्यां शरदन्ते हिमागमे म्हणजे कार्तिक हा शरदाचा शेवटचा महिना होता या उल्लेखावरुन मार्गशीर्ष हा हेमन्ताचा व हेमन्तारम्भी वर्षाचा पहिला महिना ठरतो व मासानां मार्गशीर्षोहम या वचनात मार्गशीर्षाला दिलेले पहिले स्थान उचित ठरते. अर्थात् हे वचन ख्रिपू. दुसऱ्या सहस्रकातले आहे.

महाभारतात सांगितलेली अधिक माहिना घेण्याची व अमान्त महिन्यांची पद्धत वेदाङ्ग ज्यौतिषानुसार आहे. ५८ रात्री भीष्म शरपंजरी होता या वाक्यात सांगितलेले उत्तरायण मास अमान्त मानल्याशिवाय माघ शुक्ल अष्टमीला येत नाही. वेदाङ्ग ज्यौतिषाचा काळ ख्रिपू .१४०० आहे. तेव्हा हे सर्व उल्लेख ख्रि.पू. दुसऱ्या सहस्रकातले आहेत.

(३) याच काळात उपनिषदांची रचना झाली हे मैत्रायणी व छान्दोग्य उपनिषदांच्या काळाबद्दल वर जी माहिती दिली आहे त्यावरुन स्पष्ट आहे.

(४) या काळी कलियुग पूर्णपणे समाप्त झाले. तेव्हा कोण राजा होता या प्रश्नाचे उत्तर देण्यास विष्णुपुराण उपयोगी पडते.

विष्णुपुराणात परीक्षिताच्या जन्मापासून नन्दांच्या अभिषेकापर्यंत १०१५ वर्षे झाली असे म्हटले आहे. भागवतात हीच वर्षे १११५ अशी सांगितली आहेत. हा परीक्षित अर्जुनाचा नातू असू शकत नाही. कारण अर्जुनाचा नातू त्याच्यानन्तर १००० वर्षांनी झाला असे मानता येत नाही. शिवाय कलियुगात काल सांगताना युधिष्ठिराचा वा विशेषत: कृष्णाचा उल्लेख न करता विष्णुपुराणाने परीक्षिताचा उल्लेख का करावा हा प्रश्न उपस्थित होतो.

महान राजा म्हणून एका परीक्षिताचा उल्लेख अथर्ववेदात आहे. हा परीक्षित अर्जुनाचा नातू परीक्षित नव्हे कारण अथर्ववेदातील ऋग्वेदात नसलेल्या भागात या परीक्षिताचे वर्तमानकालीन राजा म्हणून वर्णन आहे. म्हणजे तो व्यासकालीन असू



शकत नाही. या परीक्षितानन्तरच कलियुगाचा शेवट झाला असला पाहिजे. कारण तोच पाण्डवांच्या वंशातला शेवटचा राजा होता. याच परीक्षिताचा पुत्र जो जनमेजय त्याला त्याचे मन्त्री कलियुगाची १००० वर्षे लोटली आहेत असे सांगतात. (पृष्ठ २५१) पाण्डवांचा पणतू जो जनमेजय त्याला नाही. भागवतात सांगितलेली १११५+नन्दांची १०० आणि नन्दानन्तर लोटलेली ख्रिस्तपूर्व ३०० वर्षे व कलियुगाच्या सन्ध्या व सन्ध्यांशाची २०० वर्षे मिळविली म्हणजे ख्रि.पू. १७१५ च्या थोड्या आधी परीक्षित झाला असे ठरते. पण ख्रि.पू. ३१०१ पासून मोजले असता सन्ध्या व सन्ध्यांश धरुन ख्रिपू. १९०० मध्ये कलियुग सम्पले असे होते. हा दोनशे वर्षांचा फरक पडण्याचे कारण असे असू शकते की द्वापर युग सम्पल्यानंतर द्वापारची सन्ध्या व सन्ध्यांश घेतल्याशिवाय कलियुग सुरु करता येत नाही अशी विष्णुपुराणाची समजूत होती. या हिशोबाने द्वापरचे सन्ध्या २०० व सन्ध्यांश २०० मिळून द्वापारसमाप्तीनंतर ४०० वर्षांनी कलियुग सुरु होते हे असले पाहिजे तेव्हा ३३०१ हे युद्धवर्ष घेतले तर परीक्षिताचा काल ख्रि.पू. १९१५ हा येतो व विष्णुपुराणाच्या वचनाची संगति लागते.

निरनिराळ्या युगांची वर्षसंख्या व प्रत्येकाच्या सन्ध्या आणि सन्ध्यांश या कल्पना कशा निघाल्या असतील ? असे दिसते की कलियुगारम्भ भारतीय युद्धावरुन ठरला. व द्वापाराचा आरम्भ वैवस्वत मनु या रघुवंशाच्या आद्य पुरुषाच्या कालावरुन ठरला. त्रेतायुग वैवस्वता पूर्वीच्या सावर्ण्य मनूपासून असेल. सावर्ण्य म्हणजे ज्यावेळी सर्व समाज एकाच वर्णाचा होता, वर्णव्यवस्था सुरु झाली नव्हती त्या काळाचा प्रणेता तो सावर्ण्य मनु. कृतयुग मात्र फार प्राचीन म्हणून ते पूर्वकल्पाच्या प्रलयकालापर्यंत मागे नेण्यात आले. हा प्रलयकाल म्हणजे आधुनिक शोधाप्रमाणे हिमयुगाचा काल. हिमयुग ख्रिस्तपूर्व १०००० या काली सम्पू लागले असे आधुनिक मत आहे. या युगाच्या प्रणेत्याला स्वायंभुव मनु म्हटले असेल. कलियुगाचा प्रणेता मात्र कोणी मनु सांगितला नाही. चार मनु सांगितले आहेत त्यातला एक सांवरणि देखील आहे. पण तो कलियुगाचा प्रणेता असे परिशेष अनुमानावरुन म्हणता आले तरी या कल्पनेला काही दुसरा आधार सापडत नाही. कलि, द्वापार, त्रेता व कृत ही चार युगे आणि साऱ्या युगांचे मिळून दोन हजार संध्या+ संध्यांश अशी एकूण १२००० वर्षे होतात. ती हिमयुगाच्या समाप्तीच्या अन्दाजाशी जुळतात.

सन्ध्या व सन्ध्यांश यांची कल्पना निघण्याचे कारण युगकर्ता असा एक प्रबल राजवंश विलयाला गेला की त्याच्या जागी दुसरा स्थापना होऊन त्याचे युग सुरु व्हायला वेळ लागतो.

परीक्षिताबरोबर कलियुग सम्पले पण पुढे लगेच कोणतेही कृतयुग स्थापन झालेले दिसत नाही. ५७ ख्रिस्तपूर्व मध्ये स्थापित झालेल्या युगाला कृतयुग म्हणतात. मध्यन्तरी कोणते युग होते हे ज्ञात नाही. पण हे कलियुग सम्पल्यानन्तरचे युग म्हणून याला कृतयुग म्हणत असावे. कलियुग ४३२००० वर्षांचे आहे ही कल्पना मानवाचे एक वर्ष म्हणजे देवांचा एक दिवस या कल्पनेच्या आधारे १००० वर्षे कलियुग+१०० वर्षे सन्ध्या+१०० वर्षे सन्ध्यांश =१२०० ला ३६० ने गुणून काढण्यात आली आहे.; ( लो. टिळक आक्टिक होम) तिचा मानवी इतिहासाशी काही सम्बन्ध नाही. ३६० ने गुणण्याचे कारण चन्द्राची सूर्याभोवतीची एक परिक्रमा साडे एकोणतीस दिवसापेक्षा थोडी जास्त असल्यामुळे ती तीस धरुन बारा महिन्याच्या वर्षाचे ३६० दिवस होतात. एका वर्तुळाचे ३६० अंश होतात त्यामुळे युगचक्र द्योतित करण्यासाठी. सूर्य परिक्रमेच्या ३६५.२ दिवसापेक्षाही संख्या जास्त सूचक आहे. तसेच ८० वर्षे पूर्ण झाल्यास सहस्रचन्द्रदर्शन झाले असे म्हणतात यावरुनही कालगणनेसाठी चन्द्राचे महत्त्व काय मानले जाते हे स्पष्ट होते.

(६) या कालाच्या काही शतके अलीकडच्या पण ख्रि.पू. ३१०१ च्या नन्तरच्या काळाकडे अंगुलिनिद्रेश करणारा एक पुरातत्वीय उल्लेख काशाच्या तरवारीचा आहे. जयद्रथाने आपल्या तरवारीने अभिमन्यूवर वार केला तेव्हा त्याने तो चुकविला व जयद्रथाची तरवार अभिमन्यूच्या भात्यात फसली. जयद्रथाने ती झटक्याने ओढून काढली तेव्हा ती तुटली व तिचा तुकडाच जयद्रथाच्या हातात आला. याचप्रमाणे सुतसोमाच्या तरवारीचे सौबलाच्या बाणाने तुकडे पडले असे वर्णन आहे (खण्ड ११ कर्णपर्व पृष्ठ ९१) या अशा तुटणाऱ्या तरवारी काशाच्या असल्या पाहिजेत. काशाचा शोध ३१०१ च्या सुमारास लागला नव्हता. पुरातत्वाप्रमाणे हा शोध ख्रि.पू. ३००० नन्तरच लागला. मोहंजोदरोत कासे सापडले आहे पण ख्रि.पू.तिसऱ्या सहस्रकात महाभारताची एखादी आवृत्ति तयार करण्यात आली असे दिसत नाही. तेव्हा हा उल्लेख महाभारताच्या दुसऱ्या आवृत्तीच्या कालचा म्हणजे ख्रि.पू. दूसऱ्या सहस्रकातला असला पाहिजे.

रामायणात देखील याच सुमारास भर पडली हे रामायणात श्रावणात पावसाळा सुरू होतो असे वचन आहे (किष्किन्धा/२६) त्यावरुन दिसते. बालकाण्ड व उत्तरकाण्ड ही मूळ ग्रंथांत नव्हती असे रामायणाच्या पहिल्या अनुक्रमणिकेत सांगितले आहे. उत्तर काण्डाची भर रामायणात टाकण्याचा उद्देश स्पष्ट आहे. याकाळी स्त्रियांच्या लैंगिक पावित्र्याबद्दलच्या भावना अनुदार झाल्या होत्या.



स्त्रियांच्या पावित्र्याबद्दलच्या व्यासकालीन कल्पना तर सीतेचा स्वीकार करणाऱ्या रामापेक्षादेखील पुष्कळच शिथिल होत्या. द्रौपदी पाच नवरे करते, दमयन्ती नवरा जिवंत असतानाच स्वयंवर जाहीर करते. विचित्रवीर्य व पण्डू यांच्या स्त्रिया नियोग करतात. या कल्पनावर उतारा म्हणून माद्रीच्या सती जाण्याचा प्रसंग घातला गेला आहे. एकाच कुटुंबात नियोग व सती या दोन चाली असण्याचा सम्भव नाही.

भीष्म/परशुरामयुद्धाची कथा देखील उत्तर काण्डाची आठवण करुन देणारी आहे. भीष्माने हरण केल्यावर अम्बा त्याला ''माझे शाल्वावर प्रेम आहे' असे सांगते तेव्हा तो तिला सोडून देतो. पण शाल्य उत्तर काण्डातील रामाप्रमाणे तिचा स्वीकार करीत नाही. तेव्हा ती परत भीष्माकडे जाते व '' तू माझ्या जीवनाचे मातेरे केलेले आहेस तेव्हा आता तूच माझा स्वीकार कर'' असे त्याला सांगते. भीष्म ऐकत नाही तेव्हा रामकालीन योद्धा जो परशुराम त्याला ती शरण जाते. परशुराम भीष्माला अम्बेचा स्वीकार करण्याची आज्ञा देतो. ती आज्ञा भीष्म धुडकावून लावतो तेव्हा परशुराम त्याच्याशी युद्ध करतो. परशुराम भीष्माचा पराभव करु शकत नाही असे दाखवून रामकालीन दृष्टिकोनापेक्षा हा नवीन दृष्टिकोन श्रेष्ठ आहे असे सुचविण्यात आले आहे.

मी सूर्यास्ताच्या आत जयद्रथाचा वध केला नाही तर माझे काय काय विपरीत होवो हे अर्जुन सांगतो त्यात पुढील एक वाक्य फार सूचक आहे.

भुक्तपूर्वां स्त्रियं चापि निन्दतामघशंसिनाम। ब्राह्मणान्निघ्नतां ये च, ये च गोघ्यातिनामपि ।।

खण्ड ९ द्रोणपर्वणि प्रतिज्ञापर्व पृष्ठ ३५५

''जर मी जयद्रथाला मारले नाही तर मला ब्रह्मघाती गोघाती व भुक्त स्त्रीची निन्दा करणाऱ्यांची गति प्राप्त होवो'' असे अर्जुन म्हणतो. यातील ''गोघाती'' व ''ब्रह्मघाती'' हे नेहमीच पापी म्हणून मानलेले आहेत. पण भुक्तपूर्व स्त्रीची निन्दा करणे हे यासारखेच पाप आहे असे वचन इतरत्र सापडणार नाही. कर्णाने द्रौपदीची बहुपतिकत्वामुळे बन्धकी म्हणून निन्दा केली त्याचा इथे सन्दर्भ असला तरी हे वाक्य केवळ एवढ्या सन्दर्भाने उचित ठरत नाही. द्रौपदीच्या वेळी बहुपतित्वाची चाल सार्वत्रिक नसली तरी तुरळकपणे सुरु असल्याशिवाय उघडपणे पाच पति करुन द्रौपदी सम्राज्ञी म्हणून मिरवू शकली नसती. अशा विवाहाला सार्वत्रिक मान्यता नसल्यामुळे एखाद्या बहुपतिक स्त्रीला बन्धकी म्हणून कोणी हिणविले असेल हेही अपेक्षित आहे. तरी बहुपतिक स्त्रीला हिणविणारा गोघातकी व ब्रह्मघातकी यांच्या पंक्तीला बसला असेल हे शक्य नाही. त्यामुळे अर्जुन त्यांना हे स्थान देतो कारण अशा विवाहाची निन्दा करायची प्रवृत्ति बोकाळली होती. त्याची उलट प्रतिक्रिया अर्जुनाच्या तोण्डी घातली आहे. म्हणजे हे वाक्य वैशम्पायनाच्या

आवृत्तीतले असले पाहिजे.

स्त्रियांबद्दलच्या अनुदारतेबरोबरच जातिविषयक उच्चनीचतेबद्दल या काळात जास्त कटाक्ष बाळगण्यात येऊ लागला असे दिसते. याच काळातील रामायणाच्या उत्तरकाण्डात शम्बूकाची कुप्रसिद्ध कथा आहे.

कर्णाला सुतपुत्र म्हणून द्रौपदीने झिडकारले हा महाभारतातील कथाभाग भाण्डारकर इन्स्टिट्युटच्या महाभारतसम्पादकांनी प्रक्षिप्त ठरविला आहे. भाण्डारकर इन्स्टिट्युटने वापरलेले कोणतेही हस्तलिखित वैशम्पायन काळचे नाही. तेव्हा हा प्रक्षेप सौतीच्याही नन्तरचा मानला तरी केवळ द्रौपदीस्वयंवराच्या वेळीच नव्हे तर शस्त्रपरीक्षेच्या वेळी देखील सूतपुत्र म्हणून कर्णाचा उपहास झाला. पुन्हा:असा उपहास न होता कर्ण क्षत्रिय, गणला जावा म्हणून दुर्योधनाने कर्णाला अंग देशाचे राज्य दिले व हे सौहार्द स्मरुनच कर्ण आमरण दुर्योधनाशी एकनिष्ठ राहिला हा कथाभाग उरतोच. तो वैशम्पायनाच्या काळचा असला पाहिजे.

हा कथाभाग व्यासकालीन न मानण्याचे दुसरे प्रमाण असे की श्रीकृष्णदेखील सुत जातीचा असून त्याचा कधी सूत म्हणून अपमान झाल्याचे वर्णन नाही. ब्राह्मण पत्नी व क्षत्रिय पति यांच्या सन्ततीला सुत म्हणतात. श्रीकृष्ण ब्राह्मण देवयानी व क्षत्रिय ययाती यांचा पूत्र जो यदु त्याचा वंशज होता. सुत ही जाति चाण्डाळापेक्षा निकृष्ट आहे असे मनुस्मृति म्हणते. रथ बनविणे व हाकणे तसेच पुराण सांगणे ही सुतांची कर्तव्ये मानली जात होती. श्रीकृष्ण सारथ्याचे काम करीत होता यातील मर्म हेच आहे. कर्णाची मानलेली आई केवळ सुत होती. तो वस्तुत: कुन्तीचा पुत्र होता. कृष्ण हा तर, खरोखरच सुत होता. असे असता कृष्णाची अवहेलना करणारे शिशुपालादि अनेक पुरुष महाभारतात असूनही कृष्णाच्या जातिविषयक अवहेलनेचे महाभारतात अवाक्षरही नाही हे कृष्णकथेचे व्यासकालीनत्व सुचविते.

द्वारका समुद्रात बुडाली हा उल्लेख श्री. राव यांच्या मते ख्रि.पू.१५०० च्या सुमाराचा आहे असे पुरातत्वीय प्रमाणावरुन दिसते, या शोधाचा भारतीय युद्धाच्या कालाशी काही सम्बन्ध नाही. द्वारका या नावाची एक नगरी आजही अस्तित्वात आहे. तशीच एक द्वारका ख्रि.पू.१५०० मध्ये देखील असू शकते व महाभारतात जी द्वारका बुडाली असे सांगितले आहे ते या द्वारकेला लागू करण्यास काहीच अडचण नाही.

***





# महाभारताच्या तीन आवृत्या (३)

– नी. र. वऱ्हाडपांडे

## गीतेच्या आवृत्या

खि. पू. ३००० च्या सुमाराचे उल्लेख म्हणजे व्यासांच्या जय ग्रंथातील उल्लेख. हा ग्रंथ ८८०० श्लोकांचा होता. सध्याचे युद्धपर्व २४००० श्लोकांचे आहे. व्यासांनी फक्त युद्धाचा वृत्तांत लिहिला असे मानले तरी युद्धपर्वात पुष्कळशी काटछाट केल्याशिवाय व्यासांचा ग्रंथ हाती लागणार नाही. ८८०० श्लोक निवडून त्यात युद्धाचा समग्र वृत्तांत आणणे काही कठिण नाही.

कितीही काटछाट केली तरी श्रीकृष्णाचा उल्लेख टाळून भारतीय युद्धाचा वृत्तांत लिहिता येणार नाही. भीष्म, द्रोण, कर्ण व दुर्योधन या प्रमुखांचा वध श्रीकृष्णाशिवाय झालाच नसता.

'भारतीय युद्धात श्रीकृष्ण असला तरी गीता नव्हती असे मानणे कठिण आहे कारण अर्जुनविषादयोग व महाभारताकथा यांचा संबंध फारच घनिष्ठ आहे. भाऊभाऊच आपसात भांडून अठरा अक्षौहिणींचा संहार करतात ही कथा वाचताना कुणाच्याही मनात अर्जुनाच्या विषादासारखा विषाद निर्माण होणे अपरिहार्य आहे. गीता वगळून युद्धपर्व घेतले तरी त्यात अर्जुन पदोपदी भीष्म व द्रोण यांच्याशी युद्ध करताना कचरताना दिसेल. भीष्माशी लढताना अर्जुनाची 'मृदुमयता' पाहून श्रीकृष्ण चिडतो. भीष्माच्या प्रेमामुळे अर्जुन कर्तव्याला विसरत आहे असे म्हणतो व सुदर्शन चक्राचे स्मरण करतो. (खंड ८ पृ. ३१२-३१३).

द्रोणाचार्यांबद्दलच्या आदरामुळे अर्जुन त्यांच्यावर बाण सोडण्यास कचरतो (जयद्रथवधपर्व पृष्ठ ४४१). कृपाचार्याला अर्जुनाचा बाण लागतो तेव्हा अर्जुन 'धि:कार असो मला!' म्हणून दु:ख करू लागला (द्रोणपर्व खंड पृष्ठ ८३७). केवळ अर्जुनच नव्हे तर भीष्म/द्रोण राजाच्या बाजूने लढणे हे प्रजाजनांचे कर्तव्य आहे म्हणूनच केवळ पांडवांशी लढतात व त्यांच्या प्रत्येक कृतीत हा जबरदस्तीचा रामराम आहे ही वृत्ती स्पष्ट दिसते. कर्णाला कुंतीचे व आपले नाते कळल्यावर या युद्धाबद्दल उबग येतो व रणांगणावर देह ठेवणे एवढ्या एकाच उद्देशाने तो लढतो. तात्पर्य अर्जुनविषादयोग व भारतीय युद्ध यांना वेगळे करताच येत नाही व अर्जुनाच्या विषादाचे समाधान करणारा भाग जय या ग्रंथात कोणी ओढून ताणून आणला असे म्हणण्याची सोय नाही.

व्यासांच्या ग्रंथात गीता नव्हती असे मानण्यासाठी काही कारणे दिली जातात.

(१) रणांगणावर अशी तासन्तास तत्त्वज्ञानाची चर्चा होऊ शकत नाही.

युद्धाबद्दलच्या अज्ञानातून ही अडचण उद्भवलेली आहे. फूटबॉलच्या मैदानासारख्या लहानशा मैदानावर युद्ध लढले जाते व फूटबॉलच्या खेळाडूंना ज्याप्रमाणे फूटबॉल खेळताना तत्त्वज्ञानाची चर्चा करणे शक्य नसते. त्याचप्रमाणे सैनिकांना लढताना तत्त्वज्ञानाची चर्चा करणे शक्य असू शकत नाही अशी समजूत याच्या मुळाशी आहे.

भारतीय युद्धांची आघाडी निदान २४ मैल होती हे युधिष्ठिराला सोडून अर्जुन जयद्रथाला शोधण्यास किती दूर गेला यावरून रणाङ्णाची आघाडी किती लांब होती याचे अनुमान काढता येणार नाही. ही समजूत महाभारतातील स्पष्ट वर्णनापुढे टिकू शकत नाही. अर्जुनाची प्रतिज्ञा ऐकून जयद्रथ घाबरला व 'मी आता माझे सैन्य घेऊन घरी जातो' असे म्हणाला रणाङ्ण सोडून घराकडे न परतता रणांगणावर दाखल झाला. नुसत्या प्रतिज्ञेला भिऊन रणाङ्ण सोडून जाणे जयद्रथासारख्या क्षत्रियाला सोपे नव्हते.

अर्जुन चोवीस मैल शत्रूच्या सैन्यामधून जाऊच शकत नाहीत. अर्जुनाच्या मार्गात घोडे बदलण्याची देखील सोय असली पाहिजे. श्रीकृष्णाने घोड्यांना विश्रांती दिल्याचे महाभारतात वर्णन आहे. (द्रोणपर्व पृष्ठ ४९५) तेव्हा अर्जुन स्वतःच्याच आघाडीवरून गेला असला पाहिजे. भारतीय युद्धाची आघाडी २४ मैल तरी होती असे अनुमान सयुक्तिक आहे.

प्रत्यक्ष शस्त्रसंपात सुरू होण्याच्या आधी ज्याला मारायचे आहे तो शत्रूप्रमुख कोठे आहे हे शोधणे व याचा अंदाज झाल्यावर त्याच्यावर कशा रीतीने व कुठून मारा करायचा हे ठरवणे यात बराच वेळ जातो. या सर्व वेळात सारथी व रथी हे दोघेच रथात असतात व जाणारा वेळ सुसह्य करण्यासाठी सारथी त्याला पुराण सांगत असे. म्हणूनच सारथ्याला सूत म्हणतात.

(२) गीतेचा बहुतेक भाग अर्जुनाच्या व्यामोहाशी संबंध नसलेला आहे. त्यात 'मोक्ष प्राप्त होण्याचे मार्ग कोणते?' असे अर्जुनाने विचारले आहे असे समजून ज्ञान, संन्यास, भक्ती, योग व कर्म या मार्गात विवेचन केले आहे.

या आक्षेपाचे समाधान करण्यासाठी अर्जुनाच्या व्यामोहाशी साक्षात् संबंध असणारा भाग फक्त व्यासांच्या गीतेत होता असे मानल्याने काम भागते.





गीतेत व्यासकालाच्या काही खुणा आहेत काय हे पाहू गेले असता वेदकालीन अर्थाने काही शब्द वापरलेले आहेत या पलीकडे काही हाती लागत नाही. मित्रद्रोह हा शब्द पहिल्याच अध्यायात आला आहे. येथे प्रचलित कोशाप्रमाणे मित्रद्रोह म्हणजे मित्राचा द्रोह असा अर्थ नाही. असा द्रोह दुर्योधनाने कधी केलाच नव्हता. तेव्हा रूढ अर्थी हा शब्द गीतेत असूच शकत नाही. मित्रद्रोह हा शब्द वैदिक आहे. मित्रद्रोह म्हणजे मित्र या देवाचा द्रोह. करारांचे पालन व्हावे म्हणून मित्र हा देव दक्ष असतो व कराराचा भंग करणाऱ्यांना शासन करतो तेव्हा मित्रद्रोह म्हणजे कराराचा भंग असा अर्थ आहे. 'ठरलेला वनवास व अज्ञातवास संपल्यावर तुमचे राज्य परत देऊ' असा दुर्योधनाने करार केला होता व त्याचे त्याने पालन केले नाही म्हणून अर्जुन दुर्योधनावर मित्रद्रोहाचा आरोप करतो.

भीष्मपर्व (खंड ८ पृष्ठ ७६३) मध्ये 'मा मित्रध्रुक् पार्थिवानां जघन्यः पापां कीर्तिं प्राप्स्यसे कौरवेंद्र।' हे दुर्योधना, कराराचा भंग केल्याने तुझी मित्रध्रुक म्हणून दुष्कीर्ती होईल' असे भीष्माच्या तोंडी वाक्य आहे. त्यात वैदिक अर्थानेच या शब्दाचा प्रयोग केला आहे त्यामुळे हा भागही व्यासकालीन मानावा काय असा प्रश्न उद्भवतो. याला होय असे उत्तर देण्यास एक अडचण आहे व ती म्हणजे या श्लोकाचे शालिनी वृत्त. अनुष्टुभ हे वाल्मिकींइतके प्राचीन वृत्त आहे पण शालिनीसारखी दीर्घ वृत्ते पाणिनीच्या पूर्वीची मानणे कठिण आहे. छन्दोविचितिकार पिङ्गल हा पाणिनीचा समकालीन होता अशी परंपरा आहे. पण विण्टरनिट्झ त्याला पतंजलीच्या समकालीन मानतो. शालिनीसारखी वृत्ते पिंगलाने नवीन निर्माण केली नसली तरी त्याच्या फार पूर्वी ती माहीत असण्याचा संभव नाही. पाणिनीचा काल खि. पू. ५०० च्या सुमाराचा समजण्यात येतो. त्यापूर्वीच्या ग्रंथात कोठेही शालिनीसारखे छंद नाहीत. वृत्तावरूनच केवळ अंदाज बांधायचा तर हा श्लोक सौतीच्या काळचा असू शकतो.

या कोड्यातून सुटका करण्याचा मार्ग आहे व तो म्हणजे महाभारताचे संस्करण करताना वृत्तवैचित्र्य साधण्यासाठी मूळच्या अनुष्टुभाचे काही शब्द बदलून उत्तरकालीन वृत्तात रूपांतर केले असले पाहिजे. असे रूपांतर करण्यास फारच थोडा बदल करावा लागतो. सदरहू श्लोक अनुष्टुभ स्वरूपात असा असू शकतो : –

मित्रध्रुग्राजवृन्दे मा जघन्य सर्वथा भवेः।
पापा कीर्तिस्त्वदीया स्यात् कौरवेंद्र सुनिश्चितम्।।

सौती हा प्रती काढणारा लेखनिक नसून महाभारताची सुधारून वाढवलेली तिसरी

आवृत्ती तयार करणारा संपादक होता हे लक्षात ठेवले म्हणजे त्याने अशी संस्करणे केली असा तर्क वाजवी ठरतो.

द्रोणपर्वात 'मित्रद्रुहो दुर्बलभक्तयो ये पापात्मानो मम न स्यु: सहाया: ।' या वाक्यात मित्रध्रुक् हा शब्द आला आहे (खंड ९ पृष्ठ १५). 'दुबळ्या भक्तीचे पापी मित्रद्रोही माझे साहाय्य करणार नाहीत' या वाक्यात त्याचा अर्थ मित्राचा म्हणजे सख्याचा द्रोह असाच आहे. तेव्हा हा श्लोक स्पष्टपणेच वृत्त व शब्द या दोन्ही दृष्टींनी सौतीकालचाच मानला पाहिजे.

सौतीने महाभारतात असलेल्या वृत्तावरदेखील संस्कार केले असे मानणे कदाचित् जास्त सरळ असेल.

वेदकालीन अर्थाने योग हा दुसरा शब्द गीतेत आला आहे. वेदोत्तर काली योग म्हणजे पातंजल योग वा हठयोग हाच अर्थ प्रचलित झाला. पण गीतेत कर्मयोग: या शब्दात जीवनप्रणाली व कर्म करण्यातले कौशल या अर्थी योग हा शब्द वापरलेला आहे. ऋग्वेदात ५/३८/५ व १०/१६/५ मध्ये योग आणि क्षेम हे दोन्ही शब्द योगक्षेम या शब्दात प्रचलित असलेल्या अर्थी म्हणजे अप्राप्ताची प्राप्ती व प्राप्त झालेल्याचे रक्षण या अर्थी आलेले आहेत. पातंजल योग याअर्थी या शब्दाच प्रयोग कुठेही नाही. अप्राप्ताची प्राप्ती व प्राप्ताचे रक्षण हेच जीवनाचे स्वरूप असते. प्राप्ती ही रक्षणापेक्षा जास्त महत्त्वाची आहे कारण प्राप्ताचे रक्षण न झाले तरी ते पुन:प्राप्त करता येते. पण काही प्राप्तच न करता आले तर रक्षण कशाचे करणार? तेव्हा मूल्यवान असे काहीतरी मिळवणे हा गीतेतील योग शब्दाचा अर्थ निम्नलिखित वैदिक अर्थाशी जास्त जुळतो.

ज्या या सदसस्पती देवाशिवाय विद्वानाचा देखील यज्ञ सिद्धीस जात नाही तो सदसस्पती देव बुद्धीच्या योगाला व्यापून राहिलेला आहे. म्हणजे बुद्धीचा योग हेच त्याचे स्वरूप आहे असे ऋग्वेद ५/१८/७ मध्ये म्हटलेले आहे. 'बुद्धीचा योग' या प्रस्तुत शब्दप्रयोगावरून गीतेतील 'बुद्धीयोग' आठवल्याशिवाय राहणार नाही. ऋग्वेद १०/११४/९ मध्ये योग्य उपयोग या अर्थी योग हा शब्द वापरला आंहे. योग्य उपयोग हेच गीतेत सांगितलेले कर्मसु कौशल आहे.

आधुनिक कालात अप्राप्तप्राप्ती हा योग शब्दाचा अर्थ फक्त योगक्षेम या समासात उरलेला आहे. नुसते योग म्हटल्याने हा अर्थ कुणाच्याही ध्यानात येत नाही. म्हणजे वस्तुत: योग म्हणजे काही तरी मिळवण्याची धडपड हा गीतेतील योग शब्दाचा अर्थ





खास वैदिक कालातला अर्थ आहे.

कठोपनिषद् (२/६/१८) मध्ये 'तां योगमितिप्राहु:स्थिरामिन्द्रियधारणम्' म्हणजे स्थिर इन्द्रियधारणेला योग म्हणावे अशी योगाची व्याख्या केली आहे. श्वेताश्वतर उपनिषत् २-८ मध्ये हाच अर्थ आलेला आहे. या व्याख्या पातंजलयोगाशी जुळणाऱ्या आहेत. वैदिक अर्थाने योग शब्द उपनिषदात आलेला नाही. खि. पू. दुसरे सहस्रक हा उपनिषदांचा काल समजतात. यापूर्वी, पण ३१०२ खि. पू. या कालानंतर महाभारताची एखादी आवृत्ती निघाल्याचा पुरावा नाही. त्यामुळे अप्राप्तप्राप्ती या अर्थी योग शब्दाचा वापर करणारा गीतेतील भाग व्यासकालीन मानला पाहिजे.

सुरवातीला व्यासांच्या जय या ग्रंथाचा प्रारंभ कोणता हे सांगता येत नाही असे म्हटले आहे पण तर्क करायचा झाला तर 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' हा गीतेचा प्रारंभ हाच व्यासांच्या ग्रंथाचा प्रारंभ होता असे म्हणता येईल.

पण गीतेत नंनर असंबद्ध भाग घातला गेला असे म्हणून असंबद्धतेची उपपत्ती कशी लागेल? गीतेला सध्याचे स्वरूप देणाऱ्या शेवटच्या संपादकाला संबद्ध व असंबद्ध हा विवेक नव्हता काय?

याचे उत्तर असे की श्रीकृष्णाला अवतार मानल्यावर व भारतीय युद्ध होऊन हजारो वर्षे लोटल्यावर हळूहळू भारतीय युद्ध ही मानवसंहाराची एक मोठी शोकांतिका होती ही त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी नाहीशी होऊन तिच्याकडे सत्प्रवृत्ती व असत्प्रवृत्ती यातील संघर्ष अशा रूपकात्मक स्वरूपात पाहण्याची वृत्ती बळावू लागली. या दृष्टिकोनातून अर्जुनाचा व्यामोह असत्प्रवृत्तीविरुद्ध लढण्याची ईर्ष्या कमी करणारा आहे व म्हणून तो दूर करण्यासाठी सत्प्रवृत्तीचे पोषण करणारे म्हणून ज्यांना मान्यता आहे त्या ज्ञान, भक्ती, योग वगैरे साऱ्याच जीवनप्रणालींची चर्चा संबद्ध ठरली. महात्मा गांधीना देखील एका भाऊबंधकीशी गीतेचा अतुट संबंध आहे असे मानणे म्हणजे गीतेचे महत्त्व कमी करणे आहे असे वाटत होते. गीतेचे महत्त्व वाढवणे वा कमी करणे हा संशोधनाचा उद्देश नसतो असे यावर कोणताही संशोधक म्हणेल. पण वैशम्पायन आणि सौती हे संशोधक नव्हते. त्यांनाही महात्मा गांधींप्रमाणेच गीतेला भाऊबंधकीचे समर्थक मानणे हा गीतेचा अनादर वाटत असेल व म्हणून त्यांनी असत्प्रवृत्तीशी सत्प्रवृत्तीला लढायचे असेल तर त्यासाठी अध्यात्माची कास धरणे आवश्यक आहे म्हणून कौरव/पांडवांचे युद्ध हे असत्प्रवृत्तीचे सत्प्रवृत्तीशी युद्ध मानून अंतिम कल्याणाचा मार्ग जे अध्यात्म त्याचा उपदेश असे स्वरूप गीतेला देणे त्यांना आवश्यक वाटले असेल. रामाने रावणाला मारले व दुर्गादेवीने

महिषासुराला मारले असे म्हणण्यास भारतीयही कचरतात. मंगलाची अमंगलावर मात असे या घटनांचे वर्णन करण्याचा प्रघात पडला आहे. गीतेकडे या दृष्टीने पाहिले तर तिच्यावरील असंबद्धतेचा आरोप दूर होतो.

गीतेकडे आध्यात्मिक दृष्टीने न पाहता संशोधक दृष्टीने पाहणाऱ्या विचारवंतात देखील गीता हा एकटाकी ग्रंथ आहे व महाभारताप्रमाणे त्याच्या आवृत्त्या झालेल्या नाहीत असे म्हणण्याची प्रवृत्ती आहे. यात सगळीच गीता बुद्धोत्तर मानणारे पाश्चात्त्य संशोधक आहेत. ते अर्थात मासानां मार्गशीर्षोऽहम् या निश्चितपणे बुद्धपूर्व कालाकडे निर्देश करणाऱ्या वाक्याची वाट प्राचीन संस्कृत वाङ्याचे प्राचीनत्व सिद्ध करणाऱ्या शेकडो खगोलीय उल्लेखाप्रमाणेच काहीतरी टाळाटाळीची विधाने करून लावणार.

या पाश्चात्त्य संशोधकांच्या सुरात सूर मिळवणारे संशोधन हल्ली यार्दींनी सांख्यिकीचा वापर करून केलेले आहे. (Mahabharata its Genesis & Growth : A Statistical Study). सांख्यिकी हे गणिती शास्त्र! त्याच्या आधारे मांडलेला सिद्धान्त निर्विवाद असणार असे पुष्कळांना वाटते. म्हणून यार्दींनी संशोधनाचे स्वरूप स्पष्ट केले पाहिजे. अनुष्टुभ छंदात पाचवे, व दुसऱ्या व तिसऱ्या चरणातील सातवे अक्षर लघु असावे व सहावे अक्षर गुरू असावे असा नियम आहे. पण बाकीची अक्षरे लघु व गुरू ठेवावी हे सर्वस्वी कवीवर अवलंबून आहे. यार्दी यांचे म्हणणे असे की एका कवीच्या रचनेत या वैकल्पिक अक्षरांची योजना जशी असते तशी दुसऱ्या कवीच्या रचनेत नसते. पण सगळ्या गीतेत या अक्षरांची रचना एकसारखीच आहे म्हणून सारी गीता एककर्तुक आहे.

या संशोधनाचा पायाभूत दोष हा आहे की निरनिराळ्या कवींच्या रचना घेऊन त्यात वैकल्पिक लघुगुरूंचे वितरण वेगळे असते व एकाच कवीच्या रचनेत ते एकरूपच असते. असे प्रत्यक्ष उदाहरणांनी सिद्ध केलेलेच नाही. तेव्हा बाकीचे संशोधन हे पायाशिवाय उभारलेल्या डोलाऱ्यासारखेच आहे.

## आवृत्त्यादेखील संबद्धच

पण गीतेत नंतर असंबद्ध भाग घातला गेला असे म्हणून असंबद्धतेची उपपत्ती कशी लागेल? गीतेला सध्याचे स्वरूप देणाऱ्या शेवटच्या संपादकाला संबद्ध व असंबद्ध हा विवेक नव्हता काय?

सौतीसारख्या संपादकाला असंबद्ध काय हे कळत असलेच पाहिजे. तरी त्याने गीतेत हे भाग घातले कारण गीतेबद्दल सौतीचा दृष्टिकोन म. गांधींच्या दृष्टिकोनासारखा होता.





कच खाणाऱ्या अर्जुनाला युद्धासाठी प्रवृत्त करणे एवढाच गीतेचा मर्यादित उद्देश मानला तर गीतेची महती कमी होते. कौरवपांडवांचे युद्ध हे निमित्त आहे. हे युद्ध म्हणजे सत्प्रवृत्ती व असत्प्रवृत्ती याचे युद्ध मानले तर या युद्धात जय मिळवण्यासाठी सारे नीतिशास्त्रच नव्हे तर सारे अध्यात्मच संबद्ध ठरते. या दृष्टीने सौतीने हल्लीच्या गीतेचे संपादन केले आहे व संपादन करताना त्याने पूर्वीच्या भागांचेही संस्करण केले आहे. तेव्हा गीतेत छंदाच्या दृष्टीने एकरूपता आढळणे अपेक्षितच आहे.

गीतेचा व्यासकालीन भाग फक्त कर्मयोगपर असला पाहिजे. पण असा भाग फारच थोडा आहे. वैशम्पायनाच्या काळी रामायणात स्त्रीच्या शुद्धतेविषयीच्या व जातिश्रेष्ठतेबद्दलच्या कडक कल्पना घालण्यात आल्या. गीतेतही त्याचप्रमाणे वर्णसंकराला मोठे संकट मानणारा भाग वैश्य व शूद्र हे कनिष्ठ आहेत यासारखे उद्गार घालण्यात आले असावेत. तसेच 'मासांना मार्गशीर्षोऽहम' हे उद्गार खि. पू. दुसऱ्या सहस्रकातले आहेत यावरून श्रीकृष्णाच्या अवतारत्वाची कल्पना याच वेळी घातली केली असली पाहिजे कारण याचवेळी रामायणात घातलेल्या बालकांडात राम हा विष्णूचा असतार आहे अशी कथा घालण्यात आली आहे. श्रीकृष्णाच्या अवतारत्वाच्या भागामध्ये विश्वरूपदर्शनासारखे अध्यायही आलेच. याच अध्यायात 'कृष्णा तू देव आहेस हे मला माहीत नसल्यामुळे तुझा यथायोग्य मान मी पूर्वी राखला नाही त्याबद्दल क्षमा कर' असे अर्जुन म्हणतो कारण व्यासकाली अर्जुन कृष्णाला देव मानत होता असे कुणाला वाटण्याचा संभवच नव्हता. 'त्रैगुण्यविषया वेदा...' वगैरे वेदावरील टीकेचा भाग देखील वैशम्पायन काळातला मानला पाहिजे. कारण सौतीकालात बौद्धाच्या सुरात सूर मिसळून वेदावर अशी टीका करण्याची गीतेची प्रवृत्ती होणार नाही.

सौती कालात निर्वाण हा खास बौद्ध शब्द, बौद्धविचारांना आसुरी ठरवणारा भाग व बौद्धांना नैरात्म्यवादाचा प्रतिवाद करण्यासाठी आत्म्याचे अमरत्व प्रतिपादणारा भाग घातला आहे. या भागात कठोपनिषदातले हुबेहुब शब्द साहित्यिक संस्करण करून घातले आहेत. कठोपनिषदाने आत्म्याच्या अमरत्वाचा भाग गीतेतील साहित्यिक संस्करण पुसून उपनिषदांच्या शैलीत लिहिला असे म्हणणे हा दूरान्वय होईल. एकाच उपनिषदाचे भागदेखील अनेककर्तुक आहेत पण ते सारे व्यासाच्या हजार वर्षे नंतरचे आहेत. गीतेतील आत्म्याच्या अमरत्वाचा भाग व्यासकालीन असू शकत नाही. तेव्हा सौतीकालीच हे विचार गीतेत घातले गेले असे मानणे सरळ आहे.

गीता हे उपनिषदांचे सार आहे असे म्हटले जाते पण गीतेतील कर्मयोगाचा भाग

कोणत्याही उपनिषदात नाही. मूळ गीतेतील हा पंधरा वीस श्लोकांचा भाग पुढे गीतेत आलेल्या ७०० श्लोकांमध्ये झाकला गेला व त्यामुळे इतर भाग हा उपनिषदासारखा वाटला ही घटना सौतीकालातली असली पाहिजे. उपनिषत् हा शब्द कधीही एकवचनी नसतो कारण अनेक ऋषींच्या वचनांचा संग्रह हे उपनिषदांचे स्वरूप आहे. गीतेला उपनिषत् म्हणण्यात गीताही असाच संग्रह आहे हे सूचित झाले आहे.

सदाचाराबद्दलच्या ऋग्वेदातील कल्पना उपनिषदे व त्यानंतरचे वाङ्मय याहून सर्वस्वी भिन्न आहेत. मृत्यूनंतर सद्गती मिळवण्याचे एक साधन म्हणजे सदाचार अशी उत्तरकालीन धर्म व दर्शने यांची समजूत आहे. ऋग्वेदात मृत्यूनंतरच्या जीवनाची कल्पना आहे कारण पितरांचा मृत्यूनंतर वास मानलेला आहे. पण सदाचारी स्वर्गात जातात व दुराचारी नरकात जातात अशी कल्पना नाही. स्वर्ग व नरक हे शब्दच ऋग्वेदात नाहीत. नाक, स्वः वैगेरे शब्द स्वर्गवाचक नाहीत, आकाशातील काही स्थाने द्योतित करणारे आहेत.

सदाचाराबद्दल ऋग्वेदातील खालील ऋचा महत्त्वाच्या आहेत:

प्र तानग्निः बभसत्तिग्मजम्भस्तपिष्ठेन शोचिषा यः' सुराधाः।
प्र ये मिनन्ति वरुणस्य धाम प्रिया मित्रस्य चेततो ध्रुवाणि॥
४/५/४

जे जाणतेपणी मित्र देवाच्या प्रिय व काटेकोर शिस्तीचे व वरुणा या निसर्गरूप व्यवस्थेचे उल्लंघन करतात त्यांना हे वैभवशाली अग्ने तू आपल्या कराल ज्वालांचा प्रभाव दाखव.

अभ्रातरो न योषणो व्यन्तः बतिरिपो न जनयो दुरेवाः।
पापासः सन्तो अनृता असत्या इदं पदमजनता गभीरम्॥
४/५/५

ज्या स्त्रिया भाऊ म्हणून कोणत्याच पुरुषाशी नाते ठेवू शकत नाहीत (म्हणजे ज्यांना कोणताही पुरुष हा कामतृप्तीचे साधन वाटतो), ज्या पतीशी शत्रूसारखे वर्तन करणाऱ्या दुराचारी आहेत त्या पापी अनृत व असत्य लोकांनी अधःपाताचे हे विश्व निर्माण केले आहे.



गीतेतील कोणतेही परलोकीय तत्त्वज्ञान व्यासकालीन गीतेत असू शकत नाही. 'सर्वभूतहिते रतः' 'लोकसंग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि' ही वाक्ये व्यासांच्या गीतेतली असू शकतात. पण गीतेतील सारे पारलौकिक तत्त्वज्ञान व्यासोत्तर मानले पाहिजे.

ऋग्सवेदकालात यज्ञ केल्याने पाऊस पडतो अशी समजूत होती. म्हणजे यज्ञ हे ऐहिक कल्याणाचे एक साधन होते. ब्राह्मणकालात पण ब्राह्मणांचा शेवटचा भाग जी उपनिषदे त्यांच्या पूर्वी यज्ञ केल्याने स्वर्ग मिळतो ही कल्पना निर्माण झाली. सदाचार व दुराचार यांचा मरणोत्तर एखाद्या गतीशी कार्यकारणभाव आहे. ही कल्पना प्रबल होत चालली व लोककल्याण हे सदाचाराचे व लोकांचे अकल्याण हे दुराचाराचे स्वरूप आहे ही कल्पना मागे पडत चालली. ही परलोकवादी नीती म्हणजे अध्यात्म. हे सर्वस्वी ऋग्वेदोत्तर आहे.

उपलब्ध गीतेत यज्ञाने स्वर्ग मिळतो या कल्पनेवर टीका आहे पण संन्यास, भक्ती, समाधीसाठी योगसाधना वगैरे मार्ग प्रशस्त मानले आहेत. या सर्व ऋग्वेदोत्तर कल्पना व्यासांच्या मूळ गीतेत असणे शक्य नाही.

लेखक : नी. र. वऱ्हाडपांडे
३८, हिन्दुस्थान कॉलनी,
अमरावती मार्ग,
नागपूर – ४४००३३
दूरभाष : २५२२८०८

१०

# भारतीय युद्धाची दैनंदिनी

**लेखक : नी. र. वऱ्हाडपाण्डे**

भारतीय युद्ध केव्हा झाले याबद्दल दोन प्रमुख मते प्रचलित आहेत. पारंपरिक मताप्रमाणे खिस्तपूर्व ३१०१ या साली हे युद्ध झाले. हा काळ ऐहोळे शिलालेखासारख्या अस्सल ऐतिहासिक साधनात शके ५५६ म्हणजे इसवीसन ६३४ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे. प्रसिद्ध विद्वान भारताचार्य चिं. वि. वैद्य यांनी तो मानलेला आहे.

पण लो. टिळक, विद्वत्रत्न दप्तरी वगैरे विद्वानांनी तो अमान्य करून खिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकाच्या शेवटी हे युद्ध झाले असा सिद्धान्त मांडला आहे.

अलीकडे डॉ. लाल या पुरावेत्याने ख्रि.पू. ९०० च्या पूर्वी भारतीय युद्धाचा काल जाऊ शकत नाही असे मत प्रतिपादन केले आहे. पण या मताला महाभारत ग्रंथात यत्किंचितही आधार नाही. हस्तिनापुराच्या उत्खननीय प्राचीनतेवरूनच केवळ असा सिद्धान्त मांडला आहे. यात हे गृहित धरलेले आहे की उपलब्ध महाभारतातील हस्तिनापुराची वर्णने व्यासकालीन आहेत.

भारतीय युद्धाच्या कालासंबंधी याप्रमाणे दोन हजार वर्षांनी वेगळे असलेले अंदाज बसविले जात असताना काही संशोधक भारतीय युद्धातील कोणती घटना कोणत्या तिथीला घडली हे ठरविण्याचा अट्टाहास धरून भारतीय युद्धाची दैनंदिनी लिहिण्याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नात दप्तरी, र. वि. वैद्य, कवीश्वर, वर्तक व होले ही नावे प्रमुख आहेत. यांच्या प्रयत्नाचे स्वरूप काय आहे याचा विचार करण्याचे येथे योजले आहे.

चिं. वि. वैद्यांनी महाभारतात दिलेल्या निरनिराळ्या तिथींची संगती लावणे केवळ अशक्य आहे असे स्पष्ट मत दिले आहे. पण याला न जुमानता दैनंदिनी लिहिणाऱ्यांनी प्रत्येक घटनेची घटकापळे वगैरे सांगण्याचेच फक्त बाकी ठेवले आहे. उदाहरणार्थ दप्तरींचे प्रतिपादन पहा.

विराटपर्व अध्याय ५२ मध्ये पांडवांनी अज्ञातवासाची व वनवासाची वर्षे पुरी केली हे सांगताना भीष्म म्हणतो :

............ पंचमे पंचमे वर्षे द्वौ मासावुपजायत:
एषमभ्यधिका मासा पंच च द्वादशं क्षपा:
त्रयोदशानां वर्षाणामिति मे वर्तते मति:

म्हणजे पांडवांनी पाच अधिक मास धरून तेरा वर्षे व बारा रात्री पूर्ण केल्या आहेत.

येथे पांडवांनी १२ रात्री पूर्ण केल्या आहेत याचा अर्थ १२ अहोरात्र पूर्ण केले आहेत असा नसून रात्री म्हणजे १२ तास गुणिले १२ इतके तास पूर्ण केले म्हणजे केवळ सहा अहोरात्र पूर्ण केले असा अर्थ दप्तरींनी घेतला आहे. "मी पन्नास पावसाळे पाहिले" याचा अर्थ पन्नास वर्षे पाहिली असा न करता फक्त पावसाळ्याचे चार महिने घेऊन ५० X ४=२०० महिने पाहिले, महिन्यात तीस दिवस असतात याचा अर्थ ३० X १२=३६० तास असतात असे अर्थ करण्यासारखेच हे आहे.

भीष्मपर्व अध्याय १७ यात पुढील श्लोक आहे :

मघाविषयग: सोम:स्तद्दिनं प्रत्यपद्यत

त्या दिवशी मघा नक्षत्रात सोम होता असा याचा स्पष्ट अर्थ आहे. पण दप्तरी म्हणातात ; "मघापासून नववे नक्षत्र जे मूळ तेथे चंद्र होता."

भीष्मपर्व अध्याय ३ मध्ये म्हटले आहे :

चन्द्रादित्यामुभौ ग्रस्तावेकाहे हि त्रयोदशीम्<br>
अपर्वणि ग्रहं यातौ प्रजासंक्षयभिच्छत: ॥२८॥

"त्रयोदशीला एकाच दिवशी चंद्र व सूर्य या दोघांनाही ग्रहण लागले. अपर्वी ग्रस्त झालेले हे प्रजेचा क्षयच इच्छितात."

ग्रहण पौर्णिमेला लागले पाहिजे व शिवाय एकाच दिवशी चंद्रसमयचि ग्रहण सम्भवत नाही. तेव्हा त्रयोदशीला ग्रहण लागणे व चंद्रसूर्यांना दोघांनाही लागणे ही गोष्ट अपर्वणी म्हणजे अकाली घडलेली आहे. अरिष्टसूचक गोष्टी अकाली कशा घडल्या याचे हे स्पष्टपणेच फलज्योतिषीय वर्णन आहे. पण दप्तरी एकाने याचा अर्थ एका वारी असा करतात. वारांची पद्धती भारतीय युद्धकाली वा वेदांगज्योतिषकालीही नव्हती. तसेच अपर्वणी याचा अर्थ दप्तरी पंचांगात सांगितलेल्या तिथीला सोडून असा करतात व त्यावेळचे पंचांग चुकलेले होते अशी यावर मल्लिनाथी करतात. शिवाय एका दिवशी म्हणायचे असेल हक्काने म्हणावे लागेल, एकाने याचा अर्थ दिवसाच्या एका भागात असा घेतो.

उद्योगपर्व अध्याय १४३ मध्ये खालील श्लोक आहे :

कृत्वा चांगारको वक्रं ज्येंष्टायां मधुसूदन<br>
अनुराधां प्रार्थयते मैत्रं संगमयन्निव

"मंगळ ज्येष्ठेत वक्री होऊन अनुराधेला मैत्रीसाठी विनवीत आहे" असा याचा सरळ अर्थ आहे. पण दप्तरी अंगारक याचा शुक्र असा कोशात न दिलेला व मैत्री प्रार्थयते "मित्रत्वाचा नाश करीत आहे असा चक्क उलट अर्थ लावतात."

कर्णपर्वात कर्णाचा वध झाल्यावर :

ग्रहश्च तिर्यग् ज्वलनार्कवर्ण: सोमस्य पुत्रोभ्युदियाय तिर्यक्,

जळणाऱ्या सूर्याप्रमाणे दिसणारा सोमाचा पुत्र तिरपा उगवला असे वर्णन आहे. येथे दप्तरी "भ्युदियाय" म्हणजे उगवला याचा अर्थ अस्ताला गेला असा करतात.



गदायुद्धपर्वात "पुष्ये सम्प्रयातीस्मि श्रवणे पुनरागत:" म्हणजे मी पुष्यनक्षत्रावर गेलो व श्रवण नक्षत्रावर परत आलो असे बलरामाच्या तोंडी वाक्य आहे. दप्तरी म्हणतात, "येथे पुष्य व श्रवण यांची अदलाबदल झालेली आहे." मी श्रवण नक्षत्री गेलो व पुष्य नक्षत्री परत आलो असे बलरामाला म्हणायचे आहे.

युद्ध संपल्यावर गांधारीने कृष्णाला शाप दिला की यादवांचा नाश होईल व गांधारीच्या शापानंतर ३६ वर्षांनी अशुभ ग्रहस्थिती दिसू लागली असे महाभारतात वर्णन आहे. दप्तरीच्या कल्पनांशी गांधारीच्या शापापासून ३६ वर्षांनी अशी स्थिती येत नाही. तेव्हा दप्तरी म्हणतात की ही ३६ वर्षे युद्ध संपल्यापासून घ्यायची नसून पांडव वनवासात निघाले तेव्हापासून घ्यायची आहेत. असे का करायचे याला "दप्तरीचे गणित जुळविण्यासाठी" याव्यतिरिक्त काहीच समर्थन नाही. विराटपर्वामध्ये ४७ व्या अध्यायात :

अदेशिनि महारण्ये ग्रीष्मे शत्रुवशं गता<br>
यथा न विभ्रमेत्सेना तथा नीतिर्विधीयताम् ॥२॥

या ग्रीष्म ऋतूमध्ये महारण्यामध्ये आदेशरहित सेना शत्रूच्या कह्यात भरकटू नये अशी रणनीति आखा असे म्हटले आहे. येथे ग्रीष्म म्हणजे उन्हाळा हा सरळ अर्थ घेतला तर तो दप्तरींच्या कल्पनांशी जुळत नाही म्हणून दप्तरी म्हणतात, "ग्रीष्म म्हणजे उन्हाचा ताप असा अर्थ घेतल्यास वैशाख महिना होता असे घ्यावे लागेल व म्हणून उत्तरगोग्रहण वैशाख अष्टमीस झाले असे सिद्ध होते."

**महाभारत हे चित्रकाव्य नाही**

ग्रीष्म म्हणजे उष्मा असा एक अर्थ आपट्यांच्या कोशात दिलेला आहे पण ते विशेषण आहे. वरील ठिकाणी हा शब्द विशेषण म्हणून वापरलेला नाही.

दप्तरींनी भारतीय युद्धकाली उत्तरायण सुरू होण्याचा जो काळ मानला आहे तो त्यांनी ठरविलेल्या युद्धवर्षी येत नाही, म्हणून दप्तरी म्हणतात :

"भारतात सांगितलेले उत्तरायण गणितारम्भ काली पाहिलेले होय... उत्तरायणकालात चुकी... २२ दिवसांची आहे."

म्हणजे महाभारतात वर्णिलेले उत्तरायण प्रत्यक्ष पाहिलेले नसून पंचांगात सांगितलेले आहे व या पंचांगात २२ दिवसांची चुकी होती.

भारतीय युद्धकाली कोणते पंचांग प्रचलित होते हे आज सांगणे शक्य आहे कारण भारतीय युद्धाच्या कालाचे अंदाजच मुळी हजारो वर्षांनी वेगळे आहेत, म्हणजे आपल्याच मनाने भारतीय युद्धकाली कोणते पंचांग होते हे ठरवायचे व तेही चुकीचे असे मानायचे म्हणजे मनाला वाटेल तो काळ त्यावरून ठरविण्यास हरकत नाही.

पुढे दप्तरींनी पुराणातील पिढ्यांचा विचार करून भारतीय युद्धाचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. या पिढ्या दप्तरींनी सांगितलेल्या काळाशी जुळत नाहीत. म्हणून

दप्तरी म्हणतात पुराणात सांगितलेली पिढ्यांची संख्या "दुपटीने सांगितलेली आहे" म्हणजे ज्याला जो काळ पाहिजे तो आणण्यासाठी पुराणातील पिढ्यांच्या संख्येला पाहिजे त्या संख्येने गुणावे किंवा भागावे.

एकूण छप्तरी यांच्या स्वैर कल्पनांना महाभारत वा पुराणे यातील वचनांचा काही आधारच नाही.

भारतीय युद्धाची दैनंदिनी लिहू पाहणारे दुसरे लेखक कवीश्वर हे होत. यांनी १९२१ साली विविध ज्ञानविस्तारात रा. ल. गोखले यांनी प्रतिपादिलेल्या एका मताचे पुनरुज्जीवन केले आहे. हे मत म्हणजे भारतीय युद्ध एक दिवसाआड होत होते, सतत होत नव्हते हे होय. कवीश्वर यांनी युद्धाला मध्ये सुट्या देण्यास जी कारणे सांगितली आहेत ती युद्धाच्या स्वरूपाबद्दलच केवळ नव्हेत तर आजपर्यंतच्या युद्धांचा जो इतिहास उपलब्ध आहे त्या सर्वांबद्दल गाढ अज्ञान दाखविणारी आहेत. युद्धात प्राण्यांची व मानवांची प्रेते रणभूमीवर पसरल्यामुळे रणभूमी साफ करण्यास एक दिवस पाहिजे म्हणून अशा सुट्या घेणे आवश्यक होते असे एक कारण दिले आहे. सैन्यामध्ये आवश्यक असलेली लढण्यापासून तो स्वयंपाक, झाडलोट वगैरेची सर्व कामे सैनिकच करतात अशी यामागे समजूत आहे. ही समजूत किती बालिश आहे हे एखाद्या वरिष्ठ मध्यमवर्गातील नोकरांचे अवलोकन केल्यास दिसून येईल. अशा घरात एकच नोकर सैपाक, भांडी घासणे, कपडे धुणे, चौकीदारी करणे वगैरे सर्व कामे करीत नसतो. यावरूनच स्पष्ट व्हावे की सैनिक हे मुख्यत: लढण्याचे काम करतात. रणभूमी साफ करण्यासाठी हल्ली सॅपर्स ॲण्ड मायनर्स नावाचे दळ असते. जुन्या काळीही अशी दले असणार. सैन्यात काही कामासाठी स्त्रिया देखील असतात. पानिपतच्या युद्धात मराठ्यांबरोबर मोठ्या प्रमाणात स्त्रिया होत्या म्हणून गवगवा करण्यात येतो. त्या स्त्रिया बहुतांश हल्लीच्या बॅकाइझप्रमाणे बिनलढाऊ कामे करणाऱ्या होत्या असे सेतुमाधवराव पगडी यांनी दाखवून दिले आहे. सेनापती निवडण्यास व त्याला अभिषेक करण्यास वेळ लागत असे दुसरे कारण देण्यात आले आहे. हे कारण देताना "द किंग इज डेड, लॉंग लिव्ह द किंग" या उक्तीचे मर्म विसरले आहे.

### युद्धाबद्दलचे प्राथमिक अज्ञान

राजा मेला तरी राजपद क्षणभरासाठीही रिक्त नसते व राजाची सारी कामे होतच असतात. लढाईमध्ये तर एखादा अधिकारी मेला तर त्याचे काम त्याच्या लगेच हाताखाली असणाऱ्या अधिकाऱ्याने पत्करायचे असा दंडकच आहे. नियमित सेनापतीच्या निवडीला व अभिषेकाला वेळ लागतो म्हणून युद्धच तहकूब करीत ही कल्पना हास्यास्पद आहे. सैन्याच्या व्यूहांचा अभ्यास करायला वेळ लागत असे व त्यासाठी सुट्टीची आवश्यकता होती असेही सांगण्यात आले आहे, पण व्यूह लढाईच्या वेळीच रचीत व शत्रूचा व्यूह पाडून पुष्कळवेळा प्रतिव्यूह रचीत अशी महाभारतात वर्णने आहेत. दिवस बराच



उघडल्यावर देखील काही सैनिक शिबिरातच असल्याचे वर्णन आहे यावरून हे सैनिक दिवसाढवळ्या ज्या दिवशी शिबिरात होते तो सुट्टीचा दिवस होता असे अनुमान कवीश्वरांनी काढले आहे. येथे देखील युद्धाबद्दलचे अज्ञान दिसून येते. युद्धास तोंड लागल्यावर देखील सर्वच योद्धे लढाईत भाग घेत नसतात. लढणाऱ्या सैनिकांना देखील जेवणखाण करावेच लागते. पहारा देणाऱ्यांना जसे मोकळे करणारे दुसरे पहारेकरी असतात तसेच सैनिकांना भोजनास उसंत देण्यासाठी त्यांना काही काळ मोकळे करण्याची व्यवस्था असते. तसेच सारे सैन्य साऱ्याच आघाड्यावर लढत नसते. कोणते सैन्य कोणत्या वेळी कोणत्या आघाडीवर पाठवायचे हे सेनापती ठरवीत असतो व तोपर्यंत हे सैन्य सज्ज झाले तरी प्रत्यक्ष लढाईत भाग घेत नसते.

सुट्ट्यांच्या मुद्यावर एवढा विस्तार करण्याचे कारण असे की हर मुद्दा बऱ्याच वाचकांना मोठा वजनाचा वाटतो. वस्तुत: ज्या ऐतिहासिक युद्धांची सविस्तर वर्णने उपलब्ध आहेत त्यात युद्धाला सुट्टी घेण्याचा प्रकार आढळत नाही.

बरे दैनंदिनी कशीबशी जुळविण्यासाठी सुट्ट्या घेतल्या तरी तिथ्या बरोबर जुळतात काय ? मुळीच नाही. त्यादेखील कवीश्वरांनी श्लोकांची ओढाताण करूनच जुळविलेल्या आहेत. उदा.

"अपराह्ण" याचा अर्थ कवीश्वरांनी दुपार असा न घेता "दुसऱ्या दिवशी" असा घेतला आहे. "दुसरा दिवस" असा अर्थ घेण्यासाठी अपरं हर: अपराह्णम् असा विग्रह करायला पाहिजे. "अथापराह्णे तस्याह्न:" याचा अर्थ त्या दिवसाच्या दुसऱ्या दिवशी असा कवीश्वरांना करता येणार नाही कारण दुसऱ्या दिवशी असा अपराह्ण या पदाचा अर्थ करायचा असेल तर अपराह्नि अशी सप्तमी होईल. अपराह्णे अशी होणार नाही. अहन् शब्दाचे अह्न असे रूप होण्यास अपरं अह्न: म्हणजे दिवसाचा दुसरा भाग असाच अर्थ व्हावयास पाहिजे. जसे मध्यं अह्न: म्हणजे दिवसाचा मधला भाग.

कवीश्वरांनी आपल्या अर्थाच्या समर्थनार्थ "अपराह्णेऽपराह्णोस्य हे कर्णपर्व ९१/६४ चे जे वचन उद्धृत केले आहे त्यात अपराह्न: म्हणजे दुसऱ्या दिवसाची या अर्थी अहन् शब्दाची षष्ठी केली आहे. अपराह्नस्य अशी केलेली नाही.

आपली दैनंदिनी जुळविण्यासाठी कवीश्वर शेवटच्या दिवसाच्या लढाईबद्दलच्या श्लोकातही मखलाशी करतात. तो श्लोक असा आहे :

"शल्योर्धदिवसं चैव गदायुद्धमत:परम्"

"शल्य अर्धा दिवस लढला व त्यानंतर गदायुद्ध झाले." येथे स्पष्ट आहे की शल्य अर्ध्या दिवसानंतर पडला व त्यानंतर त्याच दिवशी गदायुद्ध झाले. पण कवीश्वर विचारतात, "येथे त्याच दिवशी असे शब्द कोठे आहेत ?" असेच प्रश्न पुढील वाक्याबद्दलही विचारण्यात येऊ शकतात.

"अटलबिहारी वाजपेयी सकाळी नागपुरात आले व संध्याकाळी त्यांनी कस्तुरचंद

पार्क मध्ये व्याख्यान दिले.''

'' पानिपतच्या युद्धात अर्धा दिवस मराठ्यांची सरशी झाली, मग पुढच्या अर्ध्या दिवसात त्यांचा पराभव झाला.''

वरील वाक्यांच्या बाबतीतही कवीश्वर विचारू शकतील की '' अटलबिहारी ज्या दिवशी सकाळी आले त्याच दिवशी त्यांचे कस्तुरचंद पार्कात व्याख्यान झाले असे येथे कोठे सांगितले आहे ? '' '' मराठ्यांचा मोड ज्या अर्ध्या दिवशी त्यांची सरशी झाली त्याच दिवशी झाला असे वाक्यात म्हटलेले नाही. तो पुढच्या दिवशी वा पुढच्या महिन्यात देखील झाला असेल.''

**कोशांना मराठीत नसलेले अर्थ**

अनुशासन पर्वात खालील श्लोक आहे :

माघोयं समनुप्राप्तो मास: सौम्यो युधिष्ठिर
किभागशेष: पक्षीयं शुक्लो भवितुमर्हति

हे मरणसमयी भीमाने म्हटले आहे. '' हा सौम्य असा माघ महिना आला आहे. हा त्रिभागशेष आहे म्हणजे याचा तिसरा भाग उरला आहे वा तीन भाग जाऊन चौथा उरला आहे. हा शुक्लपक्ष आहे.''

'' त्रिभागाच्छेष: '' किंवा '' त्रिभाग: शेषो यस्य '' '' ज्याचे तीन भाग गेले आहेत असा बाकी उरलेला महिना '' वा '' ज्याचे तीन भाग जावयाचे आहेत असा हा महिना '' असे दोन प्रकारचे विग्रह होऊ शकतात. पण कवीश्वर म्हणतात येथे भाग म्हणजे मुहूर्त असा अर्थ आहे. म्हणजे शुक्ल पक्षाचे तीन मुहूर्त शिल्लक होते. भाग या शब्दाचा अर्थ मुहूर्त असा होतो यासाठी त्यांनी कोशाचा आधार दिलेला नाही.

कवीश्वरांच्या अर्थ करण्याच्या पद्धतीचे आणखी अधिक उद्वेगजनक उदाहरण म्हणजे पुढील वाक्यात दिसते. भीष्म '' मी अठ्ठावन्न रात्री शरशय्येवर पडलो आहे '' असे म्हणतो. या रात्री शब्दावर कवीश्वरांचे पाण्डित्य असे :

'' संस्कृतात दिवसाच्या सूर्यविहीन काळाला '' रात्रि '' '' रजनी '', '' निशा '', '' शर्वरी '' इत्यादी अनेक शब्द आहेत. यात शुद्ध शास्त्रीय परिभाषेनुसार '' निशा '' शब्द+ते सूर्यास्तापासून सूर्योदयापावेतोचा पूर्ण काळ येतो. परंतु '' रात्रीमध्ये दोन्हीकडचे संध्यासमय समाविष्ट होत नाहीत.''

या सूक्ष्म शास्त्रीय अर्थासाठी कवीश्वर कोणत्या शास्त्राचा आधार घेतात ते त्यांनी सांगितलेले नाही. शब्दकल्पद्रुमामध्ये शब्दांचे '' सूक्ष्म शास्त्रीय अर्थ ''देखील दिलेले आहेत. त्यात निशा या शब्दाला रात्री हाच पर्याय दिलेला आहे व कवीश्वरांचा '' सूक्ष्म शास्त्रीय अर्थ '' कोठेही नाही. तसेच '' रात्री '' शब्दाचा निशा असा अर्थ दिलेला आहे.

एकूण कवीश्वरांच्या लिहिण्याचा झोक असा की महाभारत हे जनसामान्यांचे काव्य



नसून पंडितांच्या पांडित्याची कसोटी पाहणारे एक कूटकाव्य आहे. उत्तरकाली चित्रकाव्य नावाचा एक '' काव्यप्रकार '' रूढ झाला. एकाच अक्षरात सारा श्लोक लिहिणे वा शब्दांच्या विशिष्ट रचनेने '' पद्मबन्ध '' वा '' मुरजबन्ध '' साधणे चित्रकाव्याचे स्वरूप असे. या काव्याची प्रवृत्ती काही सांगण्यासाठी नसून आपले भाषाप्रभुत्व प्रदर्शित करणे हे असे.

वस्तुत: ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे की महाभारत हे साऱ्या जनतेत प्रचारात असलेले एक आर्षमहाकाव्य होते. '' सूत '' नावाचे पुराणिक ते जनतेसमोर साभिनय गाऊन दाखवीत असत. साऱ्या जनतेला सहज कळावी अशी या ग्रंथाची रचना असे. त्यात कूटे आहेत ही अद्भुतरम्य कल्पना मूळ '' जय '' ग्रंथाचे महाभारत झाले तेव्हाची आहे.

र. वि. वैद्य हे युद्धाची दैनंदिनी लिहिणारे आणखी एक संशोधक आहेत. त्यांच्या लिखाणात काल्पनिक अर्थ बरेच आहेत. रोहिणी ज्येष्ठा असा त्यांनी अर्थ केला आहे. आपटे व शब्द कल्पद्रुम यात असा अर्क आढळत नाही. '' आसन्मघासु मुनय: '' या वराहमिहिराच्या प्रसिद्ध श्लोकात '' मघा नक्षत्रात सप्तर्षि होते '' असा उल्लेख असल्याचे सर्वमान्य आहे, पण तिथे '' मुनय: '' म्हणजे ऋषि हे युधिष्ठिराच्या यज्ञात होते असा '' मघासु '' या जागी '' मखेषु '' असा काल्पनिक पाठ घेऊन अर्थ केला आहे.

**वर्तकांची सगळ्यावर कडी**

अर्थाचा अनर्थ करून भारतीय युद्धाची दैनंदिनी लिहिणाऱ्या विवेचकात सर्वांत कमाल कुणी केली असेल तर ती वर्तकांनी. वर्तकांनी केवळ महाभारताच्याच नव्हे तर सुप्रसिद्ध ऐहाळे शिलालेखातील भारतीय युद्धासंबंधीच्या वचनाचेही धिंडवडे उडविले आहेत. शिलालेखातील वचन असे आहे :

त्रिंशत्स त्रिसहस्रेषु भारतादावहादित:
सप्ताब्दशतयुक्तेषु गतेष्वब्देषु पंचसु
पंचाशत्सु कलौ काले षट्सु पंचशतासु च
समासु समतीतासु शकानामपि भूभुजाम्

याचा अन्वय असा :

भारतादाहवादित: सप्ताब्दशंतयुक्तेषु, त्रिंशत्सु त्रिसहस्रेषु, पंचसु अब्देषु गतेषु। पंचाशत्सु, पंचशतेषु षट्स च शकानां भूभुजां समासु कलौ काले समतीतासु.

३००० अधिक ३० अधिक ७०० अधिक ५ इतकी (म्हणजे ३७३५) वर्षे भारतीय युद्धापासून झाली असताना, वा शककालाची ५०० अधिक ५० अधिक ६ म्हणजे ५५६ इतकी वर्षे गेली असताना हा शिलालेख लिहिला गेला आहे.

यावर वर्तकांची मखलाशी अशी :

'' भारतादाहवादित: '' येथे पहिले वाक्य संपते. म्हणजे या वाक्यात भारतीय

युद्धापासून ३०३० वर्षे झाली आहेत असे सांगितले आहे.

पहिल्या ओळीचा शब्दश: अर्थ " तीसमध्ये व तीस हजारमध्ये भारतीय युद्धापासून " असा होतो. म्हणजे पहिली ओळ स्वतंत्र मानली तर तिचा काही अर्थच होत नाही. " तीसमध्ये व तीन हजारमध्ये भारतीय युद्धापासून " याचा कार्य अर्थ करणार ? त्रिंशत्सु त्रिसहस्रेषु हे शब्द " सप्ताब्दशतयुक्तेषु " या दुसऱ्या ओळीतील विशेषणाशिवाय निरर्थक राहतात. ७०० वर्षांनी सहित अशी ३० अधिक ३००० = ३०३० वर्षे तसेच " सप्ताब्दशतयुक्तेषु " हे " अब्देषु पंचसु " याचेही विशेषण आहे. व " सप्ताब्दशतयुक्तेषु त्रिषत्सु त्रिसहस्रेषु पंचसु अब्देषु " ही सारी सति सप्तमी आहे. तेव्हा वर्तकांचा अर्थ संस्कृतच्या प्राथमिक ज्ञानाशी देखील सुसम्बद्ध नाही.

वर्तकांनी शेवटच्या ओळीत " पंचशतासु " असा शब्द आहे तो " पंचाशत्सु " असा मानला आहे. त्याला काहीही आधार नाही. ऐहोळे हा शिलालेख आहे व शिलालेखात पाठभेद नसतात

तसेच कलिकाल सांगताना " गतेष्वब्देषु " म्हणजे इतकी वर्षे गेली असताना व तसेच शक काल सांगताना समासु समतीतासु म्हणजे वर्षे व्यतीत झाली असताना " हे शब्द वापरले आहेत. भारतीय युद्धापासूनची वर्षे सांगताना असे कोणते शब्द वापरले आहेत हे वर्तकांनी सांगितले नाही व असे शब्द असल्याशिवाय केवळ " तीसामध्ये व तीन हजारमध्ये " या शब्दावरून ३०३० वर्षे गेली असा अर्थ निघू शकत नाही.

### व्यासांच्या काळी ब्रिटिशकालीन पंचांगवाद

अश्विनी पूर्णिमेत पावसाळ्याचा प्रारंभ होतो असे रामायणात वचन आहे असे वर्तक म्हणतात. त्यांनी याचा संदर्भ दिलेला नाही.

महाभारतातील " प्राप्तु कलियुगं विध्दि " म्हणजे कलियुग प्राप्त झाले आहे असे जाण याचा अर्थ " कलियुग सुरू झाले नसले तरी ते सुरू झाले आहे असे मान " असा वर्तकांनी केला आहे. विद या धातूचा जाणणे असा अर्थ आहे, मानणे असा अर्थ नाही.

" व्यासाने पुष्य नक्षत्राला अश्विनी म्हटले आहे. असा वर्तकांचा आरोप आहे. " पुष्याचा " अश्विनी असा अर्थ कोशात दिलेला नाही.

पुढे तर व्यासांनी कूटे निर्माण करण्यासाठी कुठे सायन व कुठे निरयन नक्षत्रे घेतली आहेत असे म्हणून वर्तकांनी कमालच केली आहे. व्यासाच्या काली सायन/निरयण वाद होता असे यात गृहीत धरले आहे. हे ज्योति:शास्त्राच्या ज्ञात इतिहासाशी सर्वस्वी विरुद्ध आहे. शिवाय व्यासांना इतिहास सांगायचा नसून कोडी रचायची होती असाही यात आरोप आहे. गणपतीला लवकर लिहिता येऊ नये म्हणून व्यासाने महाभारतात कूटे घातली ही कथा महाभारताच्या सर्व प्रतीत नाही. शिवाय गणपती हा प्रत्यक्ष देव व्यासांचा केवळ लेखनिक झाला ही कथा व्यासांचे श्रेष्ठत्व वर्णिण्यासाठी स्पष्टपणेच



नंतर रचण्यात आली आहे.

शेवटी नागपुरचे ज्योतिर्विद प्रभाकरराव होले यांच्या विवेचनाकडे वळू. महाभारतात " ज्यैष्ठी अमावास्येला युद्ध सुरू होऊ द्या " असे कृष्ण कर्णाला म्हणतो असे वचन आहे. या अमावास्येला खरोखर युद्ध सुरू झाले नाही असे महाभारतात स्पष्ट वचन कुठेही नाही व वरील सूचनेप्रमाणे युद्ध सुरू न करण्यास काही कारणेही झाली नाहीत. तसेच दुसऱ्या कोणत्या दिवशी युद्ध सुरू झाले ते महाभारत सांगत नाही. तेव्हा कार्तिकाच्या ज्यैष्ठी अमावास्येला युद्ध सुरू झाले असे मानणेच उचित आहे, नाहीतर हे निरर्थक विधान घालण्यात काहीच हेतू दिसत नाही.

पण होल्यांच्या दैनंदिनीशी कार्तिक अमावास्येला युद्ध सुरू झाले हे जुळत नाही. म्हणून त्यांनी मध्ये अधिक मास घेऊन मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला युद्ध सुरू झाले असे मानले आहे. असे मानण्यास आधारभूत असे एकही वचन महाभारतात नाही. तसेच या दिवशी लहान गीतेचा उपदेश झाला व भीष्मपतनानंतर मार्गशीर्ष शुद्ध ११ ला आध्यात्मिक गीतेचा उपदेश दिला गेला असे मानले आहे. त्यानंतर १२ दिवस युद्धस्थगिती मानली आहे. या कोणत्याच कल्पनांना महाभारतातील कोणत्याच वचनांचा आधार नाही. स्वत:च्या कल्पनांचीच भारतीय युद्धाची दैनंदिनी ठरवायची तर ही काय कोणतीही ठरविता येईल.

आतापर्यंत भारतीय युद्धाची दैनंदिनी ठरविण्याच्या पाच प्रयत्नांचा परामर्श घेतला. हे सारे प्रयत्न महाभारतातील वचनांचा मन मानेल तसा अर्थ करून व महाभारतात ज्यांना आधार नाही अशा स्वैर कल्पना करून आपण काही साधल्याचा दावा करीत आहोत हे या परामर्शावरून दिसून येईल.

वरीलपैकी कवीश्वर सारा महाभारत ग्रंथ एकाच वेळी लिहिला गेला असे मानतात. वर्तकही असेच मानतात असे त्यांच्या लिहिण्यावरून दिसते, कारण त्यांनी महाभारतातील सारीच वचने व्यासकालीन मानली आहेत. या मुद्याकडे मी होल्यांचे लक्ष वेधले पण त्याचे त्यांना महत्त्व वाटले नाही. दप्तरी हे वरील लेखकांपैकी एकमात्र लेखक असे आहेत की ज्यांनी महाभारताची तीन संस्करणे झाली हे मान्य केले आहे. तरीपण कोणते वचन व्यासकालीन व कोणते उत्तरकालीन याचा विचार त्यांनी कुठेच केला नाही. त्यांना अडचणीची वाटणारी काही वचने त्यांनी प्रक्षिप्त मानली आहेत व काहीत हस्तलिखितांचा आधार नसलेला फेरफार केला आहे.

येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की महाभारतात प्रक्षिप्त या शब्दाला काही अर्थ नाही. कालिदासाच्या मेघदूतात प्रक्षेप आहेत. मल्लिनाथाने कालिदासाचे श्लोक ११५ मानले आहेत व प्रक्षिप्त श्लोक ११ मानलेले आहेत. म्हणजे मूळ श्लोकांच्या तुलनेत प्रक्षिप्तांची संख्या नगण्य आहे. पण महाभारताचे तसे नाही. महाभारतसंहितेचा चिकित्सक अभ्यास करणाऱ्यांच्या दृष्टीने व्यासाने ८००० श्लोक रचले, त्यांचे वैशंपायनाने २४००० केले व सौतीने एक लक्ष केले. म्हणजे मूळ ग्रंथापेक्षा प्रक्षेपच अधिक आहेत. तेव्हा महाभारतात

प्रक्षेप आहेत असे न म्हणता महाभारताची दोनदा सुधारून वाढविलेली आवृत्ती निघाली. असे म्हटले पाहिजे. अशा परिस्थितीत "अमुक श्लोक प्रक्षिप्त आहे" याचा अर्थ काय? तो व्यासाच्या आवृत्तीत प्रक्षिप्त आहे, वैशंपायनाच्या की सौतीच्या?

भांडारकर इन्स्टिट्यूटने या प्रश्नाचे उत्तर सौतीची आवृत्ती प्रचारात आल्यानंतर प्रक्षिप्त झालेले असे दिले आहे.

पण सौतीची आवृत्तीच मुळी बुद्धोत्तर आहे. त्यापूर्वीची वैशंपायनाची आवृत्ती ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकातली असावी कारण तिच्यातील ज्यौतिषीय व पुरातत्त्वीय उल्लेख या काळचे आहेत.

भारतीय युद्ध ३१०१ खि.पू. या सुमारास झाले हे बहुमत मान्य केले तर व्यासाची मूळ आवृत्ती या सुमाराची आहे. म्हणजे महाभारताच्या निरनिराळ्या आवृत्त्यात हजार हजार वर्षांचे अंतर आहे.

अशा या ग्रंथात दैनंदिनी लिहिण्याइतके काटेकोर सुसंगत उल्लेख सापडतील असे वरील पाच लेखकांना वाटतेच कसे?

महाभारतातील निरनिराळ्या उल्लेखात संगती नाही याचे कारण ते उल्लेख हजारो वर्षांच्या अंतराने केलेले आहेत.

यापैकी "होल्यांनी ज्याचा योग्य अर्थ लावला आहे तो रोहिणी नक्षत्रातील शुक्ल अष्टमीला भीष्माचा मृत्यू झाला" हा उल्लेख व्यासकालीन असावा कारण ज्योतिषदृष्ट्या तो त्या कालचा ठरतो.

भीष्माचे निधन माघ महिन्यात झाले हा उल्लेख ख्रि.पू. ३००० चा असू शकत नाही. कारण ख्रि.पू. ३००० मध्ये माघ हे नाव प्रचारात नव्हते, या महिन्याला तप असे म्हणत. वेदांगज्योतिषात माघ महिन्यात उत्तरायण सुरू होते सांगितले आहे. वेदांगज्योतिषाचा काल ख्रि.पू. १४०० हा आहे. तेव्हा माघ महिन्याचा हा उल्लेख ख्रि.पू. दुसऱ्या सहस्रकातला असावा.

माघ महिन्याचा उल्लेख आल्यावर ख्रि.पू. पहिल्या सहसकसत भीष्म ५८ रात्री शरपंजरी होता ही कल्पना आली कारण भारतीय युद्ध फक्त १८ दिवस चालले अशी त्यावेळी कल्पना प्रसृत झाली. वस्तुतः महाभारतातील श्लोकात कोणत्या दिवशी काय घडले याचा उल्लेख नाही. हा उल्लेख हा भारताच्या अनुक्रमणिकामध्ये आहे व अनुक्रमणिका स्पष्टपणेच महाभारताचे शेवटचे म्हणजे सौतीकृत संस्करण झाले तेव्हाच्या आहेत. अनुक्रमणिकेमध्ये ज्या श्लोकसंख्या दिल्या आहेत त्या वैशंपायनाच्या व व्यासाच्या आवृत्तीशी जळत नाहीत, सौतीच्या आवृत्तीशीच जुळू शकतात.

कोणत्याही युद्धाचा इतिहास पाहिला तर त्यात त्या युद्धाचे दिवसवार वर्णन असलेले आढळत नाही. झाशीचा वेढा हा दिवस घातला पण विष्णुभट गोडसेने त्याचे दिवसवार वर्णन केलेले नाही. ज्या दिवशी महत्त्वाच्या घटना घडल्या त्यांचेच वर्णन केले आहे. चर्चिलच्या द्वितीय महायुद्धाच्या इतिहासात प्रत्येक वर्षाचे वर्णन आहे पण प्रत्येक महिन्याचे



वर्णन नाही, कारण सहा वर्षे चाललेल्या युद्धात प्रत्येक वर्षी महत्त्वाच्या घटना घडल्या तरी प्रत्येक महिन्यात त्या घडतील असा संभव नाही.

भारतीय युद्धातील सेना पाकिस्तानातील पंजाब, राजस्थान, हरियाना, सारा रोहतक- "समस्तं रोहितारण्यम्" व अहिच्छत्र म्हणजे रामपूर येथपर्यंत पसरल्या होत्या असे उद्योगपर्वात विधान आहे. अर्थात या सर्व ठिकाणी लढाया झाल्या असणार. पण महाभारतात फक्त कुरुक्षेत्रावरील लढायांचेच वर्णन आहे. काही लढायांच्या वर्णनामध्ये त्या कुरुक्षेत्राच्या बाहेर बऱ्याच अंतरावर झाल्या असतील असा संशय येतो. उदाहरणार्थ अर्जुनाचे संशप्तकाशी युद्ध. हे युद्ध कुरुक्षेत्रावरच झाले असते तर अर्जुनाला संशप्तकाचा काही तात्पुरता बंदोबस्त करून अभिमन्यूच्या रक्षणाला येता आले असते. ते कसेही असले तरी जेथे कृष्ण, अर्जुन, दुर्योधन, व कौरवांचे सेनापती आणि इतर पांडव यांचा प्रत्यक्ष संबंध नव्हता अशा लढायांचे वर्णन महाभारतात नाही. पण अठरा अक्षौहिणी सैनिक ज्या लढाईत लढले तीत सारेच खाशे साऱ्याच लढाईत स्वतः लढले असतील असा संभव नाही.

तात्पर्य महाभारतात युद्धाचे दिवसवार वर्णन नव्हते, घटनाशः वर्णन होते. या वर्णनावरून सौतीच्या काळी हे युद्ध अठरा दिवसांचे होते अशा समजुतीने अनुक्रमणिका लिहिल्या गेल्या, वस्तुतः युद्ध अठरा दिवसांपेक्षा पुष्कळ जास्त दिवस लढले गेले व अठरा संख्येला बांधून घेऊन युद्धाच्या तिथ्यांची व्यवस्था लावण्याची गरज नाही.

युद्धाचे दिवस १८ च ही बंदी एकदा मोडली की महाभारतातील युद्धाच्या तिथ्यांची संगती लावण्यासाठी फक्त आणखी एकाच दंडकाची आवश्यकता आहे. तो म्हणजे जी वचने केवळ फलज्योतिषीय आहेत त्यांना निरीक्षणाचा आधार नाही असे समजून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे.

असे केल्यास पुढीलप्रमाणे संगती लागते.

युद्ध कार्तिक अमावास्येला सुरू झाले. बलराम कृष्णाला भेटून पुष्य नक्षत्रावर यात्रेला निघून गेला व ४२ दिवसांनी गदायुद्धाच्या दिवशी परत आला. तो सोडून गेला त्या दिवशी कृष्णाने कुरुक्षेत्रावर पांडव सैन्य नेले, त्या दिवशी युद्ध सुरू झाले नाही तेव्हा ज्यैष्ठी अमावास्येपासून गदायुद्धापर्यंत ४२ दिवस गेले असे मानण्याचे कारण नाही. बलराम गेल्यापासून ४२ दिवसांनी गदायुद्ध झाले असे मानण्यात फक्त युद्ध अठरा दिवस झाले या समजुतीचाच अडथळा आहे. ती समजूत साधार नसल्यामुळे तो अडथळा दूर होतो. कार्तिक अमावास्येपासून ६८ दिवसांनी माघ शुक्ल अष्टमी येत असल्यामुळे भीष्म ५८ रात्री शरपंजरी होता हा उल्लेख ख्रि.पू. दुसऱ्या सहस्रकातला लावला. तर संगती लागते, तो व्यासकालीन उल्लेख मानला तर संगती लागत नाही कारण व्यास काली कार्तिक ज्यैष्ठी अमावास्येनंतर ९८ दिवसांनी रोहिणी नक्षत्रात उत्तरायण येते, ६८ दिवसांनी नव्हे. चौदाव्या दिवशी रात्रीयुद्ध झाले त्यात सकाळी चंद्रोदय झाल्याचे वर्णन आहे. ते कार्तिक अमावास्येपासून सतत दर दिवशी युद्ध झाले असे मानले तर

जुळत नाही. पण फक्त १८ दिवस भारतीय युद्ध झाले ही अडचण एकदा दूर झाल्यावर वर्णिलेल्या दिवसाव्यतिरिक्त इतर दिवशीही युद्ध झाले असे मानून चंद्रोदयाची रात्र कृष्ण अष्टमीची देखील मानता येते.

अठरा दिवस भारतीय युद्ध झाले या सौतीकालीन समजुतीमुळे महाभारतात १८ या संख्येला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. १८ दिवस युद्ध, महाभारताची पर्वे अठरा व गीतेचे अध्याय अठरा.

पुढे देखील अठरा पुराणे, अठरा विद्या, अठरा प्रकारचे विवाद वगैरे रूपाने या अठरा संख्येची महती वाढत गेली.





११

# कलियुग व भारतीय युद्ध

लेखक नी.र.वऱ्हाडपाण्डे 38 हिन्दुस्तान कॉलनी, अमरावती रोड ,नागपुर 440033
दूरभाष 5540190

ता. 9/4/2009 च्या प्रज्ञालोकांमध्ये श्री. र.य. साने यांचा "युगाब्द वास्तव की काल्पनिक" हा लेख प्रकाशित झाला आहे. हल्ली युगाब्द व कलियुग यामध्ये भेद केला जातो.श्री. साने यांचा लेख युगाब्दाबद्दल नसून पारम्परिक कलियुगाबद्दल आहे.

लेखाच्या सुरवातीला." इतक्या प्राचीन काळात अशी कालगणना करण्याइतकी आपली संस्कृति प्रगत होती ही कल्पना सर्व भारतीयांची छाती अभिमानाने फुगून यावी इतकी सुखावह नक्कीच आहे." असे वाक्य आहे. हे वाक्य लिहून श्री साने असे सुचवू इच्छितात की आपल्या पूर्वजांचा गौरव करण्यासाठी ज्याप्रमाणे वेदातील विमाने व ॲटम बौम्ब यांची वर्णने केली जातात त्याचप्रमाणे प्राचीन भारतीय संस्कृतीचे महत्व वाढविण्यासाठी कोणी तरी कलियुग नावाची भाकडकथा रचली आहे.

ही समजूत निव्वळ अज्ञानावर आधारलेली आहे. गप्पा मारून आपल्या संस्कृतीचे मोठेपण सांगणारा न्यूनगण्ड इसवी सनाच्या दुसऱ्या सहस्रकात जेव्हा बहुवंश भारत पारतन्त्र्यात पडला तेव्हा निर्माण झाला आहे. कलियुगाची कल्पना इसवी सनाच्या दुसऱ्या सहस्रकात निर्माण झाली नाही. कलियुगाचा उल्लेख करणारा आर्यभट्ट पाचव्या शतकातला आहे हे साने यांना मान्य आहे.आपल्या संस्कृतीचे महत्व वाढविण्यासाठी आर्यभट्टाने कलियुगाची थाप मारली असे सानें यांना म्हणायचे आहे काय? आर्यभट्टानेच जगाला अङ्कगणित व बीजगणित शिकविले. न्युनगण्ड जोपासण्यासाठी थापा मारण्याची आर्यभट्टाला आवश्यकता नव्हती. भारतीय व पाश्चात्य खगोलाचे अधिकारी विद्वान् अभ्यंकर भारतीय युद्ध कलियुगारम्भी झाले हे भारतीय युद्धात वापरलेल्या शस्त्रास्त्रांच्या आधारे मानावयास तयार आहेत. भारतीय युद्धातली शस्त्रास्त्रे लोखण्ड व कासे यांचा शोध लागण्यापूर्वीची आहेत या पुरातत्वीय आधारावर कलियुगाचे समर्थन करणारे लेखक सांस्कृतिक न्यूनगण्डाने पछाडले आहेत असा आरोप करणे विचित्र आहे.

## निराधार विधाने

सान्यांच्या लेखात अनेक चुकीची विधाने आहेत. उदाहरणार्थ

### 1. "कलियुगाचा प्राचीनतम उल्लेख आर्यभठ्टाच्या आर्यभटीय या तन्त्रग्रन्थात सापडतो".

वस्तुतः महाभारतात खालील स्पष्ट उल्लेंख आहेत

अन्तरे चैव सम्प्राप्ते कलिद्वापरयोरभूत्।
स्यमन्तपंचके युद्धं कुरुपाण्डवसेनयोः।

" द्वापर आणि कलि युच्या संन्धिकालात स्यमन्तपंचक सरोवराजवळ कौरव/पाण्डवांचे युद्ध झाले. "

यानन्तर वैशम्पायनाने ज्या जनमेजयाला भारतीय युद्धाची हकीकत सांगितली त्याला त्याचे मन्त्री सांगतातः

एतद्वर्षसहस्राय राज्यं कलियुगे गतम्।
महाभारताची दक्षिणी प्रत

म्हणजे वैशम्पायन व्यासांच्या हजार वर्षे नन्तर झाला हे महाभारतात कलियुगाच्या परिभाषेत सांगितले आहे.

यानन्तर

भीमाने कमरेखाली प्रहार करून दुर्योधनाला मारले याचे समर्थन करताना कृष्ण म्हणतो

एतत्कलियुगं विद्धि अचिराद्यत्प्रवर्तते।

कलियूग लवकरच सुरू होणार आहे हे लक्षात ठेवून अशा तऱ्हेच्या आचरणाकडे सहिष्णुतेने पाहिले पाहिजे.

हे सर्व उल्लेख आर्यभट्टानन्तरचे आहेत असे साने यांना म्हणायचे आहे काय?लक्षश्लोकात्मक महाभारत मलबारच्या किनाऱ्यापर्यन्त खिस्तोत्तर 50 मध्ये प्रचलित होते असे क्रायसोस्टोम नावाचा ग्रीक प्रवासी म्हणतो.

महाभारतानन्तर भागवतपुराणात कलियुगाचा उल्लेख खालीलप्रमाणे आहे:.

विष्णोर्भगवतो भानुः कृष्णाख्योऽसौ दिवं गतः

तदाविशत्कलिर्लोकं पापे यद्रमते मनः।।

विष्णूचा अवतार कृष्ण धरातल सोडून गेला तेव्हा लोकात कलि शिरला म्हणजे कलियुग सुरू झाले.

सारी पुराणे गुप्तकालात रचली गेली असे मानले तरी भागवताचे वचन आर्यभट्टाच्या पूर्वीचे आहे याला बाध येत नाही.शिवाय पुराणांच्या रचना गुप्तकालात सुरू झाल्या नसून गुप्तकालात त्यांना हल्लीचे स्वरूप आले. मूळ भागवताचा काळ खिस्ताच्या पूर्वीचा आहे हे कोल्हटकर यांनी आपल्या भागवतावरील ग्रन्थात दाखवून दिले आहे

साने यांचे म्हणणे असे की हे उल्लेख आर्यभट्टाच्या पूर्वीचे असले तरी या उल्लेखांनी शालिवाहन व विक्रम शकापेक्षा कलियुग किती प्राचीन आहे हे कळत नाही व ते आर्यभट्टाच्या वचनावरूनच प्रथम कळते.

पण हेही म्हणणे टिकू शकत नाही कारण शतपथब्राह्मणावर भाष्य लिहिणाऱ्या व संवत्कर्त्या विक्रमाचा धर्माध्यक्ष असलेल्या श्रीहरिस्वामीने खिस्तपूर्वकालात कलियुगाचा उल्लेख असा केला आहे

यदाब्दानां कलेर्जग्मुः सप्त त्रिंशच्छतानि च।

चत्वारिंशत्समाश्चान्यास्तदा भाष्यमिदं कृतम्।।

कलियुगाची 3047 वर्षे गेल्यावर म्हणजे खिस्तपूर्व 54 मध्ये या भाष्याची निर्मिति झाली.

याप्रमाणे पंचाङ्गीय कलियुगाचा म्हणजे युधिष्ठिरशकाचा उल्लेख इसवीसनपूर्वकालात स्पष्टपणे आढळतो.

2."आर्यभट्टाने असेही मानले आहे की कलियुगारम्भी सारे ग्रह मेषारम्भी एकत्र होते आणि हा दिवस शुद्ध प्रतिपदेचा असून तो युगारम्भ आणि वर्षारम्भ होता

. असे आर्यभट्टाने कुठे म्हटले आहे याचा सन्दर्भ साने देत नाहीत.भारतीय खगोलविज्ञानाचे अध्वर्यु शं बा.दीक्षित म्हणतात की "सर्व ग्रह महायुगारम्भी एकत्र होते असे आर्यभट्ट म्हणतो. पण महायुग म्हणजे कलियुग नव्हे. तसेच "ग्रह एकत्र होते" असे आर्यभट्टाचे मत दीक्षित सांगतात ,मेषारम्भी एकत्र होते असे म्हणत नाहीत.तेव्हा साने कलियुगाबद्दल आर्यभट्टाची ते म्हणतात अशी कल्पना होती हे सिद्ध करणारे आर्यभट्टाचे वचन सन्दर्भासह उद्धृत करतील तर पुढे चर्चा करता येईल

3 "आर्यभट्ट युगपाद हा शब्द युग या अर्थी वापरतो"

युगे कृत ,त्रेता, द्वापर व कलि अशी चार आहेत. युगाचे पाद म्हणजे चतुर्थांश म्हणजे चार युगापैकी एक असा अर्थ आहे. तेव्हा साने यांनी युगपादचा युग हा अर्थ आर्यभट्टाच्या कोणत्या विधानाच्या आधारे त्याला चिकटविला आहे हे जाणण्याची उत्सुकता आहे.

4 "आर्यभट्टाने सारे ग्रह मेष राशीच्या आरम्भी केव्हा होते हे काढले असे गृहीत धरावेच लागते ~~कारण~~ त्याशिवायस कलियुगारम्भ एवढा निश्चितपणे त्यांना सांगता आलाच नसता".

हा फारच गहजब आहे. कलियुगाचे नावच मुळी सागते की हे युग कलिपासून म्हणजे कलहापासून वा युद्धापासून मोजलेले आहे.कलियुग एखाद्या खगोलीय घटनेपासून मोजले असे महाभारतात कुठेही म्हटलेले नाही. पौराणिक राजांचे काल पिढयांच्या गणनेने सांगतात. अभिमन्यूने मारलेला बृहद्बल रामाच्या एकतीस पिढया नन्तर झाला वगेरे. कल्हणाने राजतरङ्गिणीत पुराणातील राजांच्या पिढया भारतीय युद्ध कलिद्वापरांच्या सन्धीत झाले असे मानून सांगितल्या आहेत असे म्हटले आहे.. सूत लोक यां वंशावळि जतन करून ठेवीत.सान्यांनी रामायण, महाभारत ,पुराणे व शिलालेख यात



उल्लेखिलेली कोणती कालगणना खगोलीय आहे हे दाखवून द्यावे. सप्तर्षिचाराची गणना या विधानाला छेद देत नाही कारण सप्तर्षीना गति नसल्यामुळे ही गणना वस्तुतः खगोलीय नाही.

हे सान्यांनी पुढील वाक्यात कबूल केले आहे

"ज्योतिर्गणितीय युगे आणि महाभारतात उल्लेखिलेली व्यावहारिक युगे..".

असे जर आहे तर साने आर्यभट्टांच्या माथी या विषयाचे अज्ञान थोपून त्याच्या ग्रन्थात न आढळणारे गणित त्याने केले म्हणून आरोप का करतात?...महाभारतात उल्लेखिलेली युगे व्यावहारिक आहेत हे आर्यभट्टाला माहीत नव्हते काय?

साने भारतीययुद्धकाळ या अर्थी महाभारतकाळ असा शब्द वापरतात. आपल्या भारतीय युद्धावरील पुस्तकात महाभारतातले प्रत्येक विधान हे भारतीय युद्धकालीन आहे असे गृहीत धरतात.या समजुती महाभारत संहितेचे पूर्ण अज्ञान दर्शिवितात.भारतीय युद्ध एका विशिष्ट दिवशी सुरू होऊन 18 दिवस चालले. महाभारत ग्रन्थाची गोष्ट तशी नाही. महाभारताचे लेखन कलियुगाच्या काही वर्षे पूर्वीपासून ते खिस्तारम्भा पर्यन्त सुमारे 3000 वर्षे सुरू होते. भारतीय युद्ध आणि महाभारत यातील हा फरक सतत लक्ष्यात ठेवला नाही तर या क्षेत्रातील गोन्धळ कधीच नाहीसा होणार नाही.

स्वतःच्या डोक्यात असलेला गोन्धळ ते खालील वाक्यात आर्यभट्टाच्या माथी मारतात

"वरील उल्लेखांच्या म्हणजे महाभारतातील ज्यौतिषीय विधानांच्या आधारावर आर्यभटाटांनी ज्योतिर्गणितीय कलियुगाची सांगड जर भारतीय युद्धाशी घातली असेल तर ती वास्तववादी नाही".

आहे की नाही कमाल्! आधी जे गणित आर्यभट्टाने केलेच नाही ते त्याच्या माथी मारायचे व मग " हे वास्तववादी नव्हे" म्हणून त्याची कीव करायची.

पंचाङ्गात कलियुगाबरोबरच महावीरयुग, विक्रमसंवत् व शालिवाहन शक याचा उल्लेख आहे. गेल्या हजार दीड हजार वर्षात भारतात बौद्ध समाज नव्हता. त्यामुळे महावीरसंवत्सरासारखा बौद्ध संवत्सर प्रचलित नाही. पण बौद्ध देशात तो आहे. व तो वर्षगणनेवर आधारलेला आहे.

भारतात अशोकानन्तर काही शतके बौद्धशक प्रचारात होता असे दिसते. बुद्ध हा शाक्य होता त्यामुळे या शकाला बुद्धशकच म्हणत होते. याला आधार म्हणजे गर्ग नावाच्या ज्योतिर्विदाने शककालात 2526 वर्षे मिळविली म्हणजे युधिष्ठिराचा काळ येतो असे म्हटले आहे.;(वराहमिहिर ) हा गर्ग खिस्तपूर्व होता अशी परम्परा आहे(चिं.वि.वैद्य)अर्थात् त्याने उल्लेखिलेला शककाल हा शालिवाहन शक असू शकत नाही. बुद्धशकाचा प्रारम्भ 486 [खिस्तपूर्व आहे याबद्दल बहुमत आहे. तेव्हा

2526+486=3012 हा युधिष्ठिराचा काळ येतो.

वराहमिहिर येथे शालिवाहन शक घेतो असे काही लोकांचे म्हणणे आह. वराहमिहिर सहाव्या शतकात झाला. तेव्हा बुद्धशक फारसा प्रचारात नसल्यामुळे त्याने अशी चूक करणे शक्य आहे.

गर्गाच्या मताची पुष्टि आज उपलब्ध असलेल्या पुराणांच्या वचनाने देखील होते.भागवतात परीक्षिताच्या जन्मापासून नन्दांच्या राज्याभिषेकापर्यन्त 1015 वर्षे झाली असे वचन आहे. हा परीक्षित् म्हणजे मृतावस्थेत जन्मलेला अर्जुनाचा नातु असे समजून काही लेखक भारतीययुद्ध पन्धराव्या शतकात. खेचतात.पण युधिष्ठिरासारख्या शककर्त्याला व स्वतचा नायक जो श्रीकृष्ण त्याला सोडून भागवत मृत जन्मलेल्या परीक्षितापासून कालगणना करील हें शक्य नाही.

या गणनेतला परीक्षित स्पष्टपणेच अथर्ववेदातला परीक्षित आहे. त्याचे वर्णन "विश्वजनीन "व ज्याच्या राज्यात लोककल्याण होते – जनः स भद्रमेधते राज्ये राज्ञः परीक्षितः– अशा शब्दांनी केले आहे; (20 / 127)अथर्ववेदाचा काळ खि.पू. पन्धरावे शतक असा घेण्यास काहीच अडचण नाही. 1015 वर्षे मोजायची ती या परीक्षितापासून.

नन्दापासून अथर्ववेदातील "विश्वजनीन" परीक्षितापर्यन्त मागे गेले की आपण 1400 खिस्तपूर्वपर्यन्त पोचतो. आता भारतीय युद्धापासून केलेल्या ज्या दोन गणना उपलब्ध आहेत त्यांचा विचार करू. एक म्हणजे कलियुगारम्भापासून वैशम्पायनाने ज्या जनमेजयाला भारत सागितले तो

कलियुगाची हजार वर्षे लोटल्यावर झाला हा महाभारताच्या दक्षिणीप्रतीत सापडणारा उल्लेख व दुसरे म्हणजे जरासन्धाच्या पित्यापासून सुरू होणाऱ्या बार्हद्रथ वंशाने हजार वर्षे राज्य केले. या दोन उल्लेखांनी खिस्तपूर्व 2100 पर्यन्तचा हिशेब लागतो

आता खिस्तपूर्व 2100 व खिस्तपूर्व 1400 मधील 700 वर्षांचा प्रश्न उरतो.दप्तरींनी या काळात झालेल्या 17 राजांच्या कारकीर्दीची बेरीज 362+ 138 =. 500 दिलेंली आहे.ही बंरीज 200 ने कमी पडते. जेथे हजारो वर्षाचा वाद आहे तेथे एवढी त्रुटि गाजावाजा करण्यासारखी आहे असे वाटत नाही.

पण या त्रुटीचेही स्पष्टीकरण आहे.कल्हणाने राजतङ्गिणीत लिहिले आहे की पुराणातील काश्मीरच्या राजांच्या पिढया भारतीय युद्ध कलियुगारम्भी झाले या समजुतीवर आधारलेल्या आहेत.ही समजूत कल्हणाला मान्य नाही म्हणून त्याने त्या दुरुस्त केल्या. ही दुरुस्ती त्याने सांगितलेला सप्तर्षिकाल व कलियुग यातील फरकाइतकी आहे.".पण सप्तर्षिकाल कोणत्याच ज्योतिर्विदाला मान्य नसल्यामुळे कल्हणाले दुरुस्ती केली नसून बिघाड केला असाच सिद्धान्त होतो.

मेगॅस्थेनिसच्या वेळी पुराणातील पिढयांचा हिशेब जुळत होता हे वैद्यांनी दाखवून दिले आहे. आर्यभट्टाला तो उपलब्ध होता व त्याने त्याच्याच आधारावर कलियुगारम्भ मानला. काल्पनिक गणित करून नव्हे.

चिं.वि. वैद्य यानी महाभारताचा उपसंहार हा ग्रन्थ लिहून महाभारताच्या ऐतिहासिक संशोधनाचा पाया घातला एवढेच नव्हे तर आजकाल या विषयावर लिहले जाणारे वाङ्मय वाचले की यापैकी कोणतेच वैद्यांच्या दर्जाचे नाही असे दिसून येते. वैद्यांनी कलियुग व आर्यभट्ट याची विस्ताराने चर्चा केली आहे. त्यांचे खालील काही उद्गार प्रस्तुत करतो.

" कित्येकांचे असे मत आहे की कलियूगारम्भ आर्यभट्टाने गणिताने काढला. पण हे मत टिकू शकत नाही. कलियुगारम्भी अमुक ग्रहस्थिति होती हे पूर्वी कोठेही सांगितले नाही. मग गणिताला आधार कोणता? उदाहरण करताना उदाहरणाचा पायाही काल्पनिक आणि उत्तरही काल्पनिक अशा प्रकारचे वेडेपण करणारा आर्यभट्ट नसावा. मेग्यास्थेनिसच्या हकीकतीवरून पूर्वी वंशावळि होत्या हे निश्चित. अशा वंशावळीवरून युधिष्ठिरास झालेली वर्षे लोकांस माहीत होती व त्यावरून कलियुगाचा आरम्भकाल ठरविला गेला''"

## 5 "सूर्यासोबतचे इतर ग्रह देदीप्यमान असू शकत नाहीत. खरे तर दृश्यच असू शकत नाहीत"

कलियुगारम्भी सर्व ग्रह एकत्र होंते(मेष राशीत नव्हे) असे आर्यभट्ट मानत असल्याचा शं बा. दीक्षितांनी निर्वाळा दिला आहे.याबद्दल वरील विधान आहे

महाभारतातील वाक्य असे आहे

.'दीप्यमानाश्च सम्पेतुर्दिवि सप्त महाग्रहाः''.येथे दीप्यमानाः या शब्दाचा अचूक अर्थ करणे आवश्यक आहे. दीप्यमान हा कर्मणि प्रयोग आहे. दीप्यमान म्हणजे ज्यांच्यावर प्रकाश टाकला गेला आहे ते. प्रकाशणारे नव्हेतःपणतीवर पेंट्रोमॅक्सचा प्रकाश पडतो तेव्हा पणती "दीप्यमान" असते. म्हणून ती दिसत नाही.

दुसरा महत्वाचा शब्द "सम्पेतुः" असा आहे. सम्पेतुः म्हणजे ज्यांचा सम्पात झाला आहे ते. सम्पात म्हणज छेद. इंग्रजीत याला intersection म्हणतात.साऱ्या ग्रहांचा सम्पात झाला होता म्हणजे ते एकत्र होते अशी स्थिति. अशी स्थिति खिस्तपर्वू 16 / 4 / 3243 रोंजी होती. या दिवशी पाच ग्रह आणि चन्द्र सूर्याजवळ एकत्र असल्यामुळे अदृश्य होते असे अभ्यंकर व वल्लभ यांनी संगणकाच्या साहाय्याने आपण सिद्ध केल्याचे सिमला येथील महाभारतावरील परिसंवादात सांगितले. आर्यभट्टाने हे गणिताने काढले नाही तर हे त्याला महाभारतावरून कळले. महाभारतात हे विधान मौखिक परम्परेच्या आधारावर केलेले आहे.तसेच भारतीय युद्ध कलियुगारम्भी झाले हे महाभारतकारांना पौराणिक परम्परेने माहीत होते. गणिताचा येथे प्रश्न नाही



## 6.उत्तरायणारम्भी श्रवणनक्षत्र असण्याचा काळ इ.पू. 1380 ते इ.पू.. 480 असा आहे,

महाभारतातील शकुन्तलेच्या वचनात "उत्तरायणारम्भी श्रवण नक्षत्र" असे शब्द नसून "श्रवणारम्भी उत्तरायण" असे शब्द आहेत व हा काळ टिळक आणि दीक्षित यां दोघांनीही खि.प. 400 असा दिलेला आहे.मूळ वाक्य असे आहे

प्रतिश्रवणपूर्वाणि नक्षत्राणि चकार ह।

श्रवण नक्षत्रापासून सुरु होणरी प्रति नक्षत्रगणना सुरू केली. विश्वामित्राने प्रतिसृष्टि निर्माण केली या परम्परेचा येथे सन्दर्भ आहे.

## 7. महिन्यांची नावे मात्र आपण ग्रीकाकडून घेतलेल्या राशि या साधनावरून ठरविली जात असत.

ग्रीकांच्या कोणत्या ग्रन्थावरून आपल्याकडच्या कोणत्या ग्रन्थाने राशि घेतल्या हे साने सप्रमाण सांगतील काय? महाभारतात भीमाचा जन्म सांगताना त्याची सिंहराशि सांगितली आहे. रामाचा जन्म कर्क लग्नरवर झाला असे रामायणात वचन आहे. खुद्द ऋग्वेदातून मी मेष, कर्क, मिथुन,वृषभ आणि कन्या या राशींची नावे काढून दाखविली आहेत. प्रतिकूल प्रमाण दाखविल्यावरही त्याचे खण्डन न करता आपले मूळचेच निराधार ग्रह कुरवाळत बसण्याची इतर अनेक लेखकाप्रमाणेच सान्यांचीही सवय आहे.

.भारतीय युद्धाबद्दल माहिती देणारा महाभारत हाच प्राचीनतम ग्रन्थ आहे.त्यात स्पष्टपणे भारतीय युद्धाचा काल सांगितलेला आहे. तो शिलालेखात देखील उद्धुत केला जातो.कलियुग केव्हा सुरू झाले याबद्दल काही वाद नाही.ते साऱ्या पंचाङ्गात दिले असते. तेव्हा भारतीय युद्ध कलियुग सुरू होण्याच्या सुमारास झाले नाही असे म्हणणारे या युद्धाबद्दलचा एकमेव आधार नाकारीत आहेत.

हा आधार त्यांनी नाकारला व भारतीय युद्ध काल्पनिक आहे असे म्हटले तर माझा काही तर्कशास्त्रीय आक्षेप नाही. पण भारतीय युद्धाचा काल निःसन्दिग्धपणे नमूद करणारी वचने नाकारून महाभाताताल्या दुसऱ्या काही वचनावरून विवाद्य गणिते करून हे भारतीय युद्धाचा काल काढू पाहतात तेव्हा.स्वतः फेकून दिलेल्या शिडीवरून भिन्त चढण्याचा अव्यापारेषु व्यापार करतात.

# श्री साने यांचे चुकलेले कालवेध

चुकलेले कालवेध या लेखाबद्दल काही विचार प्रकट करीत आहे
या लेखात पुढील निराधार विधाने आहेत

१ रामायण;महाभारत आणि इतर पुराणकथा याचे ऐतिहासिकत्व आता जवळपास सर्वमान्य झालेले आहे

नुकतेच भारत सरकारने सर्वोच्च न्यायालयात वक्तव्य दाखल करून राम ऐतिहासिक नाही असे आपले मत नोन्दविले होते. रामायण व महाभारत या दोन्ही भाकडकथा आहेत असे संकालिया म्हणतात.पुराणकथा ऐतिहासिक आहेत हें मान्य झाले आहे हेही आपले मत असेच निराधार आहे. पुराणात उल्लेखिलेल्या काही राजांची नाणी व शिलालेख सापडले आहेत एवढेच म्हणता येईल

२ मी गृहीत धरलेली म्हणून कलियुगारम्भ मेंग्यासथेनिसने दिलेली वंशावळ, पाण्डवकालीन मास पूर्णिमान्त होते; महाभारतात कार्तिक अमावास्येचा उल्लेख आहे हें मी गृहीत धरलेले आहे हे सिद्ध करणारे एखादे वाक्य साने यांनी उद्धृत करावे

कलियुगारम्भ भारतीय युद्धापासून धरावा अशी परम्परा या देशात निदान दोन हजार वर्षापासून आहे हे सर्वमान्य आहे. याचे पुरावे मी पूर्वी दिलेले आहेत. परम्परा हे इतिहासाचे एक प्रमुख प्रमाण मानले जाते.साने यांच्या मतांना परम्परेचा आधार आहे काय?

हिरॅक्लीसची पूजा शौरसेनी लोक करतात असे मेग्यासथेनिसने लिहिले आहे. यावरून हीरॅक्लीज हा श्रीकृष्ण ठरतो हे चिं वि. वैद्यांचे प्रतिपादन निर्णायक ठरते. मी वैद्याचा सन्दर्भ देऊन जी विधाने केली आहेत ती मी गृहीत धरलेली आहेत हा आरोप करता येणाार नाही

महाभारतात कार्तिक अमावास्येचा उल्लेख आहे हे विधान मी दप्तरींच्या आधारे केले आहे. त्याला गृहीत धरलेले विधान म्हणता येत नाही

पाण्डवकालीन मास पूणिमान्त होते असे मी म्टलेलेच नाही. अमान्त मासापेक्षा ती पद्धत जुनी आहे असे म्हटलेले आहे, कलियुगारम्भी पंचाड्ग वा तत्सदृश काही कालादर्श होते की नाही याचीच शड्का आहे. तेव्हा पाण्डवकाली कोणती मासपद्धति होती याबद्दल मी काही विधान करणेच शक्य नाही.

ज्योतिर्गणिताने काळ काढताना मास हे अमान्त असोत की पौर्णिमान्त त्याने काही फरक पडत नाही या वाक्याला पुस्ती जोडली पाहिजे.. सर्व गणितात सर्रास एकच पद्धति वापरली असेल तर फरक पडत नाही पण कुठे अमान्त व कुठे पूर्णिमान्त मास घेतले तरी फरक पडणार नाही काय?कार्तिक अमावास्या या शब्दाने उल्लंखिलेला दिवस दोन्ही पद्धतीत एकच असतो काय?

उलट सान्यांनीच पुढील गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत

१ आर्यभट्ठाने गणिताने कलियुगारम्भ ठरविला.

भारतीय खगोल ग्रन्थातून वा कोणत्याही प्राचीन ग्रन्थातून असे विधान काढून दाखववावे. चिं.वि. वैद्य हे भारतीय व पाश्चाय दोन्ही खगोलविज्ञानांचे पण्डित होते. त्यांनी या विधानाचे सविस्तर खण्डन केलेले आहे..

आर्यभट्टाने स्वतःचा जन्मकाल कलियुगात सांगितला आहे.प्रचलित युग सोडून स्वतच कल्पिलेंल्या युगात कोणी आपला जन्मकाल सागेल काय? सांगितला तर तो कोणास समजेल काय? नवीन कालगणना सुरू करण्यास आर्यभट्ट हा कोणी सम्राट् वा धर्मसंस्थापक होता काय? एखाद्या ज्योतिर्विदाने नवीन ऐतिहासिक कालगणना सुरू केली व ती समाजमान्य झाली असे उदाहरण देता येईल काय?

आर्यभट्टाने कल्पारभ ठरविण्यासाठी गणित केले व त्याच्या आधारे कलियुगाचा प्रारम्भ ठरविला असेल तर त्याने ते गणित आपल्या ग्रन्थात देऊन कल्पारम्भ या नावानेच तो काळ का सांगितला नाही?ा कलियुग म्हणजे युद्धयुग म्हणून भारतीय युद्धाशी त्याचा सम्बन्ध जोडण्याचा त्याचा हेतु काय?

इसवीसनपूर्व काळात वर्षमानाच्या परिमाणास शक हा शब्दलावलेलाआढळत नाही हे साने कशाच्या आधारावर म्हणतात?इसवीपूर्व काळातले कोणते ग्रन्थ आज उपलब्ध आहेत की ज्यांच्या आधारे असे विधान करता येईल? अशोकानन्तर भारतात बुद्धसंवत् सुरू होता असे म्हणण्यास आधार आहे. कारण अशोकाच्या शिलालेखात २१६ असा काल दिलेला आहे. बुद्धनिर्वाणानन्तर २१६ वर्षे असा अर्थ केला तर हा काळ अशोककालाशी तन्तोतन्त जुळतो. बुद्धाला शाक्य म्हणत होते हे सर्वज्ञात आहे मग गर्गाच्या वेळेस चालू असलेला बुद्धगणनेचा उल्लेख गर्गाने शक या शब्दाने करू नये तर कोणत्या शब्दाने? गर्ग खिस्तपूर्व काळातला होता असे विधान मी वैद्यांच्या आधारे केले आहे. तां खिस्तोत्तर होता असे साने कोणत्या आधारावर म्हणतात व तो आधार वैद्यापेक्षा जास्त विश्वसनीय का मानतात?.

गर्गाने शक कसा काढावा हे सांगितलेले नाही. शक गृहीत धरून युधिष्ठिराचा काळ कसा वा हे सांगितले आहे

भगवान् श्रीकृष्ण व सम्राट् यूधिष्ठिर उपलब्ध असताना जन्मतःच मेलेल्या परीक्षिताच्या नावापासून कोणीही कालगणना करणार नाही त्यामुळे अथर्ववेदात ज्याची महान् राजा म्हणून स्तुति आहे त्या परीक्षितापासूनच कालगणना केली गेली असावी हे कोणासही पटण्यासारखे आहे असे मला वाटत होते. पण सम्भाव्यतच्या सर्वमान्य कल्पना सान्यांना मान्य नाहीत असे दिसते. म्हणून मी माझ्या म्हणण्याला आणखी पुरावे देतो उत्तरायणाच्या उल्लेखावरून छान्दोग्य उपनिषद्. सोळाव्या शतकाच्या पूर्वीचे आहे असे टिळकांनी सिद्ध केले आहे. या उपनिषदात कृष्णाय देवकीपुत्राय या शब्दात श्रीकृष्णाचा निःसन्दिग्ध उल्लेख आहे. तेव्हा श्रीकृष्ण ख्रिस्तपूर्व चौदाव्या शतकातला असू शकत नाही

ऐतरेय ब्राह्मणात सोमक या द्रौपदीच्या पाच पिढया पूर्वी झालेल्या तिच्या सोमक या पूर्वजाचा उल्लेख आहे म्हणजे द्रौपदी व ऐतरेय ब्राह्मण यात एका शतकापेक्षा जास्त अन्तर नाही. ब्राह्मणे उपनिषदांच्या पूर्वीची आहेत हे सर्वमान्य आहे. दीक्षितांनी ब्राह्मणकाली कृत्तिका विषुववृत्तावर होत्या हे सिद्ध केलेले आहे. हा काळ खिस्तपूर्व ३000 चा आहे



महाभारतातील सारी विधाने भारतीय युद्ध काळातली आहेत मग त्या विधानात युद्धाचा उल्लेख असो वा नसो हे सान्यांचें मत सान्याशिवाय कोणासमान्य.होण्याचा सम्भव नाही.

सान्यांनी ज्या वचनावरून काल ठरविला आहे त्यात युद्धाचा कोठेही उल्लेख नाही एवढेच नव्हे तर उत्तरायणारम्भी श्रवण असे म्हटले नसून श्रवणारम्भी उत्तरायण असे म्हटले आहे त्यावरून येणारा काळ टिळक व दीक्षित या दोघांच्याही मते खि.पू ४00 हा आहे असे मी त्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. तेव्हा टिळक व दीक्षित यांचे खण्डन न करता तेच विधान करीत राहणे संशोधकास शोभत नाही.

३ महा भारतात ४३२000 वर्षाचे कलियुब सांगितलेले नाही स्पष्टपणे हजार वर्षाचे कलियुगव व चार हजार वर्षाचे कृत युग सांगितले सांगितलेले आहे. महाभारतातील श्लोकासाठी भाण्डारकर इन्स्टिटयूटचा प्रतीक इण्डेक्स पहावा. कलियुग समाप्त झाल्यावर कृतयुग येते म्हणूनच विक्रमसंवताला कृत म्हणतात.जनमेजयाला त्याचे मन्त्री कलियुगाची हजार वर्षे सम्पलेली आहेत म्हणजे कलियुग सम्पलेले आहे असे सांगतात यापासूनच वैशम्पायनाचे महाभारत सुरू होते

सान्यांच्या पृष्ठ २ वर महाभारत व पुराणे यातील अनेक विधाने उद्धृत केलेली आहेत. त्याचे स्वारस्य कळत नाही. या सान्या ग्रन्थांची रचना हजारो वर्षे होत होती.त्यात भर घालताना कालविर्यास होऊ नये याची दक्षता बाळगण्याची जरूर कोणाला वाटत नव्हती कारण यातील पात्रें चिरन्तन आहेत अशी श्रद्धा बळावली होती. तरी पण भागवतात कृष्णापासून लोकात कलि शिरला असे विधान आहे.पण कलि म्हणजे युद्ध .कलियुग युद्धापासून सुरू झाले म्हणून कृष्णापासून सुंरू होणाऱ्या युगाला काही लोक युगाब्द म्हणतात युद्धापासून युरू होणाऱ्या युगाला पंचाङ्गात युधिष्ठिर शक म्हटलेले आहे.ही गणना खगोलीय नाही हे स्पष्ट करण्याचा यात उद्देश आहे. साने कलियुगावर जे आक्षेप घेतात तसे आक्षेप शालिवाहन व विक्रम संवतावर एवढेच नव्हे तर खिस्ती शकावर देखील घेता येतील. इसवी सनाला जर सान्यांचे निर्दोष गणित लावले तर सारा इतिहासच उलटा पालटा होऊन जाईल.

भारतीय युद्धाची दैनन्दिनी लिहिता येईल अशी सान्यांची भाबडी समजूत आहे. ही समजूत महाभारत संहितेच्या पूर्ण अज्ञानावर आधारलेी आहे. महाभारतातच स्पष्टपणे लिहिले आहे की व्यासाने फक्त ८८00 श्लोक लिहिले. वैशम्पासनाने त्याचे २४000 केले व सौतीने उपाख्याने घालून एक लक्ष. वैशम्पायन व्यासानन्तर हजार वर्षानी झाला असेही महाभारतात स्पष्ट वचन आहे. सौतीचा काल ३00 ते २00 खिस्तपूर्व असे संशोधकांचे मत आहे. हे सर्व सान्यांच्या गावीही नाही

यावर श्री होले म्हणत असत की ऐतिहासिक कादम्बरी लिहिणारा देखील आपण वर्णिलेल्या घटनांचे काल बदलत नाही. त्यामुळे महाभारतात बुद्ध व अलेक्झण्डर यांचा उल्लेख असला तरी त्यातले ज्योतिर्विषयक उल्लेख भारतीय युद्ध कालचे आहेत. पण हे स्वतःचेच मत बाजूस सारून त्यांनी श्रवणारम्भी उत्तरायण हा उल्लेख त्याज्य मानला आहे. कादम्बरीकार शिवाजीवर कादम्बरी लिहिताना शिवाजीचा काल २१ वे शतक न सांगता सतरावे शतकच सागतो तसेच तो शिवाजी व गान्धी यांची भेट

झाली असेही लिहीत नाही. पण महाभारतात भीम व मारुती यांची भेट होते; कृष्ण बुद्धावर टीका करतो व विदुर युधिष्ठिराशी ग्रीक भाषेत बोलतो. अशा महाभारतावरून भारतीय युद्धाची दैनन्दिनी कशी लिहिता सेईल?

महाभारतात खिस्तपूर्व ३००० चे प्रमुख उल्लेख म्हणजे ताम्रपाषाणायुगातली शस्त्रे. यावर मी सिमला येथील महाभारत परिसंवादात निबन्ध वाचला होता. तो भारतीय ज्योतिःशास्त्राचे एक मोठे अधिकारी अभ्यंकर यांना मान्य आहे. आकाशात सात महाग्रहांचा सम्पात झाला होता हेही अभ्यंकरांच्या लेखात मान्य केले आहे हे मी आपल्या युगाब्दावरील लेखात दाखवून दिले आहे

ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकातले पुंरातत्वीय उल्लेख काशाच्या तरवारीचे व दप्तरींनी दाखविलेले ज्योतिर्विषयक

ख्रिस्तपूर्व पहिल्या सहस्रकाचे उल्लेंख मुख्यतः बोद्ध धर्माच्या झपाट्याने होणाऱ्या प्रसाराचे. अलेक्झाण्डरच्या स्वारीचा देखील उल्लेंख आहे

बौद्धोत्तर प्रमुख खगोलीय उल्लेख श्रवणारम्भीच्या उत्तरायणाचा

भारतीय युद्ध १८ दिवस चालले असा उल्लेख व्यासांच्या मूळ ८८०० श्लोकात होता की नाही याचीच शंका आहे

अशा महाभारतावरून आपण भारतीय युद्धाची दैनन्दिनी लिहिण्यास धजावता हा भाबडेपणा आहे..

ऐतिहासिक कलियुग व ज्योतिर्गणितीय कलियुग ही भिन्न आहेत असे सानें मला सांगता हा एक विनोद आहे पंचाङ्गात व शिलालेखात दिलेले कोणतेही युग ज्योतिर्गणितीय नाही् सप्तर्षींना गति नसल्यामुळे सप्तर्षियुग देखील याला अपवाद नाही. वस्तुतः प्रचलित कलियुग ज्योतिर्गणितीय नसून साने माथी मारू इच्छित असलेले युगच ज्याला काहीच पाया नाही अशा निर्दोष गणिताच्या आधारावर कल्पिलेले युग आहे.

आर्यभट्टाने सर्व ग्रह कलियुगारम्भी मेषात होते हे कोणत्या आधारावर म्हटले असे याने विचारतात व याला आर्यभट्टाने केलेल्या गणिताशिवाय दुसरा आधार असू शकत नाही असा आग्रह धरतात.

याची उत्तरे अनेक आहेत १ ही भाटांच्या बाडातील वंशावळीत सांगितलेली परम्परा असू शकते२ ही जनतेंत प्रचलित असलेली मौखिक परम्परा असू शकते ३ ही फलज्यैतिषीय परम्परा असू शकते४ अभ्यकरासाख्या ज्योतिर्विदांनी याचा एक अर्थ लावून त्याला मोहेंजोदरोतील उत्खननात आधार सापडतो असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

कलियुगारम्भ व कल्पारम्भ यात ३८८८००० वर्षांचें अन्तर होते या सान्यांच्या वाक्यात त्यांच्या साऱ्या घोटाळयाचा उलगडा होतो.

तो टिळकांनी केला आहे. कलियुग फक्त हजार वर्षांनी सम्पले तेव्हा परम्परेप्रमाणे कृतयुग सुर झाले. पण आपण कृतयुगात राहत आहोत यावर लोकांचा विश्वास बसेना. तेव्हा ही हजार वर्षे देवांची आहेत अशी कल्पना करून त्यांनी हजाराला ३६० ने गुंणले.कारण देवांचा एक दिवस मानवाच्या एका वर्षाएवढा असतो. हे गणित आर्यभट्टाचे नसून पुराणांचे



आहे आर्यभट्टाने भारतीय युद्ध कलियुगारम्भी झाले हे जसे पौराणिक परम्परेच्या आधारे म्हटले तसेच कलियुग ४३२००० वर्षांचे हेही पौराणिक परम्परेच्या आधारेच म्हटले.

ससान्यांच्या लिखाणात महाभारतकाळ असा उल्लेंख आहें. त्यांच्या विचारातला सर्व गोन्धळ या एका शब्दप्रयोगात व्यक्त होतो. महाभारतकाळ ख्रिस्तपूर्व ३००० पासून तो ख्रिस्तोत्तर ७०० पर्यन्त पसरलेला आहे् भाण्डारकर इन्स्टिटयूटने जी आवृत्ति प्रकाशित केली आहे ती ख्रिस्तोत्तर आठव्या शतकातली असावी असे प्रस्तावनेत स्पष्ट म्हटले आहे

कलियुगारम्भ वास्तव असता तर तो माघ मासापासून सुरू झाला असता चैत्रापासून नव्हे हे विधान करताना सान्यांनी दोन गोषटी गृहीत धरलेल्या आहेत १ कलियुग हे खगोलीय युग आहे २ महाभारतात कलियुग चेत्रापासून सुरू होते असे लिहिलेले आहे.

ऐहोळे शिलालेखापूर्वीच्या कोणत्याही शिलालेखात कलियुगाचा उल्लेंख नाही असा सान्यांचा आक्षेप आहे सान्यांनी सांगितलेला काळ वा संशोधकांनी ठरविलेले दुसरे कोणते काळ शिलालेखात सापडतात?शालिवाहन शकाचा व विक्रम संवताचा उल्लेख त्यांच्या प्रारम्भापासून शिलालेखात आढळतो काय? ख्रिस्ती शकाचा उल्लेख तरी खिस्तापासून कुठे आढळतो? अल्बेरुणी, हाथीगुम्फा वगैरेत कलियुगाचा उल्लंख का नाही असे साने विचारतात. कारण स्पष्ट आहे. बुद्धपूर्व इतिहासाची सारी माहितीच लुप्त झाली होती तेव्हा भारतीय युद्धानन्तर इतिहासकारांनी एकदम अडीच हजार वर्षांनी झालेल्या बुद्धावर उडी मारायची काय?

इतिहासात केवळ अनुल्लेखाच्या आधारे अनुमाने बान्धायची नसून उल्लेख अवश्य असता अनुल्लेख असेल तरच बान्धायची असतात.ऐहोळे शिलालेखाने कलियुगाचा ऐतिहासिक युग म्हणून उल्लेख केला तेव्हा हजारो वर्षांपासून ते ऐतिहासिक युग म्हणून मान्य झालेले होते हे स्पष्ट आहे.

यान्यांनी श्रीहरिस्वमीचा काळ वादातीत नाही असे म्हणून त्यावर चर्चा करणे टाळले आहे. त्यांच्याजवळ त्याविरुद्ध माण्डण्यासारखा काही मुददा नाही हे स्पष्ट आहे.

ज्योतिर्विदाभरण ग्रन्थात संवत्कर्त्या विक्रमाच्या पदरी एक वराहमिहिर होता . प्रसिद्ध वराहमिहिर श्री दीक्षित यांनी मानलेन्या काळानुसार संवत्कर्त्या विक्रमाच्या पदरी असू शकत नाही. हा मुद्दा सानें कलियुग अनैतिहासिक ठरविण्यासाठी वापरतात. पण दीक्षित यावर एवढेच म्हणतात की विक्रमाच्या पदरी कोणी वराहमिहिर असेल तर तो प्रसिद्ध वराहमिहिराहून भिन्न आहे. ज्योतिर्विदाभरण ग्रन्थात कालिदास देखील विक्रमाच्या पदरी असल्याचे म्हटले आहे.पण कालिदासाच्या मालविकाग्निमित्र या नाटकाच्या भरतवाक्यावरून हे नाटक खिस्तपूर्व १५० च्या सुमारास झालेल्या अग्निमित्र शुंगाच्या कारकीर्दीतले आहे हे स्पष्ट होते. कलियुग खोटे ठरविण्यासाठी अशा ग्रन्थाचा आश्रय घ्यावा लागतो यावरून त्यांचे प्रतिपाद्य किती ठिसूळ आहे याची कन्पना होते.

कलियुगाला कल्पारम्भ हा शब्द कोठे वापरलेला आहे हे साने दाखवून देतील काय?

मेग्यासथेनिसच्या काळात काही पुराणेही अस्तित्वात आली असे सान्यांनी विधान केले आहे त्याचा आधार काय? पुराणांची रचना वेदव्यासकालीच सुरू झाली व महाभारताप्रमाणेच त्यात भर पडत गेली ती यादवकालापर्यन्त. म्हणून विल्सनने भागवत यादवकालातले ठरविले आहे.यासम्बन्धी कोल्हटकरांचा भागवताचा उपसंहार हा ग्रन्थ पहावा.

वैद्यांनी हीरॅक्लीझला हरि ठरविले आहे ते हीरॅक्लीझ हा शौरसेनी लोकांचा देव आहे या मेग्यासथेनिसच्या वचनावरून. तेव्हा मेगैस्थेनिसने दिलेल्या नावाचे भारतीयकरण करून हीरॅक्लीझला हरि ठरविले आहे हा आक्षेप निराधार आहे

चन्द्रगुप्तास मोठेपणा देण्यासाठी मेगेस्थेनिसने त्याचा सम्बन्ध झेऊस या देवतेच्या पुत्राबरोबर लावला या विधानाचा आधार दिलेला नाही.वैद्यांनी उल्लेखिलेल्या स्थळी असा काही उल्लेख नाही.

वैद्यांनी पुराणामधील माहिती अविश्वसनीय मानून मेगॅस्थेनिसवर विश्वास ठेवला असा सान्यांचा आरोप आहे. कलियुग पुराणाच्या आधाराने सिद्ध होते असेच वेद्यांचे म्हणणे आहे. मेगैस्थेनिसच्या वेळी आजची हजारो वर्षे नन्तरची माहिती देणारी पुराणे नव्हती त्यामुळे मेगॅस्थेनिसच्या माहितीचे महत्व आहे.

साने वायुपुराणाचा दाखला देतात. आज उपलब्ध असलेल्या पुराणातील माहिती असम्बद्ध आहे. कलियुगाशी मेळ जमविण्यासाठी अयुतायूला हजार वर्षांचे आयुष्य दिलेले आहे.महाभारताच्या तीन आवृत्या जशा निश्चित झालेल्या आहेत तशा प्रत्येक पुराणाच्या झाल्याशिवाय पुराणांचे आधार फारसे उपयुक्त होणार नाहीत कल्हणाच्या काळी अकराव्या शतकात जी पुराणे उपलब्ध होती त्यातील वंशावळि कलियुगारम्भापर्यन्त जात होत्या. त्या कल्हणाने दुरूस्त केल्या असा मुद्दा वैद्यांनी माण्डला आहे तिकडे सान्यांनी पूर्ण दुर्लक्ष केले आहे. पाण्डवांचा काळ पुराणातील वंशावळीवरून ठरतो असे कल्हणाने स्पष्ट म्हटले आहे पण पुराणांनी सोगितलेली वंशावळ ६५३ वर्षांनी चुकली आहे म्हणून पाण्डवांचा काळ ६५३ वर्षांनी अलीकडे आणला पाहिजे असे तो म्हणतो

तात्पर्य कलियुग भारतीय युद्धावरून न ठरता ज्योतिर्गणितावरून ठरविला गेला या मताला इतिहाससाच्या मूलस्रोतात काही आधारच नाही.

अनेक संशोधक राशींची कल्पना आपण ग्रीकाकडून घेतली असे मानतात असे साने म्हणतात- अनेक संशोधक आर्य नाचाचे कोणी लोक होते व ते भारताबाहेरून आले असेंही म्हणतात या म्हणण्याचे संशोधामूल्य शून्य आहे हे मी दाखवून दिले आहे. ते आता अमेरिकन विश्वकोश व एडविन ग्राण्ट साख्या संशोधकांना पटले आहे

ग्राण्टने माझ्या पुस्तकाचा चौदा वेळा उल्लेख केला आहे.

ऋग्वेदाबद्दल अज्ञानी असलेल्या संशोधकांची मते न सांगता ऋग्वेदाचा अभ्यास केलेल्या कोणत्याही विद्वानाला मी दाखविलेले उल्लेख दाखवावे व हे राशीचे उल्लेख आहेत की नाहीत हे विचारावे.



वेदाङ्ग ज्यौतिषातील उत्तरायणाचा उल्लेख प्रक्षिप्तआहेअसे म्हणून मॅक्समूलरने त्याचा काळ खि. पू हजारच्या सुमाराचा ठरविला आहे. कीथने दीक्षिताचा कृत्तिकांच्या आधारे केलेला युक्तिवाद फलज्यौतिषीय म्हणून मूर्खपणाचा ठरविलेला आहे

सान्यांची टीका त्याच जातीची आहे. उदाहरणार्थ

१ राशींची संख्या भारतीय असती तर नक्षत्र संख्येस राशिसंख्येने निःशेष भाग गेला असता

वेद व भारतीय युद्धकालीन खगोल पूर्णपणे सामान्य प्रत्यक्षावर आधारलेला होता. त्यात दुर्बिण व गणित याचां वापर नव्हता. त्यामुळे सान्यांची वरील अपेक्षाअवास्तव आहे.

२ पौर्णिमेचे नक्षत्र व मासनाम यांची नेहमी सांगड बसतेच असे नाही ही तर अजूनही बसत नाही

३ राशि या शब्दाचा क्रान्तिवृत्ताचा भाग या अर्थी उल्लेख आलेला नाही नसेना. यावरून रामायणाच्या मूळ ग्रन्थात कर्क राशीचा उल्लेख नव्हता हे कसे सिद्ध होईल?

आम्ही राशि ग्रीकापासून घेतल्या असे म्हणणाऱ्यांनी कोणत्या ग्रीक ग्रन्थात राशि प्रथम आल्या त्याचे नाव व काल सागाचा व त्यातील राशि वरील अपेक्षा पूर्ण करतात असे दाखवून द्यावे. तसेच त्याकाळी ग्रीकांचा व आपला त्यांच्या ग्रन्थांचे ज्ञान होण्याइतका सम्बन्ध आला होता हे सिद्ध करावे

राशीबद्दल दीक्षिताचे पुढील विधान मननीय आहे

वर्षाचे दिवस ३६० आहेत आणि सौरवर्षाचे बरोबर बारा विभाग म्हणजे बारा सौर मास; महिन्याचे तीस दिवस आणि दिवसाच्या साठ नाडिका ही कालमाने आहेत तर मग यावरून सहज सुचणारे वर्तुळाचे राश्यादि विभाग ठरविणे ही कल्पना स्वतन्त्रपणे प्रवृत्त झाली हे निर्विवाद आहे.

श्री वऱ्हाडपाण्डे यांची काही गृहीते वादातीत नाहीत असेच म्हणावे लागेल ही सान्यांची व्यथा आहे.

वेद रामायण व महाभारत हे ग्रन्थ गेल्या दोन हजार वर्षात कोणत्या तरी स्वरूपात उपलब्ध आहेत याशिवाय या क्षेत्रात काय वादातीत आहे हे साने सांगतील काय?

माझ्या ऋग्वेदावरील ग्रन्थातल्या गणितास श्री वऱ्हा डपाण्डे यांचे गणित म्हणून साने सम्बोधीत आहेत मी कोणतेही गणित केले नाही. माझ्या ऋग्वेदकालावरील पुस्तकातले गणित गणितात पहिल्या वर्गात एम एस सी झालेल श्री ब.वा. देशपाण्डे, यांनी केले आहे. राघवन् यांनी केलेल्या गणिताचे कात्रण मी सान्यांना पाठविले होते हे त्यांना स्मरतच नाही. यावरून राघवन् सारख्या संशोधकांच्या लिखाणाला ते किती किंमत देतात हे स्पष्ट होते. या पुस्तकातील गणित श्री होले यांनीही तपासले होते. श्री अभ्यंकर यांच्याकडेही हे पुस्तक अभिप्रायास पाठविले होते.अभ्यकरांचे उत्तर आले होते. त्यांनी या ग्रन्थातील गणितावर काही आक्षेप घेतले नाहीत.

प्रत्यक्ष महाभारतात युद्धारम्भ व भीष्मनिधान यात ६७ दिवसांचे अन्तर होते असे

वेदाङ्ग ज्यौतिषातील उत्तरायणाचा उल्लेख प्रक्षिप्तआहेअसे म्हणून मॅक्समूलरने त्याचा काळ खि. पू हजारच्या सुमाराचा ठरविला आहे. कीथने दीक्षिताचा कृत्तिकांच्या आधारे केलेला युक्तिवाद फलज्यौतिषीय म्हणून मूर्खपणाचा ठरविलेला आहे

सान्यांची टीका त्याच जातीची आहे. उदाहरणार्थ

१ राशींची संख्या भारतीय असती तर नक्षत्र संख्येस राशिसंख्येने निःशेष भाग गेला असता

वेद व भारतीय युद्धकालीन खगोल पूर्णपणे सामान्य प्रत्यक्षावर आधारलेला होता. त्यात दुर्बिण व गणित याचां वापर नव्हता. त्यामुळे सान्यांची वरील अपेक्षाअवास्तव आहे.

२ पौर्णिमेचे नक्षत्र व मासनाम यांची नेहमी सांगड बसतेच असे नाही ही तर अजूनही बसत नाही

३ राशि या शब्दाचा क्रान्तिवृत्ताचा भाग या अर्थी उल्लेख आलेला नाही नसेना. यावरून रामायणाच्या मूळ ग्रन्थात कर्क राशीचा उल्लेख नव्हता हे कसे सिद्ध होईल?

आम्ही राशि ग्रीकापासून घेतल्या असे म्हणणाऱ्यांनी कोणत्या ग्रीक ग्रन्थात राशि प्रथम आल्या त्याचे नाव व काल सागाचा व त्यातील राशि वरील अपेक्षा पूर्ण करतात असे दाखवून द्यावे. तसेच त्याकाळी ग्रीकांचा व आपला त्यांच्या ग्रन्थांचे ज्ञान होण्याइतका सम्बन्ध आला होता हे सिद्ध करावे

राशीबद्दल दीक्षिताचें पुढील विधान मननीय आहे

वर्षाचे दिवय ३६0 आहेत आणि सौरवर्षाचे बरोबर बारा विभाग म्हणजे बारा सौर मास; महिन्याचे तीस दिवस आणि दिवसाच्या साठ नाडिका ही कालमाने आहेत तर मग यावरून सहज सुचणारे वर्तुळाचे राश्यादि विभाग ठरविणे ही कल्पना स्वतन्त्रपणे प्रवृत्त झाली हे निर्विवाद आहे.

श्री वऱ्हाडपाण्डे यांची काही गृहीते वादातीत नाहीत असेच म्हणावे लागेल ही सान्यांची व्यथा आहे.

वेद रामायण व महाभारत हे ग्रन्थ गेल्या दोन हजार वर्षात कोणत्या तरी स्वरूपात उपलब्ध आहेत याशिवाय या क्षेत्रात काय वादातीत आहे हे साने सांगतील काय?

माझ्या ऋग्वेदावरील ग्रन्थातल्या गणितास श्री वऱ्हा डपाण्डे यांचे गणित म्हणून साने सम्बोधीत आहेत मी कोणतेही गणित केले नाही. माझ्या ऋग्वेदकालावरील पुस्तकातले गणित गणितात पहिल्या वर्गात एम एस सी झालेल श्री ब.वा. देशपाण्डे यांनी केले आहे. राघवन् यांनी केलेल्या गणिताचे कात्रण मी सान्यांना पाठविले होते हे त्यांना स्मरतच नाही. यावरून राघवन् सारख्या संशोधकांच्या लिखाणाला ते किती किंमत देतात हे स्पष्ट होते. या पुस्तकातील गणित श्री होले यांनीही तपासले होते. श्री अभ्यंकर यांच्याकडेही हे पुस्तक अभिप्रायास पाठविले होते.अभ्यकरांचे उत्तर आले होते. त्यांनी या ग्रन्थातील गणितावर काही आक्षेप घेतले नाहीत.

प्रत्यक्ष महाभारतात युद्धारम्भ व भीष्मनिधान यात ६७ दिवसांचे अन्तर होते असे



स्पष्ट म्हटलेआहेअशी साने ग्वाही देतात.

महाभारतात भीष्मनिधनाचा दोन ठिकाणी उल्लेख आहे एका टिकाणा,ी ६७ दिवसांचा उल्लेख आहे पण रोहिणी नक्षत्राचा उल्लेख नाही दुसऱ्या ठिकाणी रोहिणी नक्षत्राचा उल्लेख आहे पण ६७ दिवसांचा उल्लेख नाही. महाभारतातील उल्लेख हजारो वर्षाच्या अन्तराने केले असल्याळे त्यात संगति असेलच अशी अपेक्षा करता येत नाही.

तथापि युद्ध मार्गशीर्षात सुरू झाले असे मानले तरी होल्यानी आधारास घेतलेल्या श्लोकातही भीष्म ५८ रात्री शरपंजरी होता असे म्हणण्यास बाध येत नाही

रामाचा जन्म चैत्रात झाला व त्यावेळी चैत्र हा हिवाळयाचा शेवटचा महिना होता; पौष हा हेमन्ताचा पहिला महिना होता व भाद्रपद हा पावसाळयाचा पहिला महिना होता असे रामायणात स्पष्ट उल्लेख आहेत.बाकी उल्लेख सान्यांचे निर्दोष गणित करण्या इतके काटेकोर नाहीत.ऋतूंची वरील स्थिति कोणता काळ दाखविते हे सान्यांनी सांगावे

महाभारतकाळी दर पाच वर्षात दोन अधिक मास येत असत या सान्यांच्या वाक्यात महाभारत व भारतीययुद्ध या दोघातील घोटाळा पुनः स्पष्ट झाला आहे. दोन अधिक मास घेण्याची पद्धत वेदाङ्ग ज्यौतिषातील आहे. कलियुगारम्भी हीच पद्धति होती असे साने गृहीत धरतात हा भाबडेपणा आहे.महाभारताचा हा भाग वेदाङ्गज्यातिषकाली लिहिला गेला हे स्पष्ट आहे. ऋग्वेदात अगोह्य नावाचा अधिक मास आहे. तो कसा घेत असत हे साने सांगतील काय?

भीष्मनिधनाच्या वेळी अधिकमास येणे शक्य नाही असे साने सांगतात. होल्यांनी काढलेल्या काळी अधिक मास येऊ शकत नाही असे त्यांचे म्हणणे.साध्या डोळयांनी पाहणाऱ्या माणसाला याकाळी वृश्चिक राशीत दोन पौर्णिमा दिसणे शक्य नाही हे साने गणिताने सिद्ध करू शकतील काय? अभ्यंकराक्डे ही मी हीच मागणी केली होती. ती त्यांनी तो क्षयमास होता म्हणून उडवून लावली. हे पत्र मी सान्यास दाखविले होते. हा क्षयमास त्यांनी मान्य केला नव्हता ,,

कोरवांचे माण्डलिक राजे युद्धभूमीवर एक महिना रिकामे बसून राहिले हे तर्कास न पटणारे आहे

हे सान्यांचे वाक्य युद्धाबद्ददलचे अज्ञान दाखविते.ओरंगजेबाचा तळ महाराष्ट्रात २७ वर्षे होता. या सत्तावीस वर्षात सैनिकांचा महिनोगणती वेळ छावणीतच जात नसेल काय? २७ वर्षे रोज लढाई होणे सम्भाव्य आहे काय?

बाणभट्टाने त्यावेळचे सैन्य रोजी सोळा मैल मजल मारीत असे लिहिले आहे. कोरवांच्या पुष्कळशा सेना कुरूक्षेत्राच्या उत्तर पश्चिम भागातून आलेल्या होत्या. त्यापैकी काहींना पार करावे लागलेले अन्तर निदान नागपूर ते कुरुक्षेत्र एवढे तरी असणार. त्यावेळची वाहने व पायदळ बहुतेक चालतच प्रवास करीत असावे हे लक्षात घेता प्रवासाला किती वेळ लागेल व आल्यावर शिबिरे उभारणे किती दिवस चालले असेल याची कल्पना करा. सैन्य स्वतःची शिबिरे स्वतच उभारते. दुर्योधनाने ती त्यांच्यासाठी आयती बान्धून ठेवलेली होती अशी कल्पना सर्वसाधारण सैनिक व्यवहाराला सोडून आहे

साने यांनी जे निर्दोष गणित दिले आहे त्याचा पाया काय आहे हे दिलेले नाही

मी माझ्या पुस्तकाच्या पृष्ठ ७ वर रामजन्माच्या तिथीपासून भीष्मनिधनाच्या तिथीपर्यन्त किती वर्षे गेली असतील याचे गणित श्री होले व श्री देशपाण्डे यांच्या मार्गदर्शनाखाली केले ते ज्योतिर्गणिताचे पूर्ण अज्ञान दर्शविते असे साने यांचे म्हणणे आहे

असे असेल तर श्री साने यांनी चन्द्रग्रहणावरून भारतीय युद्धाचा काळ

काढण्याचा प्रयत्न केला आहे यावरून त्यांचे ज्योतिर्गणिताबद्लचे प्राथमिक अज्ञान प्रकट होते असे का म्हणू नये? तीच तीच ग्रहणे दर १९ वर्षानी येतात हे यात पार विसरले आहे.भारतीय युद्धाचा काळ ठरविण्यासाठी अयनचलन हाच एकमात्र खगोलीय आधार असू शकतो. सान्यांनी ज्यात युद्धाचा उल्लेखच नाही अशा एका श्लोकाचा चुकीचा अर्थ लावून त्याचा काळ १०० वर्षानी चुकीचा काढला आहे. बाकीचे विवेचन चन्द्रग्रहण व फलज्यातिषीय उल्लेख यांच्या विवेचनातच वाया गेले आहे.

श्री अभ्यंकरांनी आजच्या रथसप्तमीवरून भीष्मकालीन माघ शुक्ल अष्टमीपर्यन्त किती वर्षे गेली याचे गणित केले आहे ते सिमला सेमिनारमध्ये त्यांनी वाचलेल्या निबन्धात दिले आहे. तेही ज्योतिर्गणिताचे अज्ञान दर्शवीत असावे

मी ज्योतिर्गणिताचाच काय कोणत्याही शास्त्राचा तज्ज्ञ असल्याचा दावा करीत नाही. .केवळ तिथीवरून केलेले उत्तरायणाचे गणित चूक असू शकते हे मला माहीत आहे- पण ते जर परम्परा, वंशावळि; इतर ज्योर्तिषयक उल्लेख; पुरातत्व; महाभारताच्या तीन आवृत्यांचे काल ; अभिमन्यु रामानन्तर ३२ पिढया नन्तर झाला,.यार्दी यांची भाषासांख्यिकी, ग्रीक वृत्तान्त वगैरे सर्व प्रमाणाशी जुळत असेल तर उपोद्बलक प्रमाण म्हणून वापरण्यास हरकत नसावी.

साने यांनी ग्रेगॅरियन कॅलेण्डरप्रमाणे खिस्तपूर्व २३ डिसेमम्बर ३१०१ या रोजीचेआकाश भीष्मनिर्याणतिथीशी जुळत नाही त्याअर्थी भारतीय युद्ध कलियुगारम्भी झाले नाही असा युक्तिवाद केला आहे. महाभारतातील विधाने तारीख महिना व वर्ष ठरविण्याइतकी काटेकोर आहेत असे साने समजत असतील तर त्यांच्या भाबडेपणाचे कोतुकच करावे लागेल महाभारतात भारतीय युद्ध कलिद्वापराच्या सन्धीत झाले एवढेच म्हटले आहे. हा सन्धि २०० वर्षांचा होता. गदायुद्ध झाले तेव्हा कलियुग सुरू झाले नव्हते असे महाभारतात वचन आहे.तेव्हा या दोनशे वर्षातील कोणतेच उत्तरायण महाभारतातील भीष्मनिधन तिथीशी जुळत नाही हे साने यांनी सिद्ध करावे.माघ महिन्याचा आग्रह धरला नाही तर महाभारतातील उत्तरायणाचे वर्णन कलियुगाच्या सीमेत मोडते हे अभ्यंकरांना मान्य आहे. महाभारतातील वर्णनात असलेला माघ महिना वेदाङ्गज्यौतिष कालात घुसडला गेला असे अभ्यंकर म्हणतात. महाभारताच्या तीन आवृत्या झाल्या तेव्हा त्यातील ज्यौतिषीय परिभाषेत देखील बदल केला गेला हे विसरून महाभारतातील ज्यौतिषीय विधानांचा अर्थ लावताना परिभाषेचा आग्रह धरता येत नाही

दुसरे असे की भारतीय युद्धाचे वर्ष ठरविण्यासाठी उपयोगी पडतील असे लक्ष श्लोकांच्या महाभारतात अवघे दोन सन्दिग्ध श्लोक आहेत. त्यामुळे ज्यौतिष हे महाभारताचा काळ ठरविण्यास अत्यन्त बेभरवशाचे साधन आहे. शस्त्रास्त्रांचा पुरातत्वीय पुरावा हा सगळयात भक्कम पुरावा आहे व तो सर्वस्वी कलियुगाचे समर्थन करतो एवढेच नव्हे तर वेदापासून बुद्धकालापर्यन्तच्या कालाची उकल करू शकतो.



रामजन्माच्या तिथीवरून मी काढलेल्या काळावर साने यांनी फज्योतिषीय उल्लेख वापरून टीका केली आहे मी माझ्या पुस्तकात फलज्यौतिषीय आधार गाळले पाहिजेत असे स्पष्ट म्हटले आहे.

मी ठरविलेला ऋग्वेदाचा काळ वेदज्ञांनी तपासून पहावा असे म्हणून साने यांनी हात झटकले आहेत कारण? मला ऋग्वेदाची भाषा समजत नाही असे ते म्हणणार महाभारताची भाषा समजण्याची जरूर नाही कारण महाभारताची मराठी भाषान्तरे सर्वत्र उपलब्ध आहेत. व महाभारताच्या भाषान्तराबद्दल वाद नाहीत.पण ऋग्वेदाबद्दल ज्यांनी ज्योतिर्गणितीय संशोधन केले आहे त्यांनी आपल्या आधारभूत वाक्यांची भाषान्तरे दिली आहेत. असे करणाऱ्यात लो.टिळक चिं.वि.वैद्य शं.बा.दीक्षित ,अभ्येकर व जॅकोबी प्रमुख आहेत- त्यांनी मी सांगितलेल्या वेदकालाचीच पुष्टि केलेली आहे

वेदकालाचा विचार केल्याशिवाय भारतीय युद्धकालाचा विचार करता येणार नाही कारण महाभारताचा कर्ता व्यास हा भीष्माचा सावत्र भाऊ होता.व्यासांचा काका देवापि याने ऋग्वेदाचे पर्जन्य सूक्त रचले आहे

ऋग्वेदाच्या कालाप्रमाणेच ब्राह्मणांचा विचार देखील भारतीय युद्धकालाचा विचार करताना आवश्यक आहे.ऐतरेय ब्राह्मणात द्रुपदाचा उल्लेख आहे ऐतरेय ब्राह्मण शतपथ ब्राह्मणापेक्षा जास्त अर्वेचीन असू शकत नाही. शतपथ ब्राह्मणाचा काळ दीक्षितांनी खिस्तपर्वू ३००० असा निर्णायकपणे ठरविला आहे. ज्योतिर्गणिताच्या आधारावर ठरविलेल्या काळात यापेक्षा जास्त अचूक कालनिर्णय कोठेही नाही.

ब्राह्मणानन्र उपनिषदे. छान्दोग्य उपनिषदाचा काळ टिळकांनी खि.पू १६०० च्या आधीचा ठरविला आहे.यात कृष्णाय देवकीपुत्राय या शब्दात महाभारतीय कृष्णाचा स्पष्ट उल्लेख आहे.

सान्यांचा आग्रह फक्त ज्योतिर्गणतावर अवलम्बून राहायचा असला तरी त्यांना वरील सर्व सिद्धान्त खोटे ठरवावे लागतील

जाता जाता विगामी तर्कशास्त्राच्या काही प्राथमिक तत्वांची आठवण करून देत आहे

१ जो सिद्धान्त इतरांनी माण्डलेल्या सिद्धान्ताशी सगळयात जास्त जुळतो त्याची सत्यता अधिक सम्भाव्य आहे.

२ जो सिद्धान्त इतर सिद्धान्ताशी जुळत नसेल त्याने इतर सिद्धान्तांचे खण्डन केल्याशिवाय त्याची स्वीकार्यता फारशी मानता येत नाही.

३ कोणतेही प्रमाण दुसऱ्या प्रमाणापेक्षा श्रेष्ठ नसते. सगळया प्रमाणांची संगति ज्यात लागत नाही तो सिद्धान्त नसून मत असते.

Biodata of Dr. N.R.Waradpande

| | |
|---|---|
| Date of Birth | 25/2/1921 |
| Qualifications | Passed all the regular University Examinations in the first division.<br>M.A( B-A-Hons).( Sanskrit) M.A.( Philosophy) B.Litt.(Oxford)( Psychol;ogy) Ph-D.(Philosophy) D.Litt.( Indology) Shasri ( Darshan) Kavyateertha |
| Medals | Prakhya Ganpatrao Gold Medal for standing first in the whole university in B,A,( hons)Arts& B.A.(Hons) Science |
| Scholarships | (1) The King Edward Memorial Scholarship for research in Indian Logic.<br>(2) Government Scholarship for studying Psychology at Oxford |
| Foreign Travel | On the recommendation of Prof. Yeaxlee of Oxford the Government sanctioned educational tour to Psychology laboratories in Europe. The summer of 1947 was spent on the continent in the laboratories of Denmark, Holland,Belgium, France. Switzerland and Italy with intensive discussions with the experts there. Prof Rubin of Copenhegan university took special interest in my work<br>I had the opportunity to have extensive discussions with the world famous philosopher Bertrand Russell. An account of the discussion with him on the Concept of Infinity has been published in my book *vivekvada* . The University of Thailand was visited to study how highest technical education was imparted in the Thai language and how the problem of indegenization of technical vocabulary etc was solved |
| Posts held | (1) Lecturer in Sanskrit& Philosophy in colleges affiliated to Nagpur and Sagar Universities<br>(2)Retired from the Defence .Research & .Development Organization of the Government of India as Chief Psychologist and Director of Psychological Research. |
| Honarary | (1)President of the Sanskrit Bhasha Pracharini Sabha<br>(2) Editor of the Sanskrit weekly: Bhavitavya. |
| Felicitations | (1)Was felicited by the Government of Maharashtra with an award of Rs 10000 for service to Sanskrit<br>(2) Felicited by the President of India Shri Shankar Dayal Sharma and awarded the prestigious Shevade prize for the book "The Mythical Aryans& their Invasion<br>(3 )Sarathi award for outstanding contribution to Indology |
| Publications | English<br>(1) Abilities& Education(2) Time Space & Motion(3)Intelligence Test Scores of Candidates at the selection Boards (4 )The Mythical Aryans & their Invasion (5) The Nemesis of Nehru Worship<br>Marathi<br>(1) सत्तावनचे स्वातन्त्र्ययुद्ध आणि त्याचे निन्दक; |

(2) विवेकवाद
(3) भंपकराव बाताडे व इतर गोष्टी
(4) नेहरू आणि नेहरूवाद
(5) कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या

All the Books have received glowing reviews in standard journals' Extracts from reviews appearing in foreign journals have been given below

The book *vivekvada* contains a facsimile of Russell's letter where he describes my writings "competent" and "of considerable merit"

Abilities & Education

Prof .Sorenson writes in Contemporary Psychology May 64 published by the American Psychology Association
"The discussion of the topic " A Search for Common Elements" is a very able one and centres our attention on one of the most basic but usually overlooked means for improving both learning and living. It can be reported that Waradpande writes English very clearly and effectively"

Prof McElwain writes in the Australian Journal of Pschologyy vol 15
"The tremendous skill and the vast store of accumulated knowledge about human behaviour of Oriental thinkers has generally been rarely recognised in Western cultures. Dr, Waradpande's book is an introduction to such thinking. He himself bridges the gap between the current trends of Oriental and Occidental thinking about human behaviour, being skilled in both."

Intelligence Test scores of Candidates at the Services Selection Boards

The British Journal of Occupational Psychology writes:
"The book can be commended as admirably painstaking and impartial Psychological/ statistical study."

Impact of Dr. Waradpande's writings

(1)His D.Litt thesis on The Mythical Aryans & their Invaasion has influenced subsequent writings in the field. Lexicon the American encyclopedia in 21 volumes has stated clearly that positing an Aryan race on the basis of linguistic arguments is little better than speculation and there is no evidence that the Vedic culture has its roots in places other than North India.

The U.P. and Madhyapradesh governments had revised the account of Aryans in current textbooks to state that the theory of the Aryan Race and its invasion of India is only one of the many theories in the field.

( 2) His Magnum Opus on Rationalism which was commended by Bertrand Russell has influenced several thinkers and he is often invited for giving an exposition of his views by noted institutions.